



# कथांतर



## समकालीन जागतिक कथा



संपादन
सुनंदा विद्यासागर महाजन व अनघा भट



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# कथांतर

## समकालीन जागतिक कथा

संपादन:
सुनंदा विद्यासागर महाजन व अनघा भट

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

एच/१००
१

➤ **पुस्तकाचे नाव :**

कथांतर – समकालीन जागतिक कथा

➤ **संपादक :**

**सुनंदा विद्यासागर महाजन व अनघा भट**

➤ **प्रथमावृत्ती :** २०१७

➤ **प्रकाशक :**

**सचिव,**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवीन्द्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०००२५.

➤ **© प्रकाशकाधीन :**

➤ **मुद्रक :**

**व्यवस्थापक,**
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे-४११ ००१.

➤ **किंमत :** रुपये १५९/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकांची असून या मतांशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे निवेदन

बोलणं, ऐकणं आणि निरीक्षण करणे या माणसांच्या जगण्यातल्या महत्त्वाच्या बाबी आहेत. सुरुवातीच्या काळात भाव-भावनांचे आविष्कार व्यक्त करण्यासाठी माणूस विविध आवाज काढू लागला. त्यातूनच शब्द गीतांची निर्मिती होत गेली. अनुभवांचे चित्रण करण्यासाठी त्यानं निसर्गातल्या पानफुलांच्या रंगाद्वारे गुहेत, खडकावर चित्रं काढली. खडक फोडून मनातल्या आकृत्या गुहेत निर्माण करू लागला. यातून खडक शिल्पे तयार होत गेली. हे सर्व मानव निर्मितीचे आविष्कार होते.

माणसाने आपले अनुभव दुसऱ्यास सांगणे म्हणजे ही मौखिक परंपरेची सुरूवात होती. वडीलधाऱ्या माणसानं, आजूबाजूला बघितलेला अनोखा-अद्‌भूत अथवा नवीन अनुभव, जवळच्याला सांगणं ही मौखिक परंपरेची सुरूवात होती. आजोबा-आजीनं नातवांना सांगितलेल्या या गोष्टी, चुटके सांगत. हा मौखिक साहित्याचा श्रीगणेशा होता. ह्या गोष्टी पुढे विषय आणि कथन शैलीने विस्तारत जाऊन त्यास कथा हे प्रचलित रूप प्राप्त झाले.

कथा सांगणं आणि कथा ऐकणं हा माणसांचा उपजत गुण आहे. मनात आलेल्या भाव-भावना व्यक्त करताना तो जे बघतो, अनुभवतो ते दुसऱ्यास सांगावं या विचाराने तो अनुभव लिहू लागला आणि त्यात जीवनानुभवाचे विविध प्रतिबिंब कथा साहित्यात उमटत जावून हा एक महत्त्वाचा साहित्य प्रकार वाचकांत लोकप्रिय होत गेला.

मुद्रण कलेच्या शोधानंतर गेल्या दोनशे वर्षात लिहिलेले साहित्य छपाई स्वरूपात वाचकांना उपलब्ध होऊ लागल्याने साहित्य प्रसार सुलभतेने होऊ लागला. त्याचबरोबर एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत रुपांतराची प्रक्रियाही सुरु होऊन परभाषेतील अक्षरधनाचा खजिना भाषांतराच्या माध्यमातून उपलब्ध होत गेला. यातून परदेशी भाषांतील साहित्य मराठी भाषेत भाषांतर-रुपांतर स्वरुपात आले. यातून जगप्रसिद्ध साहित्यिकांची ओळख होत गेली. भाषांतर कला ही एका भाषेतून दुसऱ्या भाषेची ओळख करून देणारी भाषांतर हा भाषा व्यवहारातील एक महत्त्वाचा पूल ठरला. या क्षेत्रात अनेक संस्था, व्यक्तिंनी महत्त्वाचे काम केले आणि करत आहेत.

अलिकडच्या काळात 'केल्याने भाषांतर' या नियतकालिकाने समकालिन जागतिक कथेची ओळख मराठी वाचकांना करून देण्याचे फार महत्त्वाचे काम केले आहे. त्या कामाचे दृश्यरूप म्हणजे सुनंदा विद्यासागर महाजन व अनघा भट यांनी संपादित केलेला 'समकालिन जागतिक कथा' संग्रह होय. गेल्या पन्नास वर्षात प्रकाशित झालेल्या विविध परकीय भाषांतील कथांची निवड इथे केली आहे. १९६० नंतरच्या या कथा म्हणजे बदलत्या समाजजीवनाचं वास्तव चित्रित करताना भंगलेल्या आदर्शाचे आणि भ्रष्ट होत चाललेल्या जीवनाचं प्रतिबिंबच ठळक होत आहे. व्यक्तिगत स्वार्थामुळे विसविशीत होऊन परस्परात तुटत जाणारे नातेसंबंध जसे आढळते, तसे जगण्याचा संघर्षही इथे जागो जागी आढळतो. स्वार्थामुळे ढासळत जाणाऱ्या नैतिकेसोबत माणसांच्या मनोवस्थांचे चित्रणही दिसते.

या समकालिन जागतिक कथा जर्मनी, स्पॅनिश, फ्रेंच, पोलिश आणि जपानी भाषेतून थेट मराठीत भाषांतरीत झाल्या आहेत. बरेचदा आपण इंग्रजीतून भाषांतरीत झालेले साहित्य वाचत असतो; पण या संग्रहातील कथा मूळ भाषेतून मराठीत आल्याने त्यांचे वेगळेपण आहे. असा हा वेगळ्या कथांचा संग्रह प्रकाशित करण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास उपलब्ध करून दिल्याबद्दल संपादकांचे आभार.

**बाबा भांड**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

# अनुक्रम


प्रस्तावना / सुनंदा विद्यासागर महाजन व अनघा भट / सात-एकोणीस
जाड मुलगी / मारी-लुईझं काश्निट्स / सुनंदा विद्यासागर महाजन / १
उजवा हात /अलिक्सांदर सलज्हिनीत्सिन / अनघा भट / १२
पाळीव / फ्रान्त्स होलर / विद्यासागर महाजन / ३०
डिसेंबरात दोघेजण / यूरी कझाकव / मेघा पानसरे / ४२
येसिकाच्या शोधात / रूथ रेमान / सुनंदा विद्यासागर महाजन /५५
तुला नूडल्स हव्यात?/ राल्फ रोथमान/ विद्यासागर महाजन /७२
छोटी डायरी / आन-गाएल बाल्प / प्रसाद ग. बर्वे / ९३
ज्हाना / आन्द्रेइ गेलासीमव / अनघा भट / १००
पक्ष्यांसवे दूर / इल्झे बोसे / सुनंदा विद्यासागर महाजन / १२७
चामखिळाबद्दलचं पत्र / यासुनारी कावाबाता / निसीम बेडेकर /१५२
खोटं /अनातोली ग्रिगोऱ्येविच अल्येक्सिन / शुभा सोहोनी /१६६
पोरे / स्लावोमीर म्रोझेक / मंदार पुरंदरे /१७५
आमचं लोकशाहीवादी कुटुंब / माक्स फोन डेअर ग्र्यून/ शर्मिष्ठा खेर /१८२
आठवणीतील फोटो / जाँ ज्हाक सॉम्पे, रने गोसिनी /
नुपूर पोतनीस, सुदीप शिरोडकर / १८८
रुदोल्फिओ / व्हलेंतिन रासपूतिन / उज्ज्वला बर्वे / १९४
डॉक्टर मनोरंजन/ जीगफ्रिड लेन्झ / शर्मिष्ठा खेर /२११
अक्कल / मारी फ्लोरॉंस एरे / नीलिमा रड्डी / २१९
लाल कोश / कोबो आबे / निसीम बेडेकर / २३५
द स्वीचमॅन /खुआन खोसे आरेओला / विद्यासागर महाजन /२४२
दोन शब्द / इसाबेल आयेंदे / विद्यासागर महाजन / २५४

# प्रस्तावना

## समकालीन जागतिक कथा

कथा ही आपल्याला एक गोष्ट सांगत असते. घटित, म्हणजे घडून गेलेली घटना तिचा गाभा असतो. ती सांगणारा एक निवेदक असतो, त्याच्याशिवाय कथा सांगायला कोणी नसते, त्याच्याशिवाय कथा आकाराला येऊ शकत नाही. मग हा निवेदक कधी प्रथमपुरुषी असतो, म्हणजे कथेतील पात्रांपैकी एक असतो, किंवा तृतीयपुरुषी असतो, म्हणजे घडलेल्या गोष्टीच्या बाहेरचा. कथेतील 'मी' म्हणजे लेखक किंवा लेखिका नसते, मग भले त्याने सांगितलेल्या गोष्टीत आणि त्याच्या आयुष्यात घडलेल्या घटनेत कोणाला साम्य दिसो. पण त्याने एक रचलेली गोष्ट सांगितलेली असते. कादंबरीचा आवाका मोठा असतो, तर कथेचा जीव लहान असतो. तिच्यातून लेखकाला पूर्ण आयुष्याला गवसणी घालायला नाही जमले तरी आयुष्यातील एका छोट्या क्षणाला, एका छोट्या बाबीला भिडायची कथेची क्षमता नक्कीच असते. ही झाली आधुनिक कथेची काही वरवरची वैशिष्ट्ये. कथा माणसाच्या आयुष्यात फार पूर्वीपासूनच आहे. मराठीपुरते बोलायचे तर आजची आधुनिक कथा आज आहे त्या स्वरूपात विकसित होण्याआधी तिची कितीतरी लोकरूपे होती असे आपल्याला दिसेल. पुराणकथा, कहाणी, आख्यायिका, दंतकथा अशी. कधी ती एखाद्या देवाशी निगडित, तर कधी देवस्थानाशी, धार्मिक संदर्भ असलेली अथवा नसलेली, कधी ती एखाद्या नदीची गोष्ट असेल, तर कधी एखाद्या झाडाची असेल. अशा निसर्गाच्या शक्तीचे रूप दाखवणाऱ्या आख्यायिका आपल्याला माहीत असतात. ह्या पूर्वापार चालत आलेल्या गोष्टींपासूनच आजची आपली कथा विकसित होत गेली.देशोदेशीच्या किंवा भाषाभाषांमधील लोककथा याचीच साक्ष देतात. किंवा त्याआधीच्या इतिहासात डोकावून पाहायचे तर पुराणकथा, मिथककथा यांचे भांडार दृष्टीस पडते.

कथा म्हणजेच गोष्ट ही माणसाच्या जीवनात लहानपणीच प्रवेश करते. लहानपणी

जेवताना, निजताना ती सोबत करते. गोष्टीतील चिऊकाऊचा अवकाश मग हळूहळू रुंदावत जातो, आपल्याबरोबर आपली गोष्टही मोठी होत जाते. गोष्ट मात्र लागतेच, अगदी प्रत्येक टप्प्यावर. मग ती रंजन करते, कधी आयुष्यात न उमगलेल्या एखाद्या बाबीचा अर्थ उलगडून दाखवते, कधी कशाचं तरी रूपक होऊन येते, तर कधी चक्क उपदेशही करते. देशोदेशी, विविध संस्कृतींत,निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या समाजांमध्ये कथा हा वाङ्मयप्रकार अत्यंत लोकप्रिय आहे यात शंका नाही आणि रसिक वाचकाला आपल्या भाषेच्या मर्यादा ओलांडून इतर भाषांमधील कथा, मग ती प्राचीन असो वा अर्वाचीन, जुनी असो वा नवी, आधुनिक असो वा उत्तराधुनिक, पूर्वीच्या काळातील असो वा समकालीन अशी कथा ही वाचावीशी वाटतेच. म्हणूनच विविध भाषांमधील निवडक कथांचा हा संग्रह प्रस्तुत करावासा वाटला. त्यामागे आम्हा दोघींना असलेल्या 'केल्याने भाषांतर' या त्रैमासिकाच्या संपादनाची म्हणजेच भाषांतरित साहित्य संपादित करण्याच्या अनुभवाची पार्श्वभूमी आहे. 'केल्याने भाषांतर' हे एक परकीय भाषांमधून थेट मराठीत भाषांतरित केलेल्या साहित्याला वाहिलेले त्रैमासिक आहे. परकीय भाषांच्या अध्यापनाचा आणि त्या भाषांमधील साहित्याच्या वाचनाचा अनुभव असलेल्या आम्ही काही सहकारी मित्रांनी १९९९ च्या जानेवारीमध्ये ते सुरू केले. आपल्याला अवगत असलेल्या भाषेत वाचलेले उत्तमोत्तम साहित्य ती भाषा न येणाऱ्या मराठी वाचकांसाठी थेट मराठीत उपलब्ध करून द्यावे आणि त्याद्वारे मराठी साहित्यातही अल्पशी भर घालावी या प्रेरणेने आणि ध्यासाने सुरू केलेल्या ह्या उपक्रमाने आजवर अनेक वाचकांची मने जिंकली आहेत. आणि आज नुसत्या उपक्रमाच्या रूपातून बाहेर येत हे त्रैमासिक स्थिरावले आहे. त्याच्या जोडीने भाषांतराशी निगडित असे काही कार्यक्रमही उभे राहिले आहेत. भाषांतरित कथांचे अभिवाचन, भाषांतरित नाटकांचे प्रयोग, भाषांतरित साहित्याची पुस्तके, इ-बुक्स, ऑडिओ बुक अशा स्वरूपात भाषांतराच्या चळवळीला आम्ही आमच्या कामाला जोडून घेतले आहे.

भाषांतरित साहित्य वाचताना नकळत आपण त्याची आपल्या साहित्याशी तुलना करत असतो, साम्य आणि फरक शोधत असतो. काही विचार, काही भावना वैश्विक असतात, पण तशाच त्या खूप वेगळ्याही असतात. उदाहरणार्थ स्पॅनिश

भाषेतील एका लोककथेत ढगाची आणि रेतीची एक अनोखी प्रेमकहाणी सांगितली आहे. एक वाट चुकलेला ढग वाळवंटातील रेतीच्या प्रेमात पडतो आणि आपल्या अस्तित्वाची तमा न बाळगता तिच्यावर बरसतो आणि त्यामुळे वाळवंटात नंदनवन फुलते अशा आशयाची ही कथा आहे. मराठी भाषांतरात ती वाचल्यावर असे वाटले की प्रेमाला कुठलीही भाषा नसते म्हणतात, पण तरी प्रेम व्यक्त करायला एक भाषा लागतेच. प्रत्येक भाषेत त्या त्या भाषेला पेलणाऱ्या , ती भाषा बोलणाऱ्या समाजाला आणि संस्कृतीला साजेशा पध्दतीने साहित्यातून प्रेम व्यक्त होताना दिसते. प्रत्येक भाषेत भाव म्हणा, विचार म्हणा निराळ्या पध्दतीने सादर होत असतात. मग ती प्रेमासारखी वैश्विक भावना असो किंवा इतर कोणताही विचार असो. *'केल्याने भाषांतर'* या त्रैमासिकात प्रकाशित झालेल्या कथांवर आधारित एक कथा-अभिवाचनाचा कार्यक्रम २००६ साली आम्ही प्रथम सादर केला.त्या कार्यक्रमाची सुरुवात या स्पॅनिश प्रेमकथेने होत असे. ही अनोखी प्रेमकहाणी श्रोत्यांना मनापासून आवडायची आणि तिच्या जोडीने सादर झालेल्या फ्रेंच, रशियन, जर्मन, जपानी, मेक्सिकन- स्पॅनिश अशा विविध भाषांमधील गोष्टीही श्रोत्यांच्या पसंतीला पडत. ह्या *'तिकडून आणलेल्या गोष्टी'* या कार्यक्रमासाठी कथांचा गुच्छ जुळवताना आम्ही विषयवैविध्याच्या, आशयाच्या अनोखेपणाच्याबरोबरच कथांची अभिवाचनीयताही लक्षात घेतली होती. *'तिकडून आणलेल्या गोष्टी'* हे *'केल्याने भाषांतर'* चे जणु श्राव्य रूप होते. त्यावरूनच निवडक जागतिक कथांचा संग्रह करावा अशी कल्पना पुढे आली.

मराठीतील भाषांतराच्या परंपरेवर नजर टाकली तर एक लक्षात येते की परदेशी भाषांमधील अभिजात साहित्य फार मोठ्या प्रमाणात मराठीत आले आहे. शेक्सपिअर तर आजही भाषांतरकारांना खुणावत आहे, ग्योथे, दस्तएवस्की , चेखव, मोपासाँ ही इतर भाषांमधील अभिजात साहित्याच्या लेखकांची काही उदाहरणे सांगता येतील. परंतु समकालीन साहित्य आपल्या वाचनात येण्यासच पूर्वी बराच काळ जावा लागायचा. आज इंटरनेटच्या महाजालामुळे आणि माहितीच्या सुलभ देवाणघेवाणीमुळे, तसेच प्रवाससाधनांच्या सहज उपलब्धतेमुळे आणि प्रवासखर्च परवडणाऱ्या माणसांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे जगाच्या कानाकोपऱ्यातील

माहिती अथवा बातमी वेगाने इकडून तिकडे संक्रमित होत आहे. हेच साहित्यव्यवहाराच्या बाबतीतही घडत आहे. पूर्वीच्या काळाच्या तुलनेत आज एखाद्या कादंबरीचे अथवा कथेचे भाषांतर व्हायला फार वर्षे जावी लागत नाहीत. कारण एक तर मूळ भाषेतील संहिता आपल्याकडे लवकर उपलब्ध होऊ शकते, दुसरे म्हणजे परकीय भाषांमधील समकालीन साहित्य वाचायची आपल्याकडच्या वाचकांची इच्छाही आता अधिक प्रबळ होऊ लागली आहे, आणि तिसरे म्हणजे त्या त्या भाषेतून थेट भाषांतर करणाऱ्या भाषांतरकारांची उपलब्धता थोडी का होईना वाढली आहे. एकोणिसाव्या शतकात जेव्हा शेक्सपिअर मराठीत भाषांतरित झाला, तेव्हा त्यावेळेचे इंग्रजी समकालीन साहित्य वाचण्याची इच्छा होण्याइतके इंग्रजी साहित्य वाचकांना परिचित नव्हते. आज मात्र भाषांतरित साहित्य आवडीने वाचणाऱ्या वाचकवर्गातील एक मोठा गट सातत्याने समकालीन साहित्य वाचायला मागत आहे. गेल्या चाळीस –पन्नास वर्षांत जर्मन म्हणा, फ्रेंच म्हणा, रशियन म्हणा, अशा भाषांच्या साहित्यात नेमके काय व्यक्त झाले, तेथील लेखकांच्या अभिव्यक्तीतून, कथा–कादंबऱ्यांच्या आशयातून, त्या आशयाच्या मांडणीतून, कोणत्या प्रकारचे वाङ्मयीन उद्‌गार, हुंकार मांडले आहेत, त्यांच्या समाजातील स्थित्यंतरांचे पडसाद वाङ्मयात उमटले आहेत का, का व्यक्तिकेंद्री, व्यक्तिसापेक्ष साहित्य तिथे लोकप्रिय ठरले, त्यांचे कथावाङ्मय आपल्या कथावाङ्मयाशी मिळतेजुळते आहे का, तेथील लेखकांना कोणत्या प्रश्नांनी, समस्यांनी अस्वस्थ करून सोडले आहे  हे आणि असे अनेक प्रश्न आजच्या सजग आणि रसिक वाचकांना पडले आहेत. या प्रश्नांना थोड्याफार प्रमाणात समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न आम्ही सदर कथासंग्रहाद्वारे करत आहोत. जागतिक भाषांमधील निवडक समकालीन कथा वाचकांसमोर या संग्रहाद्वारे ठेवताना मराठी वाचकांना त्या त्या भाषेतील समकालीन साहित्याच्या भल्यामोठ्या दालनाचे दार जरासे किलकिले करून दिले आहे.

मराठी साहित्यात कथावाङ्मयाची मोठी परंपरा आहे. विशेषत: विसाव्या शतकात उत्तम कथा लिहिणारे, कथा या प्रकारात विविध प्रयोग करणारे  अनेक लेखक सांगता येतील. युरोपीय साहित्यातील कथेचे स्थान हे कादंबरीच्या लोकप्रियतेपुढेही अबाधितच राहिले आहे, असे आपल्याला दिसून येईल. फ्रेंचमधील

मोपासाँसारखा लेखक, रशियन साहित्यातील चेखव, ल्येरमन्तव असे दमदार कथालेखन करणारे लेखक, जर्मन साहित्यातील युध्दोत्तर काळात लघुकथा यशस्वीपणे हाताळणारे बोर्षर्ट, ब्योलसारखे लेखक यांनी एकोणिसाव्या शतकापासून ते आत्तापर्यंत कथावाङ्मयात सतत मोलाची भर घातली. या पूर्वासुरींच्या कथेवरच आजची समकालीन युरोपीय कथा उभी राहू शकते आहे. म्हणूनच प्रस्तुत संग्रह कथांचा करावा असा विचार पुढे आला. तोही समकालीन कथांचा.

माणसांच्या सांस्कृतिक व सामाजिक इतिहासाचे कालखंड कापून वेगवेगळाले करता येत नाहीत. त्यात नव्या जुन्यांची गुंफण बेमालूम झालेली असते.आधीच्या कालखंडात घडून गेलेल्या घटनांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर दिसून यायला काही दशकांचा अवधी लोटावा लागतो. इतकेच नव्हे तर निरनिराळ्या देशांत ते परिणाम निरनिराळ्या तऱ्हांनी जाणवतात. परिणाम दृश्य स्वरूपात जाणवू लागण्याचा कालखंडही प्रत्येक देशात वेगळा असू शकतो. असे असताही हे बदल साहित्यात नोंदले जातात. काही काही वेळा बदल घडून येण्याअगोदर साहित्यामध्ये त्याचे सूचन झालेले असते. स्थळकाळानुसार असलेले फरक सोडल्यास सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरांचे चित्र साहित्यात असतेच.

प्रस्तुत कथासंग्रहाद्वारे समकालीन म्हणजे साधारण गेल्या पन्नास वर्षांत प्रकाशित झालेल्या विविध परकीय भाषांमधील कथा एकत्रित स्वरूपात द्याव्यात असे आम्हाला वाटले. साधारण १९६० नंतर प्रसिध्द झालेल्या कथा निवडाव्यात असे आम्ही ठरवले. दुसऱ्या महायुध्दानंतर सुमारे पंधरा वर्षांच्या काळात युरोपीय कथांमध्ये युध्द, युध्दोत्तर सामाजिक व राजकीय जीवन, युध्दाचे मानवी समाजावर झालेले परिणाम, युध्दकाळात घडलेल्या चुका आणि त्यांचे परिमार्जन करण्याचा खटाटोप या विषयांवर कथा प्रसिध्द झाल्या. त्या इंग्रजी भाषांतरांमुळे व इतरही अनेक वाटांनी आपल्यापर्यंत येऊन पोचल्या आहेत. त्या सर्वश्रुत आहेत. त्या विषयाची पुनरुक्ती प्रस्तुत कथासंग्रहात टाळली आहे. १९६० नंतर युरोपातील देशांत युध्दोत्तर कालखंड मागे पडला, महायुध्दांच्या आर्थिक, सामाजिक परिणामांतून सावरल्यानंतर राजकीय दृष्ट्या स्थिरता व थोडीफार सुबत्ता येऊ लागली, परंतु याच काळात माणसांनी आदर्शांचा ऱ्हास होताना पाहिला. आदर्श विचारसरणीचा ऱ्हास आणि

सामाजिक बांधीलकीच्या मूल्यांची घसरण सोविएट युनियनमध्ये नागरिकांच्या प्रथम अनुभवास आली. शासनपुरस्कृत दमन आणि भ्रष्टाचार यामुळे एकीकडे भौतिक दृष्ट्या संपन्नता असूनही *आहे मनोहर परि गमते उदास* अशी भावना जोर धरू लागली. त्यातच विस्कटत जाणारे नातेसंबंध, एकाकीपणा, साम्यवादी आदर्शाच्या पराजयाची ठळक होत जाणारी चिन्हे, आर्थिक बाबतीत मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचार यामुळे सोविएट युनियन आणि सगळ्याच पूर्व युरोपियन देशांच्या साम्यवादावर आधारित राज्यध्दतींमधील फोलपणा जाणवू लागला. पूर्व युरोपातील देशांत साम्यवादी राजकीय व्यवस्थांमध्ये राहून लेखक लिखाणाच्या वाटा शोधत राहिले. १९६० नंतर पश्चिम युरोपात सामाजिक चळवळींचे वारे वाहू लागले होते,त्याचे पडसाद साहित्यात उमटू लागले. स्त्रीविषयक प्रश्नांचा, पर्यावरणविषयक समस्यांचा, त्यावरील उपाययोजनांचा उहापोह सुरू झाला, पर्यायी लैंगिक दृष्टिकोनांविषयी विचारमंथन सुरू झाले. याच काळात साहित्यात बरेच प्रयोग घडत होते. वैयक्तिक ते राजकीय व सामाजिक आणि राजकीय व सामाजिक ते वैयक्तिक अशी आंदोलने प्रत्यक्ष समाजजीवनात तसेच कथांमध्येही चालू होती, अनेक विषयांना, मानवी आयुष्यातील अनेक बाबींना त्या स्पर्शू पाहत होत्या. १९९० मध्ये सोविएट युनियनचे विघटन झाल्यानंतर जगाचा भौगोलिक नकाशा पुन्हा एकदा बदलला.पूर्व युरोपातील अनेक साम्यवादी देश भांडवलशाहीचा अंगिकार करू लागले. बर्लिनची भिंत पडली आणि दोन्ही जर्मनींचे एकीकरण झाले. साम्यवादाचा किल्ला ढासळल्याने जागतिकीकरणाचे नवे पर्व सुरू झाले. अनिर्बंधपणे पसरत जाणाऱ्या भांडवलशाहीमुळे जगाचे एकसाचेपण, सपाटीकरण होऊ लागले, ते जगाच्या विविधतेलाच सुरुंग लावेल ही चिंता वाढीस लागली. सांस्कृतिक सपाटीकरणामुळे आणि फार झपाट्याने घडणाऱ्या बदलांमुळे समाजमन अस्वस्थ राहू लागले. ठिकठिकाणच्या प्रांतीय, धार्मिक, जातीय अस्मितांनी काहीसे उग्र रूप धारण केले. या सगळ्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेच.

१९६० पासून अगदी आत्तापर्यंतचा काळ ह्या विशाल कालखंडातील कथांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या निवडक कथा प्रस्तुत संग्रहात समाविष्ट केल्या आहेत. त्यातून मराठी वाचकाला गेल्या पन्नास-साठ वर्षांत जगातील निदान काही भाषांमधील काही लेखक काय म्हणत होते हे नक्कीच समजेल, असे आम्हाला वाटते.

या कथांची निवड करताना *केल्याने भाषांतर* च्या गेल्या ७० अंकांतील निरनिराळ्या कथा कथापेढी म्हणून उपलब्ध होत्या. इतर काही नियतकालिकांमधील एक दोन कथा याला अपवाद आहेत. पहिल्या चाळणीतून त्यातील १९६० नंतरच्या कथा पुढे आल्या. जास्तीत जास्त भाषांना प्रतिनिधित्व व त्याद्वारे जास्तीत जास्त देशांना प्रतिनिधित्व मिळाले तर संग्रहाचा आवाका वाढेल हे लक्षात घेऊन कथांची निवड झाली. अर्थातच भाषांतराची गुणवत्ता, कथाविषयांतील वैविध्य, कथांची मांडणी, कथांची शैली, मराठी कथांपेक्षा विषयहाताळणीतील व सादरीकरणातील वेगळेपणा हे निकषही होतेच. *केल्याने भाषांतर* मधील कथांची इतर वैशिष्ट्येही निवडलेल्या कथांत उतरली आहेत, म्हणजेच कथांचे त्या त्या भाषांतून मराठीत थेट भाषांतर, कथेतील विशेष नामांचे म्हणजेच माणसांची विशेष नामे, स्थलनामे यांचे उच्चार मूळ भाषांप्रमाणे, आवश्यक तिथे अधिक माहितीसाठी टीपा, कथांच्या जोडीला लेखक-लेखिकांविषयी माहिती व पार्श्वभूमी उपलब्ध करून देणे इत्यादी! थोडक्यात सांगायचे तर प्रस्तुत संग्रहात

साधारण १९६० नंतर प्रसिध्द झालेल्या कथा आहेत,

त्या मराठीत थेट भाषांतरित झाल्या आहेत, (म्हणजेच जर्मनमधून थेट मराठीत, रशियनमधून थेट मराठीत असे)

मूळ भाषा आणि देश (कंसात) पुढीलप्रमाणे:

जर्मन (जर्मनी, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड),

स्पॅनिश (अर्जेंटिना, मेक्सिको),

रशियन (सोव्हिएट युनियनचा भूभाग, रशिया),

फ्रेंच (फ्रान्स),

पोलिश (पोलंड),

जपानी (जपान).

संग्रहात निवडलेल्या सगळ्याच कथा प्रसिध्द लेखकांच्या नाहीत. परंतु त्या त्या भाषांमधील समकालीन साहित्याचे प्रतिनिधित्व त्या करतात. त्यांच्या कथाविषयाचा , त्यांच्या सादरीकरणाच्या पध्दतीत असलेला अनोखेपणा यांचा

मराठी वाचकाला आवर्जून परिचय व्हावा असे आम्हाला वाटले. त्यामुळे फक्त गाजलेल्या लेखकांच्या कथा घ्यायच्या असा निकष ठेवला नाही. त्या वाचताना मराठी वाचकाला त्या भाषेच्या समाजाची, साहित्यिक परपरांची, त्यांच्या संस्कृतीची अल्पशा प्रमाणात का होईना ओळख व्हावी हे उद्दिष्ट आम्ही डोळ्यासमोर ठेवले.

युरोपातील साहित्यात कथा ही  लघुकथा, कथा, दीर्घकथा, लघुकादंबरी अशा अनेक रूपात आपल्याला भेटत राहते. जपानी भाषेत २०व्या शतकाच्या उत्तरार्धात लघुलघुकथा असा एक प्रकार फार लोकप्रिय झाला. मराठीतही आपल्याला कथा ही गोष्ट, कहाणी, बोधकथा, लघुकथा, दीर्घकथा अशा निरनिराळ्या रूपांत वाचायला मिळते. कथांचे मूळ पार संस्कृत साहित्यापर्यंत किंवा मराठीतील सणावारी वाचायच्या, ऐकायच्या कहाण्या, कथांपर्यंत जाऊन भिडवता येते.तसेच युरोपातील भाषांमधल्या कथांचेही आहे. एकोणीसाव्या शतकापर्यंत लोककथेतून कॅलेंडर-स्टोरी, नीतीकथा, बोधकथा, अनेकडोटस् अशा अनेक रूपांमधून कथा विकसित होत गेली. दीर्घकथा, लघुकादंबरी या वाङ्मयप्रकारात मग ती अठराव्या, एकोणीसाव्या शतकात चांगलीच लोकप्रिय झाली, उच्चशिक्षित, नागरी समाजातील सुसंस्कृत वाचक तिचा वाचकवर्ग झाला. त्यामुळे फक्त मनोरंजन हा तिचा म्हणजेच तिच्या लेखकाचा हेतू न राहता तिला अभिजाततेचा दर्जा मिळाला. बांधेसूदपणा, कारागिरी या वैशिष्ठ्यांनी ती सिध्द झाली. रशियन भाषेत पोवेस्त, जर्मन साहित्यात नॉव्हेले म्हणून ती स्थिरावली. ती कादंबरीहून छोटी होती, पण नाटकाला शोभेल अशा पध्दतीने तिच्यातील कथाविषय मांडला जायचा.

युध्दोत्तर कालखंडात युरोपात अमेरिकेतून येऊन *शॉर्ट स्टोरी* लोकप्रिय झाली. युध्दानंतर कागदाच्या कमतरतेमुळे काही काळ पुस्तके प्रकाशित होणे अवघड झाले. वर्तमानपत्रे व नियतकालिके यांच्या वाचनावरच वाचकांची वाचनभूक भागत होती. म्हणूनच या काळात थोडक्या शब्दांत  बरेच काही सांगून जाणारी लघुकथा लोकप्रिय झाली. अर्थात त्याआधीही कथा हा प्रकार युरोपात चांगलाच जुना-पुराणा, सुपरिचित होता. अमेरिकन शॉर्ट स्टोरीच्या म्हणजेच लघुकथेच्या प्रभावाखाली युरोपातील भाषांत विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात लघुकथा आखीव-रेखीव झाली, बांधेसूद झाली. एकदम कथाविषयाला हात घालायचा, कमीत कमी

व्यक्तिरेखा विकसित करायच्या, एकच कथानक फुलवत न्यायचे, आजूबाजूचा फापटपसारा मांडायचा नाही, वाक्ये, अगदी शब्दही मोजून मापून नेमके वापरायचे, पाल्हाळिक वर्णने टाळायची, उत्कर्षबिंदू आणि त्यानंतर लगेचच अनपेक्षित कलाटणी देत कथेला विराम द्यायचा, पण कथाविषयाला पूर्णविराम द्यायचा नाही, कथेचा शेवट हा कथेत मांडलेल्या प्रश्नाचा शेवट मानता यायला नको याचे भान राखून कथा संपवायची. २०व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच आयुष्यातील प्रश्नांना, समस्यांना लेखक अथवा कवी म्हणून आपण किंवा कोणीही ठोस उत्तर देऊ शकत नाही, त्या प्रश्नांची सोडवणूक करायला निश्चित असा मार्ग दाखवू शकत नाही ही प्रखर जाणीव लेखकाला, खरे तर कोणाही कलाकाराला झाली. युध्दोत्तर काळात तर या जाणीवेची थेट प्रचिती आली आणि साहित्यात मांडल्या जाणाऱ्या प्रश्नांची दिशा बदलली, त्यांचे स्वरूप बदलले. युध्दात अनुभवलेले भयंकर वास्तव हे एक कारण त्यामागे होतेच. त्यानंतरच्या आधुनिक काळात, कारखानदारीच्या यंत्र-तंत्रयुगात, साम्यवादी व भांडवलशाही देशांमधील शीतयुध्दाच्या काळात, सुबत्ता आणि सामाजिक विषमता यांच्यामधील दरी वाढत गेली त्या काळात, पर्यावरणाच्या बदलाची व विनाशाची लख्ख जाणीव होऊ लागली त्या काळात युध्दोत्तर काळातील आखीव असे लघुरूप घेतलेली कथा बदलत गेली. तिच्या मांडणीत पूर्वीइतकी ठाशीव नियमबध्दता राहिली नाही. युरोपातील साहित्यात जरी कादंबरी या वाङ्मयप्रकाराला जास्त महत्त्व असले तरी कथा हा प्रकार हाताळणारे अनेक दिग्गज लेखक आपल्याला माहीत आहेत.

सदर पुस्तकासाठी निवडलेल्या कथांविषयी बोलायचे झाल्यास काही कथा या तत्कालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या, तीवर मत नोंदवणाऱ्या आहेत, तर काही माणसाच्या दांभिकपणावर, ढोंगावर उपहासात्मक रीतीने टीका करणाऱ्या आहेत. काही कथा रूपकात्मक पध्दतीने आयुष्याचा अर्थ उलगडतात, तर काही सरळसोटपणे अनुभवांना भिडतात. १९६० नंतरच्या कालखंडाचा आढावा घेणाऱ्या या विविध भाषांमधील कथांमध्ये काही समान आशयसूत्रे आढळतील. जसे आदर्शांचे भंगणे आणि भ्रष्ट होत चाललेली व्यवस्था . काही आदर्श राजकीय अथवा वैचारिक आहेत; उदा. अलिक्सांदर सलज्हिनीत्सिन यांच्या

***उजवा हात*** या कथेत जीव झोकून देऊन रशियाच्या क्रांतीत सहभागी झालेला एकजण अतिशय विकलांग आणि विपन्नावस्थेत दवाखान्यात दाखल व्हायला आला आहे, परंतु तेथील माणुसकीशून्य वैद्यकीय व्यवस्था त्याची जराही दखल घेत नाही. त्याला मदत करणारा कथेचा निवेदक स्वत: त्याच्या राजकीय विचारांमुळे कैद भोगत आहे, आजारपणामुळे तो काही काळ दवाखान्यात दाखल आहे. एकीकडे त्याचे वैचारिक, राजकीय आणि शारीरिक दमन आणि दुसरीकडे क्रांतीसाठी आयुष्य समर्पित करूनही वाट्याला आलेली म्हाताऱ्याची विकलांग, विपन्न अवस्था याद्वारे लेखक तत्कालीन व्यवस्थेवर भगभगीत प्रकाश टाकून व्यवस्थेतील फोलपणा आणि तीत राहणाऱ्याची हतबलता दाखवून देतो. युरोपातील पोलंड या देशातील आणखी एका साम्यवादी राजवटीवर भाष्य करणारी स्लावोमीर म्रोझेक या प्रसिद्ध लेखकाची ***'पोरे'*** नावाची एक छोटीशी कथा पुस्तकात समाविष्ट केली आहे. या लेखकाला कम्युनिस्ट राजवटीच्या काळात देशाबाहेरचा रस्ता धरावा लागला. कारण त्याचे उपरोधात्मक टीका करणारे लिखाण १९९० च्या आधीच्या पोलंडमध्ये खपवून घेतले नसते. पोरे या कथेत लहान पोरांच्या नेहमीच्या क्षुल्लक खेळाचा अर्थ जो तो आपल्या पध्दतीने कसा लावतो आणि मुलांची ही कृती शिक्षेस पात्र ठरून त्या जबाबदार पालकांना सगळेच कसे संत्रस्त करून सोडतात हे म्रोझेक हलक्या-फुलक्या शैलीत रंगवतो. पण निष्पाप वाटणारी ही पोरे आपल्या खेळात कशी तरबेज होतात हे कथेतील शेवटच्या त्यांच्या बोलण्यातून सहज स्पष्ट होते. ***'खोटे'*** या लहान मुलाच्या दृष्टिकोनातून सांगितलेल्या कथेत घरातील मोठ्यांमधील नात्याचा बंध तुटल्याने हादरून गेलेला लहान मुलगा आपल्याला भेटतो.

विसविशीत होणारे, आतून तुटत जाणारे नातेसंबंध पण तरीही दुसऱ्या माणसाची हवीहवीशी वाटणारी सोबत हे असेच आणखी एक आशयसूत्र दिसून आले आहे. ***'डिसेंबरात दोघेजण'*** या रशियन कथेत दोन तरूण माणसे नाते जुळताना, तुटताना, नेमके काय होत आहे हे न समजल्याने भांबावली आहेत, तर ***'चामखिळीबद्दलचं पत्र'*** या जपानी कथेत आपल्या नाजुकशा भावविश्वाची जपणूक करणारी एक युवती नवीन नातं जुळवताना करायला लागलेल्या तडजोडीविषयी चामखिळीच्या रूपकातून बोलताना दिसते. ***'येसिकाच्या शोधात'*** या जर्मन कथेत स्त्रीमुक्तीच्या चळवळीच्या

सुरुवातीच्या काळातील स्वत:चा शोध घेणारी, नवऱ्याबरोबरचे बायकोचे असलेले दुय्यम नाते उमजून आल्याने हताश झालेली, त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधणारी तरूण स्त्री दिसते. तर फ्रेंच लेखिका आन गाए-बाल्प आपल्या ***छोटी डायरी*** या कथेत किंवा राल्फ रोथमानच्या ***तुला नूडल्स हव्यात?*** या जर्मन कथेत एकाकीपणाचा नकोसा अनुभव घेतलेली आणि सोबतीसाठी आसुसलेली माणसं भेटतात.

भ्रष्ट अथवा ढासळत चाललेल्या राजकीय परिस्थितीचे नागरिकांना अपरिहार्यपणे जे चटके बसतात ते दाखवणाऱ्या काही कथा आहेत. उदाहरणार्थ दक्षिण अमेरिकेतील मेक्सिकोच्या खुआन खोसे आरेओलाने लिहिलेली ***स्विचमॅन*** ही कथा. या कथेची जातकुळी आणखीच वेगळी आहे. रेल्वेसारख्या सार्वजनिक वाहतुकीची म्हणजेच एका मोठा आवाका असलेली व्यवस्था लेखक विनोदाने, उपहासाने, उपरोधाने उघडी पाडतो, कोणत्याही व्यवस्थेची *वाट लावणाऱ्या* माणसांची तो खिल्ली उडवतो. विनोदाने आपले म्हणणे सौम्य करण्याऐवजी तो त्यामुळे उपरोधाची धार वाढवत नेतो. कल्पना आणि वास्तव यांच्या सीमारेषेवर कथावस्तूशी खेळत तो कथनात अधिक गहिरे रंग मिसळतो. इसाबेला आईंदे या दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिना व चिली देशांत राहिलेल्या प्रसिध्द लेखिकेची ***दोन शब्द*** ही कथा मॅजिकल रिॲलिझम या पठडीतील असली तरी ती अनेक अंगांना स्पर्श करताना दिसते. युध्द, राजकारण, लोकशाही व हुकुमशाही, भाषेचा साधन आणि हत्यार म्हणून होणारा वापर, भाषेची ताकद किंवा भाषा वापरणाऱ्याला भाषेमुळे मिळणारी ताकद अशा अनेक विषयांची सरमिसळ करत लेखिका एक आगळी दुनिया उभी करते. त्या दुनियेत शब्दांची ताकद ओळखून त्यांचा वापर करणारी , तो करायला शिकवणारी शब्दविकी बाई आहे . शस्त्रांच्या साहाय्याने हुकुमशहा झालेल्या एका रानटी पुरुषाला आपण लोकप्रिय नेता व्हावे याची आस आहे, तो तिच्याकडून शब्दांचा वापर करायला शिकतो आणि शब्दांच्या ताकदीपुढे पर्यायाने त्यांच्या मदतीने बलिष्ठ झालेल्या शब्दविक्या बाईपुढे पार निष्प्रभ ठरतो. विषयाच्या मांडणीला बाई-पुरुषामधील वर्चस्वाच्या चढाओढीचीही एक वेगळीच धार आली आहे. दक्षिण अमेरिकेतील या दोन देशांमधील दोन कथांमधून तेथील कथाविश्वाची एक छोटीशी चुणुक वाचकाला

कळेल. ***ज्हाना*** या रशियन भाषेतील कथेतही आपल्याला आर्थिक, राजकीय, सामाजिक सर्वच बाबतीत परिस्थितीवश अशी एक पौगंडावस्थेत असलेली मुलगी दिसते. ती लहान वयातच आई झाली आहे, त्यात ते मूल अपंग आहे, त्याचा पश्चिमेकडचा बाप कोणतीही जबाबदारी न घेता पळून गेला आहे. या मुलीची निर्धन, निराधार अवस्था, पदरी पडलेलं अपंग मूल एवढे असूनही ती मात्र या परिस्थितीचे गंभीरपणे आकलन तर करू शकत नाही, त्यामुळे तीतून बाहेर पडायची उपाययोजना आखायची तोशीसही घेत नाही. १९९० नंतरच्या काळातील रशियातील परिस्थितीचे प्रखर वास्तव गेलासीमव हा लेखक उत्तराधुनिक शैलीत, भळभळीतपणे आपल्यासमोर आणतो. तर काही कथांमध्ये आपल्याला असे शैलीवैशिष्ठ्य दिसते की वास्तवाच्या आणि कल्पिताच्या सीमा धूसर झाल्या आहेत, उदाहरणार्थ: ***लाल कोश, जाड मुलगी, पाळीव*** या कथा पाहा. तसेच आणखी एक शैलीवैशिष्ठ्य म्हणजे व्यक्तिगत आयुष्यातील उलथापालथीला सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय चौकट अगदी खुबीने पुरवणे, आणि ते उदाहरणार्थ ***ज्हाना*** बरोबरच ***डॉक्टर मनोरंजन, अक्कल*** या कथांमधून प्रत्ययास येते.

या संग्रहात कथांची मांडणी करताना केवळ कालानुक्रमे अथवा भाषावर पध्दतीने त्या मांडल्या नाहीत. एका कालखंडाची एक एकसंध, अधिकाधिक पैलूंना स्पर्श करणारी प्रतिमा या कथांद्वारे वाचकापुढे उभी राहील असा प्रयत्न आम्ही केला आहे. कथांची निवड करताना लावलेले निकष हे काही वेळा या आशयसूत्रांशी बांधलेले आहेत. समीक्षकांच्या नजरेतून पाहता या निवडीला उत्तराधुनिक असे म्हणता येईल, परंतु कथांची निवड करताना अशा तऱ्हेची कोणतीही रूढ चौकट आम्ही स्वीकारली नाही. संग्रहाला अधिक समग्र, अधिक संपूर्ण रूप देण्यासाठी आम्ही लेखकांची निवडही एका मोठ्या वर्तुळातून केली आहे. अलिक्सांदर सलज्हिनीत्सिन, यासुनारी कावाबाता यांसारखे नोबेल पारितोषिकाचे मानकरी यात समाविष्ट आहेत. तसेच आन गाएल बाल्पसारखी तुलनेने कमी प्रसिध्द लेखिकाही आहे. आन्द्रेई गेलासीमव हा रशियन लेखक तर २००० पासून लेखन करू लागला आहे. लोकप्रिय, अनवट, अभिजात असे सर्व प्रकारचे लेखक कथांची निवड करताना विचारात घेतले आहेत.

कोणत्याही प्रकारच्या प्रातिनिधिक नमुन्याला सरतेशेवटी मर्यादा या असतातच. तशाच या प्रस्तुत संग्रहाला आहेत, याची आम्हाला नम्र जाणीव आहे. परकीय आणि अनोळखी भाषिक पर्यावरणातील आणि विविध देशांतील या कथा मानवी आयुष्यातील चढउतारांच्या, सुखदु:खाच्या आवर्तनाच्या, आजूबाजूच्या बदलांना तोंड देताना होणाऱ्या मनोवस्थांचे चित्रण करताना दिसतात. म्हणूनच मराठी वाचकालाही त्या परक्या, तरी आपल्या वाटतील, त्यांतील अनुभव आपल्या अनुभवांशी ताडून पाहावे असे त्याला वाटेल, त्यात मांडलेल्या विषयांचे, शैलींचे त्याला अप्रूपही वाटेल अशी आमची अटकळ आहे.

या संग्रहाद्वारे मराठी वाचकांपर्यंत समकालीन जागतिक कथा भाषांतरित स्वरूपात घेऊन जाणे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्यामुळे शक्य झाले, याचा आम्ही कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. तसेच या संग्रहाच्या कामात आपुलकीने लक्ष घालणारे महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष माननीय श्रीयुत बाबा भांड, तसेच श्रीयुत अविनाश सप्रे आणि श्रीमती मीनाक्षी पाटील यांचेही मन:पूर्वक आभार. यांच्या प्रोत्साहनामुळेच अशा प्रकारचा संग्रह सिध्द होऊ शकला.

**– सुनंदा विद्यासागर महाजन**

**– अनघा भट**


**पुणे, मे २०१७**

---

पूर्वप्रसिद्धी : येसिकाच्या शोधात (मेनका २००४), पक्ष्यांसवे दूर (सेतूबंध १९९२), दोन शब्द (साधना २००८), इतर सर्व कथा 'केल्याने भाषांतर' या त्रैमासिकात वेळोवेळी प्रसिद्ध झाल्या आहेत.

# जाड मुलगी

**मूळ जर्मन लेखिका : मारी-लुईझं काश्निट्‌स**
**भाषांतर : सुनंदा विद्यासागर महाजन**



**परिचय : मारी लुईझं काश्निट्झ**

**(१९०१-१९७४)**

**आपल्या थोडक्याच पण कसदार लिखाणाने नाव मिळवलेली ही जर्मन लेखिका. दुसऱ्या महायुद्धाच्या आधीच तिचे पहिले काव्यसंग्रह आणि कथासंग्रह प्रकाशित झाले होते. १९६०च्या दशकात प्रसिद्ध झालेले तिचे दोन कथासंग्रह खूप गाजले. तिच्या कथा बरेचदा वास्तवाच्या पातळीवर सुरू होतात. कथा फुलत जाताना त्यात काल्पनिकतेचं अंग मिसळत जातं. वरवर बघता आयुष्यातील दैनंदिन घटनांभोवती कथा घोटाळताना दिसल्या तरी त्या आयुष्यातील एखाद्या गहन कोड्याचं उत्तर सोडवायला मदत करतात. काश्निट्स एकीकडे परंपरागत शैलीत लिहिणारी आणि शिवाय आधुनिक, प्रगतीशील विचारांचे प्रतिबिंब पडलेले लिखाण करणारी अशी लेखिका आहे. काव्याशी जवळचं नातं सांगणारी तिची शैली आहे. सोबतच्या कथेतही वास्तव आणि काल्पनिकता यांचे सुरेख मिश्रण झालेले आपल्याला दिसते.**

***

**ना**ताळची सुट्टी नुकतीच संपली होती. त्यानंतरचे जानेवारी महिन्याचे शेवटचे दिवस होते ते. तेव्हा एक जाड मुलगी माझ्याकडे आली.

त्या हिवाळ्यात मी आजूबाजूला राहणाऱ्या मुलांसाठी वाचनालय सुरू केले होते. आठवड्यातल्या एका ठराविक दिवशी त्यांनी पुस्तक न्यायचे आणि आणून द्यायचे. अर्थात् मला बहुतेक सगळी मुलं माहीत होती पण कधी कधी आमच्या गल्लीत न राहणारी अनोळखी मुलं पण यायची आणि जरी त्यातली बरीचशी मुलं पुस्तक बदलायला जितका वेळ लागायचा तितकाच वेळ थांबणारी असली तरी

काही काही मुलं तिथंच बसून जागेवरच वाचायला लागायची. मग मी माझ्या टेबलाशी बसून काम करायची, अन् मुलं पुस्तकांच्या रॅकला लागून असलेल्या छोट्या टेबलाशी बसायची. त्यांचं तिथं असणं मला आवडायचं. त्याचा मला त्रास वाटायचा नाही.

जाड मुलगी शुक्रवारी किंवा शनिवारी आली, पुस्तकाच्या देवघेवीचा ठराविक दिवस तो नव्हता एवढं नक्की. मला बाहेर जायचं होतं आणि थोडंसं खायला तयार केलं होतं ते मी खोलीत नेत होते. थोड्या वेळापूर्वीच माझ्याकडे एकजण आले होते आणि ते जाताना बहुधा बाहेरचं दार लावून घ्यायला विसरले होते. त्यामुळे ती जाड मुलगी एकदम माझ्यासमोर येऊनच उभी राहिली. अगदी अचानक. तेव्हाच मी हातातला ट्रे लिहायच्या टेबलावर ठेवला आणि आणखी काहीतरी स्वयंपाकघरातून आणावं म्हणून मागे वळले. ती बारा एक वर्षांची मुलगी असावी. तिने जुन्या पद्धतीचा फर असलेला जाड चामड्याचा ओव्हरकोट घातला होता. काळे, विणलेले, मोठे मोजे घातले होते आणि एका काठीला रोलर स्केटिंगचे शूज लटकावलेले होते. मला ती ओळखीची आहे असे वाटले पण नेमकी ओळख लक्षात येईना. ती अशी हळूच घरात शिरली होती की त्याने मला दचकायला झालं होतं.

मी आश्चर्याने तिला विचारलं, ''आपली ओळख आहे का गं?'

जाड मुलगी काही बोलली नाही. नुसती उभी राहिली. आपल्या गोलमटोल पोटाभोवती हात बांधून माझ्याकडे आपल्या नितळ डोळ्यांनी बघत राहिली.

मी तिला विचारलं, ''तुला एखादं पुस्तक हवंय का?'' जाड मुलीने पुन्हा काहीच उत्तर दिलं नाही. पण मला त्याचं काही फारसं आश्चर्य वाटलं नाही. मला त्याची सवय होती. लहान मुलं बुजरी असतात. त्यांना बोलतं करायला लागतं हे मला माहीत होतं म्हणून मग मी थोडी पुस्तकं बाहेर काढली आणि त्या अनोळखी मुलीच्या पुढे मांडली. मग मी वाचायला दिलेल्या पुस्तकांची नोंद करण्यासाठीचं कार्ड बाहेर काढून ते तयार करायला लागले.

मी विचारलं, ''तुझं नाव सांग बघू.''

मुलगी म्हणाली, ''मला सगळे जाडी म्हणतात.''

मी विचारलं, ''मीसुद्धा तुला तसंच म्हणू की काय?''

ती म्हणाली, ''मला काहीही फरक पडत नाही.'' तिने माझ्या हसण्याला प्रतिसाद दिला नाही आणि आत्ता मला असं आठवतंय की त्यावेळी तिचा चेहरा दु:खाने थोडा आक्रसला होता.

पण मी तिकडे लक्ष दिले नाही. मी पुढचा प्रश्न विचारला, ''तुझा जन्म कधीचा आहे?''

मुलगी शांतपणे म्हणाली, ''मीन राशीतला.''

ह्या तिच्या उत्तराची मला गंमत वाटली आणि मी तसंच कार्डावर लिहून घेतलं. अर्थातच मजेखातर. मग मी पुन्हा पुस्तकांकडे वळले. मी विचारलं, ''तुला एखादं विशिष्ट पुस्तक हवंय का?''

पण मग माझ्या लक्षात आलं की ती अनोळखी पोर पुस्तकांकडे मुळी पाहतच नव्हती. तिची नजर ट्रेवर विसावली होती माझ्या चहावर आणि मी तयार केलेल्या सँडविचवर.

मी भर्रकन म्हणाले, ''भूक लागलीय का तुला?''

तिने मान डोलावली आणि त्या मान डोलावण्यात असं एक प्रकारचं दुखावलेपण आणि आश्चर्य दडलेलं होतं की हे माझ्या पार इतक्या उशीरा कसं लक्षात आलं म्हणून. तिने एकामागोमाग एक सँडविच फस्त करायला सुरुवात केली. हे तिनं एका विशिष्ट पदध्तीने केलं. पुढे मी त्या गोष्टीचं मनाशी गणित केलं. मग ती पुन्हा तिथे बसली आणि आपली मंद थंड नजर खोलीत आजूबाजूला फिरवत राहिली. तिच्यामध्ये अशी एक गोष्ट होती की त्यामुळे मला तिच्याविषयी राग आणि वैताग वाटायला लागला. हो हो, नक्कीच. मला पहिल्यापासूनच ही मुलगी आवडली नव्हती. तिच्यातली प्रत्येक गोष्ट मला त्रासदायक वाटली होती. तिचे मंद व बधिर अवयव, तिचा सुंदर, लठ्ठ चेहरा, तिची बोलायची पद्धत, एकाच वेळी झोपाळू आणि शैलीदार वाटावी अशी. अन् जरी ती पोरगी आली म्हणून मी माझ्या संध्याकाळच्या फेरफटक्यावर पाणी सोडलं होतं तरी तिच्याशी मात्र मी मुळीच चांगली वागले नाही. थोडं दुष्टपणे आणि थंडपणेच वागले म्हणा ना.

किंवा त्याला थोड्याफार प्रमाणात चांगलं वागणंही म्हणता आलं असतं. कारण आता मी लिहायच्या टेबलाशी बसले होते आणि माझं काम सुरू केलं होतं. माझ्या

खांद्यावरून मागे वळून बघत मी म्हटलं, ''हं, वाच आता.'' तरी मला माहीत होतं की या अनोळखी मुलीला वाचायचं नव्हतंच. मी तिथे बसून राहिले. काही लिहावं म्हटलं पण लिहून काहीच होईना. कशाचा तरी आपल्याला जाच होतोय अशी विचित्र भावना मला होत होती. म्हणजे असं की– आपल्याला कसलं तरी कोडं सोडवायला दिलंय आणि ते सुटत नाहीये. ते सुटल्याशिवाय पूर्वीसारखं काही करायला सुचत नाही असली भावना होती ती अन् हे असं मी थोडा वेळ कसंबसं सहन केलं. पण मग मला ताण वाटायला लागला. म्हणून मी सरळ तिच्याकडे वळले आणि तिच्याशी बोलायला लागले. पण कसले तरी भन्नाटच प्रश्न माझ्या तोंडून बाहेर पडत होते.

मी विचारलं, ''तुला अजून भावंडं आहेत का?''

मुलगी उत्तरली, ''हो.''

मी विचारलं, ''तुला शाळेत जायला आवडतं का?''

मुलगी म्हणाली, ''हो.''

''तुला सगळ्यात जास्त काय आवडतं?''

मुलीनं विचारलं, ''अं, काय?''

मी चाचरले, ''म्हणजे कोणता विषय?''

मुलगी म्हणाली, ''काय माहीत?''

मी विचारलं, ''कदाचित भाषा आवडत असेल.''

मुलगी म्हणाली, ''मला नाही सांगता येत.''

मी दोन बोटांच्या मधून पेन्सिल फिरवत राहिले आणि माझ्या आत मला एक प्रकारचं भय दाटून येतंय असं वाटलं. त्याचा त्या मुलीच्या तिथे अचानक येण्याशी काहीही संबंध नव्हता. मी थरथरत विचारलं, ''तुला मैत्रिणी आहेत?''

ती मुलगी म्हणाली, ''हो, तर!''

मी विचारलं, ''त्यातली एखादी तुझी अगदी लाडकी असेल ना?''

मुलगी म्हणाली, ''काय माहीत नाही.'' ती तिच्या केसाळ ओव्हरकोटमध्ये अशी काही बसली होती, एखाद्या ढब्ब्या अळीसारखी दिसत होती. अन् एखाद्या अळीसारखंच तिनं खाल्लं होतं, अन् अळीसारखीच शोधक नजरेने इकडे-तिकडे बघत

होती. माझ्या मनात आलं, आता काहीही मिळणार नाहीये तुला. एक प्रकारच्या विचित्र आसुरी आनंदाने माझं मन भरून आलं होतं. पण मग मी तरी आत गेले आणि ब्रेड आणि हॅम घेऊन आले आणि मुलीने त्याच्याकडे मथ्थड चेहऱ्याने नजर टाकली. नंतर तिने खायला सुरुवात केली. एखादी अळी खाते तशी. हळूहळू, एका तालात. आतून कुठल्यातरी जबर इच्छेने खावं तसं आणि मी ते तिचं खाणं दुष्टपणे आणि काही न बोलता निरखत बसले.

मग अशी एक वेळ येऊन ठेपली की त्या मुलीचं जे जे काही होतं त्यामुळे मी उत्तेजित व्हायला लागले आणि मला त्याचा संताप यायला लागला. मला वाटत होतं– काय पण गबाळा, पांढरा फ्रॉक होता तो आणि ती चक्रमसारखी उभी कॉलर! मुलीने जेव्हा खाऊन झाल्यावर तिच्या कोटाची बटने काढली तेव्हा मला तिचे कपडे दिसले. मी पुन्हा माझ्या लिखाणाच्या कामाला बसले. पण मला माझ्या मागून त्या मुलीचा खातानाचा मचमच आवाज येत होता. रानातल्या गढूळ डबक्यातलं पाणी वाजावं तसा तो आवाज वाटला मला. त्यामुळे जे जे असं गढूळ पाण्याचं, चिखलाचं, जडशीळ आणि झाकोळलेलं असतं असल्या आयुष्यातल्या गोष्टीचं माझ्या मनावर सावट आल्यासारखं वाटत राहिलं. मला म्हणावंसं वाटलं, ''काय हवंय तुला? जा. फूट इथून.'' मुलीला आपल्या हातांनी खोलीबाहेर ढकलून द्यावी अशी प्रबळ इच्छा मला झाली. एखाद्या नकोशा जनावराला ढकलावं तसं. पण तरी मी काही तिला खोलीबाहेर काढलं नाही, उलट पुन्हा तिच्याबरोबर बोलायला लागले. पुन्हा तशाच भयानक पद्धतीने बोलायला लागले. मी विचारलं, ''आत्ता तू बर्फावर खेळायला जाणारेस?''

मुलगी म्हणाली, ''हो.''

मुलीच्या खांद्यावर छोट्या हुकांना लटकावलेल्या रोलर स्केटिंगच्या बुटांकडे बोट दाखवत मग मी विचारलं, ''तुला चांगलं स्केट करता येतं का?''

मुलगी म्हणाली, ''माझ्या बहिणीला छान येतं.'' हे म्हणताना पुन्हा तिच्या चेहऱ्यावर दु:खाची आणि वेदनेची झाक आली आणि मी परत तिकडे दुर्लक्ष केलं.

मी विचारलं, ''तुझी बहीण कशी आहे दिसायला? तुझ्यासारखीच का?''

जाड मुलगी म्हणाली, ''नाही हो. माझी बहीण एकदमच बारीक आहे. तिचे

छान काळे कुरळे केस आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही खेड्यात आमच्या गावी जातो तेव्हा रात्री एखाद्या वेळी वादळ आलं तर ही उठते आणि गॅलरीच्या सगळ्यात वरच्या टोकाला बसून छान गाणी म्हणते.''

मी विचारलं, ''आणि तू काय करतेस?''

मुलगी म्हणाली, ''मी गादीवरच पडून राहते. मला भीती वाटते.''

मी म्हणाले, ''तुझ्या बहिणीला मात्र भीती नाही वाटत, हो ना?''

मुलगी म्हणाली, ''नाही नाही. तिला कधीच भीती वाटत नाही. पोहायच्या इथेसुद्धा ती सगळ्यात वरच्या डाइव्ह बोर्डवरून उडी मारते. ती मस्त डाइव्ह मारते आणि लांबवर पोहत जाते...

मी उत्सुकता वाटून विचारलं, ''तुझी बहीण गाणी तरी कोणती म्हणते?''

मुलगी थोडी खेदाने म्हणाली, ''तिच्या मनात येतील ती गाणी. कारण ती कवितासुद्धा करते. मला काहीही येत नाही.''

मग ती उभी राहिली आणि म्हणाली, ''मला गेलं पाहिजे.'' मी माझा हात पुढे केला. तिने तिची जाड बोटं माझ्या हातावर टेकवली. मला त्यावेळेला काय जाणवलं हे नीट सांगता येणार नाही. पण तिच्या मागे मागे जावं असं आवाहन त्यात जाणवलं. एखादी कानाला ऐकू न येणारी आर्जवी हाक असावी असं वाटलं. मी तिला म्हणाले, ''ये पुन्हा.'' पण मी काही हे मनापासून म्हटले नव्हते. ती मुलगी त्यावर काहीच बोलली नाही. आपल्या थंड डोळ्यांनी तिने माझ्याकडे नुसते पाहिले. मग ती निघून गेली. मला खरं तर सुटका झाल्यासारखं वाटायला हवं होतं. पण घराच्या दाराच्या लॅचचा बंद झाल्याचा आवाज ऐकू आल्या आल्या मी कॉरीडॉरमध्ये बाहेर धावत गेले आणि ओव्हरकोट अंगावर चढवला. मी वेगाने जिना उतरून खाली पोहोचले आणि मी ज्या क्षणी रस्त्यावर आले तेव्हाच पुढच्या कोपऱ्यावर मला जाड मुलगी वळताना दिसली.

माझ्या मनात आलं, बघू तरी ही अळी स्केटिंग कशी करते ते. बर्फावर हा जाड गोळा कसा दिसतो हे मला बघितलंच पाहिजे. मुलगी नजरेआड जाऊ नये म्हणून मी माझ्या पावलांचा वेग वाढवला.

जाड मुलगी माझ्याकडे घरात आली तेव्हा नुकतीच दुपार व्हायला लागली होती आणि आता चांगलंच अंधारून आलं होतं. या गावात मी बालपणी काही वर्षं राहिले होते खरी, पण आता मात्र मला इथलं फारसं काही ठाऊक नव्हतं. मुलीच्या पाठोपाठ जायच्या प्रयत्नात लवकरच मला कळेनासं झालं की आम्ही कोणत्या रस्त्याने जातोय ते. कोणत्या गल्ल्या, कोणती ठिकाणं मला लागली, मला काहीसुद्धा उमगेनासं झालं. हवेतसुद्धा अचानक बदल झाल्याचं मला जाणवलं. थंडी खूप वाढली आणि दव होण्याची प्रक्रिया चालू झाली होती हे नक्की. इतक्या झपाट्याने की घरांच्या छतांवरचा बर्फ थेंब होऊन घरंगळायला लागला आणि आकाशात मोठाले धुक्याचे ढग वेगाने सरकायला लागले. आम्ही गावाच्या टोकापर्यंत येऊन पोहोचलो होतो. तिथल्या घरांच्याभोवती मोठाल्या बागा होत्या. मग मुळी घरं दिसेनाशी झाली. अचानक मुलगीही नाहीशी झाली आणि मला एक घाटाची भिंत समोर उगवल्यासारखी दिसली. मला आता अशी अपेक्षा होती की आपल्याला स्केटिंगचं मोठं बर्फाळ मैदान दिसणार. तिथे मोठ्या उजेडातल्या टपऱ्या, मोठाले दिवे दिसणार आणि चमचमणारा बर्फाचा पृष्ठभाग, लोकांचा उत्साही आरडाओरडा, संगीत. परंतु वेगळंच दृश्य माझ्यासमोर होतं. कारण तिथे खालच्या बाजूला तळं होतं. त्याचे काठ चहूबाजूंनी दरम्यानच्या काळात बांधून काढलेत असं मला वाटत होतं, पण तसं काही नव्हतं, तर माझ्या लहानपणी होतं तसंच ते तळं तिथे दिसत होतं. निर्मनुष्य आणि दाट झाडीने वेढलेलं.

या अनपेक्षित दृश्याने मी इतकी भांबावून गेले की ती अनोळखी मुलगी माझ्या नजरेच्या टप्प्यातून जवळजवळ जाणारच होती. पण मग मला ती पुन्हा दिसली. ती काठाशी काहीतरी धडपड करत होती. एक पाय दुसऱ्या पायाजवळ ठेवण्याच्या प्रयत्नात होती. एका हाताने स्केटिंगचा बूट घट्ट बांधायचा प्रयत्न करत होती. हे करताना ती दुसऱ्या हातात किल्ली धरायच्या प्रयत्नात होती. किल्ली दोन-चार वेळा खाली पडली आणि जाड मुलगी घसरून बुडावर खाली पडली. बर्फावरून घसरून पुढे गेली. धडपडली, एखाद्या विचित्र सापासारखी दिसत होती. इकडे अंधार वेगाने पडायला लागला. मुलीपासून काही मीटर अंतरावर पुळणीचा रस्ता तळ्याच्या मधून आत जात होता. बर्फाच्या विस्तीर्ण पसरलेल्या पृष्ठभागावर तो काळा कुळकुळीत

दिसत होता. बर्फाचा पृष्ठभाग चंदेरी रंगात चमकत होता. पण सगळीकडे सारखा दिसत नव्हता तो. अधून मधून काळसरही वाटत होता आणि या काळसर पट्ट्यातूनच बर्फ वितळण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचं कळत होतं. मी न राहवून ओरडले, ''लवकर जा.'' आणि ती जाडी भरभर हालचाल करायला लागली. पण माझ्या सांगण्यावरून नाही, तर पुळणीच्या रस्त्याच्या जवळ जवळ शेवटाला कोणीतरी उभं होतं आणि ''जाडे, इकडे ये.'' असं ओरडत होतं. एक अलवार आणि चमकदार आकृती. ती बर्फावर स्वत:भोवती गिरक्या घेत होती. मला लक्षात आलं की ही नक्कीच तिची बहीण असणार. नाचणारी, वादळात गाणी गाणारी. कुणालाही आवडावी अशी गोड मुलगी आणि मला कळून चुकलं की दुसरं तिसरं काही नाही तर या चुणचुणीत मुलीला बघायच्या इच्छेनेच मला इथे ओढून आणले आहे.

पण त्याचवेळी या मुली धोक्यात आहेत हेही लक्षात आलं. मग एकदमच चमत्कारिक आवाज येऊ लागले. कोणीतरी कण्हल्यासारखे. बर्फाचा वरचा पृष्ठभाग फुटण्यापूर्वी हे तळं जणू खालवरून उसासे टाकत होतं. हे उसाश्यांचे आवाज तळ्याच्या खोलातून घुमत होते. अंगावर काटा आणणाऱ्या दु:खद सुरांसारखे आणि मलाच ते ऐकू येत होते. मुलींना येत नव्हते.

नाही. नक्कीच त्यांना काही ते ऐकायला येत नव्हते. नाहीतर ही भित्री जाड मुलगी कुठली स्केटिंगसाठी उतरायला! ती तिच्या अडखळत्या पावलांनी, कसंबसं रेटत पुढे पुढे गेलीही नसती. अन् तळ्याबाहेर उभ्या असलेल्या तिच्या बहिणीनेही तिला खाणाखुणा करून बोलावले नसते. ती अशी हसली नसती. बहीण एखाद्या बॅले नर्तिकेसारखी तिच्या स्केटच्या बुटाच्या टोकावर पुन्हा एकदा तिच्या नाचातल्या तालात गिरक्या घेत होती आणि त्यांना धोका कळता तर जाडीने तळ्यावर बर्फाच्या पांढऱ्या रंगाऐवजी काळ्या-गढूळ दिसणाऱ्या जागा नसत्या का टाळल्या! ही काय, आत्ता ती जागा ओलांडायच्या वेळी दचकून मागे सरकली आणि बहिणही नाही तर वरच्या बाजूने स्केटिंग करत दूरवर गेली नसती. दूरवर निर्जन भागात गेलेल्या तळ्याच्या छोट्या प्रवाहाकडे.

मला हे सगळं नीट दिसत होतं कारण पुळणीच्या रस्त्यावरून दूरपर्यंत हळूहळू पावलांनी जाण्याचं मी ठरवूनच टाकलं होतं.

पायाखालचे पाणी जरी गोठलेले होते तरी मी वेगाने पुढे जात होते. खालच्या जाड मुलीपेक्षा भरभर. मी जेव्हा मागे वळून पाहिलं तेव्हा मला तिचा चेहरा दिसू शकला. चेहऱ्यावर बधीर, पण त्याचबरोबर कसलीतरी आस लागल्यासारखा भाव होता.

एव्हाना सगळीकडे बर्फाच्या पृष्ठभागावर पडायला लागलेल्या भेगा स्पष्ट दिसत होत्या. त्या भेगांवर वेड्या माणसांच्या ओठाशी फेस दिसावा तसं फेसाळलेलं पाणी दिसत होतं. मग जाड मुलीच्या खालचा बर्फही फुटताना मला अर्थातच दिसला. ज्या जागेवर त्याआधी बहिणीने नाच केला होता तिथेच हे नेमकं घडत होतं. पुळणीच्या रस्त्यावरून काही हातावरच ही जागा होती.

मला इथे लगेच सांगितलं पाहिजे की बर्फ फुटण्याची गोष्ट जीवघेणी धोकादायक नव्हती. तलाव गोठतो तो अनेक थराथरांवर. पहिल्या थराच्या एका मीटरवर त्याच्या खालचा गोठलेला थर होता. घडलं ते एवढंच की जाड मुलगी मीटरभर खोल पाण्यात उभी होती. अर्थात पाणी अतिशय थंड होतं आणि फुटणाऱ्या बर्फाचे गोळे आजूबाजूला होते. ती फक्त काही पावलं पाण्यातून चालली असती तर पुळणीचा रस्ता लागणार होता आणि त्याला धरून ती वर आली असती. त्यावेळी मी तिला मदत केलीच असती. पण तरी त्याच वेळेला मला असंही वाटत होतं की तिला काही हे जमणार नाही, तसंच दिसत होतं ते की नाही जमत हे तिला, ती अतिशय भेदरून तिथे उभी होती आणि क्षीणपणे काहीतरी हालचाल करायला बघत होती. तिच्याभोवती पाणी हलत होतं आणि तिच्या पायाखाली बर्फ तडकून फुटत होता. तिची रास मीन होती. तो मीन आता तिला खालून ओढणार असं मला वाटलं. पण तरी मला काहीही वाटलं नाही. तिची थोडीदेखील दया नाही आली आणि मी जागेवरून हललेही नाही.

पण आता एकदम जाडीने डोके वर उचलले. रात्र पूर्ण दाटून आली होती. आकाशात ढगांमागे चंद्र आलेला दिसत होता. मला ती स्पष्ट दिसत होती. तिच्या चेहऱ्यावरच्या भावात काहीतरी पूर्ण बदलले होते. भाव तोच होता आणि तोच नव्हताही. इच्छाशक्ती आणि झपाटलेपण होतं तिथे. जणु मृत्यूच्या दर्शनाने त्या चेहऱ्याने सगळं चैतन्य पिऊन घेतलं होतं. जगातील सगळं झळझळीत चैतन्य. होय. मला खरंच तसं वाटलं की मृत्यू जवळ येऊन उभा आहे आणि हे सगळं शेवटचं आहे. मी खाली

पाण्यावर वाकले आणि मला खाली असलेला तो गोरा चेहरा दिसला, आरश्यातल्या प्रतिमेसारखा. खालच्या गढूळ पुरातून तो माझ्याकडे पाहत होता. तेवढ्यात जाड मुलीने किनारा गाठला होता. तिने हात ताणले आणि स्वत:ला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. नखांनी आणि बोटांच्या बेचक्यांनी तिने तिथे लावलेला लाकडी बाणासारखा भाग पकडला. जिथे तिनं बोटं रोवली तिथून तिच्या बोटांतून रक्त यायला लागलं आणि ती पुन्हा खाली पडली. पण जणू पुन्हा नव्याने प्रयत्न सुरू करण्यासाठीच. आणि मग एक खूप लांबच लांब झगडा सुरू झाला. मुक्ती आणि परिवर्तन यासाठी दिलेल भयावह लढा, एखादं कवच फुटावं तसं किंवा एखाद्या कोषाचे अंगाभोवतीचे धागे तुटून जावेत तसं. मला हे दिसत होतं. याक्षणी मी तिला मदत करूही शकले असते. पण मला कळून चुकलं की माझ्या मदतीची काही एक गरज उरली नाहीये. मला पुरतं कळून चुकलं...

त्या रात्री मी घरी कशी आले मला आठवत नाही. मला एवढंच आठवतंय की जिन्यावर मला जेव्हा माझी शेजारीण भेटली आणि मी तिला म्हटलं की तळ्याकाठी अजून दाट झाडी आणि मोठ्ठी कुरणं आहेत. तेव्हा ती म्हणाली, ''छे छे, आता काही राहिलं नाही तिथे.'' मला असंही आठवतंय की माझ्या टेबलावर कागद इतस्तत: विखरून पडले होते आणि त्यांच्यातच मधे कुठूनतरी एक जुना फोटो डोकावत होता, माझाच होता तो. उभी कॉलर असलेला पांढरा लोकरीचा फ्रॉक घातला होता मी. पाण्यासारखे नितळ डोळे दिसत होते आणि मी खूप जाड दिसत होते.

***

# उजवा हात

**मूळ कथा : अलिक्सांदर सलज्हिनीत्सिन**
**भाषांतर : अनघा भट**



परिचय: अलिक्सांदर इसायेविच सलज्हिनीत्सिन (१९१८–२००८)

रशियन जनतेचा ‘आतला आवाज’ असे ज्याचे वर्णन करता येईल त्या सलज्हिनीत्सिनचा नुकताच मृत्यू झाला. रशियन राज्यक्रांती, महायुद्ध, स्टॅलिनची दडपशाही, विजनवास, कम्युनिझमचा पाडाव आणि रशियातील यादवीसदृश परिस्थिती या सर्वांचे ते साक्षीदार होते.

सलज्हिनीत्सिन यांचे वडील सैन्यात अधिकारी होते. मुलाच्या जन्मापूर्वीच त्यांचा अपघाती मृत्यू झाला. सलज्हिनीत्सिन यांना त्यांच्या आईनेच वाढवले. त्यांचे आजोळ जमीनजुमला बाळगून होते. १९३० मध्ये त्यांच्या मालमत्तेचे सामुदायिकीकरण करण्यात आले. सलज्हिनीत्सिन गणितज्ज्ञ होते. मॉस्को विद्यापीठातून ते उत्तीर्ण झाले होते. तत्त्वज्ञान आणि सौंदर्यशास्त्राचाही त्यांचा गाढा अभ्यास होता. १९४० साली त्यांनी नताल्या अलिक्स्येवना रिश्येतवस्का यांच्याशी विवाह केला. त्याची परिणती १९५२ साली घटस्फोटात झाली. १९५७ साली त्यांनी पुन्हा नताल्याशीच विवाह केला. १९७२ मध्ये ते पुन्हा विभक्त झाले. १९७३ मध्ये त्यांनी नतालिया दिमित्र्येवना स्वितलोव्हा हिच्याशी विवाह केला. या विवाहापासून त्यांना तीन मुले झाली.

दुसऱ्या महायुद्धात ते प्रशियामध्ये सैन्यात कार्यरत असताना त्यांना १९४५ मध्ये अटक झाली. कारण झाले ते त्यांनी आपल्या मित्राला लिहिलेल्या खासगी पत्रात

स्टॅलिनचा उल्लेख 'मिशाळ', 'मालक' आणि 'बाब्रोस' (मालक या अर्थाचा ज्यू शब्द) असा केल्याचे. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्यावर खटला चालवण्यात येऊन त्यांना आठ वर्षे सश्रम छळछावणी व त्यांनतर 'कायमस्वरूपी अंतर्गत विजनवास' ठोठावण्यात आला.

१९५० च्या सुमारास त्यांना कॅन्सरची गाठ उद्‌भवली. ती काढून टाकण्यात आली. पण कॅन्सर आत पसरत राहिला. १९५४ मध्ये त्यांना कॅन्सरवरील उपचारार्थ ताश्कंद येथे पाठवण्यात आले. तिथल्या त्यांच्या अनुभवांवर आधारित पुस्तक म्हणजे 'कॅन्सर वॉर्ड.' या संग्रहातील त्यांनी लिहिलेल्या 'उजव्या हाताचा पंजा' या कथेचे भाषांतर येथे दिले आहे.

स्टॅलिनच्या मृत्यूनंतर त्यांचे रिहॅबिलिटेशन करण्यात आले. आता ते लेखन करू शकत होते. १९६२ मध्ये त्यांची 'इवान देनिसाविचच्या आयुष्यातील एक दिवस' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. परंतु केजीबीचा ससेमिरा पाठीमागे लागला. त्यांची अनेक हस्तलिखिते जप्त करण्यात आली. तशाही परिस्थितीत त्यांनी 'कॅन्सर वॉर्ड' लिहून पूर्ण केले. १९६८ मध्ये त्यांची गुलाग आर्किपेलागो, कॅन्सर वॉर्ड इ. पुस्तके प्रसिद्ध झाली व एकच खळबळ उडाली.

सोव्हिएट दडपशाहीचा चेहरा त्याद्वारे जगापुढे आला.

१९७० मध्ये त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. तो स्वीकारायला स्वीडनला गेल्यास आपल्याला रशियात परत येऊ दिले जाणार नाही या भीतीने त्यांनी मॉस्कोतल्या स्वीडिश दूतावासात तो आपल्याला दिला जावा असा

प्रस्ताव मांडला. त्याला स्वीडनने मान्यता दिली नाही. शीतयुद्धाच्या काळात एका महासत्तेला नाराज करणे स्वीडनला परवडणारे नव्हते. १९७४ मध्ये त्यांना सोव्हिएट रशियातून निष्कासित करण्यात आले. त्यांनतर ते फिनलँडमध्ये गेले. जर्मनीत ते प्रसिद्ध लेखक हाइनरिष ब्योल यांच्या घरी राहिले व नंतर अमेरिकेत गेले.

श्रमछावणीच्या काळात त्यांनी मार्क्सिस्ट विचारसरणीचा त्याग केला व ते रशियन ऑर्थोडॉक्स चर्चच्या विचारांकडे वळले. अमेरिकेत असताना टोकाची उजवी विचारसरणी, जाज्वल्य रशियन राष्ट्राभिमान व ज्यू विद्वेष या त्यांच्या भूमिकेमुळे रिगन सरकार अडचणीत आले. अमेरिकेची उथळ व चंगळवादी जीवनपद्धती सलज्हिनीत्सिन यांना अजिबात आवडली नाही.

१९९० मध्ये त्यांना पुन्हा एकदा रशियन नागरिकत्व बहाल करण्यात आले. १९९४ मध्ये ते रशियाला परतले. त्यांचे लेखन यानंतरही चालू राहिले. कविता, लघुकथा याबरोबरच ज्यू-रशियन संबंध व रशियन इतिहास यांवर त्यांनी तीन मोठी पुस्तके लिहिली. ज्यू-रशियन संबंधांवरचे त्यांचे पुस्तक वादग्रस्त ठरले. रशियन राज्यक्रांतीचे अपश्रेय त्यांनी 'ज्यू कॉन्स्पिरसी'च्या माथी मारले. त्यांचे 'रस्सीया ना अब्वाल्ये' (कडेलोटाच्या बिंदूवर रशिया) हे पुस्तकही खूप गाजले.

असे हे वादळी व वादग्रस्त व्यक्तिमत्त्व २००८ मध्ये काळाच्या पडद्याआड गेले. त्यांची 'उजवा हात' ही कथा येथे दिली आहे.

***

**त्या** हिवाळ्यात मी ताश्कंदला आलो, तो जणु मृतप्राय अवस्थेत. मी इथे आलो ते मरण्यासाठी.

अजून थोडं जगण्यासाठी मला इथून परत पाठवलं.

एक महिना, अजून एक महिना आणि अजून एक महिना. लटपटत्या पावलांनी मी फिरायला बाहेर पडायला लागलो, तोवर ताश्कंदचा खिडक्यांतून दिसणारा मत्त वसंत ऋतू ग्रीष्मात बदलला होता. सर्वत्र हिरव्यागार पानांची दाटी झाली होती आणि हवा अगदी उबदार होती.

माझी तब्येत सुधारते आहे, हे स्वत:शी देखील कबूल करायचं धाडस मला नव्हतं. माझ्या चुकार अवास्तव स्वप्नातसुद्धा मी अजून माझं वाढलेलं आयुष्य वर्षांत नाही तर महिन्यांत मोजत होतो. आणि मेडिकल इन्स्टिट्युटच्या इमारतींच्या आजूबाजूला असलेल्या बागेतल्या खडीच्या आणि डांबरी पायवाटांवरून सावकाशपणे चालत होतो. मला वरचेवर थांबावं लागत होतं, तर काही वेळा घशाशी येणाऱ्या जोरदार उमाश्यांमुळे बसून डोकं गुडघ्यात खुपसावं लागत होतं.

माझ्या आजूबाजूला असणाऱ्या इतर रुग्णांसारखाच मी होतो आणि नव्हतोही. मला त्यांच्याइतके हक्क नव्हते. आणि त्यामुळेच मी त्यांच्याइतकं बोलतही नव्हतो. त्यांना कुणी कुणी भेटायला येत असे. नातलग त्यांच्याखातर टिपं गाळत असत. पूर्णपणे बरे होणे– हाच एक त्यांचा उद्योग होता. – हेच ध्येय होतं. पण संपूर्णपणे बरं होण्याचं मला काही कारणच नव्हतं; त्या वसंतात, वयाच्या पस्तिशीतल्या मला, कुणासाठी बरं व्हावं असं कुणी नातलगच नव्हतं. शिवाय माझ्याजवळ पासपोर्ट* नव्हता. जर मी आता बरा झालो असतो तर मला ही हिरवाई, ही सुफल भूमी सोडून वैराण वाळवंटात, मला जिथे कायमचं धाडण्यात आलं होतं, त्या पहाऱ्यात परत जावं लागलं असतं. दर आठवड्याला हजेरी द्यावी लागली असती. मरू घातलेल्या मला उपचारासाठी पाठवण्याची कृपा करण्यासाठीसुद्धा तिथल्या प्रमुखांनी खूप वेळ घेतला होता.ह्या सगळ्या गोष्टींबद्दल माझ्या आजुबाजूला असणाऱ्या चिंताक्रांत रूग्णांना काही सांगणं मला शक्य नव्हतं.

जरी मी त्यांना सांगितलं असतं, तरी त्यांना ते समजलं नसतं....

परंतु संथपणे, भरपूर विचार करून घालवलेली दहा वर्षांची माया पाठीशी

*पासपोर्ट – सोविएत युनियन मधील नागरिकांना मिळणारे अधिकृत ओळखपत्र

असल्याने मला ते एक सत्य कधीच कळून चुकलं होतं, की आयुष्याची खरी चव थोडक्यात असते, अधिकात नाही; म्हणजे ह्या अशक्त पायांनी घेतलेल्या अडखळत्या पावलांत असते. छातीत कळ उठू नये म्हणून काळजीपूर्वक घेतलेल्या श्वासांत असते. सूपमध्ये सापडलेल्या, थंडीतही खराब न झालेल्या एखाद्या बटाट्यात असते.

अशा रीतीने तो वसंत ऋतू माझ्या आयुष्यातला सर्वात तापदायक आणि सर्वात सुंदर होता.

ह्या सगळ्या गोष्टी मी विसरून तरी गेलो होतो किंवा मी त्या पाहिल्या तरी नव्हत्या. सगळंच मला छान वाटत होतं. अगदी आईस्क्रिम विकणारी गाडी, झाऱ्या हातात घेतलेले झाडूवाले, लांबुडक्या मुळ्यांच्या गड्ड्या विकणारे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे भिंतीत पडलेल्या भगदाडातून चुकून गवतावर आलेलं शिंगरू.

जसजसे दिवस सरकू लागले तसतसं मला माझ्या क्लिनिकपासून दूर जायचं धाडस  होऊ लागलं. गेल्या शतकाच्या अखेरीस जेव्हा ह्या विटांच्या आणि घडीव चिरे कोपऱ्याला असलेल्या इमारती बांधल्या, बहुधा तेव्हाच लावलेल्या ह्या बागेत मी जाऊ लागलो. अगदी सूर्य उगवल्यापासून ते पूर्ण दिवसभर, अगदी पिवळ्या विजेच्या दिव्यांनी उजळलेल्या संध्याकाळपर्यंत पार्कात अथकपणे हालचाल चालू असे. धडधाकट लोक घाईघाईने इकडून तिकडे जात असत, रूग्ण रखडत इकडे तिकडे फिरत.

अनेक वृक्षाच्छादित पथ जिथे मुख्य गेटाकडे जाणाऱ्या वाटेला येऊन मिळत होते तिथे मिशांवर दगडी हसू घेऊन भला थोरला अलाबास्टरचा स्टॅलिन झळकत होता. याच वाटेवर पुढे गेटकडे जाताना समान अंतरावर इतर लहान लहान बस्ट्स ठेवले होते.

त्याच्यापलीकडे  स्टेशनरीचे दुकान होते. त्यात प्लॅस्टिकच्या पेन्सिली आणि आकर्षक नोटबुकं विकायला होती. माझ्याजवळ अगदी मोजकेच पैसे होते हे तर खरंच – शिवाय आयुष्यात पूर्वी माझ्याकडेही नोटबुकं होती. पण ती नको त्या हातांत पडली. त्यामुळे मी असा विचार केला, की ती नसलेलीच बरी.

गेटाच्या अगदी जवळ फळविक्रीचा स्टॉल आणि चायखाना* होता. चट्टेरी पट्टेरी पायजमे घातलेल्या आम्हां रुग्णांना चायखान्यात येऊ देत नसत. परंतु

*चायखाना – उझबेकी पद्धतीचे उपारगृह

चायखान्याभोवतीचं कुंपण बुटकं होतं. त्यातून पलीकडचं दिसत असे. आजवर खराखुरा चायखाना मी प्रत्यक्ष बघितलाच नव्हता. प्रत्येकासाठी काळ्या आणि हिरव्या चहाची वेगवेगळी किटली येते असा. चायखान्यात युरोपीय विभाग होता – टेबल खुर्च्या मांडलेला, आणि उझबेकी विभाग होता – सलग खाली बैठक मांडलेला. टेबलांवर बसलेले चटाचट खातपीत असत आणि चहाच्याच प्याल्यात चहाचे पैसे टाकून जात असत. तर उझबेकी विभागात उन्हापासून बचाव करायला उभारलेल्या तट्ट्यांच्या खाली बैठकीवर बसून लोक तासन्‌तास खात असत, किटल्यांमागून किटल्या चहा पीत असत, लांबच लांब पसरलेल्या दिवसात दुसऱ्या कसल्याच कामाचा मागे तगादा नसल्यागत फासे, सोंगट्या खेळत असत.

फळविक्रते मात्र रुग्णांनाही फळे विकत असत. परंतु माझे कैदीभत्त्याचे कोपेक्स त्यांच्या किमती ऐकूनच आक्रसून जात असत. मी लक्षपूर्वक जर्दाळू, बेदाणे आणि ताज्या चेरीचे ढीग न्याहाळून बघत असे अन् दूर जात असे.

त्याच्यापुढे एक उंच भिंत होती. गेटापलीकडेही रुग्णांना सोडत नसत. ह्या भिंतीपलीकडून दिवसातून दोनदा तीनदा बँडवर वाजवलेल्या सुतकी धुना हॉस्पिटलमध्ये तरंगत येत असत. (कारण शहराची लोकसंख्या दहा लाख होती आणि जवळच स्मशान होतं.) हॉस्पिटल ओलांडून जाईपर्यंत सुमारे दहा मिनिटं तो आवाज येत असे. ढोलाचे ठोके एक स्वत:तच मग्न असणारा ताल धरत असत. गर्दीवर ह्या ठेक्यांचा काही परिणाम होत नसे. त्यांचा ठेका जलद चाललेला असे. धडधाकट माणसं जेमतेम तिकडे वळून बघत असत– नसत आणि पुन्हा घाईघाईने त्यांना जिकडे जायचं तिकडे जात. (आपल्याला कुठे जायचं ते त्यांना चांगलं माहिती असे.) तर रुग्ण ही धून वाजायला लागली की थांबत, बराच वेळ ऐकत राहत, खिडक्यांतून डोकावून बघत.

जसजसा मी आजाराच्या पकडीतून खात्रीशीररीत्या सुटू लागलो, मी जिवंत राहणार हे जसजसं निश्चित होऊ लागलं, तसतसं मी आजुबाजूला बघताना कष्टी होऊ लागलो. हे सगळं सोडावं लागणार याचं मला दु:ख होऊ लागलं.

इथल्या स्टेडियमवर डॉक्टर्स पांढऱ्या कपड्यांत टेनिसचे पांढरे चेंडू इकडे तिकडे फेकत असत. जन्मभर मला टेनिस खेळायची फार इच्छा होती पण ते कधी जमलंच नव्हतं.

उंच तुटलेल्या कडांची मातकट पिवळी सलार नदी वेड्यागत खळखळत होती. बागेत इथे तिथे ओकवृक्ष उभे होते. झुळझुळणारे दाट छायेचे मेपल वृक्ष होते, जपानी अकॅशिया होते. अष्टकोनी कारंज्यातून नाजुक, चंदेरी धारा त्यांच्या शेंड्याकडे उसळत होत्या. हिरवळी तर अशा काही होत्या! अगदी रसरशीत, विस्मृतीतच गेलेलं गवत.(श्रमछावणीत एखाद्या शत्रूसारखा गवताचा जाळून नायनाट करत असत. माझ्या छावणीत तर बिलकूलच गवत नव्हतं.)हिरवळीत तोंड खुपसून पडणं, संथपणे गवताचा वास आणि सूर्यामुळे त्यातून निघणारी वाफ आत ओढून घेणं, हीसुद्धा सुखाची परमावधी होती.

गवतावर पहुडणारा तिथे मी एकटाच नव्हतो, इथे तिथे बसून आपली जाडजूड पुस्तकं तोंडपाठ करणारे वैद्यकीय विद्यार्थी असत किंवा गप्पागोष्टींत बुडून गेलेले परीक्षा देऊन बाहेर पडणारे असत. किंवा कुणी चपळ स्पोर्ट्सबॅग खांद्याला लटकावून स्टेडियमच्या शॉवर रूममधून बाहेर पडणारे असत. संध्याकाळी नीट न दिसणाऱ्या आणि त्यामुळेच तिप्पट आकर्षक भासणाऱ्या, अंगाला चिपकणाऱ्या आणि न चिपकणाऱ्या कपड्यातल्या मुली कारंज्याला वळसा घालून जात असत, रस्त्यांवर सळसळत असत.

मला कुणाची तरी अतिशय दया येत असे. माझ्या सहकैद्यांची, दिम्यानस्कमध्ये गारठून गेलेल्या, ऑश्विट्झमध्ये जाळून टाकलेल्या, झेजकझानमध्ये गॅस चेंबरमध्ये टाकलेल्या, तैगामध्ये मरत असलेल्या सहकैद्यांची दया येत असे, की आम्हाला ह्या मुली कधीच मिळणार नाहीत म्हणून किंवा त्या मुलींची अशासाठी दया येत असे की मी त्यांना कधीच काही सांगू शकणार नव्हतो आणि त्यांना कधीच काही कळणार नव्हतं.

मातीच्या आणि डांबरी वाटांवरून दिवसभर वाहत असायच्या बायका, बायका, बायका! – तरुण डॉक्टर्स, नर्सेस, ऑफिसात काम करणाऱ्या, रजिस्ट्रार्स, आया, धोबिणी, डिस्पेन्सर्स आणि रुग्णांच्या भेटीला येणाऱ्या नातेवाईक. पांढऱ्याशुभ्र कडक ओव्हरकोटात आणि चमकदार दक्षिणी पद्धतीच्या – बहुतेक वेळेला अगदी झिरझिरीत कपड्यात त्या माझ्याशेजारून जात. त्यांच्यापैकी ज्या सधन असत, त्या बांबूच्या काटक्यावरच्या फॅशनेबल चिनी छत्र्या– सोनेरी, निळ्या, गुलाबी – हातात फिरवत

जात. त्यांच्यापैकी प्रत्येकजण क्षणभर झळकून मला एक विषयच देऊन जात असे. – मी भेटेपर्यंत तिने जगलेलं जीवन, तिची माझी ओळख होण्याची शक्यता (किंवा अशक्यता.)

मी अगदी दया येण्याजोगा होतो. मी भोगलेल्या आयुष्याच्या सर्व खुणा माझ्या हडकुळ्या चेहऱ्यावर होत्या– छळछावणीत धारण कराव्या लागलेल्या दु:खी, गंभीर आठ्या, रखरखीत त्वचेवरची मृत्यूची राखाडी छाया, नुकत्याच झालेल्या आजारामुळे आणि त्यावरच्या औषधांच्या विषामुळे गालावर चढलेली हिरवट छटा. सतत वाकण्याच्या आणि लपण्याच्या कैदेतल्या सवयीमुळे माझ्या पाठीला पोक आलं होतं. विदुषकासारखं, चट्टेरी पट्टेरी जाकिट जेमतेम माझ्या पोटापर्यंत येत होतं. तसलाच चट्टेरी-पट्टेरी पायजमा माझ्या घोट्यांच्या कितीतरी वर संपत होता. बोथट टोकाच्या, रेक्झिनच्या कैदीछाप बुटांमधून वापरून वापरून काळपट पडलेल्या मोज्यांची टोकं दिसत होती.

या बायकांपैकी कुणीही माझ्या शेजारून चालायलासुद्धा राजी झाली नसती! पण मी स्वत:ला बघत नव्हतो आणि माझ्या डोळ्यांना जितकं स्पष्ट दिसायचं तितकंच स्पष्ट जग मलाही दिसत होतं.

असंच एकदा संध्याकाळच्या सुमारास मी मुख्य गेटापाशी उभा राहून बघत होतो. आजुबाजूंनी नेहमीचाच प्रवाह वाहत होता. छत्र्या हलत डुलत होत्या, रेशमी कपडे झळकत होते, चमकदार पट्ट्याच्या रेशमी विजारी, भरतकाम केलेले सदरे, टोप्या जात होत्या. वेगवेगळ्या सुरातले आवाज येत होते. फळविक्रेते फळं विकत होते.आणि कुंपणापाशी कुंपणावर रेलून एक लहानसा बेढब अगदी गरीब असावा असा माणूस उभा होता आणि अधुनमधून अगदी धाप लागल्यागत म्हणत होता, ''कॉम्रेड्स... कॉम्रेड्स...''

ती रंगीबेरंगी कार्यमग्न गर्दी त्याच्याकडे लक्ष देत नव्हती. मी त्याच्याजवळ गेलो, ''काय म्हणतोयस भाऊ?''

ह्या माणसाचे पोट काहीच्या काही होतं.एखाद्या गरोदर बाईपेक्षाही मोठं. एखाद्या पेट्यासारखंच. ओथंबलेलं. ठिगळ लावलेलं मळकं जाकिट आणि तशीच घाणेरडी विजार यांना न जुमानणारं. तळाला जोड लावलेले त्याचे बूट जड आणि

धुळीनं माखलेले होते. ऋतुमानाशी पूर्णपणे विसंगत असा जाडजूड, बटणं तुटलेला, मळकट, तेलकट कॉलर आणि बाह्यांच्या कडांचा ओव्हरकोट, त्याच्या खांद्यांवरून लटकत होता. डोक्यावर जुनीपुराणी, चुरगाळलेली टोपी होती, अगदी एखाद्या बुजगावण्याला शोभावी अशी.

त्याने मोठ्या कष्टाने आपला हात उचलला. घट्ट वळलेल्या मुठीतून मी घामेजलेला, चुरगाळलेला कागद काढला. बब्रोव्ह नावाच्या माणसाने अडखळत्या पेनाने तिरप्या तिरप्या अक्षरात लिहिलेला अर्ज होता तो. त्याला दवाखान्यात दाखल करून घ्यावं यासाठी लिहिलेला. अर्जावर दोन शेरे होते. एक निळ्या शाईत तर एक लाल शाईत. निळ्या शाईतला शेरा नकारार्थी होता तर लाल शाईतल्या शेऱ्याने त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करून घ्यावे असा हॉस्पिटलला आदेश दिला होता. निळ्या शाईतला शेरा कालच्या तारखेचा होता तर लाल शाईतला आजचा.

एखाद्या बहिऱ्याशी बोलावं अशा मोठ्या आवाजात मी त्याला म्हणालो,''तुम्हाला एक नंबरच्या इमारतीत जायला लागेल, स्वागतकक्षात. हे हे पुतळे आहेत ना, ते ओलांडून जा. ती पलीकडची इमारत..''

मग माझ्या लक्षात आलं, की अगदी इप्सित स्थळी आल्यावर त्याची शक्ती संपुष्टात आली होती, पुढे काही विचारपूस करणं, गुळगुळीत डांबरी सडकेवरून पावलं पुढं टाकणं, इतकंच काय पण दीड किलो वजनाची ती जीर्णशीर्ण पडशी हातात उचलणंसुद्धा त्याच्याने होत नव्हतं. मग मी ठरवलं,'' ठीक आहे, बाबा, मी नेतो तुम्हाला, चला. पडशी द्या इकडे.''

त्याला ऐकू तरी नीट येत होतं. हलकं होत त्याने पडशी मला दिली, माझ्या हातावर भार टाकत तो पावलं जवळपास न उचलता, कशीतरी घासत चालू लागला. धुळीनं माखल्याने त्याचा ओव्हरकोट करड्या रंगाचा दिसत होता,त्यातलं त्याचं कोपर धरून मी त्याला चालवू लागलो. त्याच्या प्रचंड फुगलेल्या पोटामुळे म्हातारा पुढे झुकल्यासारखा झाला होता. तो वरचेवर धापा टाकत होता.

ताश्कंदमधल्या सुंदर तरुणींचा हात हातात घेऊन मनातल्या मनात मी ज्या पायवाटांवरून फिरलो होतो, त्याच पायवाटांवरून आम्ही दोघं, जीर्णशीर्ण दोघं

जाऊ लागलो. अलाबास्टरच्या पुतळ्यांजवळून आम्ही अगदी सावकाश पाय ओढत गेलो.

शेवटी एकदाचे वळलो. आमच्या वाटेत एक आरामशीर बाक होतं. माझ्या सहप्रवाश्याने त्यावर बसू या, अशी विनंती केली. मलासुद्धा मळमळायला लागलं होतं. मी थोडासा थांबलो. आम्ही दोघंही बसलो. इथूनही तेच कारंजं दिसत होतं.

वाटेवरून येताना म्हातारा माझ्याशी  एकदोन शब्द बोलला होता. आता दम खाऊन त्याने आणखीही काही सांगितलं. त्यानं उरालला जाणं गरजेचं होतं. त्याच्या पासपोर्टवर त्याचं डोमिसाईलही उरालचंच होतं. हीच खरी अडचण होती. पण ताखिया ताशेमपाशी (इथेच कालवा खणायला सुरुवात झाली होती, मला आठवलं) आजारपणानं त्याला गाठलं. उरगेंचमध्ये त्याला महिनाभर हॉस्पिटलमध्ये राहावं लागलं. त्याच्या पोटातलं, पायावरचं पाणी काढून टाकलं आणि डिसचार्ज दिला. चारझोऊमध्ये त्याला ट्रेनमधून खाली उतरावं लागलं. उरसात्येवस्कायामध्ये नाही की कुठेच नाही, कुठेच त्याच्यावर उपचार होईनात.  त्याला उराललाच पाठवावे लागले, त्याच्या पासपोर्टवरच्या डोमिसाईलप्रमाणे. रेल्वेतून प्रवास करण्याइतकं त्राण त्याच्यात उरलं नव्हतं. आणि तिकिटासाठी पैसे शिल्लक राहिले नव्हते. इथे ताश्कंदमध्येसुद्धा ॲडमिट करून घ्यावं म्हणून तो दोन दिवस प्रयत्न करत होता.

तो दक्षिणेत काय करत होता, तो इकडे कसा काय आला, हे काही मी विचारलं नाही. वैद्यकीय अहवालांनुसार त्याचा आजार गुंतागुंतीचा होता. त्याच्याकडे नुसतंच बघितलं तरी जीवघेणा आजार होता हे कळत होतं. मी पुष्कळ रुग्ण बघितले होते आणि त्याला जगायची इच्छा शिल्लक नाही हे मला स्पष्ट कळत होतं. त्याचे ओठ सैल पडले होते, बोलणे कसेबसे ऐकू येत होते. त्याच्या डोळ्यांत कसलासा मंदपणा होता.

त्याच्या त्या टोपीचंही त्याला ओझं झालं होतं. कष्टाने हात उचलून त्याने ती काढली अन् गुढघ्यावर ठेवली. पुन्हा एकवार कष्टाने हात उचलून त्याने घाणेरड्या बाहीने कपाळावरचा घाम पुसला. त्याच्या माथ्यावर टक्कल पडलं होतं. त्या भोवताली न विंचरलेले, धुळीनं माखलेले अद्यापही भुरे असलेले केस अंधारात दिसत होते. त्याला वार्धक्याने नाही तर आजारपणाने संपवलं होतं.

कीव यावी इतक्या हडकलेल्या, कोंबडीच्या पिलासारख्या दिसणाऱ्या त्याच्या मानेवर खूप सैलसर त्वचा लोंबकळत होती. त्रिकोणी कंठमणी पुढच्या बाजूला स्पष्टपणे दिसत होता.

ते डोकं टिकावं तरी कशाच्या आधारावर? आम्ही खाली बसताक्षणीच ते त्याच्या छातीवर लोंबलं आणि हनुवटीच्या आधारावर टिकून राहिलं.

तो तसाच थिजला, गुडघ्यांवर टोपी आणि सताड उघडे डोळे. आम्ही फक्त विश्रांतीसाठी एक मिनिटभर टेकलो होतो आणि त्याला स्वागतकक्षात जायचं होतं, हे जणू तो विसरलाच.

आमच्यासमोर अगदी जवळच चंदेरी धाग्यासारखी कारंज्याची धार आवाज न करता उडत होती. त्या दिशेने दोन मुली येत होत्या. त्या पुढे गेल्यावर मी त्यांच्या पाठीकडे टक लावून पाहात होतो. एकीने नारिंगी रंगाचा स्कर्ट घातला होता तर दुसरीने गडद लाल रंगाचा. मला त्या दोघीही फार आवडल्या.

माझ्याशेजारी बसलेल्याने ऐकू येईल इतक्या जोरात श्वास सोडला. छातीवरचं डोकं इकडून तिकडे हलवलं. पिवळट-निळसर पडलेल्या पापण्या वर उचलून त्याने तिरप्या नजरेने माझ्याकडे वर पाहिलं. ''बिडी-सिगरेट काही आहे का, कॉम्रेड?''

''काही मिळणार नाही बाबा'' मी ओरडलो,''बिडी, सिगरेट न ओढतासुद्धा तुला जमिनीवर बूट घासत चालावं लागतंय. जरा आरशात स्वत:कडे बघ, विड्या ओढतोय!'' (मी स्वत: एक महिन्यापूर्वी खूप कष्टाने सिगरेट सोडली होती.)

त्याने नाकाने जोराजोरात श्वास घ्यायला सुरुवात केली. मग पुन्हा पिवळट पापण्या उचलून माझ्याकडे बघितलं, एखाद्या कुत्र्यासारखं.

''तरीपण! तीन रुबल्स दे, कॉम्रेड''

द्यावेत की न द्यावेत, मी विचारात पडलो. काही झालं तरी मी एक कैदी होतो अन् तो मुक्त होता. मी 'तिथे' कितीही काम केलं तरी मला त्याचे काहीच पैसे मिळत नव्हते. जेव्हा पैसे मिळायला लागले तेव्हा ते कापून घ्यायला लागले.: पहारेकऱ्यांसाठी, दिवाबत्तीसाठी, शोध घेणाऱ्या कुत्र्यांसाठी, प्रमुखांसाठी!

आपल्या विनोदी दिसणाऱ्या जाकिटाच्या छातीवरच्या लहानश्या खिशातून मी माझं फाटकं तुटकं पाकिटं काढून त्यातले कागद तपासले. सुस्कारा सोडून मी म्हाताऱ्याला तीन रुबलची नोट दिली.

''धन्यवाद!'' तो कण्हला. मोठ्या कष्टाने हात वर उचलत त्याने ती नोट हातात घेतली, अन् खिशात ठेवली. रिकामा झालेला त्याचा हात गुढघ्यावर जाऊन आपटला. डोकं पुन्हा हनुवटीचा टेकू करून छातीवर पडलं.

आम्ही गप्प बसलो.

ह्यावेळी आमच्यासमोरून एक बाई गेली. मग तिच्यापाठोपाठ दोन विद्यार्थिनी गेल्या. त्या तिघीही मला फार आवडल्या. बाईचा आवाजही ऐकला नाही, उंच टाचांच्या बुटांची टकटक ऐकली नाही अशी वर्षे गेली होती माझी.

''तुम्हाला पत्र मिळालं हे बरं झालं, नाही तर आठवडाभर फिरत बसावं लागलं असतं. काम साधंच पण अशी खूप कामं असतात.''

त्याने छातीवरून हनुवटी उचलली आणि माझ्याकडे वळला. त्याच्या डोळ्यांत जाणीव उमटली, आवाज थरथरू लागला. आणि बोलणं स्पष्टपणे उमटलं.

''पोरा! मला ठेवून घेतील कारण मी पारितोषिक मिळवलेला माणूस आहे. मी क्रांतीत सहभागी होतो. त्सारित्सीनो पाशी सिरग्येइ मिरोनिच कीरव्हने स्वत: माझ्याशी हस्तांदोलन केलं होतं. मला खासगी पेन्शन दिलं पाहिजे''

गाल आणि ओठांची लहानशी हालचाल - स्वाभिमानी स्मिताची छाया - त्याच्या दाढी न केलेल्या चेहऱ्यावर उमटली. मी त्याच्या फाटक्यातुटक्या कपड्यांकडे आणि खुद्द त्याच्याकडेही निरखून पाहिलं.

''मग का देत नाहीत?''

''आयुष्यात असंच घडलं'' त्याने सुस्कारा सोडला. ''आता मला ओळखसुद्धा दाखवत नाहीत. जुने काही कागदपत्र जळून गेले, काही हरवले. साक्षीदार कुठून आणायचे? सिरग्यइ मिरोनिच मारले गेले.... माझीच चूक आहे... कागद जपून नाही ठेवले... एकच राहिलंय...''

सुजलेले गोल गोल सांधे असलेल्या, एकमेकांवर चढलेल्या बोटांचा आपला उजव्या हाताचा पंजा त्याने खिशापर्यंत नेला आणि खिशातून फाईल काढू लागला. पण त्याचं क्षणभराचं अवसान गळालं. त्याचा हात आणि डोकं पुन्हा खाली लोंबलं. तो थिजल्यासारखा झाला.

सूर्य एव्हाना इमारतींच्या पाठीमागे गेला होता. आणि रिसेप्शन (तिथवर आता फक्त शंभर पावलं अंतर राहिलं होतं.)मध्ये जाणं  गरजेचं होतं. क्लिनिकमध्ये जागा मिळणं माझ्या मते अवघड होतं.

मी म्हाताऱ्याचा खांदा पकडला. – ''बाबा ! भानावर ये! दार दिसलं का? दिसलं? मी जातो. तू स्वत: ये, जमेल तुला.नाही तर माझी वाट बघ. मी तुझी पडशी घेऊन जातो.''

त्याने समजल्यासारखी मान हलवली.

रिसेप्शनपाशी – भल्या मोठ्या पोपडे पडत असलेल्या दालनाच्या पार्टिशन घालून केलेल्या भागापाशी दिवसा रुग्णांची गर्दी असे. आपला नंबर लागेपर्यंत ते तासन्तास वाट बघत बसलेले असत. (रिसेप्शनच्या पाठीमागे इथे स्नानगृह, ड्रेसिंगरूम, केशकर्तनालय इत्यादी होतं.) परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की आत्ता तिथे कुणीच नव्हतं. बंद झालेल्या काचेच्या खिडकीवर मी टकटक केलं. टोकेरी नाकाच्या, ओठांना लाल नव्हे तर गडद जांभळी लिपस्टिक लावलेल्या अगदी तरुण नर्सने ते दार उघडलं.

''काय हवंय?'' ती टेबलापाशी बसून बहुधा कुठल्या तरी गुप्तहेराचं कॉमिक्स वाचत होती. तिचे डोळे अगदी चंचल होते.

दोन शेरे मारलेला अर्ज तिला दिला अन् म्हणालो, ''तो खूप हळू हळू चालतोय. मी त्याला घेऊन येतो.''

कागदाकडे नजरही न टाकता ती एकदम खेकसली, ''नाही, नाही! कोणालाही अजिबात आणू नका! तुम्हाला नियम माहिती नाहीत का? सकाळी नऊ नंतर ॲडमिट् केलं जातं पेशंटना.''

''नियम'' तिलाच माहिती नव्हते. मी खिडकीतून डोकं आत खुपसलं आणि जाईल तेवढा हातही खुपसला. म्हणजे तिला दार माझ्या तोंडावर बंद करता आलं नसतं. खालचा ओठ वाकडा करून मी एखाद्या गुंडाच्या आवाजात म्हणालो,''ए बाई, जरा ऐक! माझ्याशी पंगा घेऊ नको!''

ती घाबरली. आपलं  स्टूल खोलीच्या आतल्या भागाकडे सरकवत म्हणाली, ''ॲडमिशन नाही, सर! सकाळी नऊला या!''

''तू तो कागद वाच!'' मी अगदी खालच्या पट्टीत पण धमकावल्यागत म्हणालो.

तिने वाचला.

''ठीक आहे! नियम तर सर्वांना सारखेच आहेत. उद्या कदाचित जागा असणार नाही दाखल करून घ्यायला. आज सकाळी नव्हतीच.''

आज सकाळी जागा नव्हती हे ती जणू खुषीनेच म्हणाली. जणू काही मला टोमणा मारायलाच!

''हा माणूस प्रवासात आहे, कळतंय का? त्याची मुक्कामाची काय सोय?''

मी डोकं खिडकीतून मागे घेतलं आणि कैदेतल्या गुंडासारखं बोलणं थांबवलं, हे बघून तिच्या चेहऱ्यावर पुन्हा पहिल्यासारखेच कठोर- आनंदी भाव पसरले.

''आम्हाला काय सगळेच प्रवासी! ठेवायचं कुठे सगळ्यांना? वाट बघा म्हणावं. घरी उतर म्हणावं एखाद्याच्या.''

''तुम्ही जरा बाहेर या अन् बघा त्याची अवस्था कशी आहे.''

''अजून नाही का काही? मी काय पेशंट्स गोळा करायला जाऊ का काय? मी म्हणजे काय हेल्थ इन्स्पेक्टर आहे का?''

आणि तिनं शिष्टपणे आपलं टोकेरी नाक मुरडलं. उत्तरं तर ती अशी झणझणीत देत होती, की जणू तिला उत्तर देणं भाग पडत होतं.

''तुम्ही इथे कोणासाठी बसला आहात?'' मी हाताचा पंजा खिडकीपासच्या भिंतीवर आपटला. भिंतीच्या रंगाचा एक लहानसा ढग उठला. ''दार बंद करून घ्या नाही तर !''

''तुम्हाला कोणी विचारलंय!! उद्धट नाही तर!'' ती ताड्कन उठली आणि वळसा घालून बाहेर कॉरिडॉरमध्ये आली. ''तुम्ही कोण? मला शिकवू नका. ॲम्ब्युलन्स येतात आमच्याकडे''

ते भडक जांभळे ओठ आणि तसलीच जांभळी नखं सोडली तर ती दिसायला बरी होती. तिचं नाक तिला शोभत होतं.

हवा गरम असल्याने तिच्या ओव्हरऑल्सचा गळा छातीवर उघडाच होता. त्यातून तिचा गळ्याला बांधलेला गुलाबी रंगाचा रुमाल आणि यंग कम्युनिस्ट लीगचा बॅज छान दिसत होता.

‘‘'अस्सं? जर तो स्वत:हून तुमच्याकडे आला नसता आणि त्याला जर ॲम्ब्युलन्स घेऊन आली असती, तर तुम्ही दाखल करून घेतलं असतंत ना? असा नियम आहे ना?'

माझ्या गमतीशीर अवताराकडे तिने तुच्छतेने रोखून पाहिलं, मीही तिच्याकडे रोखून पाहिलं. माझ्या बुटांतून पायाला गुंडाळलेल्या पट्ट्या डोकावतायत हे मी साफ विसरून गेलो होतो. ती फस्‌कन हसली. मग चेहरा कोरा करत म्हणाली, ‘‘पेशंट! हो, आहे तसा नियम!'' आणि पार्टिशनच्या पलीकडे गेली.

माझ्यापाठीमागे काहीतरी खसफसल्याचा आवाज झाला. मी वळून पाहिलं. माझा दोस्त उभा राहिला होता. त्याने सगळं ऐकलं होतं. त्याला सगळं समजलं होतं. भिंतीच्या आधाराने आणि व्हिजिटर्ससाठी असलेल्या भल्यामोठ्या बाकाला रेलून तो उजव्या हाताचा पंजा कसाबसा हलवत होता. त्यात ती चुरगाळलेली फाईल धरलेली होती.

अतिशय धापा टाकत, कसाबसा तो बोलत होता. ‘‘हे... हे.... दाखवा... बघू दे ... हे''

मी त्याला आधार देऊन बाकावर बसवलं. आपल्या अशक्त बोटांनी फाईलमधून ते एकुलतं एक पत्र शोधून काढायचा तो प्रयत्न करत होता. त्याला ते अजिबात जमत नव्हतं.

मी त्याच्याकडून ती मुडपलेली फाईल घेतली. कोपऱ्याला टोकं मुडपू नयेत म्हणून तिला जोड लावले होते. मी ती फाईल उघडली.

वाकडीतिकडी, जांभळ्या रंगाची अक्षरं कुणीतरी टाईप केली होती–

‘‘सर्व जगातल्या कामगारांनो, उठा!''

प्रशस्तिपत्र

हे प्रशस्तिपत्र कॉम्रेड एन्.के.बब्रोव यांना देण्यात येते, अशाकरिता की १९२१ साली ते सैन्याच्या सुप्रसिद्ध....... खास सेवादलाच्या 'शांतिपूर्ण क्रांती' तुकडीचे सदस्य होते आणि स्वत:च्या हाताने त्यांनी अनेक हलकटांना कंठस्नान घातले.

कमिस्सार

(सही)

त्याखाली एक फिक्कट जांभळा शिक्का.

छातीवरून हात फिरवत मी हळूच विचारलं,''खास सेवादल म्हणजे काय? कुठलं?''

त्याच्या पापण्या डोळ्यांवर पडत होत्या. तो उत्तरला, ''आहे, दाखवा तिला..''

मला त्याच्या उजव्या हाताचा पंजा दिसला- लहानसा, टरारून फुगलेल्या शिरा, गोल, सुजलेले बोटांचे सांधे, फाईलमधून कागदही ओढून बाहेर काढू न शकणारा. पायदळातल्या माणसाला घोड्यावरनं एका घावात कसे आडवं कापत असत ते मला आठवलं.

किती विचित्र आहे.... हात पूर्ण चालत होता तेव्हा तोच हात तलवार फिरवून मुंडकं, मान, खांद्याचा भाग छाटत होता. आणि आता तोच पंजा फाईलही धरू शकत नाही....

काचेच्या खिडकीजवळ जाऊन मी पुन्हा खिडकीवर हात आपटला. रजिस्ट्रेशन करणारीनं मान उंचावून बघितलंही नाही. ती आपलं कॉमिक्स वाचत राहिली. त्याच्या सर्वात  वरच्या पानावर मला हातात पिस्तुल घेऊन खिडकीत उडी घेणाऱ्या दिलेर सैनिकाचं चित्र दिसलं.

ते फाटलेलं प्रशस्तिपत्रक मी तिच्या पुस्तकाच्या वर ठेवलं. वळलो, आणि दाटून आलेला उमासा आवरायला छातीवरून हात फिरवत दाराकडे गेलो. डोकं खाली दाबून ताबडतोब आडवं होणं मला गरजेचं होतं.


''हे कागद का टाकलेत तुम्ही? घेऊन जा!'' माझ्यामागे खिडकीतून ती पोरगी जोरात ओरडली.

तो ज्येष्ठ नागरिक बाकावरच खचला होता. त्याचं डोकं, खांदेही जणू धडावर लोंबत होते. त्याची अशक्त बोटं फाकटून पडली होती. ओव्हरकोट फैलावून लटकत होता. गोल, प्रचंड फुगलेलं पोट मांड्यांवरती कसंतरीच पडलं होतं.

***

# पाळीव

**मूळ स्वीस-जर्मन लेखक: फ्रान्त्स होलर**
**भाषांतर - विद्यासागर महाजन**



**परिचय: फ्रान्त्स होलर**

**(१९४३)**

**१९६५ पासून होलर कथालेखन करू लागले, व नाटकेही लिहू लागले. रंगभूमीवरही त्यांच्या नाटकांचे प्रयोग झाले आहेत. त्यांनी मुख्यत: छोट्या छोट्या साहित्यप्रकारांची निर्मिती केली आहे. हे एक स्वीस-जर्मन लेखक आहेत. त्यांचा जन्म १९४३ मध्ये स्वित्झर्लंड येथे बील या गावी झाला. त्यांनी १९६३ नंतर झ्युरिच विद्यापीठात जर्मन व फ्रेंच साहित्याचा अभ्यास सुरू केला. त्याचबरोबर त्यांनी लेखन आणि एकपात्री नाट्यप्रयोग करणे सुरू केले. त्यात मिळालेल्या यशाने लेखन आणि नाटक हेच आपले कार्यक्षेत्र असल्याचे त्यांच्या लक्षात आले. छोटी नाटुकली, नाटके, चित्रपटकथा, दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांचे लेखन, कथा आणि बालसाहित्य असे विविध लेखनप्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले. त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे राजकीय विषयांवरील टीका आणि मनोरंजन यांची बेमालूमपणे केलेली सरमिसळ होय. त्यांना साहित्यासाठीचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. प्रस्तुत कथा एका प्रसिद्ध जर्मन साप्ताहिकाच्या एका अंकात प्रसिद्ध झाली होती.**

१

**मी**- मी म्हणजे मला अगदी *मी* च असं म्हणायचं नाही, पण मला *एकजण* होता, त्याचं वय अमूक होतं, उंची तमूक होती, *तो* असा असा होता वगैरे लिहिणं पसंत नसल्यानं मी *मी* संबोधून लिहीतोय- तर *मी* एक प्राणी पाळलाय.

मी एकटाच राहत असल्यानं एके दिवशी मला आपल्या अवती भवती कुणीतरी असावं असं प्रकर्षानं वाटू लागलं. एखादा हलता-फिरता जीव. मी सकाळी घराबाहेर

पडताना मला निरखणारा,संध्याकाळी घरी परतल्यावर आनंदानं माझ्या अंगावर उड्या मारणारा. माझी ही इच्छा काही दिवस तशीच तीव्रतेनं टिकून राह्यली तसं मी पाळीव प्राणी विकणाऱ्या दुकानात जायचं ठरवलं.

एखादा फर असलेला, केसाळ प्राणी दिसतोय का ते पाहण्यासाठी माझी नजर सुरूवातीपासूनच या दुकानातल्या विविध प्राण्यांमध्ये भिरभिरत होती. कोणता प्राणी निवडावा या विषयी माझ्या डोक्यात निश्चित काही नव्हतं हे खरं, पण तरी मी एक विशिष्ट गोष्ट शोधत होतो आणि तिथं असलेल्या एकाही प्राण्यात मला ती गोष्ट दिसून आली नाही. माझी अडचण अशी होती की मला नक्की काय हवंय ते मी नेमकं सांगू शकत नव्हतो. मला फक्त एकच दिसत होतं की तिथं ठेवण्यात आलेल्या प्राण्यांपैकी एकही माझ्या कल्पनेतला नव्हता. उदा. तिथला तो हॅमस्टर* पाळायला मजा आली असती, पण एकत्र राहत असूनही त्याला माझ्या अस्तित्वाची दखल घेणं शक्य झालं नसतं,त्याचा तो आणि माझा मी असेच राह्यलो असतो, तर मग त्याला पाळून काही उपयोग होईल का अशी धास्ती मला वाटली. याच कारणासाठी गिनीपिग्ज काय किंवा पांढरे उंदीर काय मला नको होते. उंदरांच्या झटपट होणाऱ्या हालचालींमुळे ते पाळण्याची कल्पना मी उडवून लावली. या उलट कुत्रा पाळायचा तर मला कुत्र्याचं फार करावं लागलं असतं आणि मांजरीचं घरात नसणं आणि दारोदार फिरणं मला चाललं नसतं. त्या दुकानदारानं मला एक बोनसाय ससा दाखवला, तो मला कदाचित पटला असता,पण अचानक माझ्या मनानं घेतलं की अशा कृत्रिम पैदाशीनं पैदा झालेल्या सशाच्या भावनाही जर तशाच बोनसाय असतील तर-? माकड घ्यायचा विचार करायचा तर ते इतक्या हालचाली करतं की त्याला घरात पिंजऱ्यात कोंडून घालणं मला नको वाटलं. अशा रीतीनं केसाळ प्राण्यांची निवड तिथंच थांबली.

मी पुन्हा दुकानदाराला आणखी दुसरं काही नाही का म्हणून विचारलं,तसा त्यानं दुकानाच्या मागच्या बाजूच्या खोलीतून एक पिंजरा आणला. त्या पिंजऱ्यात एका कोपऱ्यात एक छोटंसं फरचं, केसाळ मुटकुळं पडलं होतं, आणि त्या मुटकुळ्याशेजारी एक बशी होती. आपल्याला हवा तो प्राणी हाच हे मला तत्क्षणी कळून चुकलं.

*हॅमस्टर - एका मोठ्या उंदरासारखा/ घुशीसारखा पाळीव प्राणी, हॅमस्टर त्यांच्या गालात अन्नाचा साठा करून ठेवू शकतात

त्या दुकानदारानं मला सांगितलं की तो प्राणी आत्ताच मलायाहून इथं आणण्यात आला आहे. त्याच्याविषयीची कागदपत्रं हरवली असल्यानं त्या प्राण्याला काय म्हणतात हेही त्याला ठाऊक नाही. बहुदा तो स्लॉथ* किंवा ऑपोसम् असा काहीतरी असावा. अंगाचं मुटकुळं करून पडून राहिल्यानं तो अजून नीट दिसलाही नाहीये. दुकानदाराला तो प्राणी निदान आणखी काही दिवस तरी स्वत:कडे ठेवून घ्यायची इच्छा होती.

पण मी त्या प्राण्याची दुकानदाराला इतकी मोठी किंमत देऊ केली की त्यानं मला तो लगेच द्यायची तयारी दाखवली. त्यानं मला त्याला काय खायला द्यावं त्याविषयी सल्ला दिला. म्हणजे माकडाला आपण देतो साधारण तेच याचंही खाद्य समजावं. फळं, शेंगा, प्यायला रोज ताजे स्वच्छ पाणी आणि जीवनसत्वे असलेल्या धान्याचे मिश्रण, त्या मिश्रणाचं एक पोतंही मी त्या दुकानदाराकडून विकत घेतलं. शिवाय मी जांभळ्या फुलांची मुळं त्याला चावण्यासाठी म्हणून घेतली आणि मग त्या प्राण्याचा पिंजरा घेऊन मी दुकानाबाहेर पडलो. घरी आल्यावर तो बऱ्यापैकी मोठ्या आकाराचा पिंजरा एका जुन्या पद्धतीच्या भल्या थोरल्या लाकडी कपाटावर ठेवून दिला. मी पिंजऱ्याजवळ बसून त्या प्राण्याचं ते केसाळ मुटकुळं हलण्याची तास दोन तास वाट पाहिली. पण तो जागचा ढिम्म हलला नाही. त्याचा श्वास चालू आहे का नाही हेही कळू नये इतका तो निश्चल पडला होता. पण मी जेव्हा त्या पिंजऱ्याच्या गजातून त्या प्राण्याच्या केसाळ कातडीला हात लावला तेव्हा ती गरम लागली.

मग मी पिंजऱ्यात एक सोललेलं अर्ध केळं आणि एक बारीक चिरलेलं सफरचंद टाकलं, थोडेसे जीवनसत्वयुक्त धान्याचे दाणे, भांड्यात स्वच्छ पाणी भरून ठेवलं. एवढं करून मी घरातून बाहेर निघून गेलो. मी रात्रीचा घरी परतलो आणि दिवा लावला. त्याला खाण्यासाठी ठेवलेलं सगळं जसंच्या तसं तिथल्या तिथं होतं. फक्त पाणी तेवढं पिऊन टाकलं होतं.

दुसऱ्या दिवशी पाह्यलं तर तो प्राणी अजूनही पिंजऱ्यात एका कोपऱ्यात पडून होता. अजूनपर्यंत त्यानं काहीही खाल्लं नव्हतं. केळं आणि सफरचंद काळपट पडल्यानं मी ते काढून घेतलं, त्या जागी नवं ठेवलं आणि पाण्याचं भांडं पुन्हा भरून ठेवलं. संध्याकाळी मी परत आलो तेव्हाही त्या प्राण्यानं कशालाही तोंड लावलं

*स्लॉथ- दक्षिण अमेरिकेत आढळून येणारा झाडीमध्ये राहणारा आणि अतिशय मंद हालचाली करणारा प्राणी)

नव्हतं, पाण्याचं भांडं मात्र रिकामं झालं होतं, आणि आता त्या प्राण्याच्या केसाळ मुटकुळीतून एक पंजा बाहेर आलेला दिसत होता. हा पंजा जास्त करून माणसाच्या हातासारखाच दिसत होता, त्या हाताला पाच काळी, सुरकुतलेली, लव असलेली बोटं होती, आणि त्याची नखं अगदी व्यवस्थित अणुकुचीदार होती एवढं मात्र मला नीट दिसलं. मग मी माझ्या हाताच्या बोटांनी हलकेच त्या पंजाला स्पर्श केला, तशी लगेच त्यानं आपला पंजा केसाळ मुटकुळ्यात ओढला.

त्या प्राण्याला अन्नाची काहीच गरज नसल्यासारखं वाटलं. फक्त त्याच्यासाठी ठेवलेलं पाणी मात्र तो सगळं पिऊन संपवत होता, दिवसातून दोनदा पित होता. त्याच्या शरीराचे एकेक अवयव मला दिसेपर्यंत बराच काळ जावा लागला.त्याच्या त्या लहानशा हातानंतर त्याची शेपूट मला दिसली. पिंजऱ्यातून बाहेर येऊन खाली लोंबकळताना ती अचानक माझ्या नजरेला पडली. ती शेपूट इतकी लांब असावी याचं मला नवल वाटलं. मी तिला हात लावला, हाताला कुठे टणक स्नायू जाणवले नाहीत, ती लुळी पडल्यासारखीच हाताला लागली. म्हणजे तो प्राणी आपली शेपटी झाडाच्या फांदीला गंडाळून घेत असेल हे अशक्यप्राय वाटले. त्या शेपटीच्या टोकाला असलेले केसांचे झुपके पाहून मी खलास झालो. त्या शेपटीला हलकेच धरून मी एक जोराचा झोका दिला. ती लगोलग त्या प्राण्याच्या केसाळ अंगाखाली नाहीशी झाली.

एका दिवशी सकाळी त्याचा एक पाय माझ्या नजरेला पडेपर्यंत माझं असं मत होऊ लागलेलं होतं की हा प्राणी म्हणजे स्लॉथ* तरी असावा नाहीतर सी कॅट तरी. हा त्याच्या केसाळ अंगाखालून डोकावत असलेला पाय म्हणजे एक खूर होतं यात शंका नव्हती. हे खूर मधोमध दुभंगलेलं होतं. ज्ञानकोशात मला अशी माहिती मिळाली की क्लोव्हन फूट ॲनिमल्सचे असे खूर असतात. म्हणजे हा प्राणी गायी, शेळ्या, मेंढ्या,उंट, सांबर, जिराफ .... यांच्या कुळातला असावा. त्यातल्या त्यात असं समजायला हरकत नाही असं मला वाटलं की हा म्हणजे एखादी अतिशय लहानशी बोनसाय शेळी असावी. पण मग मला त्याच्या हाताची संगती लागत नव्हती, आणि तो तर मी अगदी नीट निरखून पाह्यला होता.

*स्लॉथ- दक्षिण अमेरिकेत आढळून येणारा झाडीमध्ये राहणारा आणि अतिशय मंद हालचाली करणारा प्राणी)

ज्ञानकोशात पुढे लिहिलं होतं: अनेक नामशेष झालेल्या प्राण्यांचे गट. मला वाटलं कदाचित आपला हा प्राणी म्हणजे योगायोगानं नामशेष झालेल्या प्राण्यांपैकी असू शकेल. या विचारांनी मला आनंद झाला. शिवाय मला हा प्राणी पुढे अन्नावाचून कसा जगू शकतो याचं स्पष्टीकरणही सापडलं होतं. त्याविषयी ज्ञानकोशात लिहिलं होतं की हे खूर दुभंगलेले प्राणी रवंथ करतात. याचा अर्थ हा प्राणी नामशेष झालेल्या दीर्घकाळ रवंथ करणाऱ्या दुभंगलेल्या खुरांचा प्राणी होता.

हे सगळे कयास खोटे ठरले. मी आणलेला प्राणी नक्की कोण होता हे मला एक रविवारी सकाळी रेडिओ लावला तेव्हा कळून चुकलं. सणासुदीचं वातावरण निर्माण करणारं संगीत नुकतंच संपलं होतं. लगोलग निवेदकानं कॅथॉलिक धर्माच्या प्रवचनाचं प्रक्षेपण सुरू होत असल्याचं सांगितलं. ही उद्घोषणा होताक्षणी पिंजऱ्यातून एक कर्णकर्कश किंकाळी ऐकू आली. मी वळून पाहिलं तर पिंजऱ्यातला प्राणी उडी मारून दोन्ही हात गजांना वेढून उभा होता. तो प्राणी म्हणजे सैतान आहे हे मी तेव्हा ओळखलं.

मी लगेच रेडिओ बंद केला आणि काहीतरी बोलून त्या प्राण्याला शांत करू लागलो. त्याच्या अंगावरचा केस न् केस ताठ उभा राहिला होता आणि त्याचं सर्वांग थरथरत होतं. ज्या दिशेतून आवाज आला तिकडे त्याचे भीतीने ताठर झालेले डोळे नजर लावून होते. त्याच्या नजरेत केवळ भीतीच नाही, तर तिरस्कारही भरला आहे असं मला जाणवलं. शिवाय या प्राण्याच्या कपाळावर असलेली दोन शिंगंही मला स्पष्ट दिसली. म्हणजे हा एक खराखुरा सैतान होता.

त्या दिवशी तो प्राणी हळूहळू शांत झाला आणि तो आपलं डोकं जांभळ्या फुलांच्या मुळांवर टेकून पिंजऱ्याबाहेर पाहत राहिला. तेव्हा आता आपण काय करायला हवं याचा मी विचार करत होतो. मला काही सुचत नव्हतं. कोणताच उपाय सुचत नव्हता आणि मला काही करायचंही नव्हतं. सैतान पाळायला माझी काहीच हरकत नव्हती. आत्तापर्यंत आपण जसं राहिलो तसंच पुढेही राहायचं असं मी ठरवलं.

## २

हळूहळू त्या प्राण्यातले वेगळेपण दृग्गोचर होऊ लागले. सर्वात प्रथम माझ्या लक्षात आलं की त्या सैतानाला आपल्या अंगाची गुंडाळी करून पडून राहणं सगळ्यात उत्तम जमतं. त्या खेरीज इतर कोणत्याही अवस्थेत तो अवघडलेलाच असतो. ताठ उभं राहून चालण्याच्या जातीचाच तो प्राणी असणार! कुत्र्यासारखा पसरून तो पडून राह्यला तर ते विचित्र दिसायचं, पुन्हा त्याला गुडघ्याभवती हात वेढून नीट बसताही यायचं नाही. मी त्याला बसण्यासाठी म्हणून एक छोटंसं स्टूल बनवून घेतलं. मग तो त्यावर बायकांसारखा दोन्ही पाय एकाला एक चिकटवून बसू लागला. तरी अजून त्या पिंजऱ्यात तो पुरता सुखात नव्हता. त्याच्यासाठी एक झूला तयार करवून घ्यावा असं माझ्या मनात आलं. झूला मिळाल्यावर मी तो पिंजऱ्याच्या गजांना बांधला. त्यामुळं सैतान चांगलाच उत्साहात आला. अनेकवेळा तो त्यात पडून झोके घ्यायचा. लवकरच त्याला कल्पना सुचली की तहान लागल्यावर आपण आपल्या शेपटीचा झुपका त्या पाण्याच्या भांड्यात बुचकळायचा,आणि तो झुपकन् वर तोंडात घालून चोखायचा.

अजूनपर्यंत त्यानं पाणी सोडलं तर बाकी कशालाही तोंड लावलं नव्हतं. पण नंतर मी जेवताना माझ्याकडे असा काही बघायला लागला की त्याच्या नजरेनं मी अस्वस्थ होऊ लागलो होतो. मी जेवायला बसलो की तो त्याच्या झूल्यावरून खाली उडी मारायचा, पिंजऱ्याचे गज आपल्या हातांनी पकडून ताठ उभा राहून माझ्या ताटलीकडे टक लावायचा. माझी त्याच्याकडे पाठ असली तरी माझ्या पाठीलाही त्याची नजर जाणवायची. तो आपल्याकडे असा पाहतोय ही भावना मला त्रासदायक वाटू लागली तसा मी त्याच्याकडे वळलो आणि पुढे जेवू लागलो. पण आता त्याची नजर मला असह्य व्हायला लागली. मग तूही खा की असं म्हणून मी माझ्या ताटातला एक तुकडा त्याच्यापुढे धरला. त्यानं आपली मान फिरवली, पण पुन्हा वळून माझ्याकडे तो पाहू लागला तसा मी माझ्यातल्या कटलेटचा एक तुकडा तोडून त्याला देऊ केला. त्यानं तो तत्काळ हिसकावून घेतला आणि तोंडात कोंबला आणि कचाकचा चावून घशातून खाली ढकलला. मग मी त्याला आणखी एक तुकडा दिला, तोही त्यानं आधीप्रमाणेच फस्त केला. शेवटी मी पिंजऱ्याच्या

छोट्याशा दारातून उरलेलं हाड आत सरकवलं. ते हाडूक चावत, चघळत बसायच्याऐवजी त्यानं ते लगेचच खाऊन टाकलं याचं मला नवल वाटलं. माझं जेवण झाल्याचं त्यानं पाह्यलं, तसा तो त्याच्या झूल्यात जाऊन पडला आणि हलके हलके झोके घेऊ लागला.

सैतान खातोय हे लक्षात आल्यावर मी त्याला सगळ्या प्रकारचे पदार्थ देऊ लागलो. पण त्याला फक्त मांस हवं असायचं. अगदी माशांनाही तो तोंड लावायचा नाही. मी जेव्हा त्याला एखादा साधासुधा पदार्थ देऊ केला किंवा एखादं कोंबडीचं हृदय असं काहीतरी देऊ केलं, तेव्हा त्यानं आपलं तोंड दुसरीकडे फिरवलं, काही वेळा तर तो गुर्रकावून अंगावर येऊ लागला. एकूण तो फक्त चांगल्या दर्जाचं मांस स्वीकारत होता, अगदी मी स्वत: खात होतो तसंच, आणि ते सुध्दा कच्चं नाही तर भाजलेलं. होता होता तो इतका हटवादी झाला की मला त्याला आख्खाच्या आख्खा तुकडा द्यावा लागायचा. मग मी दोघांसाठी मांस विकत घेऊ लागलो. खाटिकही माझ्यासाठी दोघाजणांसाठीचं मांस कापताना गालातल्या गालात हसू लागला.

आता मला ऐकणाऱ्याच्या तोंडाची चवच निघून जाईल अशी एक गोष्ट सांगावी लागणार आहे. पण मला ती गोष्ट बरीच सांभाळून घ्यावी लागली. सैतान जोवर फक्त पाण्यावरच राहत होता, तो पर्यंत माझ्या नजरेला कधी त्या सैतानाचं उत्सर्जन पडलं नव्हतं, अगदी त्याची लघवी सुध्दा नाही. त्या सैतानाचं शरीर प्यायलेला पाण्याचा थेंब न थेंब पचवत होतं असं दिसत होतं. पण जसजसा तो मांस भक्षण करू लागला तसतसा त्यानं जुलाबसदृश विष्ठा टाकायला सुरूवात केली. त्यात ती विष्ठा त्याच्या तंगड्यांवरून घरंगळू लागली. त्यामुळे खोलीत असह्य दुर्गंधी पसरू लागली. मग मला रोज संध्याकाळी आल्यावर सगळा पिंजरा धुवून काढावा लागत होता, आणि त्याच्या तंगड्याही स्पीरीटमध्ये बुडवलेल्या कापडानं पुसून काढाव्या लागत होत्या. नंतर त्यानं आपली विष्ठा त्या पाणी प्यायच्या भांड्यात टाकायला सुरूवात केली, तसं मला तेही रोज पूर्ण धुवून ठेवावं लागत होतं. शिवाय तो पिंजऱ्याच्या गजांतून धार सोडू लागला, तसं मला तो पिंजरा ठेवलेल्या लाकडी कपाटावर मेणकापड घालून ठेवावं लागलं.

या सगळ्याचं मला फारच काम पडू लागलं. शिवाय खोलीत ती उग्र दुर्गंधी भरून राह्यली, आणि रोज कितीही सफाई केली तरी ती जाईना झाली. एकदा मी विचार केला की आपण याला खिडकीत टांगून ठेवावा काय? पण माझ्या लक्षात आलं की त्याला दहा-पंधरा मिनिटं जरी मोकळ्या हवेत ठेवला तरी थंडीनं त्याचे दात कडाकडा वाजायला लागतायत. म्हणजे त्याला उबदार हवाच मानवत होती.

मी त्याच्या तंगड्या स्वच्छ पुसून काढलेल्या त्याला अतिशय आवडायचं. मग मी त्याला जरा वेळ खोलीत हिंडायला सोडायचो. त्याची चाल फेंगडी होती. दोन पायांवर उभा राहून तो चालायचा. त्याला एखादे वेळी उंचावरची एखादी गोष्ट निरखून पाहावीशी वाटली की मला त्याला वर उचलून धरावं लागायचं, मग तो आपलं डोकं वर करून त्याला हव्या असलेल्या वस्तूकडे पाहून हलकेच खोकायचा. एकदा त्याला सगळ्यात वरच्या कप्प्यातलं काहीतरी दिसलं म्हणून मी त्याला उंच उचलून धरलं. तिथं पोचल्या पोचल्या त्यानं खसकन् त्या कप्प्यातून एक पुस्तक ओढलं आणि जमिनीवर भिरकावलं. त्यानं माझ्या हातातून ताडदिशी खाली उडी मारली आणि संतापातिरेकाने त्या पुस्तकावर नाचून त्यानं थयथयाट केला आणि त्या पुस्तकाच्या चिंध्या चिंध्या करून टाकल्या. बायबल होतं ते.

धर्माच्या बाबतीतली त्याची नापसंती त्याच्या वागण्यातून आता दिवसेंदिवस जास्त स्पष्ट दिसू लागली. असंच एकदा त्याला माझ्या घरातल्या पॅसेजमध्ये टांगलेलं निसर्गचित्र पाह्यचं होतं, मी त्याला उंच उचलून धरलं असेल नसेल तोच त्यानं आपल्या खुरानं त्या चित्रावर अशी काही कचकून लाथ घातली की त्या चित्रावरच्या काचेचा भुगाच झाला. मग त्यानं चित्रातल्या पार्श्वभूमीवर क्षितीजरेषेशी चितारलेला चर्चचा मनोरा आपल्या पंजांनी ओचकारून टाकला. त्या चित्रात तो मनोरा इतक्या मागच्या बाजूला फिकटसर चितारला होता की तोपर्यंत मला तो दिसलाच नव्हता.

त्याला सांभाळायच्या, त्याच्यावर ताबा ठेवण्याच्या दृष्टीनं सर्वात कठिण दिवस कोणता असेल तर तो म्हणजे रविवार. चर्चच्या घंटा सुरू झाल्या की सैतान मुसमुसून रडू लागयचा. पिंजऱ्यात एका कोपऱ्यात जाऊन बसायचा, आणि केविलवाणा होऊन, गोंधळून जाऊन माझ्याकडे पाहत राह्यचा. मग त्याच्या त्या घायाळ दुःखी अवस्थेतून त्याला सावरायला मला पुढं व्हावं लागायचं. आधी मला घंटानाद

क्षीणपणे ऐकू यावा म्हणून काय करावं काही कळायचंच नाही. मी खिडक्या गच्च बंद करून घ्यायचो, पडदे ओढून घ्यायचो.

पण तरी सैतानाची नजर तशीच केविलवाणी दिसायची. दुपारी जेवण्यासाठी म्हणून आणलेलं व्हील उर्फ वासराचे मांस मी त्याच्याकडे घेऊन जायचो, पण तो माझ्याकडे जणु अपमानित झाल्यासारखा पाह्यचा. घंटानाद ऐकू येऊ नये म्हणून मी मोठमोठ्यानं गायला लागायचो. पण त्याचा काहीच परिणाम व्हायचा नाही. मग कधी कधी मी माझे त्याला शांत करायचे सारे प्रयत्न थांबवून टाकायचो, मात्र दुसऱ्या कोणत्याही कामात माझं लक्ष लागायचं नाही. एकदा मी कमालीचा वैतागलो आणि शिव्या हासडतच मी खटाखट खिडक्या सताड उघडून टाकल्या. त्या बरोबर तो सैतान शांत झाला, आणि माझ्याकडे कृतज्ञतापूर्वक पाहू लागला. त्यानंतरचा माझा तो आख्खा रविवार शांतपणाने गेला. मग संध्याकाळी पुन्हा घंटानाद सुरू झाला, तो त्रस्त,अस्वस्थ झाला तशी मी त्याला ऐकू जातील इतक्या जोरानं शिव्या हासडल्या आणि तो पुन्हा शांत झाला.

पण आता तो दिवसेंदिवस जास्त हट्टीपणा करू लागला. आता घंटानाद सुरू होऊन त्याला त्रास व्हायला लागला की मीच त्याच्याकडं जायचं आणि घंटानाद संपेपर्यंत त्यानं पिंजऱ्याबाहेर काढलेला हात हातात घेऊन त्याच्याजवळ थांबायचं. हा सारा वेळ मी हळू आवाजात पण त्वेषाने धर्माच्या नावानं शिव्या हासडत राह्यचा. एखाद्या वेळी मी असं करायचं टाळलं की तो लगेच रडवेला व्हायचा, आणि जर मी त्याच्या पिंजऱ्याजवळ गेलो नाही, तर तो हुंदके देत गदगदायचा. मी तसा धार्मिक नसलो तरी हे प्रत्येक रविवारी असं धर्माच्या नावानं शिव्या हासडणं माझ्या डोक्यात चढायला लागलं. आणि तरीही अजूनपर्यंत त्या सैतानाला मी एकटा सोडू शकलेलो नाही. कारण आपण सैतानाला असं दिवसभर त्याच्या पिंजऱ्यात दु:खात बुडवून रडत ठेवणं मला मानवतेला धरून वाटत नव्हतं.

दर रविवारी शिव्या देणं एक वेळ ठीक आहे, पण मला खरी सतावणारी गोष्ट म्हणजे त्या सैतानामुळे घरादारात पसरणाऱ्या उग्र दुर्गंधीचं काय करायचं? बाजारात मिळणाऱ्या नेहमीच्या निर्जंतुक फवाऱ्यांचा काही उपयोग होईना तसा मी होमिओपथी आणि नवौषधीवाल्यांचा आधार घ्यायला सुरूवात केली आहे. उदाहरणार्थ आत्ता

घरात सर्वत्र स्वच्छ वाळवलेल्या जॅस्मीनफुलांच्या छोट्या छोट्या पिशव्या टांगल्यात. त्या पोत्यांवर मी रोज अॅन्थ्रोपोसोफिकल लव्हेंडर तेलाचे थेंब टाकतो. माझ्या जेव्हा लक्षात आलं की हा उग्र वास माझ्याही अंगाखाद्यांवर खेळवला जातोय तेव्हा मी हादरलो. माझ्या बगलेत घाम जमा झाला आणि त्याला हा वास आला तेव्हा मला हे कळालं. असंच चालू राहिलं तर आपणही या सैतानासारखाच वास मारू हे माझ्या तेव्हाच लक्षात आलं. बरं हा वासही काही गावठी, गोठ्यातल्यासारखा नाही, नाहीतर त्या वासाशी मिळतं जुळतं घ्यायला मी एखाद्या शेतावरच्या घरात माझा मुक्काम हलवला असता. हा वास कसा आहे त्याचं नेमकं वर्णन करून सांगणं अशक्य आहे. तो म्हणजे गंजलेल्या म्हणा किंवा जळणाऱ्या कचऱ्यासारखा, कुजलेली फुलं ठेवलेल्या शिळ्या पाण्यासारखा, आणि श्वास गुदमरून टाकणाऱ्या प्रेताच्या दुर्गंधीसारखा असा काहीसा आहे, आणि ज्याच्या अंगाला हा वास येत असेल तो चार-चौघात जाऊ शकणार नाही, एखाद्या हॉटेलात म्हणा किंवा पोस्ट ऑफीसमध्ये तो प्रवेश करू धजणार नाही. आपल्या नोकरीच्या ठिकाणी जाण्याची तर बातच सोडा!

ज्याला मला काय काय करावं लागतंय याची कल्पना आहे, तो मला मी माझी त्या प्राण्यापासून सुटका करून घ्यावी असाच सल्ला देईल, आणि सारासार विचार केला तर असा सल्ला देण्यात काही वावगे आहे असे म्हणता येणार नाही. पण मला नेमकं तेच करता येत नाहीये. मला त्या सैतानाचा लळा लागलाय असंच म्हणाना. त्याला काही आवडलं की तो असा काही पाहतो की मी हेलावून जातो. त्याला आपली आवश्यकता आहे, आणि जर आपण आपल्या सर्वशक्तिनिशी त्याचं केलं नाही तर त्याची अवस्था दयनीय होईल अशी भावना मला स्पर्शून जाते. शिवाय अगदी त्याला सोडायचं म्हणलं तरी कसं सोडायचं हा प्रश्न आहेच. त्याला पुन्हा प्राण्यांच्या दुकानात परत करणं मला खात्रीचं वाटत नाही. त्याला पोत्यात घालून खोल पाण्यात फेकणं मला शक्य होणार नाही. एखाद्या जनावराच्या डॉक्टरला बोलावून त्याला विष टोचून मारायचं म्हणलं तर तो मला पुरता जनावरासारखाही वाटत नाही, आणि तो जनावरांचा डॉक्टरही मी सैतानाला घेऊन त्याच्या दवाखान्यात तपासणीला घेऊन गेलो तर काय म्हणेल कोणास ठाऊक! एकुणच सैतानाच्या

बाबतीत कोणावरही विश्वास टाकायचं मला धाडस होत नाही. मी काही काळ असाही विचार केला की माझ्या सैतानाला एखाद्या धर्मोपदेशकाकडे घेऊन जावं, मी धर्मशास्त्राची पुस्तकं चाळली तेव्हा माझ्या लक्षात आलं की अगदी पारंपारिक विचाराच्या लोकांचाही हल्ली असा चालता फिरता सैतान आहे यावर विश्वास बसणार नाही. त्यांनाही असंच वाटतं की सैतान हा माणसाच्या मनाचाच एक भाग आहे, आणि हा समज मला स्वत:ला स्वागतार्ह वाटत असल्यानं सैतानाला लोकांच्या समोर ठेवून हा समज खोटा ठरवणं मला प्रशस्त वाटत नाही.

आणखी एक गोष्ट घडते आहे. माझी अशी भावना होतेय की या सैतानाला नष्ट करण्याचे वाईट परिणाम मला भोगायला लागतील. ही भावना नेमकी कशी आहे ते मला नीट स्पष्ट करून सांगता येत नाही. मला एवढंच वाटतं की असं केल्यानं माझ्या आयुष्यात काहीतरी भयानक घडेल, आणि मला त्याची भीती वाटतेय. त्यापेक्षा सैतानाला जवळ बाळगावं आणि आत्तापर्यंत त्याच्याबरोबर एकत्र जसा राह्यलो तसंच राहावं हे बरं.

मी आणखी दुसरं काय करायला पाहिजे?

***

# डिसेंबरात दोघेजण

मूळ रशियन लेखक – यूरी कझाकव

भाषांतर – मेघा पानसरे



**परिचय : यूरी कझाकव**

**(१९२७)**

**मॉस्कोमध्ये जन्म व मॉस्कोतच वास्तव्य. मॉस्को येथील गोर्की लिटररी इन्स्टिटट्यूटमधून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. १९५८ मध्ये त्यांच्या लघुकथांचा पहिला संग्रह प्रकाशित झाला. त्याचे वाङ्मयीन वर्तुळात चांगले स्वागत झाले. कझाकव यांच्या लिखाणात प्रामुख्याने कथा, लघुकथा, कादंबरिका व निबंध यांचा समावेश आहे.**

**आजूबाजूच्या परिस्थितीतील विरोधाभास व अव्यक्त ताणतणाव यांचे चित्रण कथांतून आढळते. प्रकट संघर्षापेक्षाही मानसिक पातळीवर जाणवणारी, सहजी न सुटणारी गुंतागुंत आणि माणसामाणसांमधल्या हळुवार नातेसंबंधांचे चित्रण करणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या. रशियाच्या निसर्गाचं प्रत्ययकारी चित्रणही जोडीने त्यांच्या कथांत आढळून येते.**

**प्रस्तुत कथेतही प्रणयी जोडप्याच्या मानसिक ताणतणावांचे, भावनिक गुंतागुंतीचे चित्रण आढळते.**

***

बऱ्याच वेळापासून तो स्टेशनवर तिची वाट पाहत होता. मॉस्कोतील थंड बर्फाळ दिवस होता आणि स्वच्छ सूर्यप्रकाशही होता. त्याला सगळंच कसं छान, आल्हाददायी वाटत होते. स्कीइंग करणाऱ्यांची गर्दी, सर्वत्र शुभ्र बर्फाची पखरण. रस्त्यावर साचलेला बर्फ अजून तसाच होता. त्याला तर स्वत:बद्दलही प्रेम वाटू लागले होते. जाडजूड स्कीइंग बूट, जवळजवळ गुडघ्यापर्यंत लोकरीचे मोजे, जाड केसाळ स्वेटर आणि टोकदार ऑस्ट्रियन हॅट. पण सर्वांत छान होते ते त्याचे स्कीज्. सुंदर, प्लायवुडचे, छोट्या कातडी पट्ट्यांनी बांधलेले.

नेहमीसारखाच आजही तिला उशीर झाला होता. पूर्वी कधीकाळी तो रागावतही असे. पण आता त्याला तिच्या उशीरा येण्याची सवयच झाली होती. विचार करून पाहिले की त्याच्या लक्षात येई, हा तिचा एकमेव दोष होता. आताही भिंतीला स्कीज् टेकवून गारठू नयेत म्हणून पाय हलकेच आपटत तो उभा होता आणि ती येणार त्या दिशेला त्याची नजर लागली होती. त्याचं मन खूप शांत, समाधानी होते. अंहं, तो खुषीत नव्हता. अगदी शांत होता. आपल्याच विचारात हरवताना त्याला कसं प्रसन्न, समाधानी वाटत होतं. त्याच्या व्यवसायात सगळं काही व्यवस्थित आहे. सगळ्यांना त्याच्याबद्दल प्रेम वाटतं. घरीही सगळं कसं छान चाललं आहे आणि हा हिवाळाही मस्त आहे. डिसेंबर महिना आणि स्वच्छ सूर्यप्रकाश, शिवाय मार्च महिन्यात असतो तसा बर्फ चमकतो आहे. पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्याचे तिच्याबरोबरचे संबंध अगदी व्यवस्थित सुरू आहेत. वादावादी, मत्सर, संशय, अविश्वास, आकस्मिक येणारे फोन, फोनवरचे मौन... त्यातून जाणवणारे फक्त श्वासांचे आवाज... त्यामुळे हृदयाला होणाऱ्या वेदना... सगळं संपलं आहे. देवाची कृपाच म्हणायची, की हे सारं आता मागे पडलं आहे. एक शांत, आश्वासक अन् नाजूक संवेदनाच काय ती उरली आहे.

अखेरीस एकदाची ती आली. त्याने जवळून तिचा चेहरा, तिची आकृती पाहिली आणि इतकेच म्हणाला, ''हं! छान! तू आलीस तर!''

त्याने आपले स्कीज् घेतले आणि ते हळूहळू चालू लागले. ती इतक्या घाईघाईने आली होती की तिला दम लागला होता. ती जोरात श्वास घेत होती. तिने लाल हॅट घातली होती. हॅटखालून केसांच्या बटा बाहेर कपाळावर भुरभुरत होत्या. त्याच्याकडे पाहताना तिचे डोळे नेहमीच बारीक होत. पापण्यांची फडफड होई. वसंताच्या सुरूवातीला उठतात तसे लहान लहान वांग तिच्या नाकावर दिसत होते.

रेल्वेच्या तिकिटासाठी सुटे पैसे काढताना तो जरासा मागं राहिला आणि मागून तिच्याकडे पाहताना एकदम त्याची नजर तिच्या पायांवर पडली. मनात झर्रकन विचार आला... किती सुंदर आहे ती! अन् कपडेही किती सुंदर, आकर्षक आहेत. तिला नेहमीच जो उशीर होतो तो बहुधा यामुळेच असावा. आपण नेहमी सुंदर दिसावं असं तिला वाटत असतं. तिच्या या मोहक बटा... दिसतात चुकून बाहेर आल्यासारख्या... पण बहुधा त्या तशा नैसर्गिक नसतीलही. किती संवेदनशील अन् विचारी आहे ती!

किती स्वच्छ सूर्यप्रकाश आहे! मस्त हिवाळा आहे नाही? तो तिकीटे घेत होता, तेव्हा ती म्हणाली, ''तू काही घ्यायला विसरला नाहीस ना?''

त्याने फक्त मान हलवली. खरे तर त्याने भरपूर सामान बरोबर घेतले होते आणि आता पाठीवरची थैली खूपच जड वाटत होती.

रेल्वेच्या डब्यातही सामानाची, स्कीज्‌ची खूपच गर्दी झाली होती. गोंगाटही बराच होता. सर्वजण ओरडत होते, एकमेकांना हाका मारत होते. धपाधप आपल्या जागेवर बसत होते. स्कीज् आपटत होते. खिडक्या थंड आणि पारदर्शक होत्या. बाकाखाली असलेल्या हीटर्समुळे कोरडी उष्णता बाहेर पडत होती. रेल्वे सुरू झाल्यानंतर खिडक्यांमधून बाहेरचा, सूर्यप्रकाशात चमकणारा बर्फ पाहायला खूप छान वाटत होते. त्याचवेळी खालून, रुळावरती वेगवान चाकाची मृदू खटखट ऐकू येत होती.

पंधरा-वीस मिनिटांनी तो सिगारेट ओढण्यासाठी डब्याच्या टोकाशी असलेल्या जागेत गेला. डब्यात एका दरवाजाला काच नव्हती. तिथे थंडगार वारा भिरभिरत होता. भिंती आणि छतावर बर्फाचे शुभ्र तुषार पसरले होते. बर्फाचा, लोखंडाचा उग्र गंध दरवळत होता. इथे चाकांची नुसती खटखट होत नव्हती, तर जोरात धडधड ऐकू येत होती. रुळांचाही आवाज घुमत होता.

सिगारेट ओढत दरवाज्याच्या काचेतून तो डब्यात पाहत होता. नजर एका बाकावरून दुसऱ्या बाकावर फिरत होती. प्रवास करणाऱ्या तिथल्या सर्वच लोकांबद्दल त्याला काहीसा खेद वाटत होता; कारण हे दोन दिवस दुसऱ्या कोणासाठीही त्याच्याइतके सुंदर असणार नव्हते. तिथल्या तरुण मुली, त्यांचे उत्साही, चैतन्याने फुललेले चेहरे त्याने अगदी लक्षपूर्वक पाहिले. त्यांच्याकडे पाहताना एक हलकीशी पण कडवट जाणीव त्याच्या मनाला खुपली आणि तो बेचैन झाला. नेहमीच जेव्हा कधी तो कुणी मोहक सौंदर्यवती कुणा दुसऱ्या समवेत-त्याच्याबरोबर नव्हे- जाताना पाहायचा तेव्हा असाच बेचैन व्हायचा. पण मग त्याने तिच्याकडे पाहिले आणि तो एकदम उल्हसित झाला. त्याने पाहिले, इथेही, अगदी तरुण अन् सुंदर लोकांच्यातही तीच सर्वांत छान होती. खिडकीतून बाहेर नजर लावलेला तिचा चेहरा म्लान होता. गहिरे डोळे आणि लांब पापण्या.

तोही त्या बिनकाचेच्या दरवाज्यातून बाहेरचा बर्फ, वारे पाहू लागला. स्वच्छ प्रकाश आणि वाऱ्यामुळे त्याचे डोळे अधूनमधून बारीक होत होते.

तो पुन्हा विचारात गढून गेला. माणसाचं आयुष्य किती अजब असतं नाही? तो एक वकील. वयाची तिशी गाठलेला. पण काहीही विशेष, असामान्य असं त्याच्या हातून घडलेलं नाही. तरुण असताना त्यानं कितीतरी स्वप्नं पाहिली होती. पण त्या स्वप्नातल्यासारखा त्याने कसलाही नवा शोध लावलेला नाही. ना तो कवी झाला, ना कोणत्याही खेळात विजेता झाला. तसं पाहायला गेलं तर उदास होण्यासाठी कितीतरी कारणं होती त्याच्याजवळ. कारण आयुष्य जसं हवं होतं त्याप्रमाणे घडलंच नाही आणि तरीही त्याला खिन्न, उदास वाटत नाही. आपली सर्वसामान्य नोकरी, कसल्याही प्रसिद्धीशिवायचे आयुष्य याचे त्याला दुःख नाही की भयही वाटत नाही. उलट तो आता अगदी समाधानी, शांत आहे. सामान्यपणे जगतो आहे. जणू कधीकाळी त्यानं जी स्वप्नं पाहिली होती, ते सगळं काही त्याने साध्यही केलं होतं.

आता फक्त एकच नेहमीची चिंता त्याला होती. उन्हाळ्याचे विचार! अगदी नोव्हेंबरपासूनच उन्हाळी सुटीत आपण कुठे जायचे, कसे जायचे याचा तो विचार करू लागे. बेत आखू लागे. ही सुट्टी नेहमीच त्याला इतकी लांबलचक अन् त्याचवेळी इतकी लहान वाटे की, काही चूक होऊ नये, कसलेही बेत फसू नयेत म्हणून आधीच सर्व गोष्टींचा विचार करावा लागे. सर्वांत मनोवेधक ठिकाण निवडावे लागे. संपूर्ण हिवाळ्यात आणि वसंतामध्ये तो विचारात होता. कुठले ठिकाण चांगले आहे, तिथे हवामान कसे आहे, तिथले लोक कसे आहेत, तिथे जायचे कसे... अशी सर्व माहिती घेत होता. प्रत्यक्ष ती सहल आणि सुटी यापेक्षाही ह्या चौकशा, आखलेले बेतच कदाचित त्याला जास्त सुखद वाटत होते.

आताही तो उन्हाळी सुटीचाच विचार करत होता. ते एका छोट्या नदीवर जातील. त्यांच्याकडे तंबूही असेल. तिथे नदीवर जाऊन ते एक कयाक-हवा भरायची होडी घेतील. तिच्यात हवा भरून फुगवल्यावर ती कशी एखाद्या पिरोग होडीसारखी दिसेल आणि मग राम राम त्या मॉस्कोला, तिथल्या डांबरी रस्त्यांना, कोर्टातल्या खटल्यांना आणि कायदाविषयक सल्ल्यांना!

तेव्हाच त्याला आठवले. अगदी पहिल्यांदा ते असेच एकत्र इस्तोनियातील एका छोट्याशा गावात गेले होते. पूर्वी काही कामानिमित्त तो तिथे गेला होता आणि मग ते ठिकाण लक्षात ठेवून तिला तिथे घेऊन गेला.

एका स्वच्छ, भरपूर प्रकाश आलेल्या खोलीत ते उतरले होते. खोलीत सगळीकडे खिडकीच्या चौकटीवर, पलंगाखाली आणि कपाटातही अन्तोनव जातीची सफरचंदे पिकत ठेवली होती. त्यांचा उग्र वास खोलीभर पसरला होता. तिथला इस्तोनियाचा बाजारही किती समृद्ध होता. ते एकत्र फिरत, धुरी दिलेली डुकराची चरबी, मधाचे गोळे, लोणी, टोमॅटो, काकड्या निवडून विकत घेत. दरही कमालीचे स्वस्त होते. बेकरीतून येणारा विशिष्ट वास तिथे दरवळत असे. सगळंच कसं आगळंवेगळं होतं. पण सर्वांत महत्त्वाचं म्हणजे तिथं त्याच्यासोबत ती होती. इतकी अनाकलनीय की जणू पूर्णपणे अनोळखी आणि त्याचवेळी इतकी जवळची, इतकी प्रिय! किती सुंदर! अन् अजूनही, कदाचित त्याहीपेक्षा जास्त आनंददायी क्षण जीवनात येतीलही पण ते अर्थातच, जर युद्ध झालं नाही तर.

अलीकडे सतत तो युद्धाचा विचार करे. युद्धाचा त्याला तिरस्कार वाटे. पण आता चमकता बर्फ, जंगले, शेतांकडे डोळे भरून पाहताना, रुळांचा आवाज अन् अखंड गुणगुण ऐकताना त्याने आत्मविश्वासाने विचार केला आणि त्याला विश्वास वाटला की युद्ध होणार नाही. आणि म्हणूनच कधी मृत्यूही असणार नाही. त्याने विचार केला, आयुष्यात असे क्षण असतात जेव्हा माणूस भयंकर गोष्टींबाबत सतत विचार करत राहात नाही. सैतानी शक्तीच्या अस्तित्वावर विश्वास ठेवत नाही.

त्या लांबलचक स्टेशनवर रेल्वेतून बाहेर पडणारे ते जवळजवळ शेवटचेच होते. फलाटावरून चालू लागताच पायाखाली बर्फाचा चुरचुर आवाज होऊ लागला.

''काय सुंदर हिवाळा आहे!'' ती शहारत म्हणाली, कितीतरी काळ असा हिवाळा नव्हता.

त्याच्या दाचावर– उन्हाळी घरावर पोहोचण्यासाठी त्यांना अजून वीस किलोमीटर अंतर जायचे होते. तिथे रात्र घालवायची, दुसरे दिवशी दुपारपर्यंत स्कीईंग आणि संध्याकाळी दुसऱ्या रेल्वेने परत घरी.

त्याच्या वडिलांची इथे एक छोटी फळबाग होती. आणि लाकडी फळ्यांचे छोटे घर. घरात दोन पलंग, एक टेबल, दोन स्टूल आणि जर्मन लोखंडी स्टोव्ह असे सामान होते.

स्कीज् घातल्यावर त्याने उड्या मारल्या. स्कीज् जमिनीवर आपटून तिथे नुकताच पडलेला भुसभुशीत बर्फ बाजूला सारला. तिच्या स्कीज्चे हुक पक्के बसले आहेत ना तेही पाहिले आणि हळूहळू ते निघालेही. सुरुवातीला खूप वेगाने स्कीईंग करावे अशी इच्छा त्यांना होत होती. म्हणजे मग लवकर घरी पोहोचून हीटर सुरू करून घर चांगलं उबदार करता आलं असतं. विश्रांतीही घेता आली असती; पण या शेतांतून, रानांतून वेगानं जाणं अशक्यच होतं.

''पहा, या ॲस्पेनचे बुंधे कसे आहेत!'' ती असं म्हणून क्षणभर थांबे. ''अगदी मांजराच्या डोळ्यांसारखा रंग आहे!'' तोही थांबून पाही. ॲस्पेनची झाडे वरून पिवळट-हिरवी दिसत होती. अगदी थेट मांजराच्या डोळ्यांच्या रंगाची!

झाडीत तिरपे धुरकट प्रकाशकिरण आरपार झिरपत होते. झाडांच्या खोडांमध्ये बर्फाची जणू चादरच पसरली होती आणि फरच्या हाताचे पंजे कसल्याही ओझ्याविना मुक्तपणे इकडेतिकडे झुलत होते.

वाटेत अधूनमधून त्यांना कोल्ह्याच्या पाऊलखुणा दिसत होत्या. एकसारख्या, पण नागमोडी रेघेत त्या खुणा गवताच्या एका झुडुपाकडून दुसऱ्याकडे, बर्फाच्या एका टेकडीकडून दुसरीकडे गेलेल्या होत्या. नंतर एके ठिकाणी त्या खुणा वळल्या आणि बर्फाच्या शुभ्र चकाकीकडे नाहीशा झाल्या. स्कीईंग करत ते पुढे निघाले. मध्येच कधी ॲस्पेन आणि बर्च वृक्षांच्या झाडीत त्यांना सशाच्या किंवा खारीच्या पाऊलखुणा दिसत.

असे ते पुढे जात होते. कधी वर चढत, कधी खाली घरंगळत, खाली पडलेल्या वृक्षांवर बसून विश्रांती घेत, एकमेकांकडे पाहून हलके स्मित करत. कधीकधी तो मागून तिच्या मानेवरून हात टाकून तिला जवळ ओढायचा आणि तिच्या, वाऱ्याने थंड झालेल्या ओठांचे चुंबन घ्यायचा. बोलणं असं काही नव्हतंच. क्वचितच कधी एकमेकांना फक्त- बघ बघ! किंवा ऐक ना... असं इतकंच.

ती खरोखरच उदास, विमनस्क होती अन् म्हणूनच सारखी मागे राहत होती. पण त्याला काहीच समजत नव्हते. उलट तो विचार करत होता की ती फार थकली आहे. तो पुढे जाऊन तिची वाट पाहत थांबे. त्याला ठाऊक होते की, कोणाही मित्राला असले प्रश्न आवडत नाहीत. पण तरीही ती जवळ आल्यानंतर जेव्हा त्याच्याकडे दूषणे देणाऱ्या नजरेने,कसल्याशा निराळ्याच भावाने पाही तेव्हा तो सावधपणे विचारे–

''तू थकली नाहीस ना? थोडे थांबूया हवं तर?''

''काहीतरीच काय?'' ती घाईघाईने म्हणे, ''मी आपली... सहजच... विचारात हरवले होते.''

''असं होय!'' तो म्हणे आणि पुढे जाऊ लागे. पण आता वेग अधिकच मंद करे.

सूर्य खाली उतरला. फक्त टेकड्यांच्या शिखरांवरची शेते मात्र अजूनही प्रकाशात चमकत होती. जंगले, दऱ्या, अरुंद घळी काळोखात बुडत अस्पष्ट होऊ लागली होती. आणि पहिल्यासारख्याच दोन सुट्या आकृत्या जंगले, शेतांच्या असीम अवकाशात पुढे सरकत होत्या. तो पुढे आणि ती मागे. मागून ऐकू येणारी तिच्या स्कीज्खालच्या बर्फाची सरसर आणि काठ्यांचा किणकिणाट ऐकायला त्याला खूप छान वाटत होतं.

सूर्य जिकडे मावळला होता, तिथून जंगलामागे गुलाबी प्रकाशात त्यांना एकदम इंजिनची घरघर ऐकू आली. क्षणभरातच उंच आकाशात एक विमान दिसले. त्याच्या एका दिव्याचा प्रकाश दिसत होता. विमानावर सूर्यप्रकाशाचे पट्टे झगमगत होते. खालून, बर्फाळ, अंधारून आलेल्या स्तब्धतेतून ते पाहायला खूप मस्त वाटत होतं. त्यात प्रवासी बसले असतील. ते विचार करत असतील, आपला प्रवास संपेल. लवकरच मॉस्को येईल. तिथे आपल्याला भेटायला कोण येईल? आणि अशी सगळी कल्पना करायलाही त्याला खूप मजा वाटत होती.

संध्याकाळच्या अंधुक प्रकाशात अखेरीस ते मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचले. थंड व्हरांड्यातून बर्फाने माखलेल्या बुटांचे एकेक पाऊल टाकत ते आत आले. दरवाजाचे कुलूप काढून खोली उघडली. आत दाट काळोख होता. रस्त्यावर वाटत होते, त्यापेक्षा आत जास्तच थंड वाटत होते.

ती लगेच एका पलंगावर आडवी झाली आणि तिने डोळे मिटून घेतले. बाहेर रस्त्यावर असताना तिला उकडत होतं, घाम येत होता. पण आता ती एकदम थंड पडली. गारव्याने तिचे अंग कापू लागले अन् हालचाल करणंही नको वाटू लागलं. मधूनच डोळे उघडून ती लाकडी फळ्यांच्या छताकडे पाही. कधी केरोसिनच्या दिव्याच्या धुरकट काचेतून जोमाने पेट घेणाऱ्या ज्योतीकडे पाही. तिचे डोळे बारीक होत आणि लगेच दिवसभर पाहिलेले पिवळट-हिरवे, पांढरे, आकाशी, किरमिजी असे सगळे रंग एकेक करून तिच्या नजरेसमोर फेर धरत.

तो गच्चीखालून जळणाची लाकडे काढून चुलीभोवती टाकत होता. मग कागदाचा सरसर आवाज आला. तो चूल पेटवत होता. त्याने हुश्श असा नि:श्वास सोडल्याचे तिला ऐकू आले; पण तिला कसलीच इच्छा नव्हती. ह्यावेळी त्याच्याबरोबर आल्याचा तिला आनंदही वाटत नव्हता.

चूल पेटली. खोलीत ऊब पसरली. आता कोट काढणं शक्य होतं. त्याने कोट काढला. बूट, मोजे काढले. सगळं चुलीजवळ वर टांगलं. आतल्या शर्टवरच तो खाली बसला. तो अतिशय समाधानी होता. त्याने डोळे बारीक केले. पायाची बोटे हलवली आणि सिगारेट ओढू लागला. दमलीस? त्याने विचारले- चल कोट काढ!

जराही हालचाल करायची तिला इच्छा नव्हती. उदास, खिन्न मन:स्थितीमुळे तिला गप्प झोपून जावेसे वाटत होते. पण तरीही आज्ञाधारकपणे तिने कोट काढला, जाकिट, मोजे, स्वेटर वाळण्यासाठी टांगून ठेवले. चौकड्याच्या सैल पुरुषी शर्टमध्येच ती पलंगावर बसली. पायाभोवती हात लपेटले आणि दिव्याकडे पाहू लागली.

त्याने बुटात पाय खुपसले, खांद्यावर कोट टाकला, आणि बादली उचलून बाहेर आला. बादलीची मंजुळ किणकिण ऐकू आली. परत येऊन त्याने चुलीवर चहाची किटली ठेवली. थैलीमध्ये काहीतरी शोधले आणि त्यात जे होते ते सगळे बाहेर काढून टेबलावर, खिडकीजवळ ठेवले.

ती मूकपणेच चहा तयार व्हायची वाट पाहत होती. तिने स्वत:साठी मगमध्ये चहा ओतून घेतला आणि पाव-लोणी चघळत, वाफाळ मगवर हात गरम करत शांतपणे बसून राहिली. मग चहाचा एक घोट घेऊन पुन्हा दिव्याकडे पाहत राहिली.

''अशी गप्प का आहेस तू?'' त्याने विचारले, ''काय दिवस होता नाही आजचा? अं?''

''हं.. खूप थकलेय मी आज.'' ती उठली. त्याच्याकडे न बघता आळस देऊन म्हणाली, ''चला झोपूया!''

''असं आहे होय?'' त्याला ते सहज पटले. ''थांब जरा, मी चुलीत अजून थोडं जळण घालतो. नाहीतर पुन्हा इथे गारठा होईल!''

''आज मी एकटीच झोपते. हे इथे ठीक आहे ना? चुलीजवळ? तू रागावू नकोस हं!'' ती घाईघाईने म्हणाली आणि तिने डोळे खाली झुकवले.

''हे काय?'' तो आश्चर्यचकित झाला आणि एकदम त्याला तिचा दिवसभराचा उदास, आंतरिक दुरावा भासणारा चेहरा आठवला. हे आठवल्यानंतर त्याच्या मनात कटू वेदना भरून गेली. हृदय वेगाने जोरात धडधडू लागलं.

त्याचक्षणी त्याला समजलं की, तो तिला जराही ओळखत नाही. विद्यापीठातलं तिचं शिक्षण कसं चाललं आहे... तिथं कुणाकुणाशी तिचा परिचय आहे... त्यांच्याशी ती कशाबद्दल बोलते... त्याला काहीच नीटसं माहीत नव्हतं. त्याला हेही जाणवलं, की त्याच्यासाठी ती अजूनही एक कोडेच आहे. त्यांच्या पहिल्या भेटीवेळी होती तशीच पूर्णत: अपरिचित आहे आणि तोही बहुधा तिच्या दृष्टीने कमालीचा अशिष्ट, मूर्ख आहे. कारण तिला काय हवंय, तेच त्याला समजत नाही. तिला आणखी कशाचीच गरज भासू नये, इतर  कुणाचीच जरुरी वाटू नये, म्हणून त्याला काहीच करता येत नाही.

आणि त्याला लगेच त्या संपूर्ण दिवसाबद्दल शरम वाटली. त्याचे ते केविलवाणे घर, चूल आणि का कोण जाणे पण कडाक्याची थंडी, सूर्यप्रकाश, स्वत:ला वाटलेले समाधान... सगळ्याचीच कीव आली. आपण का आलो इथे? कशासाठी हवं हे सगळं? आणि ज्याची इतकी प्रशंसा करतात ते घृणास्पद सुख आहे तरी कुठे?

''बरं मग...'' तो उदासीनपणे म्हणाला आणि एक दीर्घ श्वास घेतला. ''तुला हवं तिथं झोप...''

त्याच्याकडे नजरही न टाकता आणि कपडेही न बदलता ती लगेच आडवी झाली. अंगावर कोट पांघरला आणि चुलीतील ज्वाळांकडे पाहत राहिली. तो

दुसऱ्या पलंगाकडे गेला. बसून सिगारेट ओढू लागला. मग दिवा मालवून तोही आडवा झाला. तो कमालीचा दु:खी झाला होता. ती त्याच्यापासून दूर जात होती. काही कारणामुळे ते सुखी झाले नव्हते. पण कशामुळे ते त्याला समजत नव्हतं आणि म्हणूनच चीडही येत होती.

काही क्षणानंतर त्याला ऐकू आले की ती रडतेय. त्याने अर्धवट उठून टेबलापलीकडून तिच्याकडे पाहिले. चुलीमधून येणाऱ्या प्रकाशात दिसत होते. ती अधोमुख निजून धगधगत्या लाकडांकडे पाहत होती. तिचा दु:खी, आसवांनी भिजलेला चेहरा त्याला दिसला. तिचे मुरडलेले ओठ, हनुवटी केविलवाणे, कसेतरीच दिसत होते. आसवांनी भिललेले ओले डोळे ती सारखी आपल्या बारीक हातांनी पुसत होती. कशामुळे बरं तिला आज अचानक असं खिन्न, दु:खी व्हायला झालं? तिला स्वत:लाही ते ठाऊक नव्हतं. फक्त इतकंच होतं, की पहिल्या प्रेमाचे दिवस आता सरले होते. आता काहीतरी नवं समोर येतंय. पूर्वीसारखं जीवन आता तिला नीरस वाटू लागले होते. आई-वडील, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी यांच्यासाठी ती कुणीच नव्हती. तिला पत्नी व्हायचं होतं. आई व्हायचं होतं. पण त्याला हे दिसतच नव्हतं. जे चाललं आहे, त्यावरच तो समाधानी होता. त्यांच्या प्रेमाच्या पहिल्यावहिल्या, चिंतेने व्यग्र अशा दिवसांबद्दल तिला कमालीचं वाईट वाटलं. तेव्हा सगळंच कसं अस्पष्ट अन् अनिश्चित होतं. पण तरीही अपरिचित, आसक्तीपूर्ण अन् नाविन्याच्या भावनेने ओथंबलेलं होतं.

नंतर तिला झोप येऊ लागली आणि पुन्हा तेच जुनं स्वप्न तिच्यासमोर रुंजी घालू लागलं. अगदी लहान मुलगी असल्यापासून ती या स्वप्नासोबत झोपी जात असे. स्वप्नातला तो एक ताकदवान पुरुष होता. त्याचं तिच्यावर प्रेम होतं. तिचंही त्याच्यावर प्रेम होतं. पण काही कारणानं ती नाही म्हणाली. मग तो दूर उत्तरेला निघून गेला आणि मच्छिमार बनला आणि ती इकडे दु:खाने शोक करत, झुरत राहिली. तो पर्वतांच्या उंच सुळक्यांवर जाऊन शिकार करे. समुद्रावर मासे पकडायला जाई. तो संगीतही रचायचा, पण सगळा वेळ सतत तिचाच विचार त्याच्या मनात असे. एके दिवशी तिला उमगले की, ती केवळ त्याच्याबरोबरच सुखी होऊ शकते. सगळं सोडून ती त्याच्याकडे जायला निघाली. ती विलक्षण सुंदर होती. प्रवासात

असताना अनेकजण तिच्या मागे लागत. वैमानिक, ड्रायव्हर, खलाशी... पण तिचे कुणाकडेच लक्ष जात नव्हते. तिला फक्त त्याचाच ध्यास लागला होता. तिची आणि त्याची भेट इतकी अद्‌भुत असेल त्याची कल्पनाही करणं भयंकर वाटे आणि भेटीचा तो क्षण पुढे ढकलण्यासाठी तिचे मन स्वप्नात एकामागून एक अशी नवनवीन कारणे शोधून काढे. त्याची भेट न होताच ती झोपी जाई.

पण अलीकडे बऱ्याच काळापासून झोपी जाताना ती अशा कसल्याही गोष्टींबद्दल विचार करीत नसे. आज मात्र का कोण जाणे, पुन्हा थोडावेळ स्वप्न पाहावंसं वाटत होतं. स्वप्नात ती जेव्हा त्याच्याकडे जाण्यासाठी मोटरबोटने प्रवास करीत होती, तेव्हा तिच्या सर्व कल्पना एकमेकांत मिसळून खूप गोंधळ झाला आणि तिला झोप लागली.

रात्री मध्येच गारठ्यामुळे तिला जाग आली. तो उकिडवा बसून थंड झालेली चूल पेटवत होता. त्याचा चेहरा खूप उदास होता. तिला त्याची दया आली.

सकाळी सुरुवातीला ते दोघेही गप्प गप्प होते. अबोलपणे त्यांनी न्याहरी केली. चहा प्याले. पण नंतर एकदम ते उल्हसित झाले. आपले स्कीज् घेऊन ते स्कीईंगसाठी निघाले. जास्तीत जास्त खड्या आणि धोका असलेल्या जागा त्यांनी निवडल्या. ते कितीतरी बर्फाच्या टेकड्या चढले, उतरले.

घरी येऊन त्यांनी पुन्हा चूल पेटविली. अंगात ऊब आल्यावर असेच बिनमहत्त्वाच्या, नित्याच्या गोष्टींबद्दल बोलत राहिले. ह्यावर्षी हिवाळा कसा चांगला आहे, त्याची चर्चा करत राहिले. अंधार पडायला लागल्यावर त्यांनी सगळे सामान गोळा केले. घराला कुलूप लावून स्कीईंग करत पुन्हा स्टेशनकडे निघाले.

रेल्वेमधील प्रवासात ते दोघेही पेंगुळले होते. संध्याकाळी ते मॉस्कोत पोहोचले. मोठ्या उंच इमारती, प्रकाशाने उजळलेल्या खिडक्यांच्या रांगा दिसल्या, तेव्हा त्याच्या मनात विचार आला– आता त्यांना एकमेकांपासून दूर जावे लागणार आणि अचानक त्याच्या मनात पत्नी म्हणून तिची कल्पना उभी राहिली.

का नाही? पहिलंवहिलं कोवळं तारुण्य आता सरलं. तेव्हा सगळंच कसं साधं सरळ आणि इच्छा असेल तरच करण्याजोगं, काहीसं अनावश्यक वाटत असतं... घर, पत्नी, कुटुंब आणि अशा सर्वच बाबी.. पण आता ते दिवस गेले.

आपण वयाची तिशीही गाठली. आता ती आपल्याबरोबर आहे. तिचं सौंदर्य आणि बरंच काही आपल्याबरोबर आहे आणि ती अशीच आपल्याबरोबर कायम राहू शकते; पण त्याचवेळी दुसऱ्या कुणाबरोबर तसेच राहता यावे म्हणून आपण कधीही तिला सोडून देऊ शकतो; कारण आपण स्वतंत्र आहोत... ह्या भावनेत प्रत्यक्षात आता काहीच दिलासा, आनंद राहिला नाही.


उद्या संपूर्ण दिवस कायदेविषयक सल्ला केंद्रात जाईल. कायद्याचे सल्ले, अपील करा, अर्ज लिहा, लोकांच्या दु:खाचा, अगदी त्यांच्या कौटुंबिक समस्यांचाही विचार करा आणि मग परत घरी. पण कोणाकडे? पुन्हा उन्हाळा येईल. विविध प्रकारच्या सहली, होडीतून सफरी, तंबू... पण पुन्हा तोच प्रश्न. कोणाबरोबर? आणि त्याला आता अधिक चांगले, अधिक मानवी व्हावेसे वाटले. तिला बरं वाटावं म्हणून सर्व ते करायची त्याला इच्छा झाली.

ते जेव्हा स्टेशनच्या चौकात आले, तेव्हा रस्त्यावरचे दिवे जळत होते. शहरात सर्वत्र गजबज होती. रस्त्यावरचा बर्फ काढल्यामुळे ते स्वच्छ दिसत होते. दोघांनाही वाटलं, जणू त्यांची ही सहल झालीच नव्हती. हे दोन दिवस जणू त्यांनी एकत्र घालवलेच नव्हते. आता त्यांना एकमेकांचा निरोप घ्यायला हवा, आपापल्या घरी जायला हवे. पुन्हा कदाचित दोन-तीन दिवसांनीच त्यांची भेट होईल. त्या दोघांनाही नेहमीसारखं शांत, हलकं वाटलं आणि नेहमी जसे घाईघाईने स्मित करून ते एकमेकांचा निरोप घेत, तसेच आताही त्यांनी स्मित केले. निरोप घेतला आणि तो आता तिला पोचवायला गेला नाही.

***

# येसिकाच्या शोधात

मूळ जर्मन लेखिका : रूथ रेमान
भाषांतर : सुनंदा विद्यासागर महाजन



परिचय: रुथ रेमान

(१९२२-२०१६)

रुथ रेमान या लेखिकेच्या १९७८ साली प्रसिद्ध झालेल्या एका कथासंग्रहातील ही कथा आहे. स्त्री-साहित्याच्या सुरुवातीच्या जडण-घडणीच्या काळातील ही कथा आहे, हे कथाविषयावरून आणि विषयाच्या हाताळणीवरून लक्षात येतं. या कथेतील स्त्री गोंधळलेली आहे. आपल्या आयुष्याला काही अर्थ आहे का? आपल्या आयुष्याचं ईप्सित नेमकं कोणतं? हे प्रश्न तिला पडले आहेत, पण उत्तरं कुठे आणि कशी शोधायची या विषयीचं गोंधळलेपण आहे. विवाहाच्या चौकटीत, गृहिणीच्या भूमिकेत अडकून आपलं अस्तित्व हरवून जात आहे अशी समज आली आहे, पण ते शोधायचं कसं हे माहीत नाही. अशी ही अवस्था आहे. स्त्रीचं सुंदर दिसणं, पुरुषावर पूर्णपणे अवलंबून असणं हे एका स्त्रीच्या आयुष्याचे गुणविशेष स्वत: स्त्रीच्या मनावरही खूप बिंबलेले आहेत. ते झुगारून देण्याच्या प्रयत्नात ती आहे. 'येसिका'च्या शोधात ती आहे.

रूथ रेमान ही कथालेखिका म्हणून १९५० नंतर नावारूपाला आलेली जर्मन लेखिका, कथेशिवाय कादंबरी, आत्मचरित्रलेखन, अनुभवकथन असे लेखनप्रकार त्यांनी हाताळले आहेत. १९५९ मध्ये प्रसिद्ध झालेली त्यांची '**इल्युजन्स**' ही कादंबरी खूप गाजली. त्यांच्या सर्व लेखनात स्त्री व्यक्तिरेखा मध्यवर्ती स्थानावर आहे हा त्यांच्या लेखनाचा विशेष. १९७५ नंतर स्त्रीमुक्ती चळवळीनंतर विविध स्त्रीप्रश्न मांडणाऱ्या लेखिकांच्या आधीच्या पिढीची रेमान ही

**प्रतिनिधी ठरते. चळवळीच्याही आधी स्त्री–प्रश्नाचं योग्य भान, स्त्रीच्या व्यक्तिरेखेच्या दृष्टिकोनातून केलेली कथेची मांडणी, पुरुषप्रधान समाजावर केलेली टीका ही वैशिष्ट्ये रेमानच्याही लेखनात स्पष्टपणे जाणवतात हे महत्त्वाचं आहे.**

***

तिला येसिकाच्या गुरगुरण्याचा आवाज आला. गादीवरच्या उशीशेजारी तिचं तांबडं, मऊ शरीर श्वासाने खालीवर होताना दिसलं असं तिला वाटलं, पण तिने जेव्हा हात लांबवून चाचपडलं तेव्हा पांघरुणाला आलेल्या उंचवट्याखेरीज काहीसुद्धा नव्हतं. मांजर निघून गेली होती. तिला तिच्या रिकाम्या घरात एकटीला सोडून गेली होती. रिकाम्या घरातली सगळी दारं उघडी होती आणि पडद्यांच्या मागे रात्र झालेली दिसत होती. तिने पलंगाजवळच्या छोट्या टेबलावरून पलीकडे हात नेत छोटा दिवा लावला, शेजारच्या गार पडलेल्या गादीवरून शरीर ताणत त्या पलंगाजवळच्या टेबलावरचा दुसरा छोटा दिवा लावला. पलंगाखाली ठेवलेल्या स्ट्रॉच्या सपातांमध्ये पाय अडकवत तिने उसासा सोडला. तीन भागांच्या मोठ्या आरशावरचा दिवा लावला. छताला लावलेला मोठा दिवाही पेटवला. आरशात स्वत:कडे बघितलं, सुंदर आणि गोरीपान, पण पुन्हा हे सगळं पूर्ण निरर्थक, व्यर्थ गेलेलं, वाया गेलेलं आणि तरीसुद्धा तिच्या चेहऱ्यावर हास्य उमटलं. येसिका गेल्याच्या दु:खातही आपल्या सौंदर्यावर खुश होत तिला हसू फुटलं. ती डावीकडे वळली, पुन्हा उजवीकडे वळली, आरशाकडे तिने आपली गोरी, कमनीय पाठ वळवली. हनुवटी खांद्यावर टेकवत तिने मागे पाहिलं, एक हलक स्मित उमटलं. ते कुणालाही उद्देशून नव्हतं.

आरशाच्या खोलपणात ते कुणीही न झेलता जाऊन पडलं. दारावर आवाज आला का मगाशीच? तो ऑफिसमधून नेहमीच वेळेवर घरी येत असे. तिच्या दृष्टीने ते फार लवकर असे. जिन्यावर त्याचं पाऊल पडायचा अवकाश, सगळ्या घरभर एखाद्या वायूसारखा कंटाळा पसरायला लागायचा, पण त्याच्या काही लक्षात येत नसे. त्याला ते सुखद वातावरण वाटायचं आणि आता तर येसिका तिला एकटं टाकून गेली होती.

तिने आरशाच्या कडा दोन्ही हात पसरून कवेत घेतल्या आणि तिला वाटलं, त्याने पुन्हा जर तसं काही म्हटलं तर येसिकासारखी मी इथून निघून जाईन. पण स्ट्रॉच्या सपाता घालून हलकेच दार उघडायला जाताना तिला मनापासून वाटलं की त्याने म्हणू नये तसं काही, यावेळी तरी. पण तो अर्थात ते म्हणालाच. तिच्या डाव्या कानाचं चुंबन घेत. एखाद्या प्रियकरासारखं हळुवार नाटकीपणाने. तो नेहमी तिच्या डाव्या कानावर ओठ टेकायचा. तिला त्या कानाची पाळीसुद्धा वापरून चेपल्यासारची वाटत होती. अगदी थंडगार आणि भावनाशून्य झाली होती. त्याचं ते प्रियकराचं चुंबन आणि दररोज संध्याकाळचं 'गोड दिसतेयस तू लाडके.' तिच्याकडे न बघताच म्हटलेलं– हे त्याच्या पद्धतीचा एक भाग होतं. वैवाहिक सुख मिळवण्याच्या पद्धतीचं ते एक अंग होतं. संध्याकाळी मित्रांच्या घोळक्यात बसल्यावर तो नक्की ते इतरांना सांगत असणार. ती त्याच्याबरोबर कधी जात नसे, पण तो त्याच्या समजूतदार आणि विश्वासार्ह अशा आवाजात ते कसं म्हणत असेल याची कल्पना ती करू शके. 'रोज संध्याकाळी एखादा कौतुकाचा शब्द, छोटासा नाजुक हळुवारपणा. बास. एवढं पुरेसं असतं त्यांना. त्यांची अपेक्षाही नसते फार.'

''गोड दिसतेयस तू लाडके.'' असं म्हणत त्याने आपली ब्रीफकेस खाली ठेवली. ओव्हरकोट काढून वर अडकवला.

''जेवणाची काही घाई नाही. सावकाश कर.''

तो समजूतदार होता. तिने काहीही तयारी केली नाही हे त्याला माहीत होतं. ती आता खाली जाऊन आधी बाजार आणणार आणि मगच रांधणार हे ठाऊक होतं त्याला. आजही ती तशीच खाली धावणार होती, पण बाजारात नाही. तिने त्याला बैठकीच्या खोलीत जाताना पाहिलं, त्यांच्या खांद्यावरून पाठीवर कंटाळा गळत होता. त्याने दिवा लावला. वर्तमानपत्र घेतलं. सोफ्यावर बसला. पाय समोरच्या तुर्की पद्धतीच्या चामडी कुशनमध्ये टेकवले. चष्मा पुसला व परत डोळ्यांवर चढवला. सिगरेट शिलगावली. परत परत तेच तेच. परत परत, पुन्हा पुन्हा हेच सगळं. तेव्हा ती झोपायच्या खोलीतल्या आरशासमोर बसली. मनगटाला जोरात चावली. नाटकीपणाने डोळे हलवले, एखाद्या सिनेमातल्या नटीसारखे. नट्या नाही का महत्त्वाचा निर्णय घेण्याआधी गोंधळून जातात, पण त्यावेळेला सुद्धा आपण सुंदर, काळीज हेलावणाऱ्या आणि नाट्यपूर्ण दिसायला हवं हे विसरत नाहीत. त्यावेळीही

कॅमेऱ्यासमोर सगळ्यात प्रभावीपणे आपलं सादरीकरण व्हावं अशा उभ्या असतात. ''आता हे व्हायलाच हवं.'' असं ती खर्जातल्या गरम आवाजात नाटकीपणे कुजबुजली. एरवी अशा वाक्यांनी सिनेमा पाहताना तिला रडू फुटायचं.

''मला माझं आयुष्य मला हवं तसं जगायचं आहे.'' या आपल्या आयुष्याविषयी मात्र तिला खूप धूसर कल्पना होती, पण काही झालं तरी ते वेगळं होतं. अमुक एकापेक्षा वेगळं नाही, पण नुसतंच वेगळं होतं आणि ते सुरू झालं असं की सरळ सरळ 'रस्त्यावर खाली उतरली' तिथपासून. पुरुष जसे परप्रांतात जातात तसे आणि ती जेव्हा कपडे बदलायला लागली तेव्हाच ते वेगळं काहीतरी सुरू झालं होतं. तो नेहमी म्हणायचा की सामान्य गोष्टींकडे तिचा तसा कल होता. तिचं लग्न झालं तेव्हा तिच्या गोष्टी एका सुटकेसमध्येच मावल्या होत्या. त्याने त्या गोष्टी बोटांच्या अगदी पुढच्या पेरांनी उचलल्या, उजेडात धरून बघितल्या आणि सरळ मोलकरणीला देऊन टाकल्या. थोड्याशा तिरकस, खवचट नजरेने बघत मोलकरणीने त्या ताब्यात घेतल्या. मग बायकोला डोक्यापासून पायांपर्यंत त्याने सजवलं. तिची वेषभूषा म्हणजे सारखी टापटीपीची असेल असं बघितलं. नीटनेटका, आकर्षक असा स्कर्टवरचा ब्लाऊज, त्याला शोभून दिसणारे दोन स्कर्ट्स वगैरे 'जॅकेटपेक्षा स्कर्टने सगळं नीट झाकलं जातं' असं म्हणत. कमरेला आणि तिच्या नितंबांवर ती जॅकेट्स ढगळ दिसायची. कारण ती कमालीची सडपातळ होती, पण कुणास ठाऊक एखाद्या दिवशी होईलही... सॅण्डल्सचंही तसंच. नवीन शोधानुसार 'उंच टाचांनी पायाला इजा होते' असं ऐकल्यापासून नवीन प्रकार सुरू केला आणि तिचा वधूचा पांढरा पोषाख काळ्या रंगात रंगवून घेतला होता, म्हणजे मग 'सुंदर उच्चभ्रू बाईसुद्धा फार लक्ष वेधून घेत नाही' म्हणून. खचाखच भरलेलं कपड्यांचं कपाट- अक्रोडाच्या लाकडापासून बनवलेलं, पॉलिश केलेलं कपाट. ते उघडायची तिला एखाद्या लहान मुलासारखी भीती वाटायची. कारण त्याच्या आत कपड्यांच्या घड्यांमध्ये कंटाळा नुसता ठासून भरलेला होता. त्याला डांबराच्या गोळ्यांचा वास यायचा, पण कपाट उघडायची गरजच नव्हती. तिला आवडणाऱ्या वस्तू अगदी तळात ठेवलेली एक पेटी होती. तिच्या वरच्या भागात मात्र धुवायला टाकायचे कपडे ती ठेवायची. तिचे सामान्य कपडे खाली जपून ठेवले होते. तिला आवडणारे, स्वस्तातले, कोणाच्याही लक्षात येतील असे.

सुट्टीवर जायच्या आधी गुपचूप खरेदी केलेली ती पँट. एवढी ती खरेदी करून शेवटी ते हिलस्टेशनवर गेले तेव्हा तिने फॅशनेबल सँडल्सच घातले.

'लडकी चालू है।' असलं काही लिहिलेला खोल उघडा गळा असलेला टी शर्ट तिने घातला. त्यातून एकदाचे तिचे गोल, गोरेपान, आकर्षक खांदे ती उघडे टाकू शकली. तिच्या गळ्यात रुळणाऱ्या मंद मोत्यांमुळे ते आणखीच आकर्षक वाटत होते. ही मोत्यांची माळ तिने फक्त साडेदहा मार्क्सना घेतली होती. त्यातला एकही मोती खरा नव्हता. त्याच्या तुलनेत तिला खऱ्या गोष्टींचं मुळीच वेड नव्हतं. प्रत्येक गोष्टीच्या खऱ्या-खोट्या गुणवत्तेचं तिला काही समजत नसे. सोनं असो वा तांबं, खरे मोती असोत किंवा खोटे- तिला थोडासुद्धा फरक पडत नसे. तिच्या गळ्याच्या दोन्ही बाजूंना तिचे कानातले डूल चमकत, हलत होते. तिच्या अगदी कानाशी त्यांचा हलकासा नाद येत होता. तोच तो कान, थंडपणे ज्याचं त्याने चुंबन घेतलं आहे असा. तो आता पुन्हा गरम आणि जिवंत झाला. तिने मारलेला तो 'प्रक्षोभक' परफ्यूम दारूसारखा तिच्या डोक्यात चढला. झिंग येण्यासाठी तिला दारू पिण्याची गरज नव्हती. तिला तरी नव्हती. तिच्या तांबूस सोनेरी रंगाच्या केसांवर तुर्की रंगाचा रुमाल घेत ते तिने झाकले. कपाळावर रुळणाऱ्या बटा तशाच मोकळ्या सोडल्या. या केसांना शोभणाऱ्या रंगाची लिपस्टिक सापडणं अवघड होतं. आठवडे न् आठवडे तिने त्यावर विचार केला होता. कोरल रंगाची चालली असती, पण त्याला लिपस्टिक लावलेली आवडत नसे. 'मला बायको हवीय, पेंटिंग नव्हे' तो म्हणे. पण खरं तर कोणतीही बाई त्याच्या त्या समजूतदार, योजनाबद्ध आणि पद्धतशीरपणाच्या वागण्याच्या प्रभावाखाली पेंटिंग झाली नसती तरच नवल होतं. ते पेंटिंग मग लावावं भिंतीवर आणि 'गोड दिसतेयस तू, लाडके' अशी फोटोछाप स्मितहास्याची पावती लावून द्यावी त्यावर!

त्यांचा मोठा पलंग, लाकडी फळीवर विसावलेलं फोनचं कव्हर, हिरवट रंगाच्या लिनोलियमची खालची जमीन आणि त्याला शोभेशी दिसणारी लाटांच्या नक्षीची पडद्यांची सजावट- हे सगळं असणारी ही खोली, पण ती गेल्यावर तिची कोणतीच खूण मागे राहणार नव्हती. तिने फक्त दार उघडून बाहेर जायचं. मग तिची आरशातील प्रतिमा विरून जाईल आणि मग अंथरुणावरची तिच्या शरीराची उबही

संपेल. या अंथरुणावर नेहमी फिक्या, थंड रंगाची चादर घातलेली असे. तिला ती फारच पांढरी, खूपच स्वच्छ वाटायची. डोक्यावरून पांघरुण घेऊन पाय पोटाशी घेऊन अर्धा तास पडून राहिलं की मग कुठे थोडी उब यायची. थोड्या श्वासोच्छ्वासानंतर. सगळ्यात छान वाटायचं येसिकाबरोबर. पण आता येसिका निघून गेली होती. तिचा एकदेखील तांबडा केस गादीवर मागे राहिला नव्हता. आज रात्री कदाचित येसिका सापडेलही. ती तिला बोलवेल, वर उचलून घेईल, गळ्याभोवती गुंडाळल्यासारखी कवटाळेल– जणू फरच्या कोटाची कॉलर.कदाचित आता तिने डांबराच्या गोळ्यांचा वास येणारा जो फरचा ओव्हरकोट अंगावर घातलाय त्यापेक्षाही येसिकाने जास्त उब दिली असती. आपल्या खऱ्या खऱ्या स्पर्शाने. कोट घातल्यावर तिने बरेचसे दिवे मालवले. तिने वरपर्यंत पट्टे असलेले नाजुकसे सँडल्स हातात घेतले आणि स्टॉकिंग्जवर चालत गेली. कारण कदाचित सँडल्स घातल्यावर तिच्या पावलांच्या आवाजाने त्याने वर्तमानपत्रातून डोकं वर काढलं असतं आणि उघड्या दारातून त्याची नजर कॉरीडॉरकडे वळली असती. तिथे अजून दिवा चालू होता. त्याच्याकडे वळून पाहायचं ती कसंबसं टाळू शकली. भिंतीलगत चिकटून ती फ्लॅटचा दरवाजा सोडून बाहेर पडली. जिना हलकेच उतरली. तिच्या पायांना पायऱ्यांचा गार स्पर्श होत होता. सगळ्यात शेवटच्या पायरीवर लंगडत तिने सँडल्स चढवले.

टॉक्...टॉक्...टॉक्... तिला असं वाटलं की हे तिचं हृदयच आता धडधडायला लागलंय– घाईत, ठेचकाळत, उतावीळपणे. इमारतीच्या कॉरीडॉरमध्ये, रिकाम्या जिन्यावर आवाज घुमत होता. मोकळ्यावर बाहेर आल्यावर त्याला ताल प्राप्त झाला. पदपथावरच्या फरशीवर, मग काँक्रीटच्या रस्त्यावर. कोपऱ्यावरचं वळण. या शांत भागात अजूनही एकटीच. आवाज इमारतींच्या भिंतीवर आदळून परत येत होता. रस्त्यावरच्या एकेकट्या पेटलेल्या दिव्यांवरून जात होता. मग पुन्हा पावलांच्या साथीने येणारा तो आवाज. पुन्हा जोडीला दिव्यांचा उजेड. पुन्हा पावलं. पुन्हा दिवे, पण तरी तिला पुरेसा वेगच येत नव्हता. तेवढ्यात अंडरग्राऊंड मेट्रोच्या जिन्याचं तोंड आलं. केराच्या यंत्रात एखादं पीस ओढलं जावं तशी ती आत खेचली गेली. जिन्यावरून गरगरतच ती खाली उतरली ती थेट तिकीटं काढायच्या स्वयंचलित यंत्रापर्यंत पोचली.

तिथे ती उभी राहिली, पण जवळ पैसेच नव्हते. तिची पर्स बैठकीच्या खोलीत राहिली होती. अशी सतत पर्स बाळगण्याची सवय तिला कधी लागली नव्हती. फरच्या कोटातही पैसे नव्हते, कधीच नसत तसे कारण खिशांना खालून भोकं पडली होती. तिच्या मागे घाई असणारे अनेक जण गर्दी करून उभे होते. एक तरुण बारक्या चणीचा, काळे केस आणि काळे डोळे असणारा तिच्यालगत मागे उभा होता. त्याने मजेशीर चेहरा केला आणि तिच्या खांद्यावरून हात लांबवत त्याने यंत्रात दोनदा नाणी टाकत दोन तिकीटं काढली. स्वयंचलित यंत्रातून ती हातात घेतली. ती त्याच्या मागे चालत होती. तिकीट त्यानेच काढलं असल्याने तिला काही इलाजच नव्हता. त्याचा जणू तिच्यावर अधिकारच प्रस्थापित झाला होता. मेट्रोमध्ये बसायला जागा नव्हती. ते उभेच राहिले आणि तिनं एका दांडीला घट्ट पकडून ठेवलं. भूमिगत रस्त्याने जाताना दोन्ही बाजूंच्या भिंतींवरून आपटून प्रकाश आणि कर्णकर्कश आवाज येत होता. त्याला ती खूपच तरुण समजली. म्हणजे स्वत:पेक्षा बराच लहान. ती खरं तर फक्त पंचवीस वर्षांची होती आणि तिला आपण कधी मोठे, सज्ञान झालोयत असं वाटलंच नव्हतं. कशाच्या तरीपेक्षा किंवा कुणातरीपेक्षा आपण लहान आहोत अशीच सवय तिला झाली होती. तिच्या नवऱ्यापेक्षा तर काही शतकं लहान. तर आता तिने आपल्या सुबक, लांबसडक बोटांच्या हाताकडे बघितलं. त्याच्या राकट तरुण हाताशेजारी तिचा हात होता. ती एक परिपूर्ण आणि तयार अशी बाई होती. एक सुंदर कलाकृती-जिच्यात कोणताही बदल शक्य नाही अशी. तिला एकदम विजयाची भावना झाली. तो तिला फक्त आपल्या डोळ्यांच्या कोपऱ्यातून बघत होता, पण त्याला काय दिसतंय हे तिला कळत होतं. अनोळखी सुंदर स्त्री, प्रेयसी. क्षणार्धात ती त्याच्या कल्पनेच्या आवरणाखाली घसरत गेली, थोडं स्वत:ला ताणत आणि ती एकदम त्याच्याबरोबर बसली. विनासायास.

मेट्रो ब्रेक लागून थांबली. दोघं खाली उतरली. त्याच्यातली धिटाई ओसरली होती. तिकीटं काढायच्या यंत्रासमोर ज्या आगाऊपणाने त्याने तिला न्याहाळलं होतं त्याचा मागमूसही नव्हता. प्लॅटफॉर्मवर उतरल्यावर तो अडखळला, तिच्याबरोबर असं चालणं तिला चालणार आहे का याचा अंदाज त्याला येईना, का त्याने मागेच थांबायला हवंय? तिने निदान आभार तरी मानायला हवे होते, पण तिला त्याच्या

बाबतीत इतकी खात्री वाटत होती की ती एक शब्दही न बोलता चालत राहिली. अर्थात मधूनच आपलं काही पडलंय का असं बघायला मागे वळून नजर टाकावी असं तिनं केलंही. तो येतोय याची खातरजमा आपल्या मनाशी करायला. तो तिच्या लगत मागेमागे जात राहिला. तिच्या आवाज करत जाणाऱ्या सँडल्सच्या टाचांवर नजर खिळवून ठेवत तो जात होता. ते एव्हाना एकदिशा मार्गावरून चालत होते. कदाचित पुढे रस्ता बंद होता. आता मागे वळताही येणार नव्हतं.

रस्त्याच्या शेवटाला जाऊन ती उभी राहिली. तो तिच्याजवळ येऊन उभा राहीपर्यंत. त्याने 'मग आता काय' असं विचारेपर्यंत. ती म्हणाली, 'मी इथे नवीनच आलेय' आणि हे तसं पूर्णपणे खोटं नव्हतं. अर्थात त्यामुळे तिला काहीच फरक पडला नसता, पण रात्रीच्या वेळी रस्त्याचा असा अनुभव तिने कधी घेतला नव्हता. ही माणसांची गर्दी आणि ती त्यांच्यामधली एक! अनेक नजरा तिच्यावर पडत होत्या, कौतुकभरल्या नजरा. तिच्या आजूबाजूने आडव्या-तिडव्या, उभ्या-तिरक्या जाणाऱ्या आनंदाच्या लाटा तिच्यावरून जात होत्या. तिला वाटेत बेटं लागत होती, प्रवाह, खडक, सिमेंट काँक्रीटच्या इमारतीच्या रूपात प्रकाशाने उजळून निघालेले किनारे लागत होते. त्यांवरून रंगीबेरंगी जाहिरातींवरचा प्रकाश खाली टपकत होता. पाठी, डोकी, चेहरे, इंद्रधनुष्याच्या रंगाचा स्प्रे मारल्यासारखा दिसणाऱ्या कपाळपट्ट्या, लाल बेरीजच्या रंगात उमललेले, बर्फाच्या फिक्या रंगात गोठलेले, हिरवट रंगाचा मुलामा असलेले, काळ्या रंगात बुडवून काढलेले असे चेहरे. जणू ते खोटेच असावेत. वेगवेगळे आवाज, गाण्यांचे आवाज, कलकलाट आणि या सगळ्यात तिचा आवाज आणि तिचा मूकपणा हे एकमेकांत मिसळून गेलं होतं. जणू एखादी अर्थहीन आणि रूपहीन भरकटलेली सिंफनी असावी तसं. तिने तिच्या हृदयाच्या धकधकीला बळ दिलं. रक्ताला गती दिली, स्वत:ला वर हलकेच उचलून धरलं आणि पुढे पुढे नेलं.

तिचा नवरा नेहमी म्हणायची की ती पायी चालण्यात कच्ची आहे, पण कसं काय खरं? तेव्हा ते डोंगराळ भागात, जंगलात, थोडक्यात निसर्गात भटकत असायचे. तेव्हा तिचा नवरा म्हणायचा, 'चालण्यात नाजूक आहेस.' पण आता तिला पायाचं काही भानच नव्हतं. आता या असल्या प्रवाहात खालचा अंधारा तळ धुंडाळताना तिचे पाय अडखळले नव्हते, पण त्याच्याशी तिला काय घेणं होतं? तिच्या साथीदाराचा

हात तिने घट्ट धरला होता. आपला तोल सांभाळण्यासाठी आणि उब मिळावी म्हणूनही. त्याच्या स्वेटरमधून उब तिच्या हातातून आत शिरत होती. त्याने विचारलं, ''काय प्रकारच्या बाई आहात तुम्ही. पैसे न घेता तुम्ही रस्त्यावर फिरताय, अनोळखी पुरुषांबरोबर बोलाचाली करताय! अं?'' तो निर्दयपणे वागत होता, तिचा अपमान होईल असं, पण तिने त्याचा आपल्यावर काही परिणाम होईल असं तो काय म्हणतोय हे मुळी ऐकलंच नाही. तिला ऐकू आला त्याच्या स्वरातला लहान मुलासारखा वाटणारा हटवादीपणा आणि तिच्या जेव्हा लक्षात आलं की तो तिला जरा घाबरतोय तेव्हा तिला दचकायला झालं. थोड्या आगाऊपणे 'काही असो. आता तुम्ही माझ्या खिशाला न परवडणाऱ्या आहात असं वाटतंय' असं म्हणत त्याने तिचा दंड दुखावा इतका घट्ट पकडला. जणू ती हळूच निसटून जाईल अशी त्याला भीती वाटत होती, एखाद्या धुरासारखी उडून जाईल. ती त्यावर नुसती हसली. तिच्या मनात आलं, अर्थातच तुझ्यामुळे मी इथे आलेय, बाळा!

त्याने विचारलं, ''तुमचं कुणीतरी असणारच. नवरा, मित्र?''

तिने आपलं घर डोळ्यांसमोर आणायचा प्रयत्न केला आणि आपला नवरा तिच्या डोळ्यांसमोर आला, सोफ्यावर बसून वर्तमानपत्र वाचणारा आणि सहनशीलपणे जेवणाची वाट पाहणारा आणि अचानक तिला येसिकाची आठवण झाली. ती पुटपुटली, ''येसिका, मला येसिकाला शोधलं पाहिजे.''

तो रागावून म्हणाला, ''काय, येसिका? हे काय प्रश्नाचं उत्तर झालं? तुम्ही प्यायलात का?''

तोंड उघडून काही बोलायचा विचारच तिने केला नाही. तिरकस, शिष्टासारखा आणि लाडाने एक कटाक्ष त्याच्याकडे टाकला आणि त्यानंतर नकळत त्याचा सगळा विरोध गळून पडला. तो म्हणाला,

''मला माफ करा.''

गरम गरम पाण्याच्या टबमध्ये पडून राहताना वाटावं तसं तिला वाटलं. कारण तो तिच्या प्रेमात पडलाय हे तिला जाणवलं. येसिकासारखं गुरगुरावं असं तिला मनापासून वाटलं, पण तिची निराशाही झाली आणि तिला जरा राग आला, कारण त्याच्या बाजूने तिच्यासाठी काही करायला मुळी राहिलंच नव्हतं, पण तो काही

एकटाच नव्हता. तिने त्याच्या हातात अडकवलेला आपला दंड सोडवून घेतला. वेगाने रंग बदलणाऱ्या दिव्यांच्या झोतात तिचं रूप एखाद्या काचेच्या बाहुलीसारखं दिसत होतं- गोरं, कडक आणि छेदता न येण्यासारखं.

दोघंही आणखी एक जिना उतरले, आणखी आणखी जिने उतरत खाली गेले. कुठे संपणार आहे हा जिना. खाली गरम होत होतं, लालभडक रंगाचा प्रकाश होता आणि धूर साठला होता. दिव्यांना लाल रंगाचं काहीतरी गुंडाळलं होतं. एखाद्या साऊनाबाथमध्ये जाऊन आल्याप्रमाणे तिथे संगीत वाजवणारे घामाने निथळत होते. त्यांचे रंगीत शर्ट्स पाठीला चिकटून बसले होते. ते थोडे उंचावर बसले होते. काळ्या रंगाच्या, विस्कटलेल्या चेहऱ्याच्या, मुखवटे बसवलेल्या पुतळ्यांसारखे दिसत होते. त्यांची डोळ्यांमधली पांढरी बुबुळं हलत होती. एकजण गाल फुगवून वाजवत होता. बेडकाच्या तोंडाजवळ फुगवटे असतात तसे त्याच्या डोक्याच्या दोन्ही बाजूंना ते फुगलेले मोठे मोठे गाल चिकटवल्यासारखे दिसत होते. काळे कुळकुळीत, चकाकणारे, तेलाने पॉलिश केल्यासारखे. त्यांच्या दोन हात खाली नाचणारी मंडळी होती. खांद्याला खांदा, कमरेला कमर भिडवत नाचत होती. मध्यभागी एक रॉक न् रोल नाचणारी जोडी होती. तरुण मुलं आणि मुली. त्यांचे झोपाळू चेहरे. त्यांची शरीरं बरोबर तालात हलत-डुलत होती-यंत्रवत्. त्यांच्यात प्रेमाचा आवेग नव्हता. नाचाच्या गोल पृष्ठभागाच्या भोवतीने खुर्च्या आडव्या-तिडव्या कशाही पडल्या होत्या. जणू तिथे नुकतीच मारामारी झालीय अशा. एकेकटे आलेले कुणी कुणी आपापल्या जागी बसून होते. बुडालेल्या जहाजातून वाचून एका बेटावर बसावं तसे दिसत होते ते. बाटल्यांच्या मागे, हातांवर चेहरा टेकवून बसले होते.

तेवढ्यात संगीत संपलं. एकमेकांना चिकटून नाचणारी जोडपी एकमेकांपासून विलग झाली. गर्दीतून दूर होताना थोडी पायांवर हेलपांडत होती. कारण आता अचानक त्यांना जाणवलं, की दोन पाय, दोन हात आणि एक डोकं असणारे आपण एकटे आहोत.

ती आपल्या त्या जोडीदाराबरोबर दरवाज्यापाशी उभी राहिली आणि धुराने आणि धूसरपणाने भरलेल्या त्या हॉलमधल्या प्रत्येक चेहऱ्याकडे तिने नजर टाकली.

तिच्या लक्षात आलं, की तिच्याइतकं सुंदर दिसणारं तिथे कुणीही नव्हतं. अस्ताव्यस्त पसरलेल्या खुर्च्या टेबलांवरून तिच्या जोडीदाराला मारलेल्या हाका ऐकू येत होत्या– जॉन... जीन... योखन... असंच काहीतरी नाव होतं त्याचं. त्याचं खरं नाव काय आहे याच्याशी तिला काही देणंघेणं नव्हतं, परंतु तो आता थोडं नाटकीपणाने वागायला लागला. कारण त्याची सोबतीण म्हणून ती होती, पण खरं तर ती कुणाचीच नव्हती, कुणाचीच होणार नव्हती. त्याने तिचं मनगट पकडलं आणि आपल्यामागे तिला ओढत घेऊन जायला लागला. ती अडखळली. तिच्या फरच्या कोटाचा धक्का टेबलावरच्या एका ग्लासला लागला. तो ओरडून म्हणाला, ''ही आहे येसिका.''

ती म्हणाली, ''नाही, चूक आहे हे. येसिका मांजरीचं नाव आहे. घरातून पळून गेलीय ती.''

त्याने तिच्याकडे बोट दाखवत तेच पुन्हा सांगितलं, ''येसिका–घरातून पळून गेलेली मांजर.''

सगळ्यांनी हसून एकच गलका केला. फक्त ती गंभीर चेहऱ्याने उभी होती. तिला ते मुळीच विनोदी वाटलं नाही. फरच्या कॉलरच्या आतले आपले खांदे अस्वस्थपणे तिने हलवले. गळ्याभोवती गुंडाळलेली फर खाली घसरली, तिने ती पुन्हा सावरली. हळूहळू सगळे शांत झाले आणि तिच्याकडेच बघू लागले. तिला काहीही लक्षात आलं नाही किंवा अशा शांततेची सवय असल्यामुळेही असेल. मग कुणीतरी तिला बसायला खुर्ची दिली, त्या शांततेच्या मध्ये ती बसली. स्वप्नाळूपणे. कंटाळलेपणाने. खरं तर एकीकडे तिने इतकं सुख अनुभवलं होतं की तिला वरपासून पायाच्या टोकापर्यंत अगदी बोटांपर्यंत सूक्ष्मपणे होणारी थरथर जाणवत होती. पियानोवर बसलेल्याने सर्व स्वर एकदम वाजवले, त्याची जाड काळी बोटं नाजूकपणे सर्व पट्ट्यांवरून फिरली, जणू तिच्यासाठी आणि जणू तिच्यासाठीच गिटारचे आणि बिगुलाचे सूर त्यात मिसळले. नंतर त्यातून एकटाच, स्पष्टपणे, सरळपणे एखाद्या लोखंडी कांबीसारखा उंचावर ट्रम्पेटचा सूर झेपावला.

ती नाचायला लागली. एकाबरोबर का दहा जणांबरोबर. कदाचित सगळ्यांबरोबरही ती नाचली असेल. तिला त्यांच्यात फरकच करता येईना, त्यांच्याकडे

बघायला तिला वेळ नव्हता. कारण शेवटी तिच्यावर साऱ्यांच्या नजरा खिळलेल्या होत्या. कौतुकभरल्या नजरा. तिच्यावर स्तुतीपर शब्दांचा, सौंदर्याची वाखाणणी करणाऱ्या शब्दांचा वर्षाव होत होता. डोळ्याच्या पापणीनेही त्याला ती प्रतिसाद देत नव्हती. तिचा श्वास गरम झाला होता. फक्त मधूनच, अगदी क्वचितच कुठेतरी तिला सुईची बोच झाल्यासारखी जाणीव होत होती की हे सारे शब्द, हे कौतुक निरपेक्षपणे कुणी करत नसतं, पण मनाला मिळालेल्या या सूचनेवर विचार करायला तिला कुठे सुचत होतं! कारण तिच्या शेजारीच ढोल वाजवणारा आपल्या ड्रमस्टिक्स धुराने भरलेल्या छतापर्यंत वर उंचावत होता आणि ट्रम्पेटचा तो उंच स्वर पुन्हा पुन्हा निनादत होता, उंच जाऊन थरथरत होता, मध्येच तुटत होता, खाली येत होता. लाल रंगाचे दिवे प्रकाशाची लाल वर्तुळं काढत हलत होते, गरगरत होते, तिच्या डोक्याच्या आतही त्यांची गरगर सुरुच राहत होती. अखेरीस दमून आणि अतिश्रमाने तिने डोळे मिटून घेतले.

कुणीतरी तिला उचललं आणि एखाद्या बाहुलीसारखं बारसमोर उंच स्टुलावर बसवलं. तिच्या कानाशी कुणाचा तरी श्वास जाणवत होता, ओठांना ग्लासचा स्पर्श होत होता. बारच्या मागच्या बाजूला बसवलेल्या आरशांच्या असंख्य तुकड्या-तुकड्यांमध्ये तिच्या शेकडो प्रतिमा तिला दिसत होत्या. पांढरीफटक आणि ताठ. कानातले डूल तेवढे हलत होते. घाबरल्यावर होतात तसे तिचे तांबडे केस कपाळावर विस्कटून आले होते. डोळे भकास आणि कोरडे. एवढं असूनही तिला स्वत:ला ती एरवीपेक्षा जास्त सुंदर भासली. कुणीतरी तिच्या दंडावर हात ठेवला होता, पण त्याने जेव्हा तो काढून घेतला तेव्हा तिला आश्चर्य वाटलं ते याचं की तिच्या त्वचेवर त्याची कोणतीच खूण शिल्लक राहिली नाही, ना त्याचा व्रण ना वळ उठला होता. तिची त्वचा इतकी नितळ आणि शीतल होती की तिच्यावर काही ठरत नव्हतं, कशाचाही व्रण तिथे राहत नव्हता. पण तरीसुद्धा कुणीतरी तेवढ्यात तिच्या खांद्यावर ओठ टेकवले तेव्हा तिच्या अंगावर शहारा उठला. जणू काही तो तिच्यावर आपल्या खुणेचा शिक्का उठवू बघत होता आणि तिला असला कसलाही शिक्का वगैरे उठवून घ्यायचा नव्हता. कशाचीही आणि कुणाचीही खूण तिला आपल्यावर उठवू द्यायची नव्हती. तिला वाटलेली किळस त्याला ताबडतोब जाणवली, कारण तो जेव्हा

सरळ होत उभा राहिला तेव्हा त्याच्या डोळ्यात चांगलाच राग तरळत होता. घाबरून तिने मान दुसरीकडे वळवली, पण तसल्या डोळ्यांनी जणू तिच्याभोवती एक कडंच उभं केलं होतं. सगळ्यांनी आपल्याकडे बघावं, आपलं कौतुक करावं हेच तिला हवं होतं, पण आता एकदमच सगळ्यांना आपण तिचं केलेलं कौतुक खटकायला लागलं. ते त्यांनी मनापासून केलं होतं खरं तर आणि आता जणू तिच्या परिपूर्णतेला तडा जावा, तिच्या सौंदर्याला गालबोट लागावं अशीच त्यांना अपेक्षा असल्यासारखे ते संधी शोधू लागले. तिचं मन भरलं होतं, तिला सगळं अती झालं होतं. आता आणखी काही करायला तिला नकोसं वाटत होतं. तिला इथून निघून जायचं होतं. तिच्या हपापलेल्या चाहत्यांचे हात तिच्यावर पडायच्या आधीच ती अलगद त्या उंच स्टुलावरून निसटली. सगळ्यांच्या डोळ्यांसमोर सरळ सरळ निसटून गेली. आपल्या डौलदार चालीत. कुणाच्याही लक्षात न येणाऱ्या हालचाली करत. तिच्या गोऱ्या पाठीच्या मागे नाचणारी जोडपी विलग होत पुन्हा जवळ आली. अनेक दारं ती गेल्यावर पुन्हा लागत गेली. त्या दारांमागे संगीत पुसट होत गेलं आणि तळघराच्या त्या बंदिस्त जागेत तिच्या उंच टाचांच्या सँडल्सचा आवाज घाईत टाकलेल्या पावलांमुळे घुमत गेला, बंदुकीतून तालात सुटलेल्या गोळ्यांसारखा. ती तिचा फरचा सरंजाम विसरून आली होती त्यामुळे थंडी वेगाने तिच्या अंगात शिरू लागली. दिवे कमी असल्याने रस्ता विझून बुडाल्यासारखा भासत होता. जणू तो समुद्राच्या पार तळाशी जाऊन पडला होता. सर्व आवाज गळा घोटल्यासारखे पुसट ऐकू येत होते. ती एकटीच एका घळीच्या तळाशी जणू पडली होती. तिच्या घोट्यांखाली असलेल्या सँडल्सच्या निमुळत्या उंच टाचांच्या तालातला आवाज तिचं क्षुद्रपण जणू जाणवून देत होता.

ती वेग वाढवत पावलं टाकू लागली, पण आपण कुठे जातोय हे तिला कळत नव्हतं. कोणत्या दिशेने आपल्याला जायचंय, आपल्याला काय गाठायचंय काही कळत नव्हतं. तिच्या विचारशक्तीने जणू घूमजाव केलं होतं. तिला एक मात्र ध्यानात आलं होतं, की कुणीतरी तिच्यामागे येतंय, पण त्याची तिला इतकी खात्री वाटत होती की तिने त्यासाठी मागे वळूनही पाहिलं नाही, पण मग मात्र तिला पावलांचा आवाज ऐकू आला. ती पळायला लागली. एका गल्लीत वळली. घाबरलेल्या

सशासारखी तिची होलपट झाली. ती लगेचच दमून गेली. एवढे थोरले जिने, लागोपाठचे नाच आणि हा रस्ता संपणार तरी केव्हा? कधीपासून, केवढीतरी वाट ती चालून आली होती. आता तिचा वेग मंदावला. पुढे ती एकदाची थांबली. एका दिव्याच्या खांबाला टेकून ती उभी राहिली आणि त्याची वाट पाहू लागली.

थरथरत तिने विचारलं, ''आता काय? तुम्हाला काय हवंय माझ्याकडून?''

तो काहीच बोलला नाही. बोलणार तरी काय होता? इतरांच्या दृष्टीने बघता त्याचं असं येणं बरोबर होतं. मागे राहिलेल्यांच्या तुलनेत बघता आणि त्याचा स्वत:चा विचार करता त्याचं योग्य होतं. अखेरीस त्याने तिला हेरलं होतं आणि कदाचित तिच्यावर प्रेमही केलं असतं. शी! किती हास्यास्पद, किती वेड्यासारखं, बालिश, निरर्थक! तो तिच्या रोखाने चालत गेला. तिचे दोन्ही दंड घट्ट पकडले, इतके की त्याचे नक्की वण उमटणार तिच्या त्वचेवर– बाहेरच्या बाजूने चार आणि आतल्या नाजूक भागावर दोन– त्याने तिला इमारतीच्या भिंतीवर रेटून धरलं आणि तिच्या ओठांचं चुंबन घेतलं, दात रोवून. रागाने त्याचे ओठ थंड पडले होते. तिला त्याने जोराने पकडून दुखावलं होतं. तिला त्याची घृणा वाटली. जिभेवर तिला स्वत:च्याच रक्ताची चव लक्षात आली. तिच्या फिसकारणाऱ्या, फुत्कारणाऱ्या रागाच्या खोलवर खाली कुठेतरी तिला जाणवली त्याला स्वाधीन करण्याची शरीराची इच्छा! एखाद्या टोकदार सुईसारखी ती बोचत होती. नंतर तिच्या शरीरभर भराभर पसरला तो एक प्रकारचा बधीरपणा आणि मंदपणा.

कदाचित कधीतरी तिने आपला विरोध सोडूनही दिला असावा. त्याच्या खांद्यावर तिने नकळत आपलं कपाळ घासलं. त्याच्या केसांखाली आणि कॉलरच्या वरच्या मानेच्या उघड्या त्वचेवर आपली बोटं फिरवली. मान मागे सैलसर सोडून दिली, पण आपल्या बालिश आवेगात त्याच्या ते काही लक्षात आलं नाही. ह्या शरणागतीच्या छोट्यामोठ्या खुणा त्याच्याही लक्षात आल्यासारखं झालं तेवढ्यात त्यांच्या जवळच एका मांजरीच्या ओरडण्याचा आवाज आला. तक्रारीचा स्वर असावा तसा. या रस्त्यावर असतीलही बऱ्याचशा मांजरी, पण ही फक्त एकच असू शकते. दोघंही दचकले, ऐकायला लागले आणि मग तो क्षण निघून गेला, हरवून गेला.

ती त्याच्या पकडीतून हलकेच निसटली आणि मांजरीच्या मागे गेली. मांजर पळत पन्हाळीच्या खालच्या दगडावर उभी राहिली आणि आपल्या हिरव्या चकाकणाऱ्या डोळ्यांनी तिच्याकडे बघत होती. ती हळूच पुटपुटली, ''येसिका, थांब. चल, आपण घरी जाऊ. चल, आपण झोपायला जाऊ.''

मांजर घरांच्या ओळीतून पुढे सटकली. पुढच्या कोपऱ्यावर वळली आणि भिंतीच्या कुंपणातून आत शिरली आणि पुढे त्यांच्याच इमारतीचं दार होतं. हे कसं शक्य होतं? तिला नेहमीचा रस्ता कसा नाही ओळखता आला? दुधाचं दुकान, बेकरी, भाजीचं दुकान. त्यांच्यासमोर रोजच्याप्रमाणे ठेवलेल्या आदल्या दिवशीच्या रिकाम्या झालेल्या बॉक्सेस. इमारतीचं दार कुलूपबंद झालं नव्हतं. तिने फक्त खांद्याने हलकेच ढकललं. तयार झालेल्या छोट्या फटीतून अलगद आत जायचं, बस्स! पॉलिश केलेल्या जिन्याच्या पायऱ्यांचा ओळखीचा वास तिला आला, रात्रीच्या जेवणाचा वास. येसिका तिच्या पायाच्या घोट्याला घासत आत शिरली. मांजरी हुशार असतात. आपली जागा त्या बरोबर हुडकून काढतात.

दाराचं अंगचंच कुलूप लागलं आणि अंधरात जिना चढत ती वर जाऊ लागली. पायऱ्यांचा आवाज येत होता, पण तेवढाच. बाकी इमारतीत संपूर्णपणे शांतता होती. जणू तिथले सगळे जण इमारत सोडून गेलेत किंवा मेलेत किंवा आपली घरं विसरलेत. ना रेडिओ, ना मुलांचा आवाज, ना बंद-उघड करणारी दारं. श्वासांचादेखील आवाज येत नव्हता. नाही म्हणायला दुसऱ्या मजल्यावर तेवढा दिवा जळत होता, प्रकाशाचा पिवळा पट्टा वाकडा होत पायऱ्यांवर पडला होता. दार नुसतंच लोटलेलं होतं. तो बैठकीच्या खोलीत बसला होता. तिथेच त्याला झोप लागली होती. सोफ्याच्या पाठीवर त्याची मान कलली होती आणि वर्तमानपत्र पायांच्या समोर पडलं होतं. अर्धवट झोपेत तो पुटपुटला,

''सॉरी डार्लिंग, मला झोप लागली होती.'' आणि मग एकदम उंच स्वरात ओरडत म्हणाला,

''अरे बापरे, अगं अशी काय दिसतेयस तू?''

ती वेगाने त्याच्या पायांवर जाऊन पडली. त्याच्या मांडीत डोकं घुसळत त्याला आपला चेहरा दिसू नये म्हणून तशीच पडून हळू आवाजात म्हणाली, ''मी येसिकाला रस्त्यावरून शोधून आणलं आणि अचानक मला बरं नाहीसं झालंय.''


तो घाबरून म्हणाला, ''खरंय गं, तू कापतेयस.'' आणि खरोखर काय आश्चर्य, ती थरथर कापत होती, तिचे दात वाजत होते आणि तिचं कपाळ नुसतं तापलं होतं.

त्याने तिला उचललं. डोळ्यांच्या फटीतून तिला हलकेच छत दिसलं. एखाद्या शिडासारखं ते गोलाकार फुगल्यासारखं वाटलं तिला. मग दिसलं तिरकं दार, उघडंच असलेलं. अंधाराने भरलेलं. दार मागे पडलं. किती छान वाटतंय असं कुणीतरी उचलून नेताना, किती छान, योग्य क्षणी आलेलं हे आजारपण, किती छान वाटतंय- अंधारात अशी डुबकी मारताना आणि गार गार पांघरुणात शिरताना एखाद्या मंद प्रवाहाने किनाऱ्यावर ढकलत आणावं तसं. तिच्या चेहऱ्यावर गार पडलेली कापडाची पट्टी ठेवली होती. त्या पांढुरक्या अंधारात आणि स्वच्छ, धुवट कपड्यांचा वास घेत ती शांतपणे पडून राहिली आणि तो पुटपुटत काहीतरी आमलेट वगैरे करायला जेव्हा गेला तेव्हा येसिका तिच्या अंथरुणात घुसली आणि गुरगुरत तिच्या छातीशी जाऊन पडली.

***

# तुला नूडल्स हव्यात?

**मूळ जर्मन लेखक : राल्फ रोथमान**
**भाषांतर : विद्यासागर महाजन**



**परिचय: राल्फ रोथमान**

**(१९५३)**

**या जर्मन लेखकाचा जन्म जर्मनीच्या उत्तर भागात १९५३ साली झाला. ते कादंबरीकार, कवी व नाटककार म्हणून प्रसिद्ध आहेत. मध्यमवर्ग आणि कामगार वर्ग अशा दोन्हीही स्तरांतील माणसांच्या आयुष्याचे चित्रण ते करताना दिसतात. त्यांच्या कथनात एकटेपणा जाणवणारी शहरी वातावरणातील माणसे वारंवार भेटतात. प्रस्तुत कथेत अगदी विचित्र अवस्थेत सापडलेली एक मध्यमवयीन स्त्री एकटेपणाच्या पहिल्याच अनुभवाला सामोरी जाताना दिसते. तिचा एकटेपणाचा अनुभव लेखक अतिशय तरल पद्धतीने रेखाटतो.**

***

रात्री वादळामुळे खिडकीशी वेल फडफडत होती. बर्चच्या झाडाची पानं खिडकीच्या काचेला चिकटली होती. अजून सकाळचे सातही वाजले नव्हते, तर तिनं आपल्या बहिणीला फोन लावला. एलिझाबेथनं तरीही लगेच रिसिव्हर उचलला आणि फोन उचलल्यावर नेहमीसारखं स्वत:चं आडनाव न सांगता ती फक्त एवढंच म्हणाली, 'काय मग?' जणू तिला फोन येणं अपेक्षितच होतं.

''हॅलो मी बोलतीये.'' आन्द्रेआला दूरवरून एक शिट्टी ऐकू आली. चाकं घासल्याचा, काहीतरी ठोकण्याचा, लोखंडावर आपटल्याचा असे आवाज ऐकू आले. तिची बहीण लाइप्त्सिग स्टेशनाजवळ राहत होती.

''तुझी झोपमोड केली का मी?''

''छे छे! मला कामावर जायला निघालं पाहिजेच की आता! तुम्ही काय म्हणताय? जीवाला घोर लावणाऱ्या आपल्या आजारी भिडूची काय हालहवाल?''

''हं!'' असं म्हणून तिनं टेलिफोनच्या रिसीव्हरच्या बाजूनं धूर सोडला आणि आधीच काठापर्यंत भरलेल्या ॲश ट्रे मध्ये आणखी राख झटकली.

''आता आमची तब्येत खूपच छान आहे.''

''म्हणजे कसं?''

तिनं खांदे उडवले. घरासमोरच्या दिव्यामुळे बाहेरच्या झाडांच्या पानांच्या सावल्या भिंतीवर पडल्या होत्या. त्यांच्या कडा कापल्यासारख्या वाटत होत्या.

''कालपासूनच मला तसं वाटायला लागलं होतं. म्हटलं, चला आता लवकरच हा अवघड गड चढून जाऊ. बरं का, अगं, काल त्याला अगदी गाढ झोप लागली होती. आणि मग त्याला पुन्हा एकदा शी झाली. मी त्याची कापडं बदलली. बहुधा त्याला त्या कशाची जाणीवच झाली नसावी. फक्त असा स्वत:शी बरळत राहिला. मग मध्यरात्रीच्या सुमारास, म्हणजे मी माझा गोगोल आणि ग्लासभर चहा घेऊन बसले होते, तेव्हा तो माझ्याकडे अचानक असा पाहायला लागला, चांगल्या मोठ्या डोळ्यांनी स्वच्छ नजरेनं पाहत होता.. देवा रे देवा! त्याचे असे स्वच्छ, मोठाले डोळे पाहून किती दिवस उलटले कोणास ठाऊक! माझ्या डोक्यात विचार आला, माझ्या छबड्या, कोणत्या जगातून तू माझ्याकडे असा पाहतोयस? अन् मग तो रडायला लागला. हलके हलके अश्रू आपले चेहऱ्यावर खालपर्यंत ओघळत राहिले अन् मी त्याच्या अगदी जवळ जाऊन बसले आणि म्हणाले, काय झालं? मी आहे ना! घाबरू नकोस तू! कोण रडतंय ते? कशाला?... मला अशी समजूत घालणं कधीच जमलं नाही. अन् अचानक तो हुंदके देऊन रडायला लागला. असा हुंदके देऊन देऊन गदगदून तो रडत होता. त्याचं रडणं थांबत म्हणून नव्हतं. त्यानं आपल्या पंजात माझं लोकरीचं जॅकेट घट्ट पकडून ठेवलं, जवळपास माझी बटणंच तोडली म्हणेनास! मला काहीच करता येईना. मी हतबल झाले.. मी आपली पुन्हा पुन्हा तेच तेच म्हणत होते, माझ्या लाडक्या, सगळं ठीक होईल. मी आहे ना! हे बघ, मी आहे रे इथंच, तुझ्याजवळ! असं म्हणून त्याचं डोकं कुरवाळत होते. आता मलाच रडू फुटतंय की काय असं मला वाटायला लागलं! पण मग तो पुन्हा शांत झाला, आणि झोपी गेला. तो अगदी सगळ्या व्याधीतून मोकळा झाल्यासारखा दिसत होता, तेव्हाच मी म्हटलं, आता यातून हा लवकरच बाहेर पडणार!''

तिनं गार चहाचा एक घोट घेतला. ''छी:! काय हे! माझ्या सगळ्या सिगरेटी संपल्या... बरं का, अगं काल दुपारी तो बोललासुद्धा, सुरुवातीला अतिशय हळू आवाजात बोलला. मला माझा कान पार त्याच्या ओठांशी न्यावा लागला. त्याला गोड खायची इच्छा झाली होती, आणि तो की-बोर्ड मी बंद करून झाकून ठेवायला त्याला हवा होता. तसा माझा मोठा रेशमी रुमाल नेहमीसारखाच त्यावर पडलेला होता. मग तो अंगभर खाजवू लागला आणि म्हणाला, मला आपल्यासाठी यातून बाहेर पडायचा काहीतरी रस्ता सापडायला पाहिजे होता गं! ते आपल्याला एका बाजूला बंदिस्त करून ठेवतात. चल, एकदाचे इथून सटकूयात! हे बोलताना त्याला आम्ही अजूनही गोल्ममध्येच आहोत असं वाटत असणार!''

तिची बहीण खाकरली, ''अँडी!''

''ऐक तर... आम्ही त्यावर हसलोही. कारण कल्पना कर, तो अचानक उठायलाच लागला. अनेक आठवडेच्या आठवडे लोटल्यानंतर पहिल्यांदाच. मी त्याला विचारू लागले, अरे काय चाललंय काय तुझं? अन् त्यावर तो म्हणतोय, तू काहीतरी खा बरं गरमागरम! मी करून घालतो तुला काहीतरी. असं म्हणून तो पलंगाच्या पाठीला जोर देऊन पार उठायलाच लागला! तुझं डोकं फिरलंय असं म्हणून मी त्याचे खांदे धरून ठेवले. पडून रहा बरं! देवा, काय त्याचे खांदे... तो पूर्वी कसा अस्वलासारखा मजबूत होता, तुला आठवतंय ना? पण तो ऐकेचना, त्याला काही झालं तरी स्वयंपाकघरात जायचंच होतं. दोन्ही हातांनी मी त्याला मागे मागे दाबलं. तो त्याच्या पांढऱ्या दाढीतून माझ्याकडे दात विचकून हसला. असं वाटत होतं की माझ्याकडे तो तिरकसपणे पाहतोय. आणि म्हणतो कसा, अगं, एक नंबरची खादाड पोरगी आहेस तू. तुला कोण करून घालणार? पाणी पाहूनही तुझी भूक जागी होते. मग अगदी हळू आवाजात त्यानं विचारलं, अँडी, तुला नूडल्स हव्यात? हव्यात नूडल्स?''

मी खाकरले, ''माझा लाडका नवरोबा..''

तिच्या बहिणीनं दीर्घ श्वास घेतला, ''कधी गेला तो?''

आन्द्रेआ बोलायची थांबली. जणु पलीकडून तिच्या बहिणीला ती दिसत असावी अशी तिनं मान हलवली. सिगारेटचं रिकामं पाकीट तिनं चुरगाळून टाकलं.

''अगं ए बाई, ऐकतेयस ना मी काय विचारतेय ते?''

''काय? अं? हो. एलिझाबेथ, मला अजून माहीत नाही कधी ते. माझा कधीतरी डोळा लागला, कोचावर, पुस्तक तसंच मांडीवर होतं. मी जागी झाले तर तो पार निस्तेज दिसत होता, जणु मेणाचाच बनलेला असावा असा. केसांच्या बटा अशा जीव नसल्यासारख्या, डोळ्यांच्या पापण्यांवर राखाडी रंग चढलेला, मी त्याचा हात कुरवाळला, आणि त्या क्षणी खरं म्हणजे मला कळून चुकलं. म्हणाले, काय रे बाबा? संपलं का सगळं? मग मी त्याची पापी घेतली, पुन्हा पुन्हा, त्याचा श्वास चालू नव्हता, बिलकुल नाही. एखादीसुद्धा झुळुक नाही. त्या वेड्याला मी अशी खसाखसा चोळतच होते म्हण ना!''

आता ती रडू लागली. एलिझाबेथ काही न बोलता ऐकत राहिली. ती बहुधा आता जागची उठली असावी, लाकडी जमिनीचा करकर आवाज येत होता, एक कपाट उघडल्याचाही आवाज आला आणि मग कागदांची सळसळ ऐकू आली. मागून एका कॉफीमशिनची खरखर कानावर पडत होती.

''हे बघ, नीट लक्ष देऊन ऐक! नऊ वाजून पन्नास मिनिटांनी एक जलद इंटरसिटी गाडी निघते. मग मी बाराच्या आधी बर्लिन झू स्टेशनावर पोचेन आणि उशिरात उशिरा साडेबारा वाजता तुझ्याकडे. तोपर्यंत... ऐकतेयस ना, जरा विश्रांती घे. तिथंच त्याच्यापाशी पडून रहा. मी बाकी सगळी व्यवस्था करते.''

पालथ्या हातानं आन्द्रेआनं नाक पुसलं.

''शहाणीच आहेस, या अरुंद सोफ्यावर मला त्याच्याजवळ कसं झोपता येईल? त्याला पलंगात पडून मृत्यू नको होता ना!''

''हो, खरंच की! सॉरी हं! माझ्या लक्षातच राहिलं नाही. अँडी, मी येतेच हं लगेच. मी ऑफिसमध्ये फोन करते आणि दोन-चार दिवसांची रजा घेते. मी तिथं आल्यावर आपण काय, कसं करायचं नीट ठरवू. बऱ्याच गोष्टी उरकायला लागणार आहेत. अगं हो, एक राहिलंच. हे बघ, त्याच्या पापण्या मिटून टाक आणि त्याच्या डोक्याभोवती काहीतरी बांध, ऐकतीयेस ना तू?''

''मी काय करू म्हणालीस? कशाला?''

''नाहीतर त्याचं तोंड उघडं राहील, त्यानं मिटलं नसेल तर! आणि जर डोळे टक्क उघडे राहिले तर मग नंतर ते मिटता मिटत नाहीत. म्हणून काहीतरी कपाळाभोवती बांध. हॉस्पिटलमध्ये आम्ही बँडेजच्या पट्ट्या गुंडाळत असतो. पण तुझ्याकडे नसेल तर मफलरही चालेल. चांगलं गुंडाळून चांगली घट्ट गाठ बांधायची. आलं ना तुझ्या लक्षात?''

आन्द्रेआनं घरात, स्वयंपाकघरात नजर फिरवली. ''काही कळत नाही.''

''अगं, कळत नाही कसं, बरोबर जमेल तुला. अगं, तुझ्या लक्षात येतंय का, ते कसं दिसेल, समजा त्याचे डोळे उघडेच... माझं ऐक, एक मफलर घेऊन बांध लगेच. लवकरच भेटू मग, काय?''

''थँक्स, पण एली-''

''काय?''

''तू ममाला फोन करशील? तिला गेरूल्फ खूप आवडायचा. जर तिनं फोनवरून माझ्या कानात हंबरडा फोडला तर मलाही स्वत:ला बिलकुल आवरता येणार नाही आणि ती इथे येऊन दाखल झाली तर मात्र! तिला सांग, इथं लागेल ते माझ्याकडे सगळं आहे. चहा, माझी पुस्तकं, दफनविधीच्या आधी तिनं इथं येण्याची काहीच गरज नाही म्हणून सांग.''

''बरं. मी सांगते तिला फोन करून.''

''अं हो, आणखी एक. येताना माझ्यासाठी सिगारेटचा डबा आणशील का?''

''आणीन की- त्यात काय! बरं भेटूच.''

बहिणीनं फोन ठेवला तशी अँडीनं आपले डोळे मिटले. क्षणभर ती खोलीतल्या शांततेमुळे दचकलीच. शांतता म्हणजे तशी शांतता नव्हती, कारण फ्रीजचा गर्रर आवाज येत होताच. खाली कुणीतरी धोपटून जिना साफ करत होतं. अन् दाराच्या फटीतून आत येणाऱ्या वाऱ्याचाही हलकेच शीळ घातल्यासारखा आवाज येत होता. तिकडे मागे काहीतरी आहे असं वाटून ती जिन्यापासल्या कपडे टांगायच्या पट्टीशी गेली. तिथं तिच्या नवऱ्याचा ट्रेंचकोट टांगलेला होता. तिनं त्याचे खिसे धुंडाळले, पण तिला कागदाच्या गुंडाळीशिवाय तिथं दुसरं काही सापडलं नाही. मग तिनं बाह्यांवरचा मफलर काढून घेतला आणि त्याची निरुंद पट्टीसारखी घडी केली. गेरूल्फच्या तंबाखूचा वास त्या मफलरला येत होता.

झोपायच्या खोलीत तिनं फक्त वाचण्यासाठीचा दिवा तेवढा ठेवला. काचेच्या मागच्या बाजूनं जाऊन तिनं बाहेरचा उजाडतानाचा प्रकाश आत येईल इतपत व्हेनेशियन ब्लाइंडचा पडदा उघडला. काही लोक उद्यान ओलांडून चालले होते. तिथले कंदीलही वाऱ्यानं थरथरत होते. आपल्या छत्र्या घेऊन लोक आगगाडीच्या स्टेशनकडे मुश्कीलीनं पोचत होते. आन्द्रेआनं मृताच्या चेहऱ्याकडं पाहिलं. पापण्या मिटलेल्या होत्या. एरवी नाजुक वाटणाऱ्या गालफडांवर उंचवटे वाटत होते आणि त्याच्या नाकपुड्या तिला जवळपास पारदर्शीच वाटत होत्या. तिथल्या बारीक नसावर तिला संध्याकाळी दिसतो त्याच्यापेक्षा जास्त रक्तिमा दिसत होता. त्यातलं रक्त आता स्तब्ध झालं आहे अशी कल्पना करणं तिला कठीण जात होतं. तिनं त्याच्या गालावरून आपल्या हाताची पालथी बोटं फिरवली.

अखेर तिनं हनुवटीखालून मफलर गुंडाळून त्याची टोकं त्याच्या डोक्यावर बांधली. त्याचं डोकं किंचितसं हललं आणि तोंडात दात नसल्यासारखे त्याचे ओठ काहीसे पुढं आले.

शिवाय त्या मफलरच्या लोकरीचे इकडे तिकडे उसवलेले धागे त्याच्या कवटीवर ॲंटेनासारखे उभे राहिले होते. एकूण ते दृश्य इतकं चक्रमसारखं दिसत होतं की तिला वाटलं तो मफलर पुन्हा काढून टाकावा. पण मग ती पुन्हा सोफ्याच्या कडेला बसली, आपलं कपाळ नवऱ्याच्या कपाळाशी नेऊन महणाली, ''मला भूक लागलीये बाबा, चांगलंच कडाडलंय.''

तिचे अश्रू त्याच्या गेल्या काही आठवड्यात वाढलेल्या दाढीत टपकले. पंचेचाळीस वय असून त्याच्या दाढीचा एकही केस पांढरा झालेला नव्हता. तिनं नाकपुड्या आक्रसल्या आणि पलंगावरची चादर नीट ताणली. नंतर तिनं चंद्रप्रकाशासारखी निळसर नखं असलेल्या त्याच्या हाताची घडी करून ती त्याच्या छातीवर ठेवली आणि ती जीन्सची पॅंट आणि पुलओव्हर घालून पलंगावर पडली. बाहेर रहदारीचा आवाज वाढला होता, सकाळी शाळेत जायची बस गाठताना चाललेल्या लहान मुलांच्या आरड्याओरड्याचे आणि धांदलीचे आवाज कानावर पडत होते.

जसजसे अधिकाधिक उजाडू लागले तसतशी त्या मृताची छायाकृती ठळक होऊ लागली. पडल्या पडल्या तिला त्याचा गंभीर चेहरा एका बाजूने दिसत होता. सतत माणसाच्या सोबत असणारा, पण आत्तापर्यंत गुप्त राहिलेला जीवनाच्या मुळाशी असलेला केवळ थंडगारपणा तिला त्या चेहऱ्यावर दिसला आणि तिच्या अंगावर काटा आला, पण या अंतिम अवस्थेतही तिला काहीतरी मनाला हलकं करणारं आहे असं वाटलं. कारण तिला मृत्यूची भावना इतकी भयानक असायला नको होती. फक्त त्याच्या मृत्यूआधी तिच्या मनात भीती शिरलेली होती. तिनं उशीलाच आपले डोळे पुसले, आपले हात मांड्यांमध्ये ठेवून ती स्वत:शी कुजबुजली, असं आहे तर, आपण हेसुद्धा अनुभवलं.

मग तिनं डोळे मिटले, तिला झोप लागूनही तिला बाहेरचं सगळं ऐकू येत होतं. त्यांच्या इमारतीत कुठंतरी कामगार काम करत होते. झाडांत पियानोसदृश गाणारा दयाळ पक्षी– शिवाय गेरूल्फच्या पोटातून येणारी गुरगुरही तिला ऐकू येत होती. स्वप्नात तिला पोटाचा डॉक्टर दिसला. तो तिला विचारत होता, काय घेऊन आलात तुम्ही माझ्याकडे? तिला नाकाच्या वरच्या हाडापुढे पोचणाऱ्या त्याच्या पांढऱ्या जाडजूड भिवया दिसल्या. तो तिला तपासणी अहवाल नीट दाखवत होता. अल्ट्रा रे किरणांच्या पडद्यावर तिथं स्पष्ट दिसणारा काळसर रंग स्पष्ट ओळखता येत होता. तपासणी अहवालामागे समाधानानं हसणारा त्याचा चेहरा तिला स्वप्नात दिसत होता.

बेल वाजली. ती फोनचीच बेल आहे असं समजून ती दुसऱ्या कुशीवर वळली. पण मग दारावर कुणीतरी टकटक करू लागलं. पत्रासाठी ठेवलेल्या फटीचं झाकण कुणीतरी उघडमीट करू लागलं, ते ऐकून ती चांगलीच दचकली. आता बाहेरचं वादळ शांत झालं होतं. बर्च झाडाच्या फांद्या खिडकीसमोर लख्ख उन्हात चकचकीत पुसल्यासारख्या दिसत होत्या. ती न्याहरीच्या टेबलाशी जाताजाता तिनं पाहिलं की विजेच्या बटनांचा बोर्ड चालू आहे. पिवळ्या कापडातून वीज नियंत्रक दिवा पेटलेला दिसत होता. ती म्हणाली, ''जरा थांबा हं, आलेच!''

तिची बहीण सिगारेट ओढणारी नव्हती. तिनं झटकन टेबलावरचा ॲश ट्रे उचलला आणि तो कचऱ्याच्या डब्यात रिकामा केला. रंगीत काचेत गुलाबांच्या

फुलांचं प्रतिबिंब गडद रंगाचं वाटत होतं. तिनं एका हातानं आपल्या डोक्यावरचे केस मागं सारले आणि त्याच वेळी दुसऱ्या हातानं दाराला अडकवलेली साखळी काढली.

दारापुढच्या रिकाम्या जागेत उभ्या असलेल माणसानं मान झुकवून तिला नमस्कार केला. त्यानं पायात स्टीलचं टोपडं असलेले बूट घातले होते. त्याच्या अंगात एक निळी कामगार लोकांची पँट होती आणि त्यानं आपल्या अंगाभोवती एक ट्युब गुंडाळली होती. पॅनेलला अरुंद पाईप टेकवून ठेवले होते आणि मॅटच्या पुढं एक दुरुस्तीच्या हत्यारांची पेटी ठेवली होती.

''अर्रर, छी!'' असं म्हणून तो त्या पेटीशी वाकला.

''तुझी झोपमोड केली का मी? सॉरी हं! खरंच! काट्सकी कंपनीकडून मी आलोय. थर्मल सर्व्हिसिंग करायला. फटाफट होऊन जाईल.''

ती काहीही न बोलता काहीही न कळल्यासारखी त्याच्याकडं पाहत उभी राहिली.

काहीसा व्रण असलेला चेहरा, डोक्यावर कुठेही, कसेही उभे असलेले सोनेरी केस, पार कानावरपर्यंत केलेली दाढी, कानात वेगवेगळ्या प्रकारचे डूल, फ्लॅनेल शर्टच्या उभ्या कॉलरवर असलेल्या कातडी पट्ट्याला लावलेलं एक पेन्डन्ट, एक नाणंच!

जिन्यावरून आवाज येत होता, वजनदार पावलांचा. आन्द्रेआनं थर्मल सर्व्हिसिंग हा शब्द स्वत:शी उच्चारला, पण तिचा आवाज बाहेर फुटला नाही. तिनं जरा वेळ डोळे मिटून घेतले.

''अं! नको नको!'' असं म्हणून तिने नकारार्थी मान हलवली. मग ती खाकरली तेव्हा तिचं बोलणं स्पष्ट ऐकू आलं, ''आत्ता काही शक्य नाही. नंतर कधीतरी या तुम्ही.''

त्या मजल्यावर दुसऱ्या टोकाला काम करणारा एक फिटर म्हणाला, ''नको म्हणजे? असं कसं?''

त्यांनी दुसऱ्या शेजाऱ्याची बेल वाजवली. ''आम्हाला या इमारतीत कामाला बोलावून घेतलंय.''

पण त्या तरुण कामगारानं आन्द्रेआच्या चेहऱ्याकडे पाहून हातातली पत्र्याची पेटी खाली ठेवली. त्याचे निळे डोळे नेहमी दिसणाऱ्यातले नव्हते, जवळजवळ समुद्राच्या पाण्याच्या रंगाचे, त्यानं पँटच्या पट्ट्यात हात अडकवले, आणि जणु आपल्या सहकामगाराच्या बोलण्याबद्दल दिलगिरी व्यक्त करत तो म्हणाला, ''बरं, ठीक आहे, मी पुढच्या आठवड्यात येईन, काहीच अडचण नाही. पण मग तुला माझ्या जाण्या-येण्याचा खर्च पुन्हा द्यावा लागेल. तीस युरो पडतील. आत्ता सर्वांची मिळून एक रक्कम ठरलीये.''

तिनं होकारार्थी मान हलवली, दाराची साखळी धरून दार बंद करणार तोच तो भिवयात चांदीची तार घातलेला माणूस म्हणाला, ''जरा थांब, एकच सेकंद. मला पुढच्या कामाच्या आखणीसाठी आत्ताच दिवस ठरवला पाहिजे. आणि जरा एक विनंती आहे, असं म्हणून त्यानं मानेला खाजवलं. ''मला जरा, म्हणजे, मी पटकन् तुझ्या इथं टॉयलेटला जाऊन येऊ का? शू करायला? मला लगेच निघायचं आहे.''

तिनं खोलवर श्वास घेतला. दार पुन्हा मागे खेचलं. कसनुसं हसून त्यानं ट्युब दाराच्या मुठीवर टांगली. टॉयलेट कुठं आहे हेही न विचारता तो न्याहारीचं टेबल ओलांडून बाथरुममध्ये गेला. ती अंडाकृती टेबलाशी बसली. त्या टेबलावर अजूनही ते चुरगाळून टाकलेलं सिगारेटचं पाकीट पडलं होतं. तिनं दफनविधीसंबंधीची माहितीपत्रकं वर्तमानपत्राखाली सारली. मग छातीशी हाताशी घडी घालून फुलदाणीमधली लिलीची फुलं न्याहाळत बसली. मुळातली शुभ्र पांढरी फुलं आता तो रंग उडून पातळसर पारदर्शी झाली होती, वितळलेल्या मेणासारखी दिसत होती.

टॉयलेटमध्ये पाणी सोडल्याचा आवाज झाला तशी ती ताठ होऊन बसली. तिला एकदम आठवलं की बाथरुममध्ये बरबटलेला टॉवेल तसाच टाकलाय, आणि बाथटबशेजारी लघवीच्या बाटल्यांचं खोकं तसंच ठेवलंय. कसलातरी शिट्टी वाजल्यासारखा आवाज आला. मग खिडकीखालच्या हीटरमध्ये गटर्र गटर्र आवाज यायला लागला. अखेरीस तो इसम न्याहारीच्या टेबलाशी आला आणि त्यानं गाल फुगवून सुटका झाल्यासारखा निश्वास सोडला.

''बाप रे! थँक्यू हं बाई! नाहीतर मला पार...''

त्यानं विजारीला हात पुसून कोरडे केले. ''काय बंडल हवा पडलीये सकाळपासून. मी तर पुरता खल्लास झालो होतो. पलंगातच पडून राहावंसं वाटत होतं. म्हटलं, चल रे बाबा, दोन गोळ्या खा, लीटरभर कॉफी घशात ओत, मग सगळं ठीक होईल. नाहीतर काय! हृदयाचं खोकडं तडकलंय आणि ब्लॅडर टब भरून फुटायला आलंय.''

त्यानं आपल्या त्या आऊटफिट पोषाखातल्या खिसे चाचपून त्यातून एक गाऊलोईजचे पाकीट बाहेर काढले. त्याच्या हातावर सर्वत्र खरचटलेलं होतं आणि व्रण होते. अंगठ्याच्या खाली गोंदलेले ठिपके होते. सिगारेट ओठांमध्ये खुपसताना त्यानं त्या खोलीचं निरीक्षण केलं.

''झ्याक आहे तुझं घर. जवळ उद्यान आहे. हा श्योनबर्गचा भाग आहे का फ्रीडेनाऊचा भाग इथपर्यंत आलाय?''

''विल्मर्सडोर्फ.'' असं म्हणून तिनं हनुवटी खाजवली. ''कसं कळायचं ते? गुड ओल्ड क्रॉयत्सबेर्गसारखा हा भाग बिलकुल बकाल नाही. मी तिथंच राहतो ना! आणि कुत्र्यांची घाणही फारशी नाही. किती खोल्या आहेत तुमच्या फ्लॅटला? दोन का तीन बेडरुमचा आहे हा फ्लॅट?'

आन्द्रेआ नजरेसमोर टेबलाकडे पाहत राहिली. त्या टेबलाच्या मऊ लाकडात तिच्या नवऱ्यानं आपल्या अंगठ्याच्या नखांनी काही भौमितिक आकृत्या कोरल्या होत्या- त्रिकोण, चौरस नि सरळ रेषा. किती आठवडे उलटले त्याला? दोन. असं म्हणून तिनं डोकं वर केलं. तिनं कानामागच्या केसांची बट कुरवाळली आणि सिगारेटकडे पाहून खुणावलं.

''या सिगरेटींना फिल्टर आहे का?''

त्या इसमाच्या डोळ्यांवरचा मस एकदम हलला.

''म्हणजे असं आहे तर!'' असं म्हणून त्यानं तिच्या हाताता सिगारेटचं पाकीट दिलं.

''एकतर आपण सिगरेट ओढू, नाहीतर  या फुसक्या सिगारेट्स रिकाम्या फुंकू, बरोबर आहे ना?''

सेलोफेनच्या मागं एक चिठ्ठी होती. त्या चिठ्ठीवर गिटारच्या मेजर कीच्या संगीताच्या काही नोट्स खरडल्या होत्या. त्यानं आपल्या लायटरचा खटका दाबला.

''एक सांगतो बाई, म्हणजे मी तुला आग्रह करून दुरुस्ती करायला भाग पाडतो असं समजू नको. खरंच! पण मी तुझी पाणी गरम करायची यंत्रणा पाहिली. अगदी साधी सरळ आहे. फार काही दुरुस्तीची गरजच नाही. इंधन गाळायच्या चाळणीचं आवरण नवीन टाकायचं, त्यातले कार्बनचे कण ब्रशनं काढून टाकायचे, सगळीकडे समान दाब राहील असं पाहिलं की झालं! दहा मिनिटात होऊन जाईल. करून घेऊ का आत्ता लगेच? मग हिवाळा सुरू झाला तरी पंचाईत नाही.''

तिनं आपल्या नाकातून धूर सोडला. किती वाजलेत ते त्याच्या घड्याळात पाहावं म्हणून डोकं किंचितसं खाली झुकवलं, पण त्या काचेतून काहीच दिसत नव्हतं.

''आणि मघाशी म्हटलं तसं तुला माझ्या जाण्या-येण्याचे पैसेही पडणार नाहीत. आजकाल सगळ्याचे ठरलेले दर असतात, त्याच पैशात तुला एखाद्या संध्याकाळी बाहेर जाऊन छान खाता पिता येईल.'' अखेरीस तिनं होकारार्थी मान डोलावली तेव्हा तो हसला. त्याचे मोठे, अधूनमधून काळसर झालेले दात दिसले. मग त्यानं भिंतीवरचा वीजप्रवाह नियंत्रक शून्यावर केला. बाहेर ठेवलेली ट्युब आणि कामाची हत्यारं आणली आणि कोपरानं दार ढकलून तो आत आला. हे करताना तो तोंडानं शीळ घालत होता. आन्द्रेआ उठली. त्या सिगारेटच्या उग्र तंबाखूमुळे तिला जरा चक्करल्यासारखं झालं. खुर्चीची पाठ घट्ट पकडून तिच्या आधारानं ती उभी राहिली.

''चहा टाकू?''

''व्वा! '' असं उद्गारून तो बाथरुममध्ये गेला.

''तू कॉफी विचारली असतीस तर मी म्हटलं असतं, धन्यवाद, माझी घेऊन झाली आहे. पण चहा चालेल. बाकी माझं नाव माक्स!''

तिनं चहाचं आधण ठेवलं. त्यानं तापमान वाढवण्याच्या यंत्राचं आवरण काढलं आणि आपली दुरुस्तीच्या हत्यारांची पेटी उघडली.

''बरं का, काही वेळेला मला वाटतं की आपण क्रॉइत्सबेर्गचा भाग सोडून दुसरीकडं राहायला जावं. आमच्या इथं बऱ्याच वेळा जिन्यात अंमली पदार्थाच्या आहारी गेलेले इसम पेंगत पडलेले असतात. पण दुसरीकडे राहायला जावं तर बाकी

सगळ्या जर्मनांमध्ये तुम्ही एकटे पडता, आणि तेही महाकठीण होतं. इथले लोक कसे आहेत वागायला? म्हणजे तुझे शेजारी पाजारी?''

तो बाथटबच्या काठावर उभा राहिला, बाहेर जाणाऱ्या पाईपवरची धूळ झटकली.

तिनं चहाचं नवं पुडकं उघडलं.

''काय सांगू? मला नाही माहीत. आमची फक्त रखवालदाराशी ओळख आहे. तो अतिशय चांगला माणूस आहे.''

''चला, निदान एवढं तरी बरं आहे,'' असं म्हणून त्यानं एका तारेच्या ब्रशनं ती चकती साफ केली.

''आमचा रखवालदार हलकट आहे. पूर्वेकडच्या देशातून आलेला. कडवा भांडवलशाहीवादी! संशयानं कचरासुद्धा हुंगून पाही. भाडेकरूंची माहिती सरकारला पुरवत असला तर त्याचं मला काही नवल वाटणार नाही.'' त्यानं गंजलेले कण फुंकून टाकले.

''तू कधी पूर्व भागात गेलीयेस?''

''नाही.'' असं म्हणून तिनं सिगारेटचा एक खोलवर झुरका घेतला.

''आता जाणं बंद केलंय.''

''जर आवश्यक नसेल तर मीसुद्धा नाही जात. पण कधीकधी आम्हाला जावं लागतं. पण तिकडे सगळे नुसते विव्हळत असतात. क्षुद्र, कद्रू माणसं. तुमच्या डोक्यावर बसणार आणि इंधन गाळायच्या चाळणीच्या आवरणाचा प्रत्येक सेंट वसूल करणार! अन् सतत तक्रारीचा सूर! कसं आमचं वाईट चाललंय! पण दोन दोन किंवा जास्तच मोटारी नाहीत असं एकही कुटुंब शोधूनही सापडणार नाही. बर्लिनमध्ये हवंय कशाला असलं काही? आमचं फारच चांगलं चाल्लंय नाही का? त्यांची कुरबुर चालूच! म्हणजे मला त्यांचं समजू शकतं, निदान जे गरीब बिचारे आहेत त्यांचं तरी नक्कीच, पण तरी मला ती दोस्ती करावी अशी माणसं वाटत नाहीत. म्हणजे तरुण दिसले की मला वाटतं हे उद्दाम भांडवलशाही असणार! म्हातारे दिसले की वाटतं हे सरकारला सामील गुप्तहेर असणार! म्हणजे मला कळतं असा विचार करणं हा मूर्खपणा आहे, पण ते तसलेच आहेत.''

त्यानं पुसायच्या लोकरीच्या फडक्यातून थोडी लोकर बाहेर काढली आणि ती एका पान्याभोवती गुंडाळली.

''परवाच मी फ्रीडरीशहाईनमधल्या एका क्लबमध्ये गेलो होतो, तो जवळजवळ क्रॉइत्सबेर्गचाच भाग आहे. माझ्याशेजारी एक माझ्या वयाची म्हणजे पस्तिशीची बाई बसली होती. अतिशय चांगली. पूर्वेकडची, सोनेरी केसवाली, नितळ चेहऱ्याची, पण दिलखेच नजर होती. म्हटलं, ''माक्सबाबा, उठा, जर्मनीच्या एकीकरणासाठी झटा.'' आणि छान जमून गेलं. आमचं करून झाल्यावर मी एक फिल्म लावली. मग आम्ही उंची तंबाखू ओढली, तेव्हा ती सरळ म्हणाली, बर्लिनची भिंत पाडून किती वर्षं झाली?''

''सोळा वर्ष झाली,'' असं मी सांगितलं तेव्हा ती म्हणाली, ''छे! मी कधी एका पश्चिमेकडच्या जर्मनाबरोबर एकत्र पलंगात शिरेन असं मला कधी वाटलं नव्हतं. हे असलं तुझ्या डोक्यात आलं तरी असतं का?''

-------

''बर्लिनच्या अगदी मध्यावर? बर्लिनसारख्या शहरात असे जुन्या जमान्यातले विचार?'' तिनं किटलीवर ठेवलेलं गाळणं उचललं आणि कपाटातून दोन मोठे कप काढले.

''चहा झालाय, माझ्याकडे त्यात पिळायला लिंबू नाहीये. दूध चालेल का तुला?''

तो म्हणाला, ''फक्त साखर घाल.''

------

''तुला सिगारेट हवी असेल तर खुशाल घे.''

असं म्हणून त्यानं फ्रेंच सिगारेट्सकडे बोट दाखवलं.

त्याच्या हनुवटीवर एक मस होता, त्याचे हात थरथरत होते. वर्तमानपत्रावर साखरेचे काही कण पडले होते. हातात कप घेऊन तो खिडकीशी गेला आणि त्यानं बाहेर डोकावून पाहिलं. ढग छपरांवर झेपावत होते. एक मॅगपाय पक्षी पुढून उडून गेला, लगेचच आणखी एका उडाला. त्यानं चमच्यानं खिडकीच्या काचेवर टकटक केलं.

''नवी बसवून घेतलेली दिसतीये. दुहेरी आहे. अशीच मलाही हवी आहे. माझ्या खिडकीच्या चौकटीवरच्या सिमेंटला तडे जाऊन ते निखळतंय. म्हणजे तसा माझ्याकडचा रुम हीटर अतिशय उत्तम दर्जाचा आहे. मी स्वत:च बनवलाय. पण घराला शेवाळलेलं हिरवं छत असेल आणि बाहेरच्या भिंतीवर गोल खिडकी असेल तर त्याचा काहीच उपयोग होत नाही. घरात सारखी थंडी वाजते म्हणूनच मला सारखं सारखं शूला जावं लागतं ना! इमारतीच्या भिंतीच्या चिऱ्यातून असं काही गार गार वारं घरात शिरतं की बस्स! त्या वाऱ्यामुळं तुमच्या बुडाला पंखा लावून ठेवलाय असं वाटतं.

त्यानं तिला खूण केली, चहाचा आणखी एक घोट घेतला आणि पुन्हा न्हाणीघरात गेला.

''धुण्याच्या यंत्रापासचं ते दाढीचं सामान उचललं तर चालेल ना? कारण मला मागच्या पाईपशी काम आहे.''

''अर्थातच!'' असं म्हणून आन्द्रेआनं पाकीटावर थाप मारून त्यातली एक सिगारेट बाहेर काढली आणि आपल्या आधीच्या सिगारेटला लावून ती पेटवली. मग तिनं झोपायच्या खोलीचं दार फक्त तिला आत शिरता येईल एवढंच उघडलं. आत जाऊन ती पियानोच्या स्टुलावर जाऊन बसली. हवेत लघवीचा हलकासा दर्प होता. तिनं आपले हात मांडीवर ठेवले आणि सोफ्याकडे पाहिलं. गेरुल्फचं हगणं-मुतणं साफ केलेली फडकी ठेवलेलं खोकं त्या सोफ्याखाली ठेवलं होतं. गेरूल्फचं डोकं उशीमध्ये खोलवर रुतल्यासारखं दिसत होतं, त्याच्या दाढीचे खुंट उभे राहिलेत असं वाटत होतं. डोळ्यांच्या खोबणी अधिक स्पष्ट दिसत होत्या. नाक धारदार भासत होतं, मात्र त्याच्या कपाळावरच्या आठ्या जिथं विरल्या होत्या तिथं हलकंसं तेज जाणवत होतं. संगीतवेड्या मित्रांसमवेत अघोरी जागरण करून घालवलेल्या रात्रीही ते तेज त्याला लहान मुलाचा निर्मळपणा बहाल करायचं. त्याच्या हातांवरून एक माशी फिरत होती.

धुळीमुळं व्हेनेशिअन ब्लाईंडच्या पट्ट्यांवरची चमक नाहीशी झाली होती. तिच्या सिगारेटचा धूर सूर्यकिरणांतून तरंगत होता. ती कुजबुजली, ''प्लंबर आलाय. उष्णतावर्धकाची देखभाल करण्यासाठी. फार वेळ लागणार नाही. तू कुणाला सांगून

ठेवलं नव्हतंस ना? का ही सगळी व्यवस्था आपली सोसायटी करत असते? मला काहीच आठवत नाहीये...''

ती खोलीतल्या शांततेचा कानोसा घेत राहिली, अन् क्षणभर त्याची छाती हलल्याचा, त्यानं श्वास घेतल्याचा तिला भास झाला. पण बाहेर बर्चच्या झाडाच्या फांद्या हलत होत्या, त्यांच्या सावल्या छपरावरून गेल्या होत्या. स्टुलावरून त्याच्याकडे तोंड करून ती पुढे बोलू लागली, ''चांगला माणूस आहे. त्याचं नाव माक्स आहे. मला वाटतं, तोही काहीतरी वाद्य वाजवत असावा.''

ती एका पिवळ्या फडक्याकडे टक लावून बघत राहिली. त्यावर बटणांचे ठसे उठले होते.

त्या उद्यानावरून हंसपक्षी उडत गेले. सकाळी नेहमी जातात तसेच. त्यांच्या पंखांचा आवाज धुराड्यामधून घुमत होता. तिला आपल्या बोटांच्या पेरांवरून थंडगार हवा रेशमी कपड्यासारखी सळसळत जाताना जाणवत होती. वास्तविक तिचा हात अजून मांडीवरच होता. दरवाजा ठोठावण्याचा आवाज झाला तेव्हा तिला डुलकी लागली होती, ती दचकून जागी झाली. हातातल्या सिगारेटची राख खाली जमिनीवर पडली. ती म्हणाली, ''आले, आले.''

पुन्हा तिनं फक्त स्वत:चं अंग बाहेर येईल इतपतच दार उघडलं आणि बाहेर आल्या आल्या लगेच मागच्या मागे लावून घेतलं. माक्स उष्णतावर्धकाच्या बाजूला उभा होता. हवा आत बाहेर येण्याच्या झडपेशी एक किल्ली तो फिरवत होता. हवा बाहेर फेकल्याचा आवाज झाला, आणि हवा आत यायची बंद झाली. डोकं हलवून त्यानं टेबलाच्या दिशेनं खुणावलं.

''झालं. पावतीवर काम झाल्याची सही करून देतेस का? मी जरा पटकन् हवेचा दाब किती आहे ते पाहतो, आणि मग मी कटतो.''

एका फळांच्या काचेच्या रिकाम्या भांड्यात काही पेनं, पेन्सिली आणि स्टेशनरी सामान ठेवलं होतं. एका नळातून काळा द्रव बाहेर पडू लागला तशी त्यानं तोंड वाकडं केलं.

''च्यायला, वास मारायला लागला, नाही का? घाण पाणी. एका स्पंजाने त्याने ते कट्ट्यावरून पुसून घेतलं. मी जरा पटकन् शेजारच्या खोलीत जातो.

त्यानं दाराची मूठ पकडली. तिनं डोकं वर केलं, ''कसलं पाणी?''

दार विजेच्या की-बोर्डला आपटलं. बटनांवरून रेशमी कापड खाली निसटलं. माक्सनं तोंड उघड्या तोंडानं गळ्यावर हात ठेवला आणि तिथं टांगलेलं एक नाणं चाचपलं, ते आशियातलं असणार.

''अरे बापरे, '' असं उद्गारून तो एक पाऊल मागं सरकला. ''आत कुणीतरी झोपलंय आणि मी इथं येड्यासारखा ठाकठोक करत बसलोय. खरंच मी असं करायला नको होतं. पण मला कळणार कसं? तुझा दोस्त का?''

तिनं नकारार्थी मान हलवली. ''माझा नवरा. पण ठीक आहे. तो झोपला नाहीये.''

''असं?'' व्हॅनिशियन ब्लाईंड्समधून आत येताना कापल्यासारखा उजेड आत आला आणि त्यामुळे गेरूल्फच्या निस्तेज चेहऱ्याची कड पुसट झाली. फक्त कपाळच नाही, तर गेरूल्फच्या पापण्याही निर्जीव दिसत होत्या.

''तो आजारी आहे का?''

ती म्हणाली, ''नाही.'' आणि परत तिनं सिगरेटचा एक झुरका घेतला. त्या पावतीचा कागद अगदी पातळ होता आणि ती सही करत असताना तो फाटला. मग तिनं त्याच्या हातात कोंबला आणि काचेच्या भांड्यात पेन टाकून दिलं.

''तू सरळ आत जा. त्याची काही झोपमोड होणार नाही.''

तरी माक्स तिथंच जागेवर उभा राहिला. अचानक त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या आणि नजर बधीर झाली. तो काही बोलत नसूनही क्षणभर त्याच्या ओठांची हालचाल झाली. त्याच्या हनुवटीवरचे सोनेरी खुंट चमकले.

''म्हणजे? असं कसं? तुला म्हणायचंय की...'' आपले दोन्ही हात त्यांने केसांवरून फिरवले आणि डोक्यामागे धरून तो तिच्याकडे एकटक पाहत राहिला. ''च्यायला म्हणजे खपलाय की काय?'' तिनं चहाचा एक घोट घेतला आणि जवळपास कातर आणि तरी कठोर आवाजात ती म्हणाली, ''हो रे बाबा. असं घडतं.'' तिला आपल्या आवाजात स्थितप्रज्ञता हवी होती, आपलं बोलणं अगदी

थोडंफार उत्साहीसुद्धा वाटायला हवं होतं, त्याला मोठा धक्का बसू नये म्हणून तिनं किंचितसं हसायचाही प्रयत्न केला.

''माणसं मरत असतात.''

एक अश्रू ओघळून तिच्या तोंडापर्यंत आला, दार आणखी जास्त उघडून ती म्हणाली, ''तिकडे त्या कोचापाठीमागे उष्णतावर्धक बसवला आहे बघ.''

पण तो दाराचा उंबरा ओलांडून आत गेला नाही. तो मागे वळला आणि त्यानं ती छोटी किल्ली टेबलावर ठेवली. ती किल्ली पाहून तिला लहान मुलांच्या बाहुल्यांची आणि खेळण्यातल्या प्राण्यांची आठवण झाली. मग तो न्हाणीघरात गेला. तिथल्या तापमानवर्धकाजवळ त्यानं आवरण ठेवलं. पुसायच्या लोकरीच्या फडक्यानं फरशी पुसली आणि पेटीत कामाची हत्यारं ठेवून दिली.

''मला आधी का सांगितलं नाहीस तू? असं काही झालं असेल हे कोणाच्या डोक्यात येईल? मी लगेच निघून गेलो नसतो का? ते आत हवा येणं बंद करायचं तुला स्वत:लाही सहज जमेल. थेंब थेंब गळायचे बंद होईपर्यंत तो नळ डावीकडे फिरवायचा की झालं. जमेल तुला. बाकी तुला माझी काही मदत हवी आहे का? म्हणजे काही करायची गरज आहे का? कुणाला फोन वगैरे?''

तिने थोडा वेळ डोळे मिटले. म्हणाली, ''धन्यवाद. पण माझी बहीण इकडं यायला निघालीच आहे.''

''असं का? मग काय तर...'' तो निर्धास्त झाला आणि त्यानं पुन्हा एकवार आत नजर टाकली. मृताच्या एका बाजूनं दिसणाऱ्या चेहऱ्याकडे एक स्थिर कटाक्ष... अगदी निस्तब्ध होऊन, त्याचा श्वासही चालू नसल्यासारखा बघत होता, मात्र त्याची धडधड होत होती, गळ्यावरचे मजबूत हाड आणि कातडी दोरी हलत होती.

''आजारी होता का? त्या न्हाणीघरात ती पिशवी पाहिली तेव्हाच मला वाटलं... किती वेळ झाला जाऊन?''

''मला नक्की माहीत नाही, आज पहाटे कधीतरी...''

त्यानं आपली पेटी घेतली, ट्यूब खांद्यावर टाकली आणि ती काम झाल्याची पावती खिशात कोंबली.

''हं, काय तरी! बेकार! काय बोलायचं आता! असलं कधीच अनुभवायला आलं नाही माझ्या!''

मग त्यानं तो नियंत्रक खोलीच्या तापमानदर्शकाजवळ भिंतीवर ठेवला.

''मी या सिगारेटी इथं ठेवतो तुझ्यासाठी, चालेल ना?''

तिनं स्मित केलं, त्याच्याबरोबर दारापर्यंत आली. दाराबाहेरच्या पायपुसण्यावरून तो पुन्हा मागं वळला. जुन्या पॅनेलमुळे मागे अंधार झाला होता, पण कपड्यांच्या कपाटाच्या आरशात जिन्यातल्या खिडकीचा थोडा उजेड दिसत होता. त्या खिडकीच्या रंगीत काचेची कड, थोडासा सूर्यप्रकाश आणि एक शेवटची हिरवी फांदी.

''माझा एक दोस्त होता, त्यानं स्वत:चा गळा आवळून आत्महत्या केली. आम्ही दोघांनी एकत्रच हा प्लंबिंगचा कोर्स केला होता, तुरुंगात असताना. आणि आम्ही सुटून बाहेर आलो, आम्हाला काम मिळालं नाही तोच त्या ज्युडस्टर्नच्या कंत्राटदाराकडं आपला पगार देऊ लागला, असं बरंच काही. मग मालिकाच सुरू झाली. मग नोकरी सुटली. सगळं हिरावलं गेलं. त्याच्याकडं काही उरलं नाही. त्यानं माझं गिटारही गहाण ठेवलं. ते गिब्सन कंपनीचं अस्सल होतं. मला इतका वैताग आला. मला इतका वैताग आला की बस्स! पण मग जेव्हा मी त्याला फुलांनी मढलेलं पाहिलं, त्याचं मढं चक्रमसारखं सजवलेलं. म्हणजे मला म्हणायचंय की अचानक मला जाणवलं की आपण वर्षभर ज्याच्याबरोबर होतो तो हा आपला मित्र... आयला, मला एकूण काय म्हणायचंय कोणास ठाऊक! चला, सगळं व्यवस्थित होऊ दे, बरं का!''

त्यानं पँटला हात पुसले. तिचा हात हातात घेऊन निरोप घेतला. आन्द्रेआनं मान डोलावली, त्याला तिचे डोळे किती मोठे आहेत, तिच्या डोळ्यांचे स्नायूही कसे ताठर झालेत ते दिसलं. अचानक त्या आरशात सगळं फिकट झालं. धुरकट पांढरं, कोट, छत्री वगैरे ठेवायच्या कपाटापासल्या बुटांवर तिचा पाय पडला, तोल जाऊन ती भिंतीवर धडकली, कोटाचा आधार घेऊन उभं राहायचा तिनं प्रयत्न केला. पण तो हँगरवरून घसरला, तशी माक्सनं तिला आधार देऊन सावरता सावरता तिचा उंबऱ्यावरच्या पेटीला धक्का लागून ती पिचली.

''अगं अगं, काय चाललंय काय बाई तुझं?''

तिला आपल्या बोटांच्या पेरात त्रिकोण, अंडाकृती विविध रंग जाणवले. तिच्या तोंडाला कोरड पडली. तिची गात्रं थरथरू लागली आणि खरंतर कितीशी असणार, पण तरी परत तिला शांततेपलीकडची ती शांतता ऐकू आली, फक्त एक श्वासभर, दुसऱ्या कोणत्याही आवाजापेक्षा ही शांतता त्या खोलीत स्पष्ट कळत होती. तिला घाम फुटला, वरच्या ओठांवरून तिनं तो जिभेनं चाटून टाकला. आपण टेबलाशी येऊन आपल्या खुर्चीवर कसे बसलो ते तिला कळलंही नाही. बसल्या बसल्या तिचा तोल जात होता.

''जरा थांब हं!''

तिला माक्सचा आवाज ऐकू आला. त्याच्या फ्लॅनेलच्या शर्टला धुळीचा वास येत होता आणि तिला एका हातानं आधार देताना दुसऱ्या हातानं त्यानं नळ उघडला.

''आता तुला बरं वाटेल. त्यानं भांडी पुसायचं एक फडकं ओलं केलं, पिळलं आणि तिच्या मानेवर ठेवलं.

''तू फारच थकून गेली आहेस, हो ना? तुम्ही पार खलास झाला आहात बाई. याआधी तुम्ही कधी काही खाल्लं, प्यालं काही आठवतंय का?''

तिनं खांदे उडवून आठवत नसल्याची खूण केली. दारासमोरच्या स्टँडवरचा तो हँगर अजूनही हलत होता. फटीतून येणाऱ्या बाहेरच्या वाऱ्यामुळं नीट न लावलेलं दारही किंचित हलत होतं. इमारतीतून बाहेर जाताना कोणी शीळ घालत जातं तशी शीळ ऐकू आली. त्यानं पावाचा डबा आणि खाद्यपदार्थांचं कपाट उघडलं. बर्फाचा ट्रे बाहेर काढला आणि कप्प्यात काय काय आहे ते तो पाहू लागला.

''बरंच काय काय आहे की. हे बघ, तुझ्या पोटात काहीतरी जाणं आवश्यक आहे. ऐकतीयेस ना? तुम्हाला आत्ता विचित्र वाटेल, पण मला माहिती आहे, त्यामुळंच तू उभी राहू शकशील. तुला काहीतरी खाल्लं पाहिजेच. तुझ्या अंगात थोडी ताकद आली पाहिजे.''

त्यानं ओट्यावर काही छोटे डबे आणि पुडकी काढून ठेवली. भाजीच्या कप्प्यातून त्यानं काही टोमॅटो काढून घेतले, दोन नासलेले कचऱ्याच्या डब्यात टाकून दिले, कांद्याची जाळीची पिशवी उघडली.

''मी तुला काहीतरी करून घालतो. माझी आत्ता जेवायची सुट्टी होतेच आहे. जमेल जमेल, काही काळजी करू नकोस.''

असं म्हणून त्यानं भांड्यांचा कप्पा उघडला.

''तुला काय आवडतं? भात? बटाट्याचं काही? नूडल्स?''

त्यानं गॅस पेटवला, आणि तो तिच्याकडं वळला. ''तुला नूडल्स हव्यात?''


काहीच न बोलता तिनं फक्त मान डोलावली आणि आपल्या बोटांनी टेबलावर हलकेच कुरवाळलं, टेबलटॉप गुळगुळीत होता. तो परत एकदा घराच्या दाराशी गेला, दार बंद करून त्यानं तो खाली पडलेला कोट हँगरवर टांगला.

''मी स्पगेटीच बनवतो, चालेल ना? मला स्पगेटी चांगल्या करता येतात.''

***

# छोटी डायरी

मूळ फ्रेंच लेखिका - आन-गाएल बाल्प
भाषांतर - प्रसाद ग. बर्वे



**परिचय: आन–गाएल बाल्प**

**(१९७५)**

**आन–गाएल बाल्पचा जन्म १९७५ सालातील आहे. लहानपणापासून त्यांना वाचनाची व लेखनाची आवड होती. त्यांनी बाल व कुमारवयातील वाचकांसाठी सातत्याने लेखन केले आहे. तत्त्वज्ञान, तिबेटी भाषा, मल्टिमिडीया या विषयांचे अध्ययन करून त्यांनी त्यात प्रावीण्य मिळवले. सुरुवातीला विद्यापीठात काही काळ त्या अध्यापन करत होत्या, नंतर त्या शाळेत शिकवत होत्या, त्यानंतर मात्र त्यांनी बालकवर्गात शिकवण्यास पसंती दिली आहे.**

***

**श**प्पथ घेऊन सांगते, मी ती तिथेच ठेवली होती... त्या कागदाखाली बहुतेक... पण जर का... नाही, तरीही... आता असं बघूया... काल परत आल्यावर, मी आलेली पत्रं पाहिली... आणि नंतर ... नंतर मी कॉफी केली... स्वयंपाकघरात?... नाही, ती तिथे नाहीये... अरे बापरे... चार तर कधीचेच वाजलेत... तिथे मी कधीच पोहोचू शकणार नाही... पुन्हा आठवूया... पत्रं, कॉफी... नंतर मी लिखाण केलं. फोन वाजला... फोन वाजला, खरंच की, मला त्याला पुन्हा केला पाहिजे.. आणि खरं तर मी ड्रॉवरमध्ये पाहिलं का? नाही, ती तिथे नाहीये... फोननंतर... पोस्ट, मी पोस्टात गेले... अर्ध्या तासाची रांग... परतले मी... टेबलावर मी माझ्या किल्ल्या ठेवल्या... त्या अजूनही तिथेच आहेत... ड्रॉवरमध्ये?... नाही, नाही मी आत्ताच तर तिथे बघितलं... बरं... टेबलावर किल्ल्या... मी पत्रं तर आधीच बघितली आहेत... मला त्यातल्या एक-दोन पत्रांना उत्तरं लिहायला हवीत... नाही, हे पोस्ट ऑफिसच्या आधी होतं... हे तर तर्कसुसंगत वाटतंय... तर, टेबलावर किल्ल्या...दुसऱ्यांदा फोन करण्याचा प्रयत्न केला? नाही, मला नाही वाटत... पण तरीसुद्धा... नाही, मीच फोन केला होता... फोनच्या बाजूला...

अं..अं..नाही.. चार वाजून दहा मिनिटं... नंतर मी रेडिओवरचा कार्यक्रम ऐकला... हो की, अतिवास्तववादावरचा तो कार्यक्रम... वाईट नव्हता अगदीच... मी बहुतेक ती सीडींच्याजवळ ठेवली असावी... मला तर तिथे काहीच दिसत नाही... ती काय अदृश्य थोडीच झाली असेल? जेवढे जास्त आपण शोधतो, तेवढी सापडण्याची शक्यता कमी असते... रेडिओ आणि... मी त्या कार्यक्रमानंतर काय केलं... मला खूप उकडत असल्यामुळे मी जरा आंघोळ केली... ती मी काही माझ्याबरोबर बाथरुममध्ये घेऊन गेले नव्हते... नाही. ती तिथे नाहीये... आणि ड्रॉवरमध्ये?... ते तर आधीच झालंय... पण खरंतर तिथेच मी नेहमी ती ठेवते... सव्वाचार वाजलेत... मी त्यांना कळवायला फोन करते आता... आणि हो... नाही टेलिफोनशेजारी तर मी आधीच बघून खात्री करून घेतली आहे, तर मी आंघोळ केली... कपडे घातले... पुन्हा लिहायला लागले मी... ही कादंबरी. ही तर माझ्याकडून कधीच संपणार नाही.. मी लिहिलं असेल... दोन तास बहुतेक... नाही, एकच तास वाटतं... आणि कॉम्प्युटरवर?... असं वाटतंय... नाही, नाही तसे नाही... तर, मी फोन करते... फोन एंगेज लागतोय. मी कुठे होते बरं... ओहो... कॉम्प्युटर... मी अंदाजे एक तास कॉम्प्युटरवर टाईप केलं... नंतर बाजारात गेले... अरेच्या, मी साखर आणायची विसरले...मी ते लिहून ठेवते... साखर आणायला हवी... ठीक आहे, बाजार... परत येताना शेजारी राहणाऱ्या माणसाची भेट झाली... जाऊ दे, ते काही महत्त्वाचं नाही... मी परत आले, मी टेबलावर किल्ल्या ठेवल्या... चार वाजून तेवीस मिनीटं... फोन एंगेज लागतोय... आणि मग टेलिफोन बिलाबद्दल ते तक्रार करतात... तर परतल्यावर टेबलावर किल्ल्या... मी ड्रॉवरमधे आधीच बघितलं आहे... बहुतेक चेकबुकाखाली असेल... इथेही नाही... तर आता पद्धतशीरपणे विचार करायला हवा... बाजारातून परतल्यावर मी टेबलावर किल्ल्या ठेवल्या... मग भाजी धुतली... साडेचार... फोन एंगेज लागतोय... मी कळवण्याचा प्रयत्न केला नाही तर असं कोणीही म्हणू शकणार नाही... तर, भाजी... रस्सा... आणि तेव्हाच बेल वाजली... स्वयंपाकघरातून बाहेर पडे पडेपर्यंत तिथे कोणीच नव्हतं... लोक तरी काय असतात... मी ती त्या छोट्याशा खणांच्या टेबलावर तर ठेवली नसेल?... मला नाही वाटत... मी स्वयंपाकघरात पुन्हा गेले... नूडल्स उकळायला

पाणी... पुन्हा कोणीतरी बेल वाजवली... चार वाजून छत्तीस मिनीटं... पुन्हा एंगेज... त्यांनी रिसिव्हर बहुतेक नीट ठेवला नसेल... मी नूडल्ससाठी पाणी, इथपर्यंत होते... बेलचं वाजणं... मी पुन्हा बघितलं, कोणीच नव्हतं आत्ताही... मला वाटलं की पोरं असतील... लहान असताना मी असंच करायची... असो... पाणी उकळलं, मी त्यात नूडल्स टाकल्या... पाच मिनिटानंतर पुन्हा बेल... मी ड्रॉवरमध्ये बघितलं का?... हो ते झालं... दारावरची बेल... यावेळी कोणीतरी होतं... मी पहिल्यांदा दारावरच्या काचेच्या भोकातून एक पाठमोरा माणूस बघितला... मी विचारलं दार बंद ठेवूनच, ''कोण आहे...'' मला ऐकू आलं, ''तुमचा शेजारी''... अजूनही फोन एंगेजच आहे? नाही-नाही, वाजतोय... ते कधी उचलणार फोन?... आणि नंतर ते म्हणणार की मी न कळवून कमालच करते म्हणून... पुढे... मी शेजाऱ्याला आत बोलावले... काय पाहिजे तुम्हाला? मी काय करू तुमच्यासाठी?... मी माझ्या बायकोला मारलं, त्याने उत्तर दिले... अरेच्च्या, माझ्या पँटच्या खिशात... नाही, ती तिथंपण नाही... तर, माझा शेजारी मला म्हणाला की त्यानं त्याच्या बायकोला मारहाण केली... आधी मी त्याला सांगितलं की जे झालं ते फार वाईट झालं... ते त्याला माहीत आहे असं त्यानं उत्तर दिलं आणि तो रडायला लागला... आत्ता मी नक्की काय करावं हे मला कळेना... एकाच वेळी त्याचा मला राग-तिरस्कार वाटला आणि त्याची दयाही आली... सुरुवातीपासून सांगा, मी त्याला म्हणाले... पावणे पाच... मी पुन्हा प्रयत्न करते, ही मात्र शेवटची वेळ... पुन्हा कोणीच नाही... काही झालं तरी मला ती सापडल्याशिवाय मी तिथं जाणं यात काहीच अर्थ नाही... तर, माझ्याकडे माझा शेजारी अजूनही होता... तो एका आरामखुर्चीवर बसला... मी त्याला विचारले की त्याची बायको गंभीररित्या जखमी तर झाली नाही ना?... तिला फार मारबिर लागला नाही ना? त्याने मला उत्तर दिले... हे मात्र फारच झालं, मी त्याला निघून जायला सांगितले... त्याने उठण्यासाठी म्हणून आरामखुर्चीचे हात पकडले... थांबा, मला तुम्हाला समजावून सांगू द्या... त्याचा चेहरा भिजलेला होता... थांबा, तो मला म्हणाला... मी त्याला उत्तर दिले की त्याच्या भानगडी ऐकून घेण्याची माझी अजिबात इच्छा नाहीये... पाचला दोन कमी... तर! आता तर तिथे जायची अजिबातच गरज नाहीये... दहा मिनिटांसाठी...

कुठे होते मी? हो... मी शेजाऱ्याला म्हणाले की त्याच्या भानगडी मला ऐकायच्या नाहीत... तो काही ऐकत नव्हता... ती इतकी सुंदर आहे, हे मला सहन होत नाही... इतक्या सुंदर बाईवर मी प्रेम करू शकत नाही... असं असेल तर एखादी घाणेरडी कुरूप शोधा की, मी म्हणाले... खूप उशीर झालाय, तो मला म्हणाला, पण आता ती मला आवडते, आणि जेव्हा मला एखादी बाई आवडते, तेव्हा मी तिला सोडू शकत नाही, तुमच्याकडे काही प्यायला असेल का? मी त्याला म्हणाले की आधीच तुम्ही बरेच प्यायलेले आहात आणि मला त्याने कोणी एक मूर्ख माणूस समजू नये... तर ती खूप सुंदर आहे! तो पुढे सांगायला लागला.. मी तिला मारहाण करतो... शेल्फवर असेल कदाचित... नाही, दुसरं काहीतरी... असो... तो मला म्हणाला की ती खूप सुंदर आहे... नंतर... अरे हो... नूडल्स... माझ्या नूडल्स! मी स्वयंपाकघरात पळाले... पाणी ऊतू गेल्यामुळे गॅस विझला होता. मी खिडकी उघडली...

शेजारी माझ्यापाठोपाठ आला... ती कुरूप घाणेरडी होईपर्यंत मी तिला मारतो... आता पुरे करा, मी त्याच्यावर ओरडले, अशा भयानक गोष्टी मला ऐकायच्या नाहीत, पण तरीही तो सांगतच राह्यला... जसं त्या संध्याकाळी, तिचा एक डोळा काळा-निळा पडल्यामुळे ती खरंच कुरूप दिसतेय. हे बघा, मी तुम्हाला आधीच सांगते, तुम्ही लगेचच बाहेर गेला नाहीत, तर मी पोलीस बोलावीन, खरं तर मी पोलीस खूप आधीच बोलवायला पाहिजे होते, मी त्याला म्हणाले,.. असं काय, तुम्ही पाच मिनिटं तरी माझं बोलणं ऐकून घेऊ शकता, नक्कीच... खरं तर मी मुळात वाईट माणूस नाहीये... ही अशासारखी भाषणबाजी मला चांगली माहीत आहे, यामुळे न चुकता कसायाचं रूपांतर गरीब कोकरात होतं हे मला माहीत असल्यामुळे मी त्याला म्हणाले की मुळात-बिळात मला माहीत नाही; पण वरवर तरी तुम्ही अगदी कचरा आहात, मी पुष्टी जोडली की आता मात्र बाहेर व्हा... ठीक आहे... तो स्वयंपाकघराच्या बाहेर गेला... घराचा दरवाजा उघडल्याचा आणि आपटून बंद झाल्याचा आवाज मला ऐकू आला.. मी काही मिनिटं तशीच तिथेच थांबले आणि जेव्हा मला पुन्हा काहीही ऐकू आले नाही, तेव्हा पुन्हा गॅस पेटवला, माझ्या नूडल्स मला उकळवायच्या होत्या... पाच वाजून दहा मिनिटं... चला,

यावेळी ऑफिसमध्ये कोणीही नसणार... तर गॅस... नंतर मला वाटले की बैठकीच्या खोलीत वर्तमानपत्र वाचायला गेले होते... हो मला तिबेटवर लिहिलेला लेख आठवतोय... नूडल्स शिजेपर्यंत मी पेपर वाचल्यानंतर स्वयंपाकघरात गेले... मी त्या शेजाऱ्याबद्दल आणि त्याच्या त्या तर्कविसंगत गोष्टीबद्दल विचार करत होते... जेवणानंतर... मी हो खरंच... दुसऱ्या पानावरचा तो रिपोर्ट... जरा लांबलचक होता... नंतर मी झोपायला गेले... माझ्या खोलीतले दिवे मालवलेले होते. दिव्याचं बटण शोधायला जरासा वेळच लागला, ते खुर्चीच्या आड लपलेलं होतं... तर, मी दिवे लावले... माझ्या पलंगावर कोणीतरी मुटकुळं करून झोपलं होतं... पुन्हा तुम्ही, मी ओरडले... तो काही हलेना, मी पलंगाजवळ गेले आणि एकदम खोचलेली चादर बाहेर काढून झटकली... चालते व्हा बाहेर! तो काही हलायला तयार नव्हता... आणि मनामधे ठरवूनच, मी फोन उचलला... हॅलो? पोलीस?... माझा शेजारी स्तब्ध पडून ऐकत होता. संभ्रमात पडल्यामुळे मी फोन ठेवला आणि जवळ जाऊन त्याच्या चेहऱ्याकडे बघितलं... त्याचे डोळे बंद होते, त्याचा श्वास मंद गतीने चालू होता, मधूनच हलकासा घोरण्याचा आवाज ऐकू येत होता... शेवटी मी दिवे मालवले आणि खोलीच्या बाहेर पडले... नंतर काही वेळ वाचन केलं... अतिशय खिळवून ठेवणारं पुस्तक, एका माणसाची गोष्ट, आपले मित्र आपली खिल्ली उडवतात का आपण खरंच वेडे होत चाललो आहोत हे त्या माणसाला कळत नसतं... रात्री दोन वाजता जेव्हा मी झोपायला गेले, तेव्हा मला माझ्या पलंगावर झोपलेल्या त्या शेजाऱ्याची आठवण झाली... आता आरामखुर्चीत मी झोपणं हाच एक उपाय शिल्लक होता... एका तासानंतर माझ्यासमोर दोनच पर्याय उरले होते... एकतर न झोपता जागून रात्र काढायची किंवा माझ्या शेजाऱ्याजवळ झोपायचं... मी हळूच माझ्या खोलीचं दार उघडलं आणि चाचपडत माझ्या पलंगाकडे गेले... माझा शेजारी पलंगावर ऐसपैस झोपला होता... जरा सरका पलीकडे, मी त्याला म्हटलं... तो घशातच गुरगुरण्याचा आवाज काढत म्हणाला, ''तुला माझ्याआधी झोपायला काय झालं होतं?''... मला वाटलं की हे जरा जास्तच होते की, माझ्या अंगात चिडचिड करायलाही त्राण उरले नव्हते... तर मी त्याच्या बाजूला काहीही न बोलताच झोपले होते, अगदी पलंगाच्या कडेला, जेणेकरून माझा स्पर्श त्याला होऊ

नये… आधी मला वाटलं की मला अजिबात झोप येणार नाही… हा असला माणूस माझ्या पलंगावर झोपलाय ही कल्पनाच कशीतरी होती… मी बऱ्याच वेळेला जवळजवळ उठून बसलेही… घड्याळात रात्रीचे दोन चाळीस झालेत, असं मला दिसत होतं… तुला कसलाही धोका नाही, मी स्वत:शीच बोलत होते. पुन्हा पुन्हा, तुला कसलाही धोका नाही, झोप!… नंतर माझे डोळे मिटायला लागले… शेजारी जराही हलला नव्हता… हळूहळू त्याच्या घोरण्याचा आवाजाचा आणि दारूच्या उच्छ्वासाचाच मला आधार वाटू लागला… किती उबदार होता… त्याच्याकडे वळू लागले… माझं डोकं अगदी त्याच्या मानेजवळ होतं आणि मला त्याची उब जाणवत होती… हळूच माझं शरीर मी त्याच्या शरीराजवळ मी नेलं, त्याच्या पाठीचा स्पर्श होईपर्यंत… त्याची झोप चालूच होती… तो जणू नेहमीच तिथे असायचा असं मला वाटलं… सगळ्या रात्री… आता मला अजिबात भीती वाटत नव्हती… हे खूप विचित्र होतं; पण खरंच माझी भीती पार निघून गेली होती, उलट तो निघून जायला निघाला असता, तर मी त्याला थांबवून ठेवलं असतं, असं मला वाटायला लागलं… मग मी माझ्या उजव्या हाताने त्याला विळखा घातला… त्याचं पुटपुटणं मला ऐकू आलं, ''प्रिये मला माफ कर, मला माफ कर प्रिये''… काही हरकत नाही, मी त्याला म्हटलं, ''झोप आता…'' त्याच्या खांद्यावर मी हलकसं नाजूकपणे प्रेमाने चुंबन घेतलं… नंतर अजून तो काही म्हणाला नाही, त्याचं श्वसन एका तालात सुरू झालं, मी ते ऐकलं एक क्षण आणि नंतर मी पण झोपी गेले… आज सकाळी आठ वाजता तिथे कोणीही नव्हतं… एक क्षण मी माझ्या पलंगात तशीच पडून राहिले… त्याचे काही केस उशीवर चिकटून राहिले होते… त्याचं माझ्याकडे काही उरलं असेल तर तेवढेच केस शिल्लक होते… काही केस आणि 'धन्यवाद' हा एक शब्द माझ्या छोट्या डायरीवर लिहिलेला… माझी छोटी डायरी… खरंच मी तिचं काय केलं होतं? ती या पानाखाली नाहीये… ड्रॉवरमध्ये असेल का?… नाही, मी आधीच तिथे बघितलंय… पण मी तिथेच तर साधारणपणे ठेवते… तिथेच तर मी ती डायरी ठेवते… साधारणपणे…

***

# ज्हाना

मूळ रशियन लेखक :आन्द्रेइ गेलासीमव
भाषांतर : अनघा भट



परिचय: आन्द्रेइ गेलासीमव

(१९६५)

सायबेरियात इर्कुत्स्क इथे जन्म झालेल्या गेलासीमव यांचे शिक्षण इर्कुत्क्स आणि मॉस्को इथे झाले. इर्कुत्स्कमधील जागतिक भाषा विद्यापीठातून पदवी घेतल्यानंतर त्यांनी मॉस्को थिएटर इन्स्टिट्यूटमध्ये दिग्दर्शन शिकण्यासाठी प्रवेश घेतला.

गेलासीमव लेखनाकडे अचानक वळले. सन २००२ मध्ये 'सेन्सिटीव्ह एज्' हा त्यांचा पहिला कथासंग्रह इंटरनेटवर प्रसिद्ध झाला. त्याने जाणकारांचे लक्ष वेधून घेतले. रशियातील अपोलोन ग्रिगोऱ्येव आणि ब्येलकिन हे दोन मानाचे पुरस्कार ह्या पुस्तकाने पटकाविले. त्यानंतर गेल्या आठ–दहा वर्षांत त्यांचे लेखन सातत्याने प्रसिद्ध झाले आहे. 'दोम ना अझ्योरनय' (अझ्योर्नावरचे घर), 'राखील' (रेचल), 'गोद अबनामा' (असत्याचे वर्ष), 'स्तिप्नीये बोगी' (स्तेपवरचे देव) आणि नुकतेच आलेले 'ज्हाज्ह्दा' (तहान) ही त्यांची पुस्तके लोकप्रिय ठरली आहेत. यांपैकी काही जर्मन भाषेत तर 'ज्हाज्हदा' 'Thirst' या नावाने इंग्रजीत भाषांतरित झाली आहेत. गेलीसीमव यांच्या काही गोष्टींची जर्मन भाषांतरे '२१ उत्तम कथाकार' अशासारख्या संग्रहात समाविष्ट झाली आहेत.

प्रस्तुत कथा 'ज्हाना' एका पौगंडावस्थेतील कुमारी मातेबद्दल आहे. तिचे मूल अपंग आहे. प्रथमपुरुषी निवेदनातील ही कथा पौगंडावस्थेतील मुलगी जशी सांगेल

**तशा पद्धतीची आहे. त्यात सुसंबद्धता नाही. पण लेखनशैली खिळवून ठेवणारी आहे. सकारात्मक किंवा नकारात्मक अशा कुठल्याच तऱ्हेने ठाम विधान ही कथा करत नाही. कथेचा अर्थ लावायचे काम पूर्णत: वाचकांवर सोडले आहे.**

**प्रस्तुत कथेत लोकप्रिय गाण्यांचे 'पॉप कल्चर'चे अनेक उल्लेख येतात. 'ज्हाना नावाची एअरहोस्टेस' हे पिरिस्त्रोयकाच्या काळात लोकप्रिय असलेले व्लादिमीर प्रेस्न्याकव या पॉप गायकाचे गाणे आहे. 'एडिथ पिआफ्' हीसुद्धा जागतिक महायुद्धाच्या दरम्यान अतिशय लोकप्रिय असणारी फ्रेंच पॉप गायिका. हे सर्व संदर्भ लेखकाने कथेला चौकट पुरवण्यासाठी खुबीने वापरले आहेत.**

***

**त्या**ला सगळ्यात जास्त ती वस्तू आवडली. म्हणजे सुरुवातीला खूप नाही आवडली कारण तो चांगला तापला होता. त्याच्या अंगात ताप होता आणि ती वस्तू थंडगार होती. ती त्याच्या अंगाला लावल्यावर तर तो शहारलासुद्धा. मान वळवली आणि चेहरा वाकडा केला. डोकं सगळं ओलं होतं. पण भोकाड नाही पसरलं, कारण आता त्याच्याच्याने ओरडणंसुद्धा मुश्किल होतं. तो आता फक्त हळूहळू कण्हत होता आणि डोळे फिरवत होता. पण तरीही त्याने हात पुढे केला. कारण ती वस्तू चमकत होती.

कानातून ती वस्तू काढत डॉक्टर म्हणाल्या,-''मी परत तपासू तुला?''

त्या वस्तूचं नाव काय ते मी अगदी पार विसरले. लोकांचे छातीचे ठोके ऐकायची वस्तू. हिरव्या नळ्या असलेली. तिची गोल चकती पाठीला चिकटते, जर खूप वेळ टेकवून ठेवली तर. आणि मग ती काढताना गमतीशीर आवाज येतो. थोड्याश्या गुदगुल्या होतात आणि डोकं गरगरतं.

तर सिर्योज्हकाने ती वस्तू घेतली आणि ओढून तोंडात घालायला लागला.

डॉक्टर म्हणाल्या, ''अरे थांब! छी छी आहे ते. मला देऊन टाक.''

मी त्यांना म्हणाले, ''आत्ता देईल तो. त्याला ती फक्त थोडीशी चाटून बघायची आहे. त्याला धरू दे ती थोडावेळ. जवळपास रात्रभर रडला आहे तो.''

त्यांनी माझ्याकडे बघितलं आणि म्हणाल्या, ''तू काय एकटीच वाढवत्येस का त्याला?''

मी म्हणाले, ''एकटीच. अजून कोणीही नाही.''

त्या गप्प राहून माझ्याकडे बघत बसल्या. मग म्हणल्या, ''थकलीस?''

मी म्हणाले, ''नाही नाही, मला सवयच झाली आहे. फक्त हात दमलेत खूप. सकाळपर्यंत तुटायला आले अगदीच.''

त्या म्हणाल्या, ''तू काय त्याला सारा वेळ कडेवरच घेऊन फिरतेस की काय?''

मी म्हणाले, ''त्याला अजून चालता येत नाही.''

त्या त्याच्याकडे बघत म्हणाल्या, ''किती वर्षांचा आहे तो?''

मी म्हणाले, ''दोन वर्षांचा. बर्थ ट्रॉमा होता.''

त्या म्हणाल्या, ''समजलं. आणि तुझं वय काय?''

मी म्हणाले, ''मी अठरा वर्षांची आहे.''

त्या थोडा वेळ गप्प बसल्या आणि मग आपली बॅग आवरायला लागल्या. सिर्योज्हकाने ताबडतोब ती वस्तू त्यांना परत केली. कारण आता हट्ट करायची त्याच्यात शक्तीच राहिली नव्हती.

दारापाशी त्यांनी मागे वळून पाहिलं आणि त्या म्हणाल्या, ''खरं तर आणखी काही गंभीर परिस्थिती येणार नाही. पण काही लागलंच तर फोन कर. सकाळी आठ वाजेपर्यंत मी ड्युटीवरच आहे.''

मी त्यांना म्हणाले,' ''थँक यू.'' आणि त्यांनी जाताजाता दार ओढून घेतलं. चांगल्या आहेत डॉक्टर. सिर्योज्हकाला पण त्या आवडल्या. आमची विभागीय अधिकारी त्याला अजिबात आवडत नाही. ती आमच्याकडे आली की तो नेहमी

रडतो. पण विभागीयला सिर्योज्हकाबद्दल आणि माझ्याबद्दल सगळं सगळं, अगदी पूर्वीपासून सगळं माहित्येय म्हणून तिला आश्चर्यही वाटत नाही. पण ह्या वेळेला मी 'इमर्जन्सी'ला फोन केला होता. त्याला दहा मिनिटं एकटं सोडून मी वोद्का विकणाऱ्या, रात्रीचं उघडं असणाऱ्या दुकानात गेले. तिथल्या चौकीदाराजवळ फोन असतो.

कारण चार वाजता मला भीती वाटायला लागली. आख्खी रात्र तो रड रड रडला आणि चार वाजता रडायचा थांबला. मला भीती वाटली की तो मरेल.

जेव्हा मला कामावर घ्यावं म्हणून मी शाळेत गेले होते तेव्हा मला मुख्याध्यापिका म्हणाल्या,''तुझ्यामुळे तुझी आई मेली. ह्या सगळ्यात तुझाच दोष आहे.''

कारण मला आता सर्टिफिकेट नकोच होतं. मला आता सिर्योज्हकाचं पोट भरायचं होतं. दुधाची भुकटी खूप महाग होती. इंपोर्टेड. अगदी छान डब्यातनं येणारी. विभागीय म्हणाली की फक्त तीच भुकटी द्यायची. तिच्यात चांगली व्हिटॅमिन्स आहेत. म्हणून मी शाळेत काम मागायला गेले होते. शिकायला नाही काही. शिवाय तसंही मी मागे राहिले होते. ममा गेल्यावर पैसे पूर्ण संपले. ती नेहमी म्हणायची– ''पैसे साठवून काय फायदा? आपण फ्रान्सला जाऊ. तिथे हजारपटीने जास्त कमवू.'' आणि आपली एडिथ पिआफ*ची कॅसेट ऐकायची.

मुख्याध्यापिका मला म्हणाल्या,''तिचं हृदय कमकुवत होतं हे तुला माहीत होतं. आणि आता इथे उभी राहून माझ्या डोळ्याला डोळा भिडवतेस, निर्लज्ज कुठली! इथे यायची तुला हिम्मत कशी झाली?''

मी त्यांच्याकडे बघून मनात म्हणाले, ''इतकी वर्ष ममा इथे कशी काय येऊ शकली?''शिवाय मला सांभाळून नोकरी केली.

त्यांनाही माहीत होतं की तिचं हृदय कमकुवत आहे. तरीसुद्धा शिक्षक-खोलीत त्या माझ्याबद्दल बोलायच्या. ती तिथे असतानासुद्धा. कारण यात तिचाही दोष आहे असं त्यांना वाटायचं. शिक्षिका आणि स्वत:च्या मुलीला सांभाळता आलं नाही. ती नंतर घरी येऊन रडायची. पण दवाखान्यात जायची तिची तयारी नसे. आपली कॅसेट लावायची आणि त्याच्या जोडीने गुणगुणायची. मग मरूनच गेली.

*एडिथ पिआफ – दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात लोकप्रिय असणारी फ्रेंच गायिका

मी मुख्याध्यापिकेला म्हणाले,''म्हणजे मग मला तुम्ही कामावर घेणार नाही?''

ती म्हणे, ''माफ कर. ही खूप मोठी जबाबदारी आहे. आमच्या इथे मुली आहेत. आणि आम्हाला त्यांचा विचार केलाच पाहिजे.''

म्हणजे मी जणू अशी वेश्याच आहे, की जिला मुलांच्या नजरेस पडू देता कामा नये.

''हा सिनेमा मुलांचा नाहीये, हे तुला माहित्येय.'' ममा म्हणायची आणि मला झोपायला पाठवायची.

स्वत: मात्र टी.व्ही.समोर बसायची.

भिंतीकडे तोंड करून मी पडायची. अन् विचार करायची, ''लोकं मोठ्यामोठ्याने श्वास घेतायत् हे पाहण्यात काय मजा?'' माझ्या खोलीतसुद्धा ते ऐकू यायचं.

आणि जेव्हा तोलिक बांधकामावरून पडला तेव्हा तो पण जोराजोरात श्वास घेत होता. फक्त तो डोळे अजिबात उघडत नव्हता. फक्त विटांवर डोकं ठेवून पडला होता आणि जोराजोरात श्वास घेत होता. आणि ज्या बांधकामावरून तो पडला, ते म्हणजे आमची शाळा आणि आता तिथे ती मुख्याध्यापिका बसते.

नंतर आम्ही सगळेच ह्या शाळेत गेलो. तोलिक सोडून. कारण नंतर मग तो कधीच कुठेच गेला नाही. अगदी जुन्या लाकडी शाळेत पण एकदाही गेला नाही. फक्त घरीच बसला. कधी कधी त्याला अंगणात सोडायचे तेव्हा मी कुणाशीच खेळायचे नाही. त्याला मुलांनी चिडवू नये म्हणून मुलांना दगड मारायचे. जर त्याला चिडवलं, तर तो नेहमीच ओरडायला लागायचा. त्याची आई घरातून बाहेर पोर्चमध्ये येऊन रडायची. दगडी बिल्डिंगमध्ये घर द्यायचं असं सुद्धा त्यांना कबूल केलं होतं. पण दिलं मात्र नाही. कॉर्पोरेशनमधून कोणीतरी काकू आल्या आणि म्हणाल्या, ''इथे मतिमंद राहू शकतो.'' म्हणून ते आमच्याच भागात राहायला लागले. ममा नेहमी म्हणायची, की इथे राहायलाच नको.

''सर्वस्व पणाला लावीन पण आपण इथून निघून जाऊ. ह्या झोपडपट्टीतून पळून गेलं पाहिजे.''

तिचं बोलणं मी ऐकायची आणि ''झोपडपट्टी'' म्हणजे काय? असा विचार करायची. मला वाटायचं की ही म्हणजे पट्ट्यांची घरं असणार. फक्त खूप घाणेरडी. 'झ' ह्या आवाजासारखी नकोशी अन् सळसळणारी. मला आश्चर्य वाटायचं कारण आमच्या भागात पट्ट्या नव्हत्या. कोणीही शेकोटीसुद्धा पेटवायचं नाही. घरं मात्र अगदीच घाणेरडी होती.

पण नंतर मला तिचं बोलणं समजायला लागलं.

जेव्हा पोलिस आले आणि त्यांनी आमचं दार तोडलं तेव्हा. कारण ते कोणाला तरी शोधत होते. ज्याने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या होत्या त्याला. तेव्हा ते घरोघरी जाऊन दारं तोडायला लागले. ते निघून गेल्यावर ममा पहिल्यांदाच म्हणाली, ''फ्रान्सला निघून गेलं पाहिजे. इथे आता काहीही करणं शक्य नाही. आता आपलं दार कोण दुरुस्त करणार?''

ती कसली कसली पत्रं लिहायला लागली. महाग पाकिटं विकत घ्यायला लागली. पण उत्तर कधीच आलं नाही.

ती शेजाऱ्यांना म्हणायची,''आम्ही पॅरिसला निघून जातोय. म्हणून मी तुम्हाला उसने पैसे देऊ शकत नाही. शिवाय तुम्ही ते परत करणार नाही. माझ्या पैशांनी तुम्ही दारू पिणार.''

त्यामुळे लवकरच मला घराबाहेर पडणं, फिरणं अवघड झालं. खास करून, गॅरेज जिथे बांधत होते तिथं.

''चल जा इथून.'' वोफ्का शिपाग्लाझ म्हणाला आणि सायकलच्या पंपाने त्याने मला मारलं. ''ज्हाना नावाची एअर होस्टेस''* आणि मी निघून आले कारण मारलेलं दुखत होतं आणि मला त्याची भीतीही वाटत होती. तो दुसऱ्या इयत्तेत होता. अजूनही लाकडी शाळेतच होता तो. पण गॅरेजमध्ये तो सगळ्यात मुख्य होता. ही गॅरेजेस त्याचे वडील बांधत होते. जर कोणाला त्यांच्यावरून खाली वाळूच्या ढिगावर उडी मारायची असेल तर आधी वोफ्काची परवानगी घ्यायला लागायची. मला त्याने परवानगी दिली नाही.

*ज्हाना – ज्हाना नावाची एअरहोस्टेस-व्लादिमीर प्रेस्न्याकव या रशियन पॉप गायकाचे १९८५(पिरिस्त्रोयकाच्या) काळात प्रसिद्ध झालले गाणे.

''फूट इथून, एअर होस्टेस. तू आणि तुझी आई फ्रान्समध्ये मारा उड्या गॅरेजवरून. तुझी आई महामूर्ख आहे. तुम्ही दोघी महामूर्ख आहात. चल निघ इथून.''

असं म्हणून त्याने त्याचा तो पंप माझ्या डोक्यात मारला. पंप नेहमी तो बरोबर घेऊनच हिंडायचा. सायकल कधीही चालवायचा नाही तरीही. त्याला ते काही केल्या जमलं नाही. सारखा पडायचा आणि मग जी मुलं त्याला हसतील त्यांना मारायचा.

पण तोलिक त्याला कधीही हसला नव्हता. फक्त एकदा त्याच्याजवळ जाऊन म्हणाला होता ''असू देत तिला. तुला काय दया येत नाही का?

आणि त्यांचं भांडण सुरु झालं. नंतर मग ते कायमच भांडत राहिले. तोलिक बांधकामावरून पडेपर्यंत. कारण आम्हाला तिसऱ्या मजल्यावर चढून जायला आवडायचं. आम्ही तिथे शाळा-शाळा खेळायचो. जेव्हा तो पडला, तेव्हा मी वर पाहिलं तर तिथे वोफ्का शिपाग्लाझचा चेहरा होता. तोलिक जोरजोरात श्वास घेत होता आणि त्याचे डोळे जाम उघडत नव्हते.

''बघ, बघ, कसे डोळे उघडतोय तो. मुलगा झाला तुला. बघितलंस, कसा मोठा आहे!'' नर्स मला म्हणत होती. तिने मला सिर्योज्हका दाखवला.

पण मला काहीच दिसलं नाही कारण मला खूप दुखत होतं. मला असं वाटतं होतं की मी लवकरच मरणार. मला फक्त एवढंच दिसलं की तो रक्ताने अगदी माखलेला आहे आणि मला हे कळेना की हे रक्त कोणाचं- माझं की त्याचं?

''बघ बघ, धर त्याला. अस्सं- चल, तुला आता त्याची सवय करायला हवी.''

पण मला काही केल्या सवय होईना. आणि ममा म्हणाली, ''लहान बाळांबद्दलचं सगळं ती पण कधीच विसरून गेली आहे.'' ती म्हणे, ''अरे देवा! इतकी का ती पिटुकली असतात? तू त्याचे हात बघ कसे छोटे छोटे आहेत ते. बघ, बघ तो हसला माझ्याकडे बघून!''

मी म्हणाले,''फक्त तोंड वेडंवाकडं केलं. आम्हाला डॉक्टरांनी व्याख्यानात सांगितलं होतं. अनैच्छिक हालचाल. अजून त्याला काहीसुद्धा ओळखता येत नाही.''

ती म्हणाली, ''तू स्वत:च आहेस अनैच्छिक हालचाल. आणि तुझ्या त्या डॉक्टरलासुद्धा लहान मुलांचं काही कळत नाही. आपण लवकरच फ्रान्सला जाणार आहोत ना म्हणून तो खूष आहे. मी माझी एडिथ पिआफ्ची कॅसेट कुठे टाकली, ते तू बघितलंस का? टेप रेकॉर्डरमध्ये दिसत नाहीये ती.''

आमचा टेपरेकॉर्डर खूप जुना होता. त्याचे तुकडेच पडत होते. आणि कॅसेट मीच मुद्दाम तिच्यापासून लपवून ठेवली होती. कारण आता माझ्याच्याने ठोकठोक सहन होईना. शेजाऱ्यापाजाऱ्यांची मुलंसुद्धा आम्हाला फ्रेंच आहात म्हणायची. त्यात आता अजून सिर्योज्हका जन्मला होता. हे सगळं संपायलाच हवं होतं.

पण आख्खी संध्याकाळ ती भांबावल्यासारखी होऊन ह्या कोपऱ्यात, त्या कोपऱ्यात येरझारा घालत राहिली. वह्या तपासायचा प्रयत्न करून पाहिला. मग टी.व्ही. पाशी बसली. कसल्यातरी बातम्या बघायला लागली. पण तिला चैन पडत नाहीये हे मला दिसत होतं. फक्त टी.व्ही. पाशी बसली होती. तिची पाठ अगदी वाकलेली होती. सिर्योज्हका बोंबलत होता कधीचा. बहुतेक दोन तास.

मी म्हणाले, ''ही बघ. तुझी कॅसेट. फळीवर पडली आहे. पण तुला काहीच ऐकू येणार नाही. इतक्या ओरडण्यात.''

ती म्हणाली, ''मी स्वयंपाकघरात जाते.''

आणि सिर्योज्हका पण रडायचा थांबला. ताबडतोब.

मी त्याला पाळण्यात ठेवला आणि आमच्या स्वयंपाकघरात एडिथ पिआफ् कशी गाते आहे ते ऐकायला लागले. खूपच सुंदर संगीत.

पण माझे हात बधीर झाले होते आणि पाठ थोडीथोडी दुखत होती. तरीही मला असंच वाटत होतं की तो अजून कोणालाच ओळखत नाही. फार लहान आहे.

तोलिकने मला ओळखलं होतं, त्याला बारावं वर्ष लागलं तेव्हा. अगदी त्याच्या वाढदिवसाच्या दिवशीच. ममा म्हणाली, ''वर जा त्याच्याकडे, त्याला

काही तरी दे. नाहीतर ते सगळे परत पिऊन झिंगतील आणि त्याच्याबद्दल विसरून जातील.''

तिला अशी भीती होती की तो पुन्हा बटाट्याची सालं खाईल अन् मग त्याला दवाखान्यात न्यावं लागेल. शिवाय त्याचं नुकतंच ॲपेंडिक्सचं ऑपरेशन झालं होतं.

त्याला काय भेट द्यावी हे मला कळेना म्हणून मी एक छोटा बॉल आणि एक जुना फोटो नेला. त्यात इतरही मुलं आणि मी आणि तोलिक होतो. आमचा तो फोटो पेत्या अंकलने -ज्याच्याकडे गाडी होती अशा-ममाच्या मित्राने काढला होता.

त्याने आम्हाला सगळ्यांना घेऊन घराभोवती गाडीतून चक्कर मारली होती. नंतर गच्चीवर आमचा फोटो काढला होता. फोटो काढल्याबरोब्बर फोटो कॅमेऱ्यातून सरपटत बाहेर आला होता. हे असं मी पूर्वी कधीही बघितलं नव्हतं. पण मग नंतर ममा म्हणाली की, ''त्याच्याबद्दल काहीही तिला विचारायचं नाही इथून पुढे. गप्प बैस. तुझ्या प्रश्नांचा मला कंटाळा आला आहे.''

आणि तिने हातांनी कान झाकून घेतले.

त्या फोटोतले आम्ही सगळे जवळपास सहा वर्षांचे होतो. बांधकामावर आम्ही शाळा शाळा खेळायचो, त्याच्या आधीचे.

''थांब. तो तोंडात नाही घालायचा.'' मी म्हणाले. ''बघ. दिसतंय का? हा तू इथे आहेस. शेजारी मीश्का उभा आहे. बघितलंस? त्याने जीभ बाहेर काढली आहे. त्याच्या शेजारी आहेत स्लाव्का आणि ज्हेन्का. आठवतंय? ते आख्खी रात्र पोटमाळ्यावर चढून बसले हाते. मग नंतर त्यांचे पपा बेल्ट घेऊन त्यांच्यापाठी मारायला आख्खा रस्ताभर धावले होते. आणि ही बघ मी. मला कोणीतरी शिंगं लावली आहेत पाठीमागून. तो बहुतेक नालायक मीश्का असणार. तो नेहमी करायचा तसं. आता तो इथे राहत नाही. त्याचे आई-वडील कुठेतरी गावाच्या मध्यवर्ती भागात गेले राहायला. मी आणि ममा पण बहुतेक जाऊ इथून कधीतरी. थांब थांब. काय करतो आहेस तू? त्याच्या कडा दुमडायच्या नाहीत काही. मोडेल तो आणि मग काहीच दिसणार नाही. खेचतोयस् का तू तो? काय? मला समजत नाही, तू काय म्हणतो आहेस ते. तू नुसतं पुटपुटतो आहेस. काय? काय म्हणायचंय तुला?''

त्याने माझ्या हातातून फोटो खेचून घेतला आणि त्यातल्या कशावर तरी बोट टेकवलं.

त्याने कशावर बोट टेकवलं ते मी पाहिलं आणि त्याला फोटो देऊन टाकला. कारण तो माझ्या फोटोवर बोट ठेवत होता.

तर असं त्याने मला ओळखलं. अगदी स्वत:च्या जन्मदिवशी.

''बाळाचा जन्म ही स्त्रीच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची घटना असते. ह्या जगात आल्याच्या पहिल्या मिनिटापासून बाळाला काळजी आणि प्रेम दिलं पाहिजे.'' असं आम्हाला डॉक्टरांनी व्याख्यानात सांगितलं होतं.

मी तिथे बसून सगळ्यांकडे बघत होते. असं वाटतं होतं की आम्ही हवा भरलेले फुगेच गिळले आहेत. बसलोय आणि ऐकतोय प्रेमाबद्दल, ते हॉस्पिटलचे कपडे घालून. पण मला कधीचा कंटाळा आला होता. कदाचित मी मरेन असा विचार माझ्या मनात येत होता. मला किती दुखेल असाही विचार माझ्या मनात येत होता. तेव्हाही मला प्रेमाबिमाची बिलकुल फिकीर नव्हती.

मी समर कँपमध्ये आले तेव्हा मुली म्हणाल्या, ''तुला माहित्येय? तो कसला भारी आहे. व्येनेच्का जिम ट्रेनरपेक्षा भारी आहे तो.''

मी म्हटलं,''कोण?''

''तू काय वेडी आहेस का?'' त्या म्हणाल्या.

मी म्हणाले, ''तुम्हीच आहात वेड्या. मला कुठून माहीत असणार तुमचा व्येनेच्का जिम ट्रेनर. मी आत्ताच आले आहे. वर्गाची डागडुजी करायला मी आईला मदत करत होते.''

त्या म्हणाल्या, ''व्येनेच्का पायलट आहे. त्याच्याकडे गाडी आहे आणि तो पंचवीस वर्षांचा आहे. त्याला जेव्हा सुट्टी असते तेव्हा तो आपल्या कँपमध्ये जिम ट्रेनर म्हणून काम करतो. कारण त्याला फिगर टिकवायची आहे. पण तोसुद्धा वोफ्चिक इतका भारी नाही कारण वोफ्चिकचा म्हणजे... जबाव नही..''

''थांबा जरा तुम्ही, वोफ्चिक कोणता?'' मी म्हणाले.

तर त्या म्हणे,''तू काय, वेडी आहेस का? तो तुझ्याच शाळेतला आहे. तो तुला ओळखतो, असं त्याने आम्हाला सांगितलं.''

मी म्हणाले, ''म्हणजे वोफ्का शिपाग्लाझ की काय?''

त्या म्हणाल्या,''आम्ही त्याला वोफ्चिक म्हणतो.''

त्यावर मी त्यांना म्हटलं, ''वोफ्का शिपाग्लाझ अगदी घाणेरडा आहे. अगदी घाणेरड्यातला घाणेरडा आहे.''

त्या हसायला लागल्या आणि म्हणाल्या, ''ते काही आम्हाला माहीत नाही.''

पण मी समर कँपला आले होते, ते उन्हाळ्यात काम करून पैसे मिळवायला. मला अकरावीच्या वर्गात जाताना नव्या जीन्समध्ये जायचं होतं. शिवाय क्रॉस ट्रेनर्स पण घ्यायचे होते. म्हणून तर मी एक वर्ष मागे राहिले होते.

ममा मला जन्मभर सांगत आली होती की प्रेम वाईट असतं. पण यावेळी तिलासुद्धा संशय आला नाही. बिलकूल.

पहिल्याच आठवड्यात मुलींचं सतत त्याच्या विषयी बोलणं ऐकून माझे कान किटले की कोणाकडे त्याने बघितलं, कोणाबरोबर डान्स केला, मुलांपैकी कोणाला ठोकलं.

शेवटी एकदाचा जेव्हा तो मला भेटला तेव्हा मी म्हटले, ''तू तर इथला सुपरस्टारच आहेस. स्थानिक जॅकी चॅन ओरिएंटल फायटिंग मास्टर.''

त्याने सरळ माझ्या डोळ्यांत रोखून बघितलं अन् म्हणाला, ''आज डिस्कोथेकला ये. मी तुला भारी डान्स करायला शिकवतो.'' मग हसून म्हणाला, ''ज्हाना नावाची एअर होस्टेस.''

का कोण जाणे पण मी गेले.

---

आमची विभागीय मला म्हणाली, ''नॉर्मल मुलं दहा महिन्यांची चालायला लागतात. तुझ्या मुलाला दोन वर्ष पूर्ण झाली आहेत. तो अजूनही फक्त सरपटतोय...झुरळासारखा.''

तो कसा सरपटतोय, ते तिने एकदम नाही सांगितलं. थोडा विचार केला आणि मग बोलली. तिने त्याला दूर ढकलला. कारण तो कायम तिच्याकडे सरपटत जायचा. ती यायची तेव्हा तो रडत-ओरडत असायचा. मग तिच्या बुटांकडे सरपटत जायचा आणि कपड्यांची कड घट्ट धरायचा.

ती म्हणायची,''बघ, थुंकीने बरबटून ठेवलं मला. आता मी इतर मुलांकडे कशी जाऊ?''

मी म्हणायचे,''सॉरी.''

ती म्हणायची, ''तुझ्या सॉरीचं मला काय? हा सगळा विचार तू आधीच करायला हवा होतास. त्याला जन्माला घालायचं की नाही. जर गर्भपात करून घेतला असतास तर आत्ता अशी आईविना एकटी त्याला मांडीवर घेऊन बसली नसतीस. शाळा व्यवस्थित पूर्ण केली असतीस. त्याची पुढची वाढ कशी होणार ते काय ठाऊक? अशा प्रकारचा बर्थ ट्रॉमा म्हणजे काही मस्करी नाही. आधीच एक मतिमंद आहेच आपल्याकडे वरच्या मजल्यावर.''

मी म्हणाले,''तो मतिमंद नाहीये. फक्त सहा वर्षांचा असताना तो बांधकामावरून पडला.''

ती म्हणाली,''पडला की काय झालं कोण जाणे? मी तुला सांगते आहे बाळा, की ट्रॉमा म्हणजे काही मज्जा नाही; आता काय जन्मभर त्याची लाळ पुसत बसायचंय का तुला? तुझं वय बाहुल्यांशी खेळण्याचं आहे. जन्म देतायत मुलांना- आणि मग बसा सांभाळत. अक्कल कुठे होती तुझी? आणि रडण्यासारखं काही नाही यात.''

मी म्हटलं,''मी रडत नाहीये. माझ्या डोळ्यांत काहीतरी कुसळं गेलं.''

ती म्हणाली,''तुझी सगळी कुसळं मला माहिती आहेत. तुला भलत्याच ठिकाणी गेलं कुसळ. मी अजून आठवड्याने येईन. कृपा करून त्यावेळेला घरात राहा.''

मी म्हटलं, ''आम्ही नेहमी घरातच असतो.''

तिने बूट चढवले आणि ती गेली.

ती बाहेर पडल्याबरोबर मी सिर्योज्हकाला उचललं, पायांवर उभं केलं आणि म्हणाले, ''चल रे छोटू. प्लीज, चाल ना.''

मी रडत होते त्यामुळे मला काही दिसेना पण त्याने चालावं असं मला खूप वाटलं.

पण तो चालेचना. प्रत्येकवेळी तो धुपकन् कुल्ल्यांवर आपटत होता. मी त्याला पुन्हा पुन्हा उभं केलं. तो आपला हसायचा आणि सगळा वेळ जमिनीवर बसायचा.

मग मी त्याला शेवटचं एकदा उभं केलं अन् पाठीला धक्का दिला, ओरडले, ''दळभद्र्या, कारट्या, हे सगळं तुझ्यामुळे होतंय. एकदासुद्धा तुला नीट चालता येत नाही ना?''

तो तोंडावर पुढे पडला आणि त्याचं डोकं आपटलं. त्याच्या तोंडातून रक्ताची धार लागली. तो रडायला लागला आणि मी घाबरले. मी त्याला उचललं आणि घट्ट कवटाळून धरलं. मी पण रडले. मला थांबताच येईना. त्याच्या तोंडाचं रक्त पुसलं आणि मला काही केल्या रडणं थांबवताच येईना.

---

मी तोलिकवर ओरडले. ''थांबू नकोस. थांबू नकोस पुढे चल!''

पण त्याला माझं बोलणं समजेना. मी ओरडत्येय हे त्याने ऐकलं, पण त्याला वाटलं की आम्ही अजून खेळतोच आहोत. पण त्याच्या पायाखालचं बर्फ तडकायला लागलं होतं. उत्तरादाखल तोही माझ्याकडे बघून किंचाळला. अन् त्याने हात हलवला. आता तो उड्या मारतो की काय, अशी मला भीती वाटली. कारण तो खूष झाला की नेहमी जागच्या जागी उड्या मारतो. मी ओरडले, ''थांबू नकोस फक्त. हात जोडते तुला.''

कारण बर्फाचा थर अगदीच पातळ होता आणि तो त्याच्यावरून चालला होता, दोन दिवसांपूर्वी त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी मी त्याला दिलेल्या बॉलच्या मागेमागे. आता तो बॉल अजिबात सोडत नाही. खातानासुद्धा तो बॉल हातात धरून ठेवतो कारण तो माझा बॉल आहे, मी तो त्याच्यासाठी आणला आहे.

आम्ही परत आल्यावर ममाने माझ्याकडे बघितलं आणि म्हणाली, ''तू त्याच्या मागेमागे का करतेस. तुझे मित्रमैत्रिणी येऊन गेले. नॉर्मल मुलांशी खेळत जा बरं.''

मी म्हणाले,''तोलिक नॉर्मलच आहे. त्याने फोटोतल्या मला ओळखलं.''

ती म्हणाली,''खरं तर त्याला स्पेशल स्कूलमध्ये घालण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. नाहीतर इथे तुझ्याखेरीज कोणीच त्याच्याकडे लक्ष देत नाही. कधीतरी तो पुन्हा एकदा पडून त्याची मान मोडेपर्यंत वाट पाहणार आहेत की काय हे दारूडे? कदाचित ते त्याचीच वाट पाहत असतील. शाळेशेजारच्या बांधकामाचा मोठा खड्डा तर कोणीच बुजवायला बघत नाहीये. तू त्याला घेऊन तिथे जाऊ नकोस. जर अचानक बर्फावर पळत गेला तो, तर धडपडेल. तो खड्डा किती खोल आहे, ते तुला माहीत आहे ना?''

मी म्हटलं,''मला माहित्येय. आम्ही तिकडे जात नाही खेळायला. आम्ही बहुतेक नेहमी अंगणातच खेळतो.''

त्यावर ती म्हणाली, ''मी तुला घेऊन फ्रान्सला निघून गेले म्हणजे त्याच्यावर कोण लक्ष ठेवेल? कसं असतं नाही आयुष्य? कोणालाच नको आहे तो.''

आणि मग मी पण कोणालाच नकोशी झाले. हिवाळ्यात ममाचे पैसे संपले आणि काम शोधायची गरज भासायला लागली. पण मला कोणीच कामावर घेईना. शाळेच्या मुख्याध्यापिकांनीसुद्धा मला कामावर घ्यायला नकार दिला. म्हणे, मुलींच्यापुढे माझा आदर्श नको.

मला खरंतर कसलाच आदर्श बनायचं नव्हतं. मला फक्त सिर्योज्हकाचं पोट भरायचं होतं. ह्या वेळेपर्यंत माझे बर्फात वापरायचे बूटही पार तुटून गेले होते. त्यामुळे मी काम शोधायला त्या उन्हाळ्यात विकत घेतलेले क्रॉस ट्रेनर्स घालून पळत फिरत असे. ते अगदी झिजून गेले होते. जवळ जवळ दोन वर्ष जुने झाले होते ते. त्यांच्यामध्ये पाय अगदी गारठून गोठून जायचे. खास करून बस जर लवकर आली नाही तर फारच. बसस्टॉपवर उभी असायचे, लाकडी फळकुटं आपटावीत तसे पाय आपटत आणि भीतीने वेड लागायची पाळी आलेली असायची. बंद घरात एकटा सिर्योज्हका एव्हाना रडायला लागला असेल का नसेल रडत?

आणि रस्त्यावर फक्त भीषण थंडी असायची. नुकतंच सन दोन हजार सुरू झालं होतं. नववर्ष साजरंही झालं होतं. मी नव्हतं केलं साजरं, कारण टी.व्ही. विकून टाकला होता. शिवाय शिवणयंत्र आणि व्हॅक्यूम क्लिनर. तरीही पैसे फारच लवकर संपून गेले होते. मग मी ममाच्या वस्तू विकायला सुरुवात केली. खरंतर आधी मला त्या विकायच्या नव्हत्या. जेव्हा टेपरेकॉर्डरची वेळ आली तेव्हा का कोण जाणे मी थांबले. रिकाम्या घरात मी बसले. सिर्योज्हका जमिनीवर कसा सरपटतोय ते बघत आणि ममाची एडिथ पिआफ्‌ची कॅसेट ऐकत. सिर्योज्हकाला तिची गाणी आवडायची. अजून थोडेफार तरी पैसे मला कुठून मिळतील असा विचार करत मी त्याच्याकडे बघत होते कारण बहुधा कुठूनच मिळणार नव्हते.

आणि तेव्हा हे पत्र आलं. मार्च महिन्याच्या मध्यात कधीतरी. क्रॉस ट्रेनरमध्ये पाय गारठायचं थांबलं होतं. आधी मला कळलंच नाही की ते कुठून आलं आहे. उघडल्यावरच मला खूप आश्चर्य वाटलं. कारण हे पत्र कधीकाळी येईल यावर माझा विश्वासच नव्हता. जरी ममा त्याची अगदी दर दिवशी वाट पाहत होती तरीही. पण माझा विश्वास नव्हता. मला वाटायचं, फक्त तिचं थोडंसं डोकं फिरलंय. मला वाटायचं की चमत्कार घडत नाहीत.

पत्रात लिहिलं होते की 'मदाम', माझी ममा यांनी अनेकवार केलेल्या विनंत्यांना अनुसरून फ्रान्सच्या रशियातील दूतावासाने काही ठराविक विभागांकडे विचारणा केली आणि ह्या सर्व कार्यवाहीला झालेल्या विलंबाबद्दल दूतावासाने दिलगिरी व्यक्त केली होती. त्यांच्यावर अवलंबून नसणाऱ्या काही न्यायिक व राजकीय कारणांमुळे फ्रेंच दूतावासाला ह्या गुंतागुंतीच्या प्रकरणाच्या परिस्थितीची शहानिशा अगदी आत्तापर्यंत करता आली नाही. तथापि, त्यांना आता हे सांगायचे आहे की दीर्घकाल चालवलेल्या शोधानंतर त्यांना मादाम बोशे यांना सापडवण्यात यश आले आहे. मादाम बोशे ह्या माझ्या ममाशी आपला नातेसंबंध आहे असे मान्य करतात. त्या दोघींचे आजोबा एकच आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये त्यांचा समावेश होता आणि युद्ध संपल्यानंतर त्यांना फ्रान्समध्ये कायमस्वरूपी वास्तव्य करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यांनी फ्रेंच नागरिक स्त्री शी विवाह केला होता. ह्या प्रकरणात फ्रेंच दूतावासाला उद्‌भवलेली अडचण

म्हणजे नागरिकत्व दिलेल्या ह्या आजोबांची आणि वर उल्लेखिलेल्या फ्रेंच नागरिक स्त्रीची मुलं विविध देशांत विखुरली होती आणि त्यांनी निरनिराळ्या देशांचे नागरिकत्व घेतलेले होते. विशेषत: मदाम बोशेंचे आई-वडील कॅनडाचे नागरिक होते. परंतु मदाम बोशे फ्रान्समध्ये परतल्या होत्या. त्यांनी फ्रेंच नागरिकाशी विवाह केला होता. त्यामुळे मदाम, माझी ममा यांनी फ्रान्समध्ये कायमस्वरूपी वास्तव्य करण्यासाठी फ्रान्सच्या सरकारला विनंती करण्यात रशियातील फ्रेंच दूतावासाला कोणतीही अडचण दिसत नव्हती. आवश्यक ती सगळी कागदपत्रे रशियातील फ्रेंच दूतावास खालील पत्त्यावर पाठवण्यास तयार होता.

पुढे फॅक्स नंबर दिला होता. काहीतरी शब्द, पण मला फ्रेंच वाचता येत नाही आणि ममाच्या सगळ्या डिक्शनरीज् मी विकून टाकल्या होत्या कारण या वेळेपर्यंत ममाला जाऊनही सहा महिने उलटले होते.

'स्थानबद्ध करण्यात आलेले' म्हणजे काय ते ही मला माहीत नव्हते.

पण पाकीट खूप छान होतं म्हणून मी ते सिर्योज्हकाला दिलं. निरनिराळ्या कागदांचा चुर्रचुर्र आवाज करायला त्याला आवडतं.

त्याने ते घेतलं आणि तो आनंदाने गुरगुरायला लागला. मी त्याच्याकडे बघितलं अन् माझ्या मनात विचार आला, ' तू अजून चालत का बरं नाहीस?'

कारण मी काही कुठे फ्रान्सला वगैरे जाणार नाही. मी कोणाला हवी आहे तिथे? आणि तोलिकबद्दल मला हे नक्की माहीत होतं, की मी त्याला टाकून जाऊ शकणार नाही. ह्या वेळेपर्यंत त्याचे आई-वडील पार वेडे झाले होते. दररोज बेफाम पीत होते आणि त्याला मारत होते. ते का मारत आहेत हेच त्याला कळायचं नाही आणि तो जोरजोरात ओरडायचा. शेजारी-पाजारी म्हणायचे की इतर इमारतींतही ते ऐकू जायचं. मग मी वर त्यांच्याकडे जाऊन त्याला माझ्याकडे घेऊन यायचे. तो ताबडतोब शांत व्हायचा. सिर्योज्हकाबरोबर तो खोल्याखोल्यांतून सरपटायचा आणि वाफेच्या इंजिनासारखा शिट्ट्या मारायचा. सिर्योज्हका पाठीवर पडायचा, हात हलवायचा आणि हसायचा. लहानसा पाठीवर पडलेला, हसणारा मुलगा. तर मी कुठेच जायचं नाही असं ठरवलं.

फक्त ममाबद्दल तेवढं वाईट वाटलं.

म्हणून मग मी दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा काम शोधायला गेले. माझी एक जुनी वर्गमैत्रिण म्हणाली की तिच्या मालकाला अजून एका विक्रेतीची गरज आहे. रात्रीची ड्यूटी आहे. मला ते अगदी सोयीचं आहे कारण सिर्योज्हकाला आता दोन वर्ष पूर्ण झाली आहेत. तो रात्रभर झोपतो. अगदी पहाटेपर्यंत शू सुद्धा करत नाही.

''आणि पैसे देतील. ठीक आहेत वागायला.'' ती म्हणाली.

पण अखेरीस नेहमीप्रमाणे यातूनही काही निष्पन्न झालं नाही.

ती म्हणाली,''सांगू का– त्यांना मूलबाळ असलेली विक्रेती नको होती. ते म्हणाले, ''तू गोंधळ घालून ठेवशील.''

मी म्हटलं,''नाही, मी कसलेच गोंधळ नाही करणार.'' तिने फक्त खांदे उडवले.

मी पुन्हा म्हटलं, ''मी नाही करणार कसलेच गोंधळ.''

तर मग आम्ही एकमेकींकडे बघत समोरासमोर उभ्या राहिलो. मी कधी जाते आहे याची ती वाट बघत बसली. कारण मला तिने बोलावलं, याचाच तिला आता पश्चात्ताप झाला होता. आजूबाजूला मालाची दाटीवाटी होती. 'स्नीकर्स,' 'बाल्टिक नं ९' पण मला तरीही तिथेच थांबावसं वाटतंय. कारण मला माहीत आहे की अजून कुठूनच मला पैसे मिळणार नाहीत.

आणि मग तिथे कोपऱ्यात एक अगदी छोटा मुलगा मला दिसला. तो चार वर्षांचा असेल किंवा फारतर थोडा मोठा. एका भल्या मोठ्या झाडूने तो कचरा झाडून काढत होता. म्हणजे बहुधा नव्हताच झाडत कारण झाडू उंचीला जवळजवळ त्याच्या इतकाच होता. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी तो हलवणं त्याला भलतंच अवघड जात होतं.

मी म्हटलं, ''मग हा इथं काय करतो आहे? हा काय तुझा भाचा वगैरे आहे की काय? घरी सोडून यायला कोणी घरी नाही म्हणून?''

तिने माझ्याकडे बघितलं, ती हसली आणि म्हणाली, ''छे, भाचा कसला? उगाच नुसतं भंडावून सोडलं आहे. सारखे येतात. एकदा ह्याला हात लाव एकदा त्याला हात लाव. आत्ता आला आणि म्हणे, ''मावशी मला योगर्ट द्या.' म्हणून मी त्याला झाडू दिला, म्हटलं फुकट नाही देणार. एक बहिण आहे अजून त्याला.''

मी वळून पाहिलं तर उंबऱ्याशी मला एक मुलगी दिसली. त्याच्याहूनही लहान. तीही तशीच अस्वच्छ, घाणेरडी. उभी राहून आमच्याकडे बघत होती. तिचे डोळे चमकत होते.

मी जेव्हा आत आले तेव्हा माझं त्यांच्याकडे अजिबात लक्ष गेलं नाही. कारण कामाचं ठरवायची मला खूप निकड होती.

मी वाकून त्या मुलाला विचारलं, ''तुला काय योगर्ट पाहिजे?'' तो थांबला आणि अगदी हळू आवाजात मला म्हणाला, ''हो.''

''यापूर्वी कधी तू ते खाऊन पाहिलं होतंस?''

त्याचे गाल इतके मळकट होते!

तो म्हणाला, ''नाही.''आणि माझ्याकडे बघायला लागला. उंचीने त्या झाडू एवढाच. मग मी ताठ उभी राहिले आणि म्हणाले, ''तू प्लीज त्यांना योगर्ट दे. हे घे. पैसे.''

तर तिने माझ्याकडे बघितलं आणि मान हलवली आणि वर हसली. मी म्हणाले, ''त्यांना योगर्ट दे. मी तुला पैसे दिलेले आहेत.''

मग मी बाहेर पडले, बस स्टॉपपाशी उभी राहून रडायला लागले. कारण मला त्या मुलांचं वाईट वाटलं.

जणू काही गुलाम होते ते. फक्त अगदी लहान.

मग दुसऱ्या दिवशी वोफ्का शिपाग्लाझ आला. तो पुन्हा आमच्या गावात आला आहे हे मला माहितच नव्हतं. मला कोणीतरी सांगितलं की तो वडिलांबरोबर मॉस्कोला गेला आहे. त्यांचा तिथे कसलातरी बिझनेस आहे.

मी दार उघडलं तर हा समोर उभा, फरकोट आणि फरची कॅप घालून. बाहेर आता चांगलं गरम आहे तरीसुद्धा. अन् मी ममाचे जिमचे कपडे घातलेली. माझा टीशर्ट खांद्यावर उसवलेला.

त्यात अजून माझ्यामागून सिर्योज्हका बाहेर कॉरिडॉरमध्ये सरपटत आला. तिरका तिरका खेकड्यासारखा. तो एक पाऊल पुढे टाकतो आणि मग दुसरं ओढत, घसटत त्याच्याजवळ आणतो. पण अगदी भराभर. कारण आता तो तसा मोठा आहे. त्याला भराभर पळायचं असतं इकडे-तिकडे.

उघड्या दरवाज्यात जमिनीवर तो गारठू नये म्हणून मी त्याला उचलून घेतलं. तर असे आम्ही एकमेकांकडे बघत उभे राहिलो.

सरतेशेवटी तो म्हणाला, ''तुझी आई वारली असं मला कळलं.''

त्यानंतर आणखी दोनचार वेळा येऊन गेला. खायचे पदार्थ, चॉकलेट आणि डायपर्स घेऊन. खेळणी पण आणली होती पण ती सगळी काहीशी विचित्रच होती. तो पण तसा विचित्रच होता. अगदी बोलायचा नाही. फक्त एवढंच सांगितलं की वडिलांचं फार्महाऊस, फ्लॅट आणि गॅरेज विकण्यासाठी तो फ्लाईटने आला आहे. फक्त आठवड्याभरासाठी. यापलिकडे त्याला या गावात करण्यासारखं काहीही नाही.

हे असं त्याने स्वत:च सांगितलं.

सांगितलं आणि माझ्याकडे बघितलं. आणि मग सिर्योज्हकाकडे. म्हणाला, ''हा अजून चालत नाही का?''

मी म्हणाले, ''बर्थ ट्रॉमा.''

तर म्हणाला, ''हो? म्हणजे काय?''

मी म्हणाले, ''जेव्हा तो जन्मला तेव्हा माझं वय फार कमी होतं. कंबरेची हाडं खूप अरूंद होती. त्याला बाहेर काढण्यासाठी चिमटे लावावे लागले. त्यामुळे त्याच्या डोक्याला थोडीशी इजा झाली आणि मानेचे मणके थोडेसे सरकले.''

त्याने त्याच्याकडे पाहिलं अन् म्हणाला, ''कदाचित ऑपरेशन करायला लागेल?''

मी म्हणाले,''ते काही माहीत नाही. डॉक्टर म्हणतात वाट बघा. जसा वेळ जाईल तसं समजेल.''

यानंतर तो गायब झाला. येईनासा झाला. मला वाटलं की त्याने त्यांचं फार्महाऊस विकलं.

आणि मग शेवटी एकदाचं मला काम मिळालं. म्हणजे मी ते शोधायलासुद्धा गेले नव्हते. फक्त घरी बसले होते. वोफ्काने आमच्यासाठी तीन-चार वेळेला जे काही आणलं होतं ते खाऊन संपवलं होतं. चॉकलेटस् सगळी सिर्योज्हकाने खाल्ली.

मग नेहमीसारखीच विभागीय आली आणि आमच्यावर ओरडायला लागली.

ती म्हणाली, मी मूर्ख आहे. खरं तर जन्मल्या जन्मल्या माझाच गळा घोटायला हवा होता. सिर्योज्हकाला व्यवस्थित अन्न दिलं पाहिजे आणि मी कसली आई? आम्ही जमिनीवर बसून तिच्याकडे बघत होतो. ती ओरडत होती. पण सिर्योज्हका घाबरायचा थांबला होता, कारण त्याला आता तिची सवय झाली होती. तिच्या आवाजाने तो दचकेना. डोकं वर करून तिच्याकडे बघायचा आणि तोंड किंचित उघडं. हे असे मोठेमोठे डोळे, पण तो तिला घाबरत नाही हे उघड दिसत होतं. फक्त तिच्यावरून नजर हटवायचा नाही. मी त्याच्याकडे बघायचे अन् मला त्याची दया यायची. कारण त्याचं डोकं कायम डाव्या खांद्यावर कललेलं असायचं. त्यामुळे माझाच श्वास दाटल्यासारखा व्हायचा.

मग तिने विचारले, ''मला बसायला काही आहे का?''

मी म्हटले, ''काही नाही.''

कारण मी सगळ्या खुर्च्या विकून टाकल्या होत्या. अगोदरच कोच, मग खुर्च्या आणि त्यानंतर स्टुलं. तशीही सिर्योज्हकाला अन् मला ह्यांची गरजच नव्हती. तो आणि मी तसे सारखेच जमिनीवर असायचो.

त्यावर ती म्हणाली, ''मग मी पलंगावर बसते.''

मी म्हटलं, ''प्लीज बसा.''

ती बसली आणि सिर्योज्हका सरपटत तिच्या बुटांकडे गेला. मी त्याला उचलायला लागले. तर म्हणे, त्याची काही गरज नाही. मला आश्चर्यच वाटलं. कारण आधी तो तिच्या जवळ गेलेला तिला आवडायचा नाही.

ती म्हणाली,''माझ्या नवऱ्याने तुझ्यासाठी काम शोधलंय.'' ''त्याच्या बँकेत स्वच्छता, झाडझूड करायची अन् फरश्या पुसायच्या. पगार खूप चांगला देतील. निदान शाळेत तुझ्या आईला मिळायचा त्यापेक्षा जास्तीच. मला फक्त तू असा शब्द दे की आम्हाला तोंडघशी पाडणार नाहीस. कारण माझ्या नवऱ्याने तुझी खात्री दिली आहे. लोकांना कामावर घेतानाची त्यांची पॉलिसी फार कडक आहे. तुझ्या विश्वासार्हतेची खात्री हवी त्यांना. मला शब्द देशील का?''

मी म्हटलं,''कसला?''

कारण खरं तर मला नीटसं काही कळलं नव्हतं. मला तिचं बोलणं कळावं असं वाटत होतं, अगदी खूप खूप तरीही. ''नको. अगदी मूर्ख आहेस तू. मी असं विचारतेय की माझ्या नवऱ्याला तोंडघशी पाडणार नाहीस असा मला शब्द देतेस का? त्याने तुझ्याखातर शब्द टाकला आहे.''

मग मी म्हणाले, ''अर्थात. अर्थातच मी तुमच्या नवऱ्याला तोंडघशी पाडणार नाही. मला जे जे सांगतील ते ते सगळं मी करेन. सगळ्या फरशा अगदी नीट पुसेन. सगळी चिठोरी, कागद टाकून देईन.''

''ठीक आहे तर मग. तुझ्याकडून काय अपेक्षा आहेत ते कळलं म्हणायचं तुला. परवाच्या दिवशी पाच वाजता ह्या पत्त्यावर जा. संध्याकाळचं काम आहे. मुलाला कोणाजवळ ठेवता येईल का तुला?''असं म्हणून तिने मला एक कागद दिला.

मी म्हणाले, ''हो. हो. सगळं व्यवस्थित आहे. सिर्योज्हकाची अगदी काळजी करू नका. तो आता चांगला मोठा आहे.''

''ठीक आहे तर मग.'' ती म्हणाली. मग उठली आणि दारापाशी गेली. अगदी दारापाशी मागे वळून म्हणाली, ''त्याचं कसं काय चाललंय्?''

''सगळं छान चाललंय. थँक यू.'' मी म्हणाले.

ती गेल्यावर मला रडू कोसळलं.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सुमाराला पुन्हा शिपाग्लाझ आला. मला वाटलं होतं की तो गेला. म्हणून मला थोडसं आश्चर्य वाटलं. मी थोडी घाबरले पण; कारण वरच्या मजल्यावर दुपारपासून दारू पिणं सुरु झालं होतं. त्यामुळे मला तोलिकला माझ्याकडे घेऊन यावं लागलं होतं. नाहीतर त्याने ओरडून ओरडून सगळा रस्ता डोक्यावर घेतला असता.

सिर्योज्हका ताबडतोब वोफ्काच्या बॅगेकडे सरपटत निघाला होता. त्याच्यात चॉकलेटं असतात याची त्याला सवय झाली होती. पण वोफ्काने या वेळी त्याला काहीच दिलं नाही. फक्त तोलिक अन् सिर्योज्हका जमिनीवर कसे सरपटतायत हे बघत तो गप्प राहिला.

मग त्याने मला विचारलं, ''त्याला निदान बोलता तरी येतं का?'' आणि तो हे सिर्योज्हकाबद्दल बोलत नाहीये, हे मला समजलं. कारण सिर्योज्हकाबद्दल त्याने पूर्वीच सगळं विचारलं होतं.

मी म्हटलं,''नाही येत. जेव्हा भीती वाटते तेव्हा त्याला जोरात ओरडता येतं. पण मला ओळखतो तो.''

वोफ्काने विचारलं,''आणि इतरांना?''

''मला वाटतं, इतरांना नाही ओळखत.''

त्याने अजून थोडावेळ तोलिककडे बघितलं आणि मग पलंगावर बसला. काल विभागीय जिथे बसली होती तिथेच.

तो म्हणाला,''तुला सांगू का?, आपल्याला बोललं पाहिजे.''

मी म्हणाले,''कशाबद्दल?''

कारण तो किती नर्व्हस झाला आहे ते मला दिसत होतं. मी स्वत:ही थोडीशी नर्व्हस झाले होते.

तो म्हणाला,''मी उद्या मॉस्कोला परत जातोय.''

मी म्हणाले, ''मॉस्कोला-भारीच!''

सिर्योज्हका आणि तोलिक त्याची बॅग उपडी करतायत की काय म्हणून मी त्यांच्याकडे बघायला लागले. ते बॅगेच्या फारच जवळ गेले होते.

तो म्हणाला,''आपल्याला काहीतरी ठरवलं पाहिजे.''

मी त्याच्याकडे वळून बघितलं इतक्यात त्याच्या बॅगेतल्या सगळ्या वस्तू जमिनीवर घरंगळल्या. मी ताबडतोब तिकडे निघाले पण त्याने माझा हात धरला आणि म्हणाला, ''थांब. ते महत्त्वाचं नाही. त्यात काहीही महत्त्वाच्या वस्तू नाहीत. मला तुझ्याशी बोलायचंय.

मग मी त्याच्या शेजारी पलंगावर बसले. सिर्योज्हका अन् तोलिक हसत होते आणि जमिनीवर इकडे तिकडे त्याच्या वस्तू टाकत होते.

तो म्हणाला, ''त्याने इथे राहता कामा नये.''

तो हे तोलिकबद्दल बोलत नाहीये, हे मला समजलं. कारण तोलिकला तर त्याने आत्ता पाच मिनिटांपूर्वी बघितलं होतं आणि कदाचित त्याला त्याच्याबद्दल काहीच आठवतही नव्हतं.

पण मला तर आठवत होतं.

तो मला म्हणाला, ''थोडक्यात, मी सगळा विचार केला आहे. तू अन् मी असं करु या.''

मी त्यांच्याकडे बघत होते. ते दाराकडे निघाले होते. त्यांना कशाने तरी कापलं नाही म्हणजे मिळवलं. माझ्या मनात विचार आला. त्याच्या बॅगेत काहीतरी टोकदार वस्तू असायची.

तो म्हणाला, ''काय मग तुझी तयारी आहे ना?

मी म्हणाले, ''कशाची?''

तो माझ्याकडे बघत म्हणाला, ''मी आत्ताच तुला समजावलं. तू काय ऐकलं नाहीस का?''

मी म्हणाले, ''मी ऐकलं पण मी थोडी थकले आहे. आणि माझं डोकं पण थोडं दुखतंय.''

तो म्हणाला, ''महत्त्वाचं म्हणजे तू ह्या कागदावर सही करायचीस. मी सिर्योज्हकाचा बाप आहे. म्हणून तू माझ्याकडून कसलीही मागणी करणार नाहीस असं त्यात लिहिलंय. मी इथल्या एका वकिलाला विचारलं. अशा प्रकारचा कागद करता येतो.

आणि मग मी तुम्हाला माझ्याबरोबर घेऊन जाऊ शकतो. तुमच्यासाठी दोन खोल्यांची जागा भाड्याने घेऊ– ते ठीक आहे. महत्त्वाचं काय की मी सिर्योज्हाकाला मदत देईन. फक्त माझ्या वडिलांना इतक्यात काही बोलायला नको.''

मी त्याच्याकडे वळून म्हणाले, ''म्हणजे आम्ही तुझ्याबरोबर मॉस्कोला यावं असं तुला वाटतंय का?''

तो म्हणाला, ''हो. फक्त आधी ह्या कागदावर सही करावी लागेल. म्हणजे मग नंतर कोर्टात काही भानगड उपटणार नाही.''

मी म्हणाले,''कोणत्या कोर्टात?''

''अचानक तुला माझ्यावर खटला भरावासा वाटला की मी सिर्योज्हकाचा बाप आहे म्हणजे?''

मी त्याच्याकडे बघितलं अन् म्हणाले, ''मग आहेसच तू त्याचा बाप.''

तो म्हणाला, ''मला माहित्येय ते. पण ते इतकं महत्त्वाचं नाही.''

मी म्हणाले,''महत्त्वाचं नाही कसं? तो तुझाच मुलगा आहे.''

तो म्हणाला,''मला माहित्येय ते.''

मग उठून उभा राहिला आणि खोलीत येरझारा घालत म्हणाला, ''थोडक्यात म्हणजे ठरव. माझ्याबरोबर मॉस्कोला यायचं की नाही ते.''

तोलिकच्या भोवती भोवतीने सरपटणाऱ्या सिर्योज्हकाकडे मी बघितलं. मग वोफ्काकडे बघितलं, कसा तो आमच्या खोलीत मधोमध उभा आहे, फरकोट घालून, त्याने तर डोक्याची फरची टोपी काढलीसुद्धा नव्हती. मग मी म्हणाले,''आम्ही फ्रान्सला जाणारोत. अगदी लवकरच. बहुतेक तोलिकलासुद्धा आमच्याबरोबर नेऊ.''

वोफ्का माझ्याकडे बघतच राहिला आणि मग हसायला लागला. म्हणाला, ''तू तुझ्या आईसारखीच मूर्ख आहेस. तुझं पण डोकं फिरलंय. भानावर ये. ती गेली, ती नाहीये आता.''

त्यावर मी स्वयंपाकघरात गेले आणि खिडकीच्या कट्ट्यावरचं पत्र घेतलं. ते त्याला दिलं अन् म्हणाले, ''त्याचं पाकीट गेलंय हे खरं आहे. पण सगळे शिक्के व्यवस्थित आहेत. जर विश्वास बसत नसेल तर स्वत:च बघ.''

त्याने ते पत्र वाचलं आणि त्याची चर्या पालटली. लहानपणी तो सायकलवरून पडल्यावर मुलं हसली की जसं व्हायचं तसं.

मला तर त्याची दयाच आली.

तो म्हणाला, ''कधी निघणार आहेस जायला?''

मी म्हणाले, ''अजून माहीत नाही. उरल्यासुरल्या वस्तू विकायला हव्यात. आणखीही काही गोष्टी मार्गी लावायच्या आहेत.''

तो म्हणाला,''अस्सं.''

शेवटी एकदाची त्याने टोपी काढली. टोपीखालचे केस डोक्याला चिकटले होते. कपाळावर घाम आला होता.

''मदतीच्या योजनेबद्दल आभारी आहे. कदाचित आपली पुन्हा भेट होईलही.''

मग तो आपल्या वस्तू गोळा करायला लागला. अन् तोलिक अन् सिर्योज्हका त्याच्या भोवती सरपटत त्याच्या मधेमधे करू लागले, कारण तो त्यांच्याशी खेळतोय असं त्यांना वाटायला लागलं.

शेवटी एकदाच्या त्याने सगळ्या गोष्टी गोळा केल्या, उभा राहिला आणि फरकोटातून एक छोटासा टेलिफोन काढला. म्हणाला, ''घे. हे बटण दाबलंस की थेट मॉस्को कनेक्ट होतं. मी वडिलांच्या बरोबर राहत नाही. वेगळा राहतो. त्यामुळे तू कोणत्याही वेळी मला फोन करू शकतेस. इनकमिंग कॉलचे पैसे मी भरेन.''

मी म्हटले,''कशासाठी?''

त्याने माझ्याकडे बघितलं अन् म्हणाला, ''काय माहीत. कधी काय होईल कोण जाणे.''

मग त्याने सिर्योज्हकाकडे आणि तोलिककडे बघितलं. त्यांना ओलांडून तो बाहेर पडला. पाठोपाठ मी दार लावून घेतलं.

थोडावेळ मी तशीच उभी राहिले आणि हळुहळू शांत झाले. त्या दोघांनी कुरकुरायला सुरुवात केली. कारण वोफ्काने त्यांची सगळी खेळणी काढून घेतली होती आणि त्यांना त्याची बॅग उचकायला आवडलं होतं.

मी खाली वाकून तोलिकला टेलिफोन दिला आणि सिर्योज्हकाला पत्र दिलं. त्यांनी गप्प राहावं म्हणून.

ते गप्प झाले. कारण मुलांना सगळं मोडातोडायला आवडतं. सिर्योज्हकाला तर कागद फाडायला आवडतं.


तोलिक फोन जमिनीवर कसा आपटतोय ते मी बघितलं. पण माझ्या मनात काहीच विचार नव्हते. मला फक्त त्याच्याकडे बघायला आवडत होतं. मला सिर्योज्हकाकडे बघायलासुद्धा आवडत होतं. तो कसा कागद तोंडात घालत होता. थुंकून टाकत होता आणि हसत होता.

आणि मग तो सरपटत पलंगाकडे गेला. त्याच्या पाठीचा आधार घेऊन उभा राहिला. मग दोन्ही हात ताणले. मी त्याला दचकवायला नको म्हणून पटकन् खाली बसले आणि त्याच्या दिशेने हात पसरले. मग त्याने अजून एक पाऊल टाकलं. मला जागचं हलता येईना. मी फक्त त्याच्याकडे बघत राहिले. तो पुन्हा डुगडुगला आणि अजून एक पाऊल टाकलं. आणि मग मी म्हणाले, ''ये माझ्याजवळ! ममाजवळ ये!''

***

# पक्ष्यांसवे दूर

मूळ जर्मन लेखिका : इल्झे बोसे
भाषांतर: सुनंदा विद्यासागर महाजन



**परिचय: इल्झे बोसे**

**इल्झे बोसे ही एक जर्मन लेखिका आहे. यांचे फारसे लेखन प्रसिद्ध झाले नसले तरी काही संकलित कथासंग्रहात त्यांच्या कथा समाविष्ट झाल्या आहेत.**

**१९९३ मध्ये एका कथासंग्रहात विविध कथास्पर्धांत पुरस्कार प्राप्त झालेल्या कथा एकत्रितपणे प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यातूनच प्रस्तुत कथा घेतली आहे. त्या कथासंग्रहातील सर्वच कथा स्त्रियांनी लिहिलेल्या होत्या आणि त्या स्त्रीच्या आयुष्यातील घटना, प्रश्न, मानसिक आंदोलनं यांचा वेध घेणाऱ्या होत्या.**

***

**ग्र्यु**न कुटुंबाचं घर एखाद्या जलदुर्गासारखं दिसायचं. पाणथळ जागेच्या मध्यावर एका मोठ्या तराफ्यावर ते बांधलं होतं. तराफ्याच्या भोवतीने पाण्याने भरलेले रुंद खंदक होते. त्या खोल पाण्यावरून घराकडे जायला एकच पुलासारखा रस्ता होता. सगळा प्रदेश सरळसोट बांधलेल्या कालव्यांनी आणि छोट्या चिंचोळ्या डांबरी सडकांनी भरून गेला होता.

त्या पाणथळ प्रदेशावरचं आकाश नजरेला लांबवर पसरलेलं दिसायचं. नजर अडवणारं उंच बांधकाम तिथे नव्हतंच. हवेत क्षारांचं प्रमाण खूपच जास्त होतं, म्हणजे जिभेला त्याची चव जाणवावी इतकं. शहरांपेक्षा इथली हवा वेगळी होती. वाहनांचे धूर नव्हते. तेलावर चालणारे, घरं उबदार ठेवणारे रूमहीटर्सही नव्हते.

बारा वर्षांपूर्वी लेना आणि हाईनरिष प्रवासाला बाहेर पडले होते, तेव्हा समुद्रकिनारी अचानक त्यांच्या नजरेला हे घर पडलं आणि त्याच वेळी त्यांच्या लक्षात आलं की घेतलं तर हेच, ह्या घराशिवाय दुसरं कुठलंही घर आपण घेणं शक्य नाही.

त्यांचं नशीब जोरावर होतं. घराच्या त्यावेळच्या मालक-मालकिणीने घटस्फोट घेतला होता. त्यांचं कमनशीब ते यांचं सुदैव ठरलं आणि ग्र्युन मंडळींना त्यांचं हे

स्वप्नातलंच वाटावं असं घर तसं वाजवी किंमतीत मिळालं. लेना तेव्हा तीस वर्षांची होती. आपण आयुष्यात जपून ठेवलेलं स्वप्न इतक्या लवकर पूर्ण होतंय हे बघून ती चकित झाली होती. घर तसं आपलंसं आणि विश्वासू वाटायचं. घराचं छत मोठं आणि बरंच खालपर्यंत उतरत आलं होतं. त्याखाली हे कुटुंब वाऱ्यावादळापासून सुरक्षित राहू शकलं. गेल्या काही वर्षांत जवळच असलेल्या समुद्रावरून बरीच वादळं किनाऱ्यावर झेपावत आली होती. घर बांधणाऱ्यांनी शंभरएक वर्षांपूर्वी घराभोवती लावलेली झाडं चांगलीच मोठी झाली होती. वादळांमुळे झुकून झुकून ती पूर्वपश्चिम दिशांना वाकली होती.

१३ फेब्रुवारीच्या सकाळी रेडिओवर पहिल्या बातम्यांनंतर लगेचच वादळाची सूचना देण्यात आली. लेनाने आणि हाइनरिषने ती सूचना ऐकली तेव्हा दोघंही अजून अंथरुणातच होती. 'संपूर्ण उत्तर समुद्र किनाऱ्यावर तसंच एम्स नदीच्या खोऱ्यात तुफानी वादळाचा आणि पाणी आत येण्याचा धोका संभवतो. दुपारची भरती नेहमीपेक्षा सुमारे दीड मीटर जास्त उंचीची असेल. शिवाय दिवसभरात जोरदार हिमवर्षावाची शक्यता वर्तवली जात आहे.'

या ऋतूमध्ये चक्रीवादळ म्हणजे काहीच विशेष नव्हतं. बर्फ पडणार म्हणतायत ते जरा वेगळं होतं. हा वायव्येचा टापू काही बर्फाचा प्रदेश नव्हता. जमिनीच्या भागात जर खूप आतवर, ढग बरेच खालच्या पातळीवर उतरले तर पावसाचं रूपांतर हिमवर्षावात होतं.

तरीसुद्धा बातमी ऐकताना घरात सगळं सामान आणलंय का हा विचार लेनाच्या मनात ताबडतोब येऊन गेला. खरंच एकदा भरपूर बर्फ पडावा आणि सगळ्या जगाशी संबंध तुटावा हासुद्धा एक अनुभव आहे. पण जर जीवनावश्यक गोष्टी घरात नसतील तर त्यात काही मजा नाही. जरा वेळाने स्वयंपाकघरात नवऱ्याबरोबर नाश्ता घ्यायला ती बसली होती, तेव्हा त्याने गावातून काय काय आणावं त्या सगळ्या जिनसांची तिने एक यादी बनवली. त्याची गाडी पुलावरून खालच्या बाजूला वळली हे तिला स्वैंपाकघराच्या खिडकीतून दिसलं. मग ती आत वळली तर स्वैंपाकघरातल्या टेबलावर यादीचा कागद तिला दिसला.

म्हणजे आता तिला त्याला ऑफिसमध्ये फोन करायला हवा. कंटाळत तिने टेबल आवरलं. पुन्हा मस्तपैकी अंथरुणात शिरावं असं वाटत होतं, पण त्यानंतर परत उठणं तिला चांगलंच जड गेलं असतं, हे तिच्या लक्षात आलं.

लायब्ररीत जायच्या दिवशी ती हातासरशी भरभर काम करत असे. घड्याळाच्या काट्यानुसार ती झपाट्याने आवश्यक ते घरकाम आवरत असे आणि मग हाईनरिषबरोबरच गाडीने गावात जात असे. पण आज काही लायब्ररीत जायचा दिवस नव्हता.

अंथरुणं आवरताना तिला थोरल्या मुलाची – यान विलेमची आठवण आली. तो आता कील गावात शिक्षणासाठी राहत होता. दुपारपर्यंत तो गादीत लोळत राहयचा आणि काहीही करायचा नाही. म्हणून तिला त्याचा पूर्वी अगदी राग यायचा; पण तो इतका शांत स्वभावाचा आणि आनंदी होती की तिने मग त्याचा आळशीपणा आणि गलथानपणा पुन्हा पुन्हा माफ करून टाकला होता.

आता तर गिरट्ये– तिची छोटी गिरट्येसुद्धा सहा महिने झाले, दूर राहायला गेली होती. तिला अमेरिकेतल्या शाळेत एक वर्ष शिकायला मिळणार होतं. ते मिळवणं अर्थात शहाणपणाचं आणि बरोबरच होतं; पण तरी तेव्हापासून लेनाला खूप एकटं एकटं वाटत होतं. मुलं अजून घरीच राहणारी असती तर कदाचित तसं वाटलं नसतं.

तिने ताजी हवा आत यावी म्हणून जेव्हा झोपायच्या खोलीच्या खिडक्या उघडल्या तेव्हा पहिल्यांदा वादळ वाढल्याचं तिच्या लक्षात आलं. खिडकीच्या झापा तिच्या हातातून एकदम जोरात सुटल्या आणि त्या परत लावून घ्यायला तिला चांगलेच कष्ट पडले. वादळ जर उत्तर समुद्रावरून येऊन जमिनीवर फुटलं तर ते तसं कमी होणं शक्य नव्हतं.

नंतर घरातलं काम आटोपल्यावर बाहेर फिरायला जायचं लेनानं ठरवलं. तिला असं वादळात फिरायला जायला आवडायचं. ऊन पडलेलं असताना फिरायला जाण्यात तिला फारशी मजा यायची नाही. वादळाच्या उलट्या दिशेने जोरात चालायचं. आपली ताकद अजमावून पाह्यची असलं तिला आवडायचं किंवा वाऱ्याच्या दिशेने चालत स्वत:ला सैल सोडायचं. वादळाच्या हातात स्वत:ला सोपवून द्यायचं

आणि त्याच्याबरोबर भरकटत जायचं हे तर थोडं जास्तच आवडायचं. झोपायच्या खोलीत आरशासमोर उभं राहून तिने स्वत:ला न्याहाळलं. आधी चेहरा लांबडा करत आणि नंतर छानसं हसत.

जेव्हा ती बाहेरच्या लोकांना सांगायची की तिचा मुलगा बावीस वर्षांचा झालाय तेव्हा ते आश्चर्योद्गार काढणार अशी तिची अपेक्षा असे.

आज असा दिवस होता की आपण छान दिसत आहोत असं तिला वाटलं. म्हणून ती काही वेळ आरशासमोरच रेंगाळत उभी राहिली. पण हे असं अजून काही वर्षंच राहणार आहे हे तिला ठाऊक होतं. मग वाढतं वय निर्दयपणे डोळ्यांच्या आणि ओठांच्या भोवती आपल्या रेषा कोरून ठेवेल. हाईनर आपल्या ओठांविषयी अजून एकदाही काही असं बोलला नाही, विचित्रच आहे. अगदी आईबाबाही पूर्वी तिच्या ओठांचं कौतुक करायचे, म्हणायचे, कुणीही पटकन चुंबन घ्यावं इतके सुंदर आहेत ते.

लेनाने आरशातल्या आपल्या प्रतिमेपासून रजा घेतली आणि ती झोपायच्या खोलीतून बाहेर आली. ती धुण्याच्या खोलीत गेली. वॉशिंग मशिन लोड करायला हवं होतं. धुण्याच्या खोलीची खिडकी बाहेर अंगणात उघडत होती. अंगणाला लागून बाहेरच्या बाजूला सध्या वापरात नसलेल्या ऑफिसेसच्या काही इमारती होत्या. एक क्षणभर लेनाला असं वाटलं की तिथे बाहेर काहीतरी हालचाल आपल्याला जाणवतेय का काय. त्या क्षणी तिचं हृदय धडधडायला लागलं. खरं तर त्यांच्याकडे एक कुत्रा असायला हवा होता. पण हाईनरिषला आणि यान विलेमला कुत्री आवडत नसत. बाहेरच्या दाराची लॅच लेनाने खाली ओढली. बंद!

शिवाय इकडे कोणी येतही नसे. बाहेरच्या मोठ्या रस्त्याकडून त्यांच्या घराकडे येणारा एकच एक अरुंद रस्ता होता. बरेचदा ते गंमतीने ओळखीच्या लोकांना म्हणायचेसुद्धा, रविवारी कॉफीला आमच्याकडे कोण येणार आहे हे आम्हाला शुक्रवारीच कळतं. नऊ वाजायला आले होते. आता बातम्या ऐकाव्यात आणि ताजा हवामानाचा अंदाज घ्यावा असा विचार करत लेना स्वैंपाकघरात गेली.

सारायेवो! सारायेवो! मला अगदी ऐकायचं नाही, आता हे ऐकवत नाही मला. सारायेवोच्या बायकांचं ऐकायचा मला का सारखा त्रास?

त्या दु:खात आहेत म्हणून मी कशाला दु:खात राहू! त्यांच्या दु:खाला कारण आहे काही. मला नाहीये तसलं काही.

लेना, काय शरम वाटतेय का असं म्हणायची? जरा विचार कर, त्या सारायेवोच्या बायकांचं काय होत असेल!

हवामानाचा अंदाज सुरू झाल्यावर मग लेनाने रेडिओ मोठा केला... ''उपकरणांनी वादळातल्या वाऱ्याचा वेग बारा दाखवला आहे. याशिवाय जोरदार बर्फवृष्टी संभवते. दिवसभरात दक्षिणेकडच्या भागातही ती पसरत जाण्याची शक्यता आहे.'' लेनाने रेडिओ बंद केला आणि ती मागच्या व्हरांड्यात फोनपाशी गेली.

''ग्रीन बोलतेय. गुड मॉर्निंग, मिसेस लागीस. माझे पती आहेत ऑफिसमध्ये? हं, हॅलो हाईनर, मला तुला डिस्टर्ब करायचं नाही; पण तू सामानाची यादी टेबलावरच विसरलास. फोनवर सांगू का ती? टॉयलेट पेपर, मार्गारिन, ब्रेड... अरे हे खरंच महत्त्वाचं आहे आणि बिस्किटचा एकच पुडा उरलाय. मिरी, तेल, केळी, कॉटेज चीज आणि कॉफी, पण पोटाला सौम्य वाटणारी हं. हवामानाचा अंदाज काहीच्या बाहीच सांगतायत. तू लवकर नाही का येऊ शकणार? अं काय बोलतोयस? अरे, फोनमध्येच काहीतरी गडबड आहे पुन्हा. हं हं, बरोबर. ती तुमची गाण्याची प्रॅक्टिस आहे, नाही का? पण हवा जर इतकी खराब होणार असेल, तर त्याला तरी कोण येतंय! असो, तुला माहितीच आहे ते. आज दुपारी मग परत एकदा फोन करते. हं. बाय, हाईनर.''

फोन खाली ठेवल्यावर वादळात एक छोटासा फेरफटका मारायचा लेनानं ठरवलं. तिने ओव्हरकोट घातला आणि गमबूट चढवले. एक मोठा मफलर डोक्याभोवती आणि गळ्याभोवती गुंडाळून घेतला, आणि ती घराबाहेर पडली. तिच्या खिशात घराची किल्ली असल्याची खात्री तिने आधी करून घेतली.

तिला वाटलं, वादळाचं वर्णन करणारे शब्द शोधावे. अशा प्रकारचे भाषाशैलीचे प्रयोग तिच्या एकट्याने करायच्या भटकंतीत ती नेहमी करायची. गरजणे, पाठलाग करणे, सोसाट्याचा वारा सुटणे, शीळ घुमणे, गदागदा हलवणे, वेगाने वाहणे, घूं घूं आवाज करणे, तक्रारीचा आवाज येणे, ढकलणे, घुसळणे, उच्छाद मांडणे, मुळासकट उपटणे, नाश करणे. खाली खोल जायच्या रस्त्याच्या जोडणीपाशी ती आली.

अंगणात जरी वादळ तसं थोडं नरमाईने वागलं होतं, तरी संरक्षित भाग सोडून ती बाहेर पडतेय तोच त्यानं तिला सर्व शक्तीनिशी गाठलं.

वादळाच्या विरुद्ध बाजूला नको चालायला. तिने विचार केला. त्याच्याच बाजूने चालत ढकलून घेऊयात. पण आजूबाजूची वावरं पावसाने इतकी चिखलमय झाली होती की त्यावरून चालणं अशक्यच होतं. मोठ्या रस्त्याकडे जाणारा एकच पक्का रस्ता होता. मग तिला वादळ अंगावर घेत उलट्या बाजूनेच जायला लागणार होतं.

वा छान, मग उलटी उभी राहून पाठीमागे चालत जाते.

पण पुन्हा तसंच. नेहमीचंच आहे. मला जेव्हा पुढे जायचं असतं तेव्हा वादळाच्या विरुद्ध बाजूनेच जावं लागतं. पण उलटं पाठीमागे चालत गेलं तर विजेच्या वेगानेच ढकलत जातंय. पूर्वीच्या काळी बायकांना खूप जास्त कामं होती. उदाहरणार्थ आमच्या घरात शंभर वर्षांपूर्वी जी शेतकरी बाई राहत होती, तिला इतका विचार करायला वेळच नव्हता.

मी जर आत्ता शेतकरीण असते तर मी पण भल्या पहाटे उठून गायींच्या धारा काढल्या असत्या. मुलांना शाळेत पाठवलं असतं, आजारी आजीची शुश्रुषा केली असती, शेतकऱ्यासाठी अन् सगळ्या कुळांच्या न्याहारीसाठी टेबल लावलं असतं, धुणं भिजवलं असतं. ब्रेडसाठी कणिक तिंबली असती. नाही नाही. हे नाही बरोबर. धुण्याचा दिवस आणि बेकिंगचा दिवस एकाच दिवशी असणं शक्य नाही. बरं तर, दोन्हीपैकी एक केलं असतं.

लेनाने त्यातून धुण्याच्या दिवसाची निवड केली. कदाचित तेवढं तरी तिच्या आताच्या कामाशी समांतर असं काम होतं म्हणून असेल. आणि आता स्वैंपाकघरातल्या ओट्याशी उभं राहून दुपारचं जेवण रांधायचंय. एकच कुठलातरी पदार्थ. रोज एकच, रविवार सोडून. तिच्या आजीकडून ती हे शिकली होती. मोठा रस्ता येईपर्यंत लेना वादळाशी झुंजत गेली. पोस्टाची पिवळी गाडी तिच्यापाशी येऊन थांबली.

पोस्टमनने तिला अदबीने विचारले, ''मिसेस ग्रुन, तुम्हाला सोडू का?''

''नाही, नाही. नको. मला वादळात चालायला आवडतं. मलाच द्या टपाल म्हणजे लगेच वळून जाता येईल तुम्हाला.''

त्याला नीट ऐकू जावं यासाठी तिला व्यवस्थित ओरडूनच बोलायला लागत होतं.

पोस्टमन मोठ्याने बोलत होता. ''अहो, जर हवामानाचा अंदाज खरा ठरला, तर मी उद्या नक्कीच तुमच्याकडे येऊ शकणार नाही. हॅव अ गुड मील!'' एवढं बोलून त्याने तिच्या हातात टपाल कोंबलं.

''थँक्यू, मिस्टर क्लाईन आणि अच्छा!''

पत्रं आणि वर्तमानपत्रं उडून जाऊ नयेत म्हणून तिने ती छातीशी घट्ट धरली. पत्रांमध्ये बरीचशी पाकिटंही होती. तिच्या छातीत धडधड व्हायला लागली. कदाचित आज आलं असेल का...! पोस्टाचे शिक्के पाहिले तरी कळेल म्हणा. ब्रेमेन, डोर्टमंड, बेन्झाइम, पण ज्याची ती कित्येक आठवड्यांपासून चातकासारखी वाट पाहत होती ते पत्र त्यात नव्हतं.

तिला आधी वाटलं होतं तसंच झालं. वादळानं तिला नेमकं तिच्या जलदुर्गावर आणून सोडलं.

घराचं दार उघडताना तिला कवितेच्या ओळी आठवत होत्या. त्या तिने मनात म्हटल्याही...

माझी भिजते पापणी
डोळा दाटू येते पाणी
आता वाट मिळो त्यांना...
माझ्या मुक्या आसवांना

दुपारी बर्फ पडायला सुरुवात झाली. लेना बराच वेळ हिमकणांचा तो रानटी झंझावात बघत राहिली. आणि या सुंदर जाणिवेने तिला ती लहान असताना बर्फवृष्टी पाहताना कसं वाटायचं याची आठवण झाली. तिची स्वत:ची मुलं जेव्हा छोटी होती तेव्हाच्या पहाटवेळची तिला आठवण आली. रात्रभर पडून साठलेला बर्फ मुलं बघायची. झोपेतून नुकतंच उठल्यामुळे गरम असलेलं अंग लेनाच्या अंगावर झुकवत

उभी राहायची. देवाने आपल्याला ही केवढी सुंदर भेट पाठवली या विचाराने जणू भारावून जायची. आणि मग ज्या देवाने एवढी भेट पाठवली, त्याला गाठणं शक्य नसल्याने त्याची प्रतिनिधी मानून आपले झोपाळू उबदार गाल लेनाच्या चेहऱ्यावर ठेकवून तिची पापी घ्यायची. बर्फ मग धाडसाला प्रोत्साहन द्यायचा. तळघरातून बर्फावरच्या घसरगाड्या काढून घ्यायच्या, अस्पर्श अशा बर्फाच्या पृष्ठभागावर पायांचे ठसे उमटवायचे, पक्ष्यांच्या वस्तीजवळ जाऊन त्यांच्यासाठी खूप, कसदार टपारे दाणे टाकायचे, बर्फाचे डोंगर तयार करायचे, बर्फाचा माणूस तयार करायचा. एक ना दोन कितीतरी धमाल गंमतीचे खेळ खेळायचे; पण लहानपणाचा बर्फ कसा शांत आणि ज्याचा अंदाज येऊ शकायचा असा बर्फ होता.

आताचं मात्र हिमवादळच आहे. असं लेनाने कधी बघितलंच नव्हतं. ते विलक्षण होतं. हृदयाची धडधड वाढवणारं होतं; आणि तितकंच भीतीदायकही. दलदलीच्या प्रदेशात घरात ती एकटीच होती. वीज गेली तर काय करणार? हाईनरला गाडी घेऊन परत येता आलंच नाही तर? तिला दोन गोष्टी करणं भाग होतं.

पहिली गोष्ट म्हणजे हाइनरला फोन करणं. त्याला त्याची संध्याकाळची गाण्याची तालीम रद्द करायला लावणं आणि लवकरात लवकर त्याला घरी यायला सांगणं. मग तिला मागे गोठ्याच्या जागी जाऊन लाकडं आणायला लागणार होती. शक्य होतील तितकी. नशीब हाइनरनं वीकेण्डला बरीच लाकडं तोडून ठेवली होती. कारण जर वीज गेली असती तर तिला शेकोटी लागणार होती. त्यांच्या बैठकीच्या खोलीत सुंदर डॅनिश पद्धतीची फायरप्लेस बसवली होती. निदान तिथे तरी मग थोडं उबदार वाटत असे.

हाइनर त्याची गाण्याची तालीम रद्द करायला राजी नव्हता. अर्थात तिला ते तसं वाटलंच होतं. इस्टरच्या सणाला अजून फक्त आठ आठवडे होते. हाइनरला त्याच्या कोरस ग्रुपचा अभिमान वाटायचा. गुड फ्रायडेला छानपैकी कॉन्सर्ट सादर करण्याचा ध्यासच त्याने घेतला होता. अगदी पूर्णपणे.

फोनवरच्या या संभाषणाच्या वेळीसुद्धा वेडेवाकडे आवाज येत होते. ''पण मग रात्री तिथेच राहिलेला बरा. तुला नक्कीच कोणाकडे तरी रात्रीचा मुक्काम करता येईल. तू कुठेतरी बर्फात अडकून पडण्यापेक्षा मला हे परवडेल.''

आपल्या या जलदुर्गात एकटं अडकून पडण्याच्या विचाराने तिला थोडी भीती वाटत होती. तरीसुद्धा ती असं म्हणाली. ''छे, काहीतरीच काय. मी येतोय घरीच. मी आज संध्याकाळी पुन्हा एकदा फोन करीन. नीट राहा गं सोने.''

हं हे झालं एक, आता दुसरं.

लेनाने मोठ्या हॅण्डलची बास्केट घेतली आणि बर्फाच्या झंझावातातून गोठ्यापर्यंत जाण्यासाठी धुण्याच्या खोलीच्या मागच्या दारातून बाहेर पडली. पुरेसं लाकूड घरात आणून ठेवायचं तर तिला बहुतेक चार-पाच हेलपाटे घालावे लागणार होते.

पुढचा काही तासांचा काळ हा तसा तिला फारसा अवघड दिसत नव्हता. जर वीज गेलीच तर निदान ती फायरप्लेस पेटवू शकणार होती आणि जोडीला मेणबत्त्या.

मग बैठकीच्या खोलीतच उबेत छानपैकी बसायचं, मस्तपैकी कॉफी प्यायची आणि कविता वाचायच्या...

पंख पसरून वाटे झेप मुक्तपणे घ्यावी
आणि पाखरासारखे आज दूर दूर जावे
खोल हुंगूनिया श्वास, घ्यावा पिऊनिया वारा
आणि मोकळ्या आभाळी उंच उडत राहावे...

विचारांबरोबर ती दूर दूर उडत जाईल. यान विलेमकडे आणि गिरट्येपर्यंत? हो, तसंसुद्धा. पण तिथूनही तिला पुढे उडायचंय, पुढे...

गोठ्याचं ते भलं मोठं दार तिला धड उघडता येईना, इतका वादळाचा जोर होता. आतल्या अंधुक प्रकाशाची डोळ्यांना सवय होईपर्यंत थोडासा वेळ लागला. नशीब, तोडलेल्या लाकडाचा ढीग समोरच लावून ठेवला होता.

लेनाला गोठ्यात जायला नेहमीच भीती वाटायची. कारण तिथे बरेचदा उंदीर असायचे. तिच्या नशिबाने तिच्या नजरेला कधी उंदीर पडला नव्हता; पण तरी तिने आत मोठ्याने आणि बेसूर अशी शिट्टी वाजवत प्रवेश केला, आपल्या शिट्टीने घाबरून उंदीर पळून जातील या आशेने! संगीताविषयी ती एवढी अनभिज्ञ होती, याचं हाइनरला खूप वाईट वाटायचं. पण उंदरांना पळवून लावण्याइतकं तिचं शिट्टीचं संगीत पुरेसं होतं.

लाकूड भरायची टोपली लेनाने पूर्ण भरली. घराच्या मागच्या दाराशी वाहून नेली. धुण्याच्या खोलीत ती बास्केट रिकामी केली आणि परत ती गोठ्यात आली. असे पुष्कळ हेलपाटे तिला घालावे लागले. हिमवादळाचा भर तोपर्यंत वेड्यासारखा वाढतच राहिला. काम संपल्याच्या समाधानात लेनाने लाकडांनी गच्च भरलेली शेवटची बास्केट धुण्याच्या खोलीत आणून टाकली. तिला धाप लागली होती. त्याचवेळी तिला एक आवाज ऐकायला आला. एकदमच समोर काहीतरी अवतीर्ण झाल्यासारखं तिला वाटलं; आवाज अगदी जवळून आला होता.

बर्फामुळे समोरचं काही दिसत नव्हतं, त्यात हा आवाज कानावर पडला. त्यामुळे लेना भीतीने एवढी गोठून गेली की तिला ओरडताही येईना.

''प्लीज, बाईसाहेब, घाबरू नका. मी तुम्हाला काही करणार नाही, नक्कीच नाही. प्रभू येशूची शपथ.''

बर्फाच्या वादळात तिच्या शेजारी एक माणूस येऊन उभा राहतो काय आणि म्हणतो काय, ''प्रभू येशूची शपथ.''

ती भारावून गेली. म्हणजे तिला अक्षरश: क्षणापूर्वी मरणप्राय भीती वाटत होती. तरीसुद्धा त्यामुळे लगेच मागच्या दाराकडे झेप घेऊन स्वत:ला वाचवायचा प्रयत्न करावा असं तिला वाटलं नाही. एखादा खुनी किंवा एखादा चोर असं म्हणू शकेल? फार फार तर 'देवाशपथ' असं म्हणाला असता एखादा, कारण तसा सगळ्यांच्या तोंडात बसलेला तो वाक्प्रचारच आहे म्हणून.

''तुम्ही आलात कसे इथपर्यंत?''

तिला वाटलं हा प्रश्न विचारताना आपण प्रत्येक शब्द दोनदोनदा का म्हणतोय! ''तुम्हाला काय हवंय?''

''बाईसाहेब, काही नको. कालची रात्र मी तुमच्या गोठ्यात झोपलो होतो.''

खरंच की, म्हणजे सकाळी मला हालचाल जाणवली ते बरोबरच होतं.

''आमच्या गोठ्यात? तुम्ही काय भटके, बेघर आहात का काय? म्हणजे गोठ्यात आश्रयाला भटके, बेघर येतात असं अजून चालू आहे का काय? मला तर वाटतंय, मला भासच होतोय. पण आता मग काय करणार आहात तुम्ही?''

''हवा बघा ना, मला पुढे जाणं शक्यच नाही हो.'' तिला हिमवादळात तो कसा दिसतोय हे नीट कळतच नव्हतं.

''मला तुम्ही खरंच काही करणार नाही ना?'' तिने असा प्रश्न विचारला खरा आणि लगेच तिच्या लक्षात आलं की त्याच्याइतका मूर्ख आणि निरर्थक प्रश्न कुठला नसेल. तो म्हणाला, ''प्रभू येशूची शपथ, मी तुम्हाला काही करणार नाही.''

हे त्याचं बोलणं निर्णायक ठरलं. जुन्या कादंबऱ्यात असतं तसं तो बोलला. हल्ली कोणी असं बोलत नाही. होफमान किंवा चार्लस् डिकन्सच्या कादंबऱ्यांत असतं तसं. लेना त्याला म्हणाली, ''या माझ्याबरोबर आत.''

धुण्याच्या खोलीत तिला त्याचा नीट अंदाज आला. तो बराच म्हातारा होता, गबाळा होता; पण त्याच्यात असं काहीतरी होतं की त्यामुळे तिला कशाची तरी सारखी आठवण येत होती. तिने त्याला विचारलं, ''भूक लागलीय?''

भीतीवर या असल्या व्यवहारातल्या प्रश्नाने मात केल्यासारखं झालं.

''होय बाईसाहेब, आपली परवानगी असेल तर...!'' फायरप्लेससमोर डिकन्सची एखादी कादंबरी वाचता वाचता आपल्याला झोप लागलीय आणि आता आपल्याला हे स्वप्न पडतंय की काय! लेनाला कशाचा नीट उलगडा होत नव्हता; पण फायरप्लेसमध्ये विस्तव पेटवायला तिने आता तर लाकडं आत आणली होती. म्हणजे मग फायरप्लेसच्या उबेत तिला झोप लागून गेलीय असं नाही म्हणता येणार.

तिने विचारलं, ''तुमचं नाव काय आहे?''

''मॅक्स'' हे सांगताना तो थोडासा अदबीने खाली झुकला.

''नेमकं हेच नाव. मॅक्स आणि पुढे काय?''

''बाईसाहेब, मॅक्स. नुसतं मॅक्स. माझे सगळे मित्र मला मॅक्सच म्हणतात.''

हाइनर रात्रभर कदाचित घरी परतणार नाही अशी शंका वाटत असूनही लेनाने त्या भटक्याला घरात घेतलं. याला बरीच कारणं होती.

खूप वर्षांपूर्वी एका भटक्यानेच तिच्या आयुष्यातील सर्वांत सुंदर असा स्तुतीपर शेरा तिला ऐकवला होता. तेव्हा ती भर तारुण्यातली युवती-कॉलेजकुमारी होती. गावात एका बसस्टॉपवर उभी होती. तेव्हा ती यान विलेमच्या वेळी गरोदर होती.

कदाचित गरोदरपणाच्या त्या पहिल्या दिवसांची विशेष झळाळी तिच्या अंगावर उमटली असावी.

काही का असेना, तेव्हा एक भटक्या त्याच्या काही मित्रांबरोबर फुटपाथवर बसला होता. तो उठून तिच्याकडे आला. तिच्यासमोर अदबीने झुकला आणि म्हणाला होता, ''तुमची परवानगी असेल तर मी तुमच्याकडे पाहीन म्हणतो, कारण तुम्ही एवढ्या निरागस दिसत आहात, खरंच.''

लहानपणी वाचलेल्या बालकथांमुळे असेल, तिच्या मनात भटक्या लोकांविषयी आस्था असे. ती त्यामुळे अधिकच वाढली.

''या ना, आत या, प्लीज.'' असं म्हणत तिने म्हाताऱ्याला स्वैंपाकघरात नेलं.

तिने त्याच्यासाठी एक खुर्ची पुढे सरकवली. मग शेगडीवर पाणी आधणासाठी चढवलं आणि इन्स्टंट सूपचं एक पाकीट कपाटातून काढलं. तिला वाटलं, खऱ्या शेतकरीण बाईकडे खरं घरचं सूप शेगडीवर रटरटत असतं आणि जोडीला व्यवस्थित ब्रेड. मोठ्या लोफमधला. त्यातूनच तिने आता स्लाईसेस कापून दिल्या असत्या. त्याऐवजी हा वाळवलेला कुरकुरीत ब्रेड आहे आपल्याकडे. सगळं केवळ शरीर सुडौल दिसण्यासाठी. वेडेपणाच नसता.

असला कुरकुरीत ब्रेड खाऊन, कमी स्निग्धांशाचं लोणी आणि चीज खाऊन ह्या भटक्या माणसाचं पोट भरू शकेल हे लेनाला खरं तर पटत नव्हतं. पण तिच्याकडे दुसरं काही द्यायला नव्हतंही.

ती माफीच्या सुरात म्हणाली, ''प्लीज, घ्या ना. आम्ही नेहमी असंच खातो. जाड व्हायला नको म्हणून.'' अरे देवा, किती बावळटपणा. इन्स्टंट सूप आणि लो फॅटचं चीज! शी!

तिचं आयुष्यही थेट तसंच होतं. म्हाताऱ्याला काही फरक पडत नव्हता. त्याने चार बाऊल भरून सूप प्यायलं आणि कुरकुरीत ब्रेडला कमी फॅटचं चीज लावून चार तुकडे खाल्ले. त्याचं खाऊन संपलं, तेव्हा तो उठला आणि त्याने तिचे आभार मानले.

लेनाने विचारलं, ''आता काय?'' पण त्याला तर थांबणं भाग आहे.

असल्या हवेत ती एका म्हाताऱ्याला पुन्हा रस्त्यावर काढणं शक्य नव्हतं. बुचकळ्यात पडून म्हाताराही दाढी कुरवाळत राहिला.

''अं, जर तुम्हाला हवं असेल तर अजून थोडा वेळ थांबलात तरी चालेल.'' अजून तिची भीती पूर्णपणे गेली नव्हती; पण तरी बरीच कमी झाली होती. ''गारठला असाल तर गरम पाण्याने आंघोळ करा हवी तर.''

आपल्या घरात इतकं कळकट कुणी असलेलं आपल्याला आवडत नाही असं त्याला म्हणायचं तिला धाडस झालं नाही.

तो समाधानाने म्हणाला, ''हो, आणि तशी साफ-सफाई करायचीही वेळ झालीच आहे.''

आणि नंतर? त्याच्या जुन्या कपड्यांचं काय? तो काही हाइनरएवढा उंच नव्हता; पण त्याऐवजी थोडा जाड होता. छे, नाही. हाइनरचे कपडे त्याला नाही यायचे. तेवढ्यात तिला आठवलं, माळ्यावरच्या कपाटात तिच्या वडिलांचा एक सूट होता. तो होईल नक्कीच. तिला तो सूट सापडलाही. त्यावर बारीक रेघांचं डिझाईन होतं. गडद रंगाचा होता. तिच्या आईला काहीही फेकून द्यायचं जीवावर यायचं. शेवटी सूट वडिलांना घट्ट व्हायला लागल्यावर ठेवून दिला होता. थोडे जीर्ण झालेले आतले कपडेही तिला सापडले. खालच्या ड्रॉवरच्या तळात होते ते. शर्ट आणि मोजे मिळणं काही अवघड नव्हतंच.

त्याचे जुने कपडे मात्र तिने धुण्याच्या टबात भरपूर धुण्याची पावडर घालून गरम पाण्यात भिजवले. प्रत्येक कपडा आत बुडवताना तिने लांब काठी वापरली. कपडे भिजवताना तिला वाटलं की शंभर वर्षांपूर्वीच्या शेतकरीणबाईने असेच भिजवले असतील कपडे. काही वेळाने ती बैठकीच्या खोलीत छान पेटलेल्या फायरप्लेससमोर त्या म्हाताऱ्या माणसाबरोबर बसली, तेव्हा तो नीटनेटका, व्यवस्थित दिसत होता.

वादळाने तर आता चांगलाच जोर धरला होता. वेगाने घुसळत खालीवर उडणाऱ्या पांढऱ्याशुभ्र हिमकणांचा एक दाट, अभेद्य पडदाच जणू समोर उभा राहिला होता. तिच्या आजोबांचं तिला मिळालेलं घड्याळ टिकटिकत होतं, काचेच्या मागे फायरप्लेसमध्ये लाकूड धडधडत होतं आणि बाहेर वादळ घोंघावत होतं. त्यानं

जर मला जीवे मारलंच तर निदान अशा शैलीपूर्ण वातावरणात तरी आयुष्य संपवता येईल असा तिने विचार केला; पण खरं तिला नुसतं असं वाटलं, तेही गंमतीतच.

हाइनरने फोन काही केला नाही. त्याने अर्थात बऱ्याच वेळा प्रयत्न केला पण लाईनच बंद होती. एवढ्या मोठ्या दलदलीच्या प्रदेशात कुठे तरी केबल तुटली असणार आणि त्याला काही झालं तरी घरी यायचंच होतं, कारण लेनाची त्याला काळजी लागून राहिली होती. ती गेल्या काही महिन्यांत पूर्वीपेक्षा खूप बदलली होती.

ती अशी मधूनमधून एखाद्या वेळी दुःखी व्हायची, खूप आतवर. मग ती जे जे करायची ते ते खूप अतिशयोक्त पद्धतीने; पण मग दुःखी क्षण नंतर निघून जायचे. पण गेल्या काही महिन्यांत तिचं सारं आयुष्यच दुःखाने व्यापलं आहे असा सगळा नूर दिसत होता.

कदाचित मुलं दूर गेलीयत म्हणूनही असेल. गाण्याची प्रॅक्टिस खरंच पुढे ढकलावी आणि लेनाकडे निघावं. नंतर रात्री एवढ्या बर्फामधून गाडी चालवत नेणं दुरापास्त होईल. पण आता मात्र खूप उशीर झाला होता.

वादळामुळे बर्फांच्या मीटर मीटर उंचीच्या लाटा तयार झाल्या होत्या. रेडिओवर कधीपासून हिमवादळाच्या भीषण आपत्तीविषयी बोलणं चालू होतं आणि गाडी चालवणाऱ्यांना गाड्या न हाकण्याविषी इशारा दिला जात होता.

दलदलीच्या मध्यभागी जलदुर्गातील उबदार फायरप्लेससमोर, मोठ्या संरक्षक छताखाली लेना आणि तिचा तो अवचित पाहुणा बसले होते.

लेना म्हणाली, ''तुमचं नाव नेमकं मॅक्स आहे. मजेशीरच आहे.''

''मॅक्स हे अगदी नेहमीचं नाव आहे. माझं नाव मॅक्स आहे हे तुम्हाला मजेशीर वाटत असेल तर याचा अर्थ तुम्हाला अजून एखादा मॅक्स माहीत आहे.''

एखाद्या अनुभवी मनोवैज्ञानिकाला शोभेल अशा आत्मविश्वासाने तो बोलला.

''तुम्ही एखाद्या भटक्या माणसासारखं आजिबात बोलत नाही आहात. तुमचं बोलणं एखाद्या सुशिक्षित माणसासारखं वाटतंय. काय, तुमची कथा तरी काय आहे?''

''माझ्या एक का अनेक कथा आहेत. माझी कथा मी कोणाला सांगतोय यावर ती अवलंबून असते. चर्चमधल्या फादरला सांगण्यासाठी एक कथा आहे, तर एकट्या राहणाऱ्या विधवा बायकांसाठी वेगळी आणि एखाद्या लॉजवरच कायमचं राहणाऱ्या आणि सामाजिक कार्य करणाऱ्यांसाठी आणखीच वेगळी.''

''आणि माझ्यासाठी? मी कोणत्या गटात बसणारी आहे?''

''हं. खरं तर आधी मी तुम्हाला एकट्या राहणाऱ्या विधवा बायकांच्या गटात टाकलं होतं.''

''म्हणूनच तर तुम्ही प्रभू येशूची शपथ म्हणाला होतात तर. आणि मी? देवा, मला तेच खरं वाटलं.''

तो म्हातारा म्हणाला, ''माझ्या प्रत्येक गोष्टीत थोडं तरी खरं असतंच. मलाच माझी खरी कथा नीट माहीत नाहीये. पण मला तर वाटतंय, तुम्हीच काहीतरी लपवता आहात. मॅक्सचं काय, तुमची मॅक्सची काय कथा आहे?''

लेनाने खांदे उडवले.

''मघाशी तुम्ही मला जेव्हा इतक्या प्रेमाने घरात घेतलंत, तेव्हा तुम्ही इतक्या निवांत आणि उत्साही दिसत होतात आणि तुम्ही इतक्या सहजपणे, झटपट गोष्टी हातावेगळ्या करत होतात की तुमच्याकडे बघत राहावं असं मला वाटत होतं, आणि आता तुम्ही इथे बसलायत ना, तर सगळा जीवनातला आनंद पुन्हा तुमच्यातून निघून गेलाय असं वाटतंय. माझं नाव मॅक्स आहे, हे मजेशीर वाटतंय तुम्हाला. का तुम्ही एवढ्या दु:खी आहात?''

लेना गप्प राहिली. अनेक वर्षांपूर्वीची एक दु:खी कवयित्री तिला आठवली. आपल्या दु:खाला तिने काव्यातून शब्दबद्ध केलं होतं.

सारायेवोतल्या बायकांसारखं हे दु:ख नव्हतं. तर हे तिचं छोटंसं, वेडं आणि तसं निरर्थक दु:ख होतं.

मी खूप खूप दु:खी आहे, दु:खी आहे सई,<br>
चंद्रावरचा चेहरा जाणतो सगळं काही<br>
म्हणून तर आहे ही मंद उत्सवी लगबग

आणि उगवत्या उषेची प्रभा माझ्याभोवती...

तो अशिक्षित नक्कीच वाटत नव्हता. पण त्याला ही कविता माहीत असेल, याची कल्पनाही ती करू शकली नाही. तिला स्वत:लाच ती नुकतीच काही दिवसांपूर्वी कळली होती. पण कदाचित आधी पुस्तक चाळताना कवितेच्या अक्षरावरून नुसतीच नजर फिरली असेल, पण तेव्हा ती तिला एवढी लक्षात नव्हती आली. कधी कधी असा अनुभव येतो, एखादी कविता बाणासारखी थेट काळजात जाऊन रुतते.

''मला मॅक्सचं काय ते सांगा ना!'' हे म्हणताना तो इतक्या आग्रहाने बोलला, पूर्वी मॅक्स तिला म्हणाला होता तसा.

''मॅक्स म्हणजे तुमचर नवरा नाही, बरोबर ना?''

तिने मानेने 'हो' म्हटले, ''माझ्या नवऱ्याचे नाव हाइनर आहे. खरं नाव हाईनरिष''

''मग मॅक्स तुमचा प्रियकर तर?''

''नाही. प्रियकर नाही. प्रियकर म्हणजे कोण? तर, जो एखाद्यावर प्रेम करतो तो, नाही का?''

''आणि ह्या तुमच्या मॅक्सचं तुमच्यावर प्रेम नाही?''

लेना म्हणाली, ''मला नाही माहीत. मला ते माहीत असायला हवं होतं, असं मात्र वाटतं मला.''

मॅक्सने सुचवले, ''तुम्ही त्याला तसं सरळ विचारत का नाही?''

''नाही ना. असं सरळ काही त्याला विचारता येईल, तर तो मॅक्स कुठला. त्याला तर सहजपणे गाठता येणंसुद्धा मुश्कील आहे.''

''बाप रे! तुम्ही माझी उत्सुकता चांगलीच ताणताय.'' विषय बदलायच्या दृष्टीने लेना म्हणाली, ''परत एकदा छानपैकी कॉफी घ्यायची वेळ झालीय.''

रेघारेघांच्या सूटमध्ये तिच्या नीटनेटक्या बैठकीच्या खोलीतल्या आरामखुर्चीत मस्तपैकी बसलेला हा म्हातारा माणूस एक बेघर भटक्या आहे आणि काही तासांपूर्वी तो आपल्या गोठ्यात झोपला होता हे लेना पूर्णपणे विसरून गेली होती.

ती जेव्हा स्वैंपाकघरात आली तेव्हा तिच्या लक्षात आलं की तिच्या मागच्या दारात हाईनर आहे का काय!

हाइनर असल्या हवेत परत येणं केवळ अशक्य होतं. नशीब एवढंच की जोडीला आणखी वीज नव्हती गेली. तिला तिच्या पाहुण्याविषयी नाही तर काय माहिती होती?

त्याला योग्य वाटणारी भूमिका निभावणारा तो एक नाटक्या होता. चर्चमधला फादर, विधवा, समाजकार्य करणारा असले त्याचे कळीचे शब्द होते. छानपैकी सूट अंगात घातला की झाला त्याचा सभ्य नागरी माणूस. खरं तर रात्र पडायच्या आतच त्याला कसं कटवायचं हे सुचायला हवं. पण कसं जमवायचं हे? हिमवादळात ती त्याला बाहेरच्या दलदलीत कशी हाकून लावणार?

तिचे विचार वाचता आल्यासारखा तो अचानक तिच्या शेजारी येऊन उभा राहिला.

''तुम्ही मला रात्रभर घरात ठेवून घ्याल अशी अपेक्षा मी तुमच्याकडून करत नाही. विशेषत: तुमचा नवरा अशा बर्फातून वाट काढत येणं शक्य नाही, हे दिसत असताना तर नाहीच. याचीच चिंता तुम्हाला लागून राहिली असेल तर, मला गोठ्यांमध्ये झोपायची सवय आहे, हे मी सांगू इच्छितो.''

त्याला तोडून ती म्हणाली, ''पण असल्या हवेत नाही. नाही, नाही.

माझा विश्वास आहे तुमच्यावर. तुम्ही घरातच राहा रात्री.''

हाय रे देवा, मॅक्स!

त्याला मिठी मारावी असंच तिला वाटलं, पण तिने स्वत:ला आवर घातला. अशा कुणा भटक्याला कुणी मिठी मारत नाही. मग भलेही त्याने वडिलांचा रेघारेघांचा गडद रंगाचा सूट का घातलेला असेना.

प्रिया तुझे रे काळिज फत्तर
तुटले माझे पंख तयांवर
आणि निळ्या झुडुपातून खाली
पडल्या मैना
शोककाळची जशी फुले ही

त्याने कवितेच्या ओळी म्हटल्या.

ती पूर्णपणे गोंधळून गेली. म्हणाली, ''कशा काय कुठून या ओळी...?''

''तुम्ही बसला होतात त्या खुर्चीजवळ हे पुस्तक होतं आणि त्यात पानाची खूण तुम्ही नेमकी या ओळींच्या ठिकाणी ठेवली होती. तुम्ही सांगून टाका ना तुमची गोष्ट. दगडाच्या काळजाचा तुमचा तो मॅक्स. त्यानेच तर पंख मोडून टाकले ना तुमचे? उडत गेला तो. कारण असं करणाऱ्या माणसाला बाद करून टाकायचं आयुष्यातून. कायमचा. मला चांगली कल्पना करता येतेय, तुमच्या त्या मॅक्सची. त्यापुढे वरच्या अंगाला राहणाऱ्या लोकांपैकी ना? फारसा तरुण नसणार नक्की, पण वयाचं काय एवढं? तो तुम्हाला महत्त्वाचा वाटतो. तुम्हाला आदर वाटतो त्याचा, तुम्ही फार मानता त्याला, म्हणजे अर्थात काही विशिष्ट अंतर राखून. आणि त्याला जी कुठली संधी मिळते ती तो लगेच पकडतो. धाडसीपणा नुसता! याहून जास्त काही नाही. तुम्ही खूप सुंदर आहात, तरुणही. तुम्ही इतक्या निरागस आहात.''

लेनानं अंग आकसून घेतलं. पण मॅक्सच्या काही लक्षात आलं नाही. तो आपल्याच नादात होता.

''निरागसपणा. या अति सभ्य पुरुषांना आवडणारी हीच तर नेमकी गोष्ट आहे. ते त्यांच्या दृष्टीने इतकं वेगळं आणि हवंहवंसं वाटणारं आहे. कारण बाकी सगळं त्यांनी उपभोगलेलं असतं आणि तुमचा असल्या माणसावर विश्वास आहे. त्याची एवढी लायकी नाही, नसावी बाईसाहेब.''

लेना कोरडेपणाने यावर आक्षेप घेत म्हणाली, ''तुम्ही तर ओळखतही नाही त्याला.''

''अहो, असले लोक इथून तिथून सारखेच. एकासारखा दुसरा.''

''नाही, मला नाही असं वाटत. तो तसा नाहीये. तुम्हाला सांगू का, तुम्हाला बघून मला त्याची आठवण होतेय असं साम्य आहे, तुमच्यात.''

मॅक्स झटकत म्हणाला, ''देवा, भलतंच काय!''

''डिकन्सच्या कादंबऱ्यांमधल्या सभ्य भटक्या माणसाची भूमिका तुम्ही आता करताय हं. मला वाटतंय, मी तुम्हाला हळूहळू चांगली ओळखायला लागलेय.'' असं म्हणत लेना हसली.

मॅक्सही आनंदून म्हणाला,

''तुम्हाला असं नीट हसताना मी आता पहिल्यांदा पाहतोय.''

''कॉफी तयार आहे, घ्या. तुम्ही ट्रे घेता का? म्हणजे मग मला किटली घेता येईल. मला वाटत नाही, तो तसा आहे म्हणून. तुम्ही जे वर्णन करताय तसा नाहीये तो. आमचं दोघांचं डोकं काही काळ अक्षरशः फिरल्यासारखं झालं होतं. माझी मुलं नेहमी म्हणतात की तरुण लोकांनीच नव्या धाडसाच्या वाटेला जावं. पण असं म्हणणं खरं नाही. जसजसा धाडस जोखून बघायला असलेला आयुष्यातला वेळ कमी कमी होत जातो, तसतशी धाडस करून बघण्याची आस वाढत जाते. बरोबर आहे ना माझं? तुम्ही तरी कशाला अशा भटकंतीवर बाहेर पडलायत? तुमच्यासारखा गुण अंगात असलेला माणूस? हा काही योगायोग नव्हे. आयुष्यात खरं तर योगायोग नसतातच.''

लेनाने कॉफीचे कप काठोकाठ भरले. ''दूध, साखर?''

त्याने मानेनंच हो म्हटलं.

लेना पुढे म्हणाली, ''तुम्हाला सांगू का, माझ्या या धाडसीपणाचं चित्रीकरण करायचं झालं तर मी असं करीन, की मी प्रेक्षागृहात बसले आहे. माझ्या हिरोचा सिनेमा बघत आणि अचानक पडद्यावरून हिरो सरळ माझ्या रोखाने येतो आणि आम्ही बाहेर निघून जातो.''

मॅक्स म्हणाला, ''असला सिनेमा मी एकदा पाहिला होता.''

लेना त्याला होकार देत म्हणाली, ''हो ना, मीसुद्धा पाहिला होता. मी नुसती माझी परिस्थिती वर्णन करत होते. पण भटकी माणसं सिनेमा बघायला वगैरे जातात मला ठाऊक नव्हतं.''

मॅक्स आनंदाने म्हणाला, ''बघा, पुन्हा किती छान हसलात! पण तो तुमचा हिरो परत पडद्यावर गेला. तुम्हाला न घेता. आणि आता तर सिनेमाही संपला. तुम्ही मात्र प्रेक्षागृहात बसून राहिलात आणि सिनेमा संपल्याचं लक्षात येत नाहीये तुमच्या. आणि सिनेमा थिएटरच्या बाहेर आयुष्य चालू आहे, हे सुद्धा ध्यानात येत नाहीए तुमच्या.''

लेनानं विचारलं,''मी मग करू तरी काय?''

''मॅक्सला विसरून जा. त्याला बाद करून टाका आयुष्यातून. कायमचा.''

''आणि तसं जमलं नाही तर?''

''मग आणखीन थोडा काळ वाट पाहा. मग जमेलही कदाचित. आणि दररोज निराश होऊन पोस्टमनच्या मागे कशाला धावावं? असं करू नका.''

''तुम्हाला हे सगळं कसं काय माहिती? कुठून, आलायत तरी कुठून? तुम्ही भटके वगैरे आहात असं काही मला वाटत नाही. वर्षानुवर्षं असं भटकं आयुष्य घालवल्यावर इतकं सुशिक्षित माणसासारखं बोलत नाही कुणी!''

''मी वर्षानुवर्ष असा भटकत आलोय हे कुणी सांगितलं? कदाचित मी देवदूत असेन तुमचं रक्षण करणारा. एक मोठा मूर्खपणा करण्यापासून तुम्हाला परावृत्त करण्यास आलेला देवदूत असेन मी.''

लेनानं विचारलं,''कोणता मोठा मूर्खपणा?''

''हं. आता उदाहरणार्थ, उद्या सकाळी तुम्ही तुमचा ॲप्रन काढून ठेवाल, शेगडीवरनं अन्न उतरवून ठेवाल, तुमची छोटी बॅग भराल आणि पुन्हा कधीही परत न येण्याचं ठरवून निघून जाल.''

लेना हसली,''तुम्ही फारच टोकाचं रोमॅंटिक बोलताय. एक तर मी एप्रन वापरत नाही, उद्या जर बर्फानं मनावर घेतलंच तर मी ओट्यापाशी नाही तर शासकीय ग्रंथालयात काऊंटरच्या मागे उभी असेन. आणि तिसरं म्हणजे माझ्या गोष्टीशी तुमचा तसा संबंध काय?''

पण तिने घेतलेल्या या आक्षेपांकडे दुर्लक्ष करून मॅक्स पुढे बोलत राहिला, जणू ती मधे काही बोललीच नव्हती असा, 'कधीतरी, कुठेतरी तुम्ही पुन्हा एप्रन बांधून ओट्याशी उभ्या राहाल. पण मग तुम्हाला स्वैपाक करायचा तो ओटा आणि ते सगळं नकोसं वाटेल. मग कदाचित तुम्ही, आपण मागे काय सोडून आलो आहोत याचाच मन लावून विचार करत असाल. हा मन अस्वस्थ करणारा काळ आहे आणि ज्या गावाला आपल्याला जायचं नाही तिकडचीच वाट हा काळ आपल्याला जायला लावणार नाही ना याकडे आपण लक्ष द्यायला हवंय.'' तो मागे रेलून बसला, त्याने कॉफीचा एक घोट घेतला आणि शांत बसून राहिला.

नुसतं असं तिथे बसून राह्यचं आणि गप्प बसायचं हे खरंच छान होतं.

शेकोटीची उब पायाच्या चवड्यापासून हलके हलके वर गालापर्यंत चढत होती आणि कॉफीचे घोट वरपासून खालपर्यंत उब आणत होते. दाराच्या समोर बाहेर मात्र हिमवादळ घोंगावत होतं.

लेना जेव्हा झोपायला गेली तेव्हा तिने दार काळजीपूर्वक लावून घेतलं आणि दाराच्या हॅण्डलखाली एक खुर्ची लावून ठेवली. मॅक्स तिला काही करेल असं तिला आजिबात वाटत नव्हतं. पण तरी सावध राहणं केव्हाही चांगलंच.

गादी बर्फासारखी गार पडली होती. खरं तर गरम पाण्याची शेकायची पिशवी आणली असती येताना, तर फार बरं झालं असतं. पण आता खूप उशीर झाला होता. एखादा टॉर्च किंवा मेणबत्ती आत आणायचंही तिला सुचलं नव्हतं. आत्तापर्यंत वीज गेली नव्हती हे एकूण हवामानाचा विचार करता एक महदाश्चर्यच म्हणायचं. कदाचित कुठेच काही बिघडलं नव्हतं. खरं हाईनर कुठे असेल बरं?

ती घरात एकटीच राहिलीये म्हणून तो नक्कीच काळजी करत असणार. अर्थात त्याला जर कळतं की घरात ती एकटी नाहीये तर तो जास्तच काळजी करता. पांघरूणात ती अंगाचं मुटकुळं करून झोपली. अंगात थोडी उब यावी म्हणून. ती मॅक्सचा विचार करत होती. गेले कित्येक महिने झोपताना ती मॅक्सचा विचार करत होती. तसंच रोज उठताना, खरं तर ती सारखा त्याचाच विचार करत होती.

तो म्हणाला होता, ''आपण शहाण्यासारखं वागलं पाहिजे. तू अशी दुःखात राहावीस हे मला मंजूर नाही.''

''नाही, नाही. दगडाचं काळीज वगैरे काही बरोबर नाही. त्याच्या काळजाच्या दगडावर नाही तिचे पंख फुटले. मॅक्सचं बरोबर होतं, तिच्या मॅक्सचं नाही, दुसऱ्या मॅक्सचं. इथला स्वैपाकाचा ओटा सोडायचा आणि दुसऱ्या ओट्याशी जाऊन उभं राह्यचं यात कसलं आलं आहे धाडस?'' तिने दुसऱ्या मॅक्सच्या बोलण्याचा विचार केला.

तिच्या डोळ्यासमोर बरीच चित्रं तरळली. ती एकमेकांत मिसळून विरून गेली. तो आपल्याकडे का आलाय हे ती त्याला उद्या विचारणार होती. आयुष्यात खरं तर योगायोग नसतात काही. उद्या...

तिला जाग आली, कारण काहीतरी वेगळंच घडलं म्हणून. पडद्याच्या फटीतून सकाळचा अंधूक प्रकाश आत आला होता. काहीतरी मुळातूनच वेगळं घडलं होतं. पण काय? थोडा वेळ ती तशीच पडून राहिली आणि तिने धडधडणाऱ्या हृदयानं कान देण्याचा प्रयत्न केला. मग तिच्या लक्षात आलं की कमालीचं शांत होतं सगळं, भलतंच. वादळ थांबलं होतं. ती उभी राहिली आणि खिडकीशी गेली. अस्पर्श अशा पांढऱ्या थराखाली संपूर्ण दलदलीचा प्रदेश गुपचूप पडला होता. बर्फाने सर्व आवाज जणू दाबून टाकले होते. क्षितिजापाशी पसरलेली लाल रेघ सकाळ झाल्याची सूचना देत होती. लेनाला वाटलं, याहून सुंदर असं आपण काही पाहिलंच नाही.

आश्चर्याचा भर ओसरल्यावर तिला कुडकुडायला झालं. तिने सिल्कचा मॉर्निंग गाऊन अंगावर चढवला. गेल्या वर्षी तिने अक्षरश: कुठल्या तरी झटक्यात उगीचच विकत घेतला होता तो. गाऊन घालून खाली जावं असं तिनं ठरवलं. मॅक्स आधीच उठला होता की काय? दाराच्या हॅण्डलखाली लावलेली खुर्ची तिने हलकेच सरकवली आणि दार उघडलं.

घरात फारच शांतता होती. तिने जिना खाली उतरून आवाजाचा वेध धेतला, पण मॅक्स एवढ्यात उठणं शक्य नव्हतं. तो अशा व्यवस्थित गादी–उशीच्या बिछान्यात याआधी कधी झोपला असेल कोण जाणे. कॉफी करायला ती स्वैपाकघरात गेली. अंगणातसुद्धा प्रचंड शांत होतं. खिडकीतून तिची नजर मागच्या दारावर पडली. दार बर्फामुळे पक्कं बंद झालं होतं. दार उघडून बाहेर जाणं शक्य नसल्याने तिने खिडकीच्या कठड्यावरच मांजरीसाठी दूध ठेवलं. मॉर्निंग गाऊनमध्येच न्याहरी करावी का?

तिने थोडा वेळ विचार केला आणि मॉर्निंगगाऊन न बदलण्याचा निर्णय घेतला. दोन जणांसाठी तिने टेबल लावलं. तेवढ्यात तिला जोरात घरघर असा आवाज आला. ती खिडकीशी धावली.

पाण्यावरच्या पुलावर बर्फ बाजूला हटवणारं मशिन उभं होतं आणि त्याचाच आवाज येत होता. त्याच्यामागे त्यांची गाडी उभी होती, होय! हाइनर आला होता. तिला वाटलं मॅक्सला उठवावं, म्हणून तिने पाहुण्यांच्या खोलीचं दार वाजवलं. आत शांतता होती. तिने काळजीपूर्वक दार उघडलं. गार वाऱ्याचा झोत तिच्या अंगावर

आला. तिने पाहिलं, अंथरुणात कुणीही नव्हतं, पांघरूणाची व्यवस्थित घडी करून, चादर पसरून ठेवली होती आणि खिडक्यांची दारं लोटून घेतली होती.

म्हणजे तो खिडकीतून बाहेर उतरलाय तर. त्याच्या पावलांच्या खुणा तिच्या नजरेला पडल्या. त्या गोठ्याच्या बाजूने पुढे निघून गेल्या होत्या. खरं तर तिने तिच्या चांदी-सोन्याच्या वस्तू-दागिने जागेवर आहेत ना, हे तपासून पाह्यला हवं होतं; पण तिच्या डोक्यातही तो विचार आला नाही. तिच्या जेव्हा लक्षात आलं की आपल्याला आत कुठेतरी वाईट वाटतंय तेव्हा तिला आश्चर्य वाटलं. पण तेवढ्यात बर्फ हटवणारं मशिन अंगणाच्या आतपर्यंत आलं आणि त्याच्या पाऊलखुणा जिथवर होत्या त्यावर परत बर्फाचा हलकासा, गुळगुळीत थर जाऊन बसला.

गाडीतून बाहेर पडणाऱ्या हाइनरला तिने ओरडून सांगितलं, ''तुला खिडकीतून उडी मारून आत यायला लागेल कारण दार एकदम पक्कं बसलंय बर्फाने.'' आणि मग ती त्याच्या कुशीत शिरून रडायला लागली.

हाइनरला वाटलं, ताण सैल पडल्यानं ती रडतेय. बर्फ हटवणाऱ्या मशिनच्या ड्रायव्हरला तीस मार्कस्‌ची लालूच दाखवून इथवर आणलं. आपल्यासाठी रस्त्यावरचा बर्फ हटवत त्याला आणलं हे किती बरं झालं, असा त्याने विचार केला.

लेनाला ताण संपला म्हणून रडू आलं आणि दु:खानेही. हा मॅक्स कोण होता हे तिला कधीही कळणार नाही. काही प्रश्न असे नेहमी अनुत्तरितच राहतात. काही वेळानं मग तिनं माळ्यावर जाऊन जुन्या कपड्यांच्या कपाटात बघितलं. तिच्या वडिलांचा सूट तिला दिसला नाही. म्हणजे ते स्वप्न नव्हतं तर.

धुणं धुवायच्या खोलीत भिजवलेल्या कपड्यांचा टबसुद्धा तसाच होता. त्याचा कोट आणि बूट तिने रूमहीटर्स असलेल्या खोलीत वाळायला टांगून ठेवले होते, ते मात्र तिथून नाहीसे झाले होते. तिनं ठरवलं की त्याचे कपडे नीट ठेवून द्यावे. कोण जाणे, पुन्हा कधीतरी येईलही तो परत. पण ते काही तिला खरं वाटेना.

नंतर जेव्हा ती बैठकीच्या खोलीत गेली तेव्हा ती बसली होती त्या खुर्चीच्या जवळ कवितांचं पुस्तक तसंच होतं. पानाची खूणही तिथेच जुन्या पानावर लावून ठेवली होती. तिने अभावितपणे पुस्तक उघडून वाचलं,

दाबूनिया ठेवलेली मधुरशी किलबिल
नव्या उत्साहाने पुन्हा वाटे सुरूही होईल
पंख पसरून नवीन झेप मुक्तपणे घ्यावी
आणि पाखरासारखे आज दूर दूर जावे.

पण दुसऱ्या ओळीतल्या 'वाटे' शब्दावर काट मारली होती. त्यावर पेन्सिलीने 'होईलच' शब्द लिहिला होता आणि तिसऱ्या ओळीतही 'घ्यावी' ह्या शब्दाऐवजी 'घेईन' आणि शेवटी 'निघून जाईन' असे शब्द लिहिले होते.

अतिशय प्रेमाने तिनं म्हटलं 'मॅक्स!' पण हा आता दुसरा मॅक्स होता.

***

# चामखिळाबद्दलचं पत्र

मूळ जपानी लेखक - यासुनारी कावाबाता
भाषांतर - निसीम बेडेकर



परिचय – यासुनारी कावाबाता

(१८९९–१९७२)

जपानचे पहिले नोबेल पारितोषिक विजेते आणि जपानच्या 'राष्ट्रीय लेखकांपैकी' एक समजले जाणारे यासुनारी कावाबाता यांचा जन्म ओसाका येथे झाला. लहानपणीच आई–वडिलांचा मृत्यू झाल्याने त्यांना प्रथम आजी–आजोबांनी आणि नंतर आईच्या नातेवाईकांनी वाढवले. १९२० साली त्यांनी टोकियोच्या शाही विद्यापीठाच्या इंग्रजी भाषा विभागात प्रवेश घेतला आणि चार वर्षांनी पदवी संपादन केली. विद्यापीठात असतानाच त्यांनी एक बंद पडलेले साहित्यिक मासिक नव्याने सुरू केले. आणि कथालेखनास सुरुवात केली. १९२६ साली त्यांनी लिहिलेल्या 'इझू नो ओदोरिको' (इझूची नर्तकी) या कथेने त्यांना प्रसिद्धी मिळाली.

१९३४ साली त्यांनी 'युकीगुनी' (हिमप्रदेश) ही कादंबरी लिहिण्यास सुरूवात केली आणि १९४७ साली ती पूर्ण केली. या कादंबरीने त्यांना जपानच्या अग्रगण्य लेखकांमध्ये स्थान मिळवून दिले. दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांनी 'सेन्ना झूरू' ('सहस्रक्रौंच), 'यामा नो ओतो' ('पर्वतांचा आवाज), 'नेमेरेरू बिजो' ('निद्रिस्त सौंदर्यवती') इत्यादी प्रसिद्ध कादंबऱ्या लिहिल्या.

१९६८ साली 'युकीगुनी' या त्यांच्या कादंबरीला नोबेल पारितोषिक मिळाले. 'कथाकथनावरचे प्रभुत्व आणि जपानी अंत:करणाचा अत्यंत संवेदनाशील रीतीने वेध घेण्याचे त्यांचे

**कौशल्य' हा त्यामागचा निकष होता. १९७२ साली कावाबाता यांनी आपल्या राहत्या घरी गॅसने भरलेल्या खोलीत स्वत:ला कोंडून घेऊन आत्महत्या केली. ती आत्महत्या होती, की अपघात याबद्दल जपानमध्ये अजूनही वाद आहे.**

**स्त्रीमनाचे अनेक कंगोरे अलगदपणे उलगडून दाखवणे हे यासुनारी कावाबाता यांच्या लेखनशैलीचे एक वैशिष्ट्य समजले जाते. 'होकुरो नो तेगामी' ('चामखिळाबद्दलचं पत्र') या त्यांच्या प्रस्तुत कथेतही वाचकांना त्याचा अनुभव येईल.**

***

**का**ल रात्री मला स्वप्नात तो चामखीळ दिसला. मी नुसता तेवढा शब्द जरी लिहिला, तरी मला काय म्हणायचंय ते तुला कळेल. तो चामखीळ-किती वेळा माझ्यावर रागावलायस तू त्याच्यामुळे.

माझ्या उजव्या खांद्यावर आहे तो. किंवा माझ्या पाठीवर वरच्या बाजूला असं म्हटलेलं बरं.

''आधीच एखाद्या दाण्याहूनही मोठा आहे तो. तू बस खेळत त्याच्याशी. म्हणजे एक दिवस एखादं रोपटं उगवेल त्यातून.''

तू त्याच्यावरून मला खूप चिडवायचास. पण तू म्हणायचास तसं, नेहमीच्या चामखिळीच्या मानानं तो मोठा होता. गोल गरगरीत. सुजल्यासारखा.

मी लहान होते तेव्हा अंथरूणात पडल्या पडल्या त्याच्याशी खेळायचे. तुला ते पहिल्यांदा दिसलं, तेव्हा किती लाज वाटली मला!

मला आठवतंय- मी चक्क रडले होते आणि तू आश्चर्यचकित झाला होतास.

''सायोको, थांबव ते चाळे! तू त्याला जेवढा हात लावशील ना, तेवढा तो मोठा होईल.'' माझी आईसुद्धा ओरडायची मला. मी अजूनही लहानच होते. तेरा वर्षांचीसुद्धा नव्हते तेव्हा. त्यानंतर मात्र मी स्वत:च्या या सवयीबद्दल कुणालाही

काहीही कळू दिलं नाही. नंतर मी त्या गोष्टीबद्दल विसरूनही गेले. पण माझी सवय मात्र तशीच राहिली.

जेव्हा माझी सवय पहिल्यांदा तुझ्या लक्षात आली, तेव्हा मी 'बायको' म्हणण्यापेक्षा लहान मुलगीच होते अजून. मला किती शरमल्यासारखं झालं याची कल्पना तुझ्यासारख्या एखाद्या पुरुषाला येणं शक्य तरी आहे का? पण मला केवळ शरमल्यासारखं झालं एवढंच नाही, 'हाय रे देवा!' मला त्यावेळी वाटलं, 'किती भयंकर गोष्ट आहे लग्न म्हणजे!'

मला स्वत:ची सगळी गुपितं उघड झाल्यासारखं वाटलं. जणू मी आत्तापर्यंत दडवून ठेवलेल्या गोष्टी तू एकामागून एक अनावृत्त केल्या होत्यास. अशा गोष्टी, की ज्यांचं मला स्वत:लाही फारसं भान नव्हतं. मला आता कुठेच आसरा नव्हता.

तू आरामात झोपी गेलास. मधून मधून मला हायसं वाटलं. जरासं एकटंही वाटलं आणि जेव्हा जेव्हा माझा हात चामखिळाकडे गेला, तेव्हा धक्का बसल्यासारखं होऊन मी स्वत:ला रोखलं.

''चामखिळाला साधा हात लावणंही अशक्य झालंय मला.'' मला आईला लिहावंसं वाटलं. पण तसा विचार मनात येताक्षणीच मला जाणवलं– आपला चेहरा लाजेनं लालेलाल झालाय.

''साध्या चामखिळाची कसली एवढी चिंता करतेस तू!'' एकदा तू म्हणालास तेव्हा मी आनंदानं मान डोलावली होती. पण आता ती गोष्ट आठवली, की मला वाटतं– माझी ती नतद्रष्ट सवय तुला जराशी– अगदी थोडीशी जरी आवडली असती तर किती बरं झालं असतं!

खरं तर चामखिळाची एवढी काळजी नव्हती वाटत मला. चामखीळ दिसावा म्हणून बायकांच्या मानेखाली कुणी डोकावून बघत नाही. बऱ्याचदा एखाद्या व्यंग असलेल्या मुलीचं वर्णन 'बंदिस्त खोलीसारखी निष्कलंक' असं करतात. पण चामखीळ कितीही मोठा असला तरी त्याला व्यंग कसं म्हणता येईल?

त्या चामखिळाशी खेळण्याची सवय मला का लागली असं तुला वाटतं? आणि माझ्या त्या सवयीमुळे इतका नाराज का व्हायचास तू?

तू म्हणायचास, ''बस कर आता! ताबडतोब थांबव ते!'' शेकडो वेळा माझ्यावर रागावला असशील तू.

''त्याच्याशी चाळा करायला डावा हातच वापरायला हवा का तुला?'' एकदा वैतागून तू विचारलं होतंस.

''डावा हात?'' तुझ्या प्रश्नाचं मला नवल वाटलं. खरंच होतं ते. अजूनपर्यंत माझ्या लक्षात आलं नव्हतं, पण मी नेहमीच डावा हात वापरत होते.

''तो चामखीळ तुझ्या उजव्या खांद्यावर आहे. उजवा हात वापर की!''

''काय?'' मी उजवा हात उंचावला. ''पण विचित्रच वाटतंय मला.''

''काहीही विचित्र नाहीये त्यात.''

''पण मला डावा हात वापरणंच बरं पडतं.''

''उजवा हात जास्त जवळ आहे त्याच्या.''

''पण उजवा हात मागे न्यावा लागतो मला.''

''मागे?''

''हो. एक तर मला माझा हात मानेसमोर आणावा लागेल. किंवा हा असा मागे न्यावा लागेल.'' तू म्हणशील त्याला निमूटपणे संमती देणं मी आता थांबवलं होतं. आतासुद्धा तुला उत्तर देताना मला जाणवलं- जेव्हा मी माझा डावा हात समोर आणत होते, तेव्हा मी तुला दूर लोटत होते आणि जणू स्वत:लाच आलिंगन देत होते. मला वाटलं, फारच क्रूर वागले मी याच्याशी!

मी हळूच विचारलं, ''पण डावा हात वापरला तर बिघडलं कुठे?''

''डाव्या-उजव्याचा प्रश्नच नाही. ती सवय वाईट आहे.''

''माहितीये मला.''

''एखाद्या डॉक्टरकडे जाऊन तो चामखीळ काढून टाक. कितीतरी वेळा सांगितलंय मी तुला.''

''पण मला नाही जाता येत. लाज वाटते मला.''

''साधी गोष्ट तर आहे ती!''

''चामखीळ काढून टाकण्यासाठी डॉक्टरकडे जातं का कुणी?''

''कितीतरी लोक जातात.''

''चेहऱ्यावरचा चामखीळ काढण्यासाठी जात असतीलही लोक. मानेवरचा चामखीळ काढण्यासाठी कुणीतरी जात असेल का? डॉक्टरसुद्धा नक्कीच हसतील. त्यांनाही वाटेल, हिच्या नवऱ्याने पाठवलंय म्हणून आलेली दिसतीय ही!''

''मग सांग त्यांना, तुला चामखिळाशी खेळायची सवय आहे म्हणून.''

''काय हे... एक साधा, क्षुल्लक चामखीळ. तोसुद्धा दिसतही नाही अशा ठिकाणी. एवढंसुद्धा सहन होत नाही का तुला?''

''त्या चामखिळाविषयी माझी काहीही हरकत नाही. तू जर त्याच्याशी खेळली नाहीस तर.''

''मला मुद्दाम नसतं करायचं तसं.''

''पण तू आडमुठी आहेस ना. मी कितीही सांगितलं तरी स्वत:ला बदलायचा कधीच प्रयत्न करीत नाहीस तू.''

''पण मी करते की प्रयत्न. त्याला हात लावावासा वाटू नये म्हणून बंद गळ्याचा नाईटगाऊनसुद्धा घालून पाहिला मी.''

''किती दिवस?''

''पण... मी त्याला हात लावणं हे इतकं वाईट आहे का?''

मी परत वाद घालण्याचा प्रयत्न करते आहे असं वाटलं असेल त्याला.

''नाही. विशेष असं काही वाईट नाही. मी तुला त्या चामखिळाला हात लावू नकोस म्हणतो, कारण मला आवडत नाही ते.''

''पण ते इतकं असह्य का होतं तुला?''

''का वगैरे कारण सांगायची गरज नाही. तू त्याच्याशी खेळू नकोस, ती सवय वाईट आहे. तेव्हा तू ते थांबव.''

''पण थांबणार नाही असं कुठे म्हटलं मी?''

''तू जेव्हा जेव्हा त्याला हात लावतेस ना, तेव्हा तेव्हा एक विचित्र भाव येतो तुझ्या चेहऱ्यावर या जगाचं भान नसल्यासारखा. त्या... त्या गोष्टीनं डोकं भडकतं माझं.''

''हो. बरोबर आहे तुझं म्हणणं.'' का कुणास ठाऊक, पण तुझं ते वाक्य माझ्या हृदयाला भिडलं आणि आणि मला होकारार्थी मान हलवावीशी वाटली.

''पुन्हा मी तुला तसं करताना दिसले तर फटका मार माझ्या हातावर. चेहऱ्यावरही मार एक थप्पड.''

''पण दोन-तीन वर्षं प्रयत्न करूनही एक क्षुल्लक सवय तुझी तुला घालवता येत नाही याचं तुला काहीच वाटत नाही का?''

मी काहीच बोलले नाही. माझ्या मनात अजूनही तुझे शब्द घोळत होते. ''त्या गोष्टीनं डोकं भडकतं माझं.''

माझा तो अवतार- मानेभोवती उंचावलेला माझा डावा हात- नक्कीच उदास, अगतिक दिसत असेल, नाही? 'एकाकी' वगैरे शब्द वापरण्याचं धाडस मी करणार नाही. उलट दळभद्री आणि नीच दिसत असेल माझा अवतार. केवळ स्वत:चं छोटसं स्वत्व राखण्याचा प्रयत्न करत असलेल्या एका बाईचा दीनवाणा अवतार आणि माझ्या चेहऱ्यावरचे भावही तू म्हणालास तसेच दिसत असतील- विचित्र, बेभान.

मी अजूनही स्वत:ला मनापासून तुला अर्पण केलं नसल्याची ती निशाणी होती का? आपल्या दोघांमध्ये अजूनही अंतर असल्याचं दाखवणारी? जेव्हा जेव्हा मी त्या चामखिळाला स्पर्श करायचे आणि त्यानं हरखून जायचे- लहानपणापासून तसंच करत आले होते मी- तेव्हा तेव्हा माझ्या मनातल्या खऱ्या खऱ्या भावना माझ्या चेहऱ्यावर प्रकट व्हायच्या का?

पण नक्कीच तू माझ्यावर अगोदरच नाखूष असला पाहिजेस, म्हणूनच त्या एका क्षुल्लक सवयीचा तुला एवढा बाऊ वाटत होता. जर तू माझ्यावर खूश असतास तर तू फक्त हसला असतास आणि बाकी काहीही विचार केला नसतास.

खरोखरच भयंकर विचार होता तो. अचानक तो विचार मनात आला आणि माझं सर्वांग शहारलं. माझी ती सवय ज्यांना खूप आवडेल असेही पुरुष असतील!

माझी सवय तुझ्या लक्षात आली, कारण तुझं माझ्यावर प्रेम होतं म्हणून. त्यात मला यत्किंचितही शंका नाही. पण सुरुवातीला अशाच क्षुल्लक गोष्टी असतात या- त्या नंतर वाढतात आणि वैवाहिक जीवनात सगळीकडे आपली पाळंमुळं

पसरवतात. ज्यांचं नातं खरंखुरं घट्ट असतं, अशा नवरा-बायकोला एकमेकांच्या विचित्र सवयींचं काही वावगं वाटत नाही. पण असेही नवरे आणि बायका असतात, की ज्यांचे प्रत्येक गोष्टीत मतभेद होतात. जे एकमेकांना समजून घेतात. त्यांचं एकमेकांवर प्रेम असतं आणि ज्यांचे मतभेद होतात ते एकमेकांचा द्वेष करतात असं मला म्हणायचं नाही. पण मला असं मात्र जरूर वाटतं- आणि यापुढेही वाटत राहील- की चामखिळीशी खेळण्याची माझी ती सवय तू नजरेआड केली असतीस तर बरं झालं असतं.

हळूहळू तू मला मारझोड करायला आणि लाथा मारायला सुरुवात केलीस. मी रडून तुला विचारलं होतं- केवळ चामखिळाला हात लावला म्हणून इतकी मारझोड सोसायला हवी का मी? इतकं सहन करायला हवं का मी?

संतापानं थरथरणाऱ्या आवाजात तू म्हणालास, ''मग मोडणार तरी कशी तुझी ही खोड?'' तुला काय वाटत असेल हे मला चांगलंच कळत होतं आणि तू केलेल्या गोष्टीचा रागही आला नव्हता. दुसऱ्या कुणाला मी जर ही गोष्ट सांगितली असती तर त्यांना नक्कीच वाटलं असतं- किती हिंसक आणि उलट्या काळजाचा आहे हिचा नवरा! पण आपल्या दोघांचे संबंधच अशा थराला गेले होते, की क्षुल्लक गोष्टीनंही तणाव जास्तच वाढायचा, त्यामुळे तू मला मारायचास ना, तेव्हा मला खरंतर एकदम सुटल्यासारखं वाटायचं.

''कधीच नाही जाणार माझी ही सवय. कधीही नाही. हात बांध माझे.'' मी दोन्ही हात एकत्र आणून तुझ्या छातीच्या दिशेनं लांबवले. जणू काही मी स्वत:ला तुला अर्पण करत होते. संपूर्णपणे.

तू गोंधळल्यासारखा दिसलास. जणू संतापामुळे तुझा सगळा जोष निघून गेला होता आणि भावनाही आटून गेल्या होत्या. तू माझ्या कमरपट्ट्यातली नाडी काढून घेतलीस आणि तिनं माझे हात बांधलेस.

बांधलेल्या हातांनी मी आपले केस सारखे करण्याचा प्रयत्न करत होते आणि तू ते बघत होतास. बरं वाटलं. मला त्या वेळचे तुझ्या डोळ्यांमधले भाव पाहून. इतक्या दिवसांची ही सवय यावेळी तरी निघून जाईल, असं मला वाटलं.

पण तरीही दुसऱ्या कुणाचा त्या चामखिळाला चुकूनही स्पर्श होणं धोक्याचंच होतं.

तुझं माझ्यावरचं उरलंसुरलं प्रेमही संपण्याचं कारण माझी ती गेलेली सवय पुन्हा सुरू झाली हे होतं का? तू माझा नाद सोडला होतास आणि मला हवं ते करायला मी मोकळी होते असं तुला सुचवायचं होतं का? मी जेव्हा पुन्हा चामखिळाशी चाळा करायला लागले, तेव्हा तू ते न पाहिल्याचं नाटक केलंस, आणि एक शब्दही उच्चारला नाहीस.

आणि मग एक नवल घडलं. रागावण्यानं आणि मारण्यानंही न गेलेली माझी ती खोड– गेली की नाही ती? तुझ्या जालीम उपायांचा काहीही उपयोग झाला नाही. आपोआपच गेली ती.

''एक गंमत सांगू? आता अजिबात खेळत नाही मी त्या चामखिळाशी.'' मी असं म्हटलं– जणू मला त्या क्षणी ती गोष्ट पहिल्यांदा लक्षात आल्याप्रमाणे. तू नुसताच हुंकार दिलास. त्या गोष्टीचं तुला काहीच सोयरसुतक नसल्यासारखा. मला तुला विचारावंसं वाटलं– जर तुझ्या दृष्टीनं ती इतकी क्षुल्लक गोष्ट होती, तर त्याच्यासाठी इतकी काय गरज होती माझ्यावर रागवायची? आणि मला वाटतं तुलाही मला विचारायचं असेल– जर ती सवय इतक्या सहजपणे जाण्यासारखी होती, तर ती घालवायला इतका वेळ का लागला मला? पण तू तर माझ्याशी बोललाही नाहीस.

तुझ्या चेहऱ्यावरचे भाव जणू म्हणत होते– तुझ्या त्या सवयीनं मला काहीही फरक पडत नाही. तुझी सवय ना फायदेशीर, ना घातक– तुला हवं असेल तर बस दिवसभर खेळत त्याच्याशी. मला फटकारल्यासारखं झालं. तुला खिजवण्यासाठी तुझ्यासमोर मुद्दाम त्या चामखिळाला हात लावावासा वाटला मला. पण का कुणास ठाऊक. माझा हात हलायलाच तयार नव्हता.

खूप एकटं वाटलं मला आणि खूप रागही आला. तू जवळपास नसतानाही मला त्या चामखिळाला हात लावावासा वाटला. पण आता मला अचानक तसं करण्याची लाज वाटली, तसं करणं नकोनकोसं झालं आणि पुन्हा एकदा माझा हात जागचा जाम हलेना.

मी जमिनीकडे बघत ओठ चावला.

''काय झालं तुझ्या चामखिळाला?'' असं तू म्हणण्याची मी वाट बघत होते. पण त्यानंतर 'चामखीळ' हा शब्द जणू नाहीसाच झाला आपल्या संभाषणातून.

आणि कदाचित त्याचबरोबर इतरही अनेक गोष्टी नाहीशा झाल्या.

जेव्हा तू माझ्यावर रागवत होतास त्या दिवसात मी काहीच का करू शकले नाही? किती कवडीमोलाची बाई आहे मी!

माहेरी गेले होते, तेव्हा आईबरोबर एकत्र स्नान केलं.

''तू आता पूर्वीसारखी चांगली दिसत नाहीस, सायोको.''

ती म्हणाली, ''शेवटी वय थोपवणं कुणालाही जमत नाही हेच खरं.'' आश्चर्यचकित होऊन मी तिच्याकडे पाहिलं. ती पूर्वी होती तशीच होती. गुटगुटीत आणि टवटवीत.

''आणि खूपच छान होता तो तुझा चामखीळ.''

त्या चामखिळापायी खूप काही सहन केलंय मी. पण मी आईला तसं म्हणू शकत नव्हते. मी म्हणाले, 'चामखीळ काढून टाकण्यात डॉक्टरांना फारसा त्रास पडत नाही असं म्हणतात.''

''काय? डॉक्टरांना?... पण त्याचा व्रण राहीलच ना?'' किती शांत आणि मजेत असते माझी आई! ''त्या चामखिळाचा विषय निघाला ना, की खूप हसायचो आम्ही. आम्ही म्हणायचो, लग्न झाल्यावरसुद्धा सायोको अजूनही खेळत असेल त्याच्याशी.''

''होतेच मी खेळत त्याच्याशी.''

''आम्हाला वाटलंच होतं, तू खेळत असशील म्हणून.''

''पण वाईट होती ती सवय. मला लागली तरी कधी ती?''

''मुलांना केव्हा चामखीळ येतात कुणास ठाऊक. लहान बाळांच्या अंगावर चामखीळ दिसत नाहीत कुठे.''

''माझ्याही मुलांच्या अंगावर कुठेच नाहीयेत.''

''असं? पण मुलं वाढायला लागली ना, की हळूहळू यायला लागतात ते,

आणि कधीही जात नाहीत. अर्थात तुला आहे तेवढ्या आकाराचा चामखीळ अपवादानंच दिसतो. तुझ्या अगदी लहानपणीच आला असेल तो.''

आई माझ्या खांद्याकडे बघून हसली.

मी लहान होते तेव्हा माझी आई आणि बहिणीही माझा चामखीळ कधीकधी चाचपत असत ते मला आठवलं. तेव्हा अगदीच छोटा आणि छान होता तो चामखीळ.

मलाही त्यामुळेच त्याच्याशी खेळण्याची सवय लागली नव्हती का?

अंथरुणात पडल्यापडल्या मी चामखिळाला हात लावत राहिले आणि माझे लहानपणीचे आणि तरूणपणीचे दिवस आठवत राहिले.

मी त्याच्याशी शेवटची खेळले होते त्याला कितीतरी दिवस झाले होते. किती वर्षं कुणास ठाऊक.

तुझ्यापासून दूर, ज्या घरात मी जन्मले तिथे मी हवी तेवढी खेळू शकत होते त्या चामखिळाशी. कुणीही थांबवायचं नाही मला.

पण त्याचाही काही उपयोग नव्हता.

माझ्या बोटांनी चामखिळाला स्पर्श केला, तेव्हा थंड आसवांनी भरले माझे डोळे.

मला खरंतर खूप पूर्वीच्या, माझ्या तरूणपणीच्या गोष्टी आठवायच्या होत्या, पण चामखिळाला हात लावताक्षणी मनात विचार आला, तो फक्त तुझा.

मी वाईट बायको ठरले हे माझे दुर्दैव. कदाचित माझा घटस्फोटही होईल. पण स्वत:च्या माहेरी अंथरूणात पडलेली असतानाही मनात केवळ तुझाच विचार येईल याची कल्पनाही नव्हती मला.

मी अश्रूंनी भिजलेली माझी उशी पालटली– आणि मला चक्क चामखिळाचं स्वप्न पडलं.

नंतर मी जागी झाले, तेव्हा ती स्वप्नातली खोली नक्की कुठली होती ते मला कळेना. पण तू तिथे होतास, आणि आपल्याबरोबर एक दुसरी बाई होती. मी दारू पीत होते. मला चांगलीच चढली होती दारू; आणि मी कशासाठी तरी तुझ्याकडे गयावया करत होते.

माझी ती दुष्ट खोड पुन्हा एकदा जागी झाली. मी आपला डावा हात मागे नेला– नेहमीसारखा छातीसमोरून. पण... पण तो चामखीळ– माझ्या दोन बोटांमध्ये धरला तेव्हा चक्क निघून आला तो! कोणत्याही वेदना न होता, अगदी सहजपणे निघून आला तो– जणू काही तसं होणं नैसर्गिकच असल्यासारखा. माझ्या बोटांना त्याचा स्पर्श एखाद्या भाजलेल्या दाण्याच्या सालासारखा भासला.

मी माझा चामखीळ तुझ्या नाकाजवळच्या त्या चामखिळाच्या खळग्यात लावायला सांगितलं तुला. एखाद्या बिघडलेल्या मुलासारखं.

मी माझा चामखीळ तुझ्याकडे सरकवला. मी रडले आणि ओरडले. मी तुझी बाही खेचली आणि तुझ्या छातीला बिलगले.

मी जागी झाले तेव्हा उशी अजूनही ओली होती. अजूनही रडत होते मी.

मला अतिशय थकवा आला. पण त्याचबरोबर मला खूप हलकं हलकं वाटलं. डोक्यावरून एखादं मोठं ओझं उतरवावं तसं वाटलं.

जरावेळ मी स्वत:शीच हसत राहिले आणि विचार करत राहिले. तो चामखीळ खरोखरच नाहीसा झाला होता की काय? त्याला पुन्हा हात लावून बघण्याचा धीर मला होईना.

एवढीच आहे माझ्या चामखिळाची गोष्ट.

माझ्या बोटांमध्ये मला अजूनही जाणवतो तो चामखीळ– एखाद्या काळ्या दाण्यासारखा.

तुझ्या नाकाजवळच्या त्या छोट्याशा चामखिळाचा मी आजवर कधी फारसा विचारच केला नव्हता. त्याविषयी मी कधी बोललेही नव्हते. पण माझ्या मनात नक्कीच कुठेतरी असला पाहिजे त्याचा विचार नेहमी.

माझा चामखीळ लावल्यामुळे तुझा चामखीळ जर खरोखर वाढला, तर ती किती झकास परीकथा होईल नाही?

आणि तुलाही माझ्या चामखिळाचं स्वप्न पडलं होतं असं मला वाटलं तरी किती खुश होईन मी !

***

एक गोष्ट सांगायची राहिलीच.

''त्या... त्या गोष्टीनं डोकं भडकतं माझं.'' तू म्हणाला होतास ते मला इतकं चांगलं उमजलं, की मला वाटलं, तुझ्या त्या वाक्यातूनसुद्धा माझ्याबद्दलचं प्रेमच व्यक्त होतंय. मला वाटलं, मी जेव्हा जेव्हा त्या चामखिळाला हात लावते, तेव्हा तेव्हा माझ्यातल्या सगळ्या नीच आणि ओंगळ गोष्टी बाहेर येतात.

पण मी जर तुला एक गोष्ट सांगितली– ज्याविषयी पूर्वीच बोलले आहे मी– तर जाईल का निघून माझा वाईटपणा? माझ्या आईनं आणि बहिणींनी ज्या प्रकारे माझे लाड केले होते, त्यामुळेच त्या चामखिळाशी खेळण्याची सवय लागली मला.

मी आईला म्हटलं, ''खूप वर्षांपूर्वी मी जेव्हा चामखिळाशी खेळायचे, तेव्हा तू ओरडत असशील ना मला?''

''हो, ओरडायचे ना मी– फार काही वर्षं झाली नाहीत त्याला.''

''का ओरडायचीस तू मला?''

''का? ती सवय वाईट आहे म्हणून.''

''पण जेव्हा तू मला चामखिळाशी खेळताना बघायचीस तेव्हा कसं वाटायचं तुला?''

''कसं म्हणजे?''... आईनं डोकं एका बाजूला झुकवलं, ''ते योग्य नव्हतं.''

''ते माहितीय मला. पण कसं दिसायचं ते? माझी दया यायची तुला? की तुला वाटायचं काय आगाऊ आणि नालायक पोरगी आहे!''

''त्याचा फारसा विचारच केला नाही मी. फक्त वाटायचं, की तो चाळा तू थांबवावास. विशेषतः तुझ्या चेहऱ्यावर तो वेडसर, भोंगळ भाव यायचा ना, त्यामुळे.''

''माझा त्रास व्हायचा का तुला?''

''हो, जराशी नाराज व्हायचे मी.''

''आणि मग तू आणि इतर सगळे चामखिळाला टिचक्या मारायचात– मला चिडविण्यासाठी?''

''हो. करायचो बहुतेक आम्ही तसं.''

''ते जर खरं असेल, तर मग मी नादात असल्यासारखी चामखिळाला हात

लावायचे, ते का? माझ्या लहानपणी आईनं आणि बहिणींनी माझ्यावर केलेलं प्रेम मला आठवायचं होतं, हेच त्याचं कारण नाही का?''

माझं ज्या ज्या व्यक्तींवर प्रेम आहे, त्यांची आठवण काढण्यासाठीच मी तसं करत होते, नाही का? तुला मला सांगायचं होतं ते हेच.

सुरुवातीपासून शेवटापर्यंत माझ्या चामखिळाबद्दल तू चुकीची समजूत करून घेतली होतीस असं नाही वाटत तुला?

तुझ्याबरोबर असताना मनात दुसऱ्या कुणाचा विचार करत होते का मी?

मला पुन्हा पुन्हा वाटतं- कितीतरी वेळा वाटतं, की तुला इतकी नापसंत असलेली माझी ती सवय हे खरं म्हणजे मला आजवर शब्दात व्यक्त करता न आलेल्या प्रेमाचा संकेत तर नव्हता ना?

चामखिळाशी खेळण्याची माझी सवय ही एक क्षुल्लक गोष्ट आहे. त्याच्या समर्थनासाठी काही सबबी वगैरे सांगायच्या नाहीत मला. पण इतर अनेक गोष्टी- ज्या गोष्टींमुळे मी 'वाईट बायको' ठरले- अशाच प्रकारे तर सुरू झाल्या नसतील ना? म्हणजे सुरुवातीला माझं तुझ्यावर प्रेम व्यक्त करण्यासाठी मी केलेल्या गोष्टी, केवळ त्यांचं खरं स्वरूप जाणून घेण्याची तुझी तयारी नसल्यामुळे अखेर 'वाईट बायकोचे दुर्गुण' ठरल्या, असंही झालं असेल. नाही का?

हे शब्द लिहितानाही, मी म्हणजे स्वत:वर अन्याय झाल्याचं दाखवण्याचा प्रयत्न करणारी एक वाईट बायको तर नाही ना असं वाटतं मला. पण तरीही या सगळ्या गोष्टी मला सांगितल्याच पाहिजेत तुला.

***

# खोटं

**मूळ रशियन लेखक : अनातोली ग्रिगोऱ्येविच अल्येक्सिन**
**भाषांतर : शुभा सोहोनी**



**परिचय : अनातोली ग्रिगोऱ्येविच अल्येक्सिन**

**(मूळ आडनाव गोबरमान).**

**(१९२४)**

**उच्चशिक्षित कुटुंबात जन्मलेल्या अल्येक्सिन यांनी आपले लिखाण वृत्तपत्रातून प्रसिद्ध करणे सुरू केले. त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या व बालसाहित्य यांची निर्मिती केली. अल्येक्सिन यांनी काही नाटके लिहिली. काही इतर लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांचे नाट्यरुपांतर केले. चित्रपटांसाठी पटकथासुद्धा लिहिल्या. आपल्या प्रदीर्घ लेखन कारकिर्दीत त्यांना अनेक साहित्यिक पुरस्कार व नागरी सन्मान प्राप्त झाले.**

***

**ग्ये**न्काला सोळा वर्षांखालील मुलांना पाहण्याची परवानगी नसलेले चित्रपट पाहायला खूपच आवडायचे. ज्यांमध्ये काही तात्पर्य नसायचं, जी वाढत्या वयासाठी म्हणजे मोठ्यांसाठी असत अशी पुस्तकं वाचायला आवडायची.

जेव्हा एकदा रेडिओवरून पालकांसाठी म्हणून एक भाषण उद्घोषित करण्यात आलं तेव्हा हे भाषण न चुकता ऐकायचं ग्येन्कानं ठरवलं. रुक्ष आवाज त्याच्या कानी पडला. पहिली सूचना होती, 'मूल जितके अधिक वाचते तितके अधिक ते शिकत असते.' ग्येन्का घाबरलाच. तो कधीच शिस्तीत वाढला नव्हता हे सरळच होतं. त्याला पाचांपैकी जे तीन गुण मिळत होते ते पुस्तकांमुळेच. आत्ताआत्तापर्यंत ग्येन्का जेवणाच्या अन् झोपण्याच्या वेळीच पुस्तकं वाचायचा. मग दुसरी अट, ती त्याला लागू पडत नव्हती. 'बालकाने पालकांचा मान ठेवावा, पण त्यांना घाबरू नये.'' ग्येन्का तर एकाच वेळी वडिलांचा मानही ठेवायचा अन् घाबरायचाही.

वडिलांनी ग्येन्कापुढे आव्हान ठेवलं. युद्धाचे सारे नियम त्यांनी अंमलात आणले. पहिल्या प्रथम वाचून झालेल्याचा अर्थ स्पष्ट केला. पुस्तकाबद्दल मुलाशी चर्चा केली. याचा परिणाम असा झाला, की लेखकांची नावे, आडनावे ग्येन्काच्या डोक्यात विनाकारणच गोंधळ माजवू लागली आणि मग वडिलांनी निर्णायक हल्ला चढवायला सुरुवात केली. ते कठोरपणे मुलाची थट्टा करायचे, अगदी त्याच्या मित्रांच्या देखत. ग्येन्का भांबावून गेला; तेव्हा सौम्य बनून वडिलांनी त्याला धीर दिला.

''आता आपण दोघं मिळून वाचू या.''

''काय? दोघं मिळून?''

ग्येन्का चकित झाला.

'मोठ्यानं, हो ना?''

''नाही. मोठ्यानं नाही. पण मनातल्या मनातही नाही, आणि मी सांगेन ती पुस्तकं तू आणायचीस; नंतर आपण त्याच्यावर चर्चा करत जाऊ.''

पहिल्या मजल्यावर मुलांसाठी वाचनालय होते. ग्रंथपाल, सज्जन, प्रौढ बाई होती. 'पाहा, फाडू नकोस' अशा टोपणनावाची. ग्येन्काच्या वडिलांनी सांगितलेली पुस्तकं ती काढून द्यायची.

रात्री जेवणाच्या वेळी ग्येन्काची परीक्षा सुरू व्हायची.

वडील विचारायचे, ''पुन्हा तू निसर्गवर्णन गाळून टाकतोयस?''

ग्येन्का स्पष्टीकरण द्यायचा, ''मी काहीही गाळून टाकत नाहीये.''

''खोटं बोलू नकोस, तू खोटं बोलतोस ते जास्त वाईट हं! इथे हिमवर्षावाच्या वासाची तुलना कशाशी केलीय?'' ग्येन्का खुर्चीतल्या खुर्चीत चुळबुळत राही. त्याला वाटे, ज्या बर्फाच्या गंधाच्या तुलनेबद्दल वडील विचारत होते, तो बर्फ जिथे पडत असेल त्या रस्त्यावर धाव घ्यावी.

''लेखक पहिल्या गंधाची तुलना खरबुजाशी करत आहे हे अगदी योग्य आहे. आणि तू हे गाळून टाकलंस?''

आणि मग ग्येन्काला स्वत:हून नवनवीन काही वाचायला आवडू लागलं. रात्री जेवण्याच्या वेळी होणाऱ्या परीक्षा संपल्या. त्यांच्याऐवजी पुस्तकाविषयी वादविवाद रंगू लागले.

कधीकधी आई त्या चर्चेत हस्तक्षेप करायची. वडीलही त्याच क्षणी तिच्याशी सहमत व्हायचे, पण आई कशामुळे तरी रागवायला लागली.

केवळ ट्राममध्ये स्त्रियांसाठी जागा राखून ठेवतात; पण चर्चेच्या वेळी ही स्त्री निरुपयोगी असते.

ग्येन्काची आई टायपिस्ट होती. ती घरीच कामं आणायची. तिला सकाळच्या वेळी कुठेही जाण्याची घाई नसायची. पण ती सगळ्यांच्या आधीच उठायची. ग्येन्कासाठी आणि त्याच्या वडिलांसाठी नाश्ता बनवायची.

आईचा निरोप घेताना तिच्या कपाळावर ओठ टेकवून वडील दरवेळी एकच, तेच ते शब्द उच्चारायचे.

''गुड बाय, माझ्या लाडक्या पोरी.''

आईचा चेहरा एकदम बदलायचा. लाल व्हायचा आणि ग्येन्काला वाटायचं, की हे शब्द ऐकायलाच जणू ती इतक्या लवकर उठते.

'पोरी' हा शब्द तर आईसाठी मुळीच योग्य वाटत नव्हता. काही झालं तरी ती नाजूक चणीची नव्हती. उंचीनं ती वडीलांइतकीच, १८८ सेंमी. असावी. हे सेंटिमीटर्स ग्येन्काच्या दृष्टीने अभिमानाचे होते. पण पाहा ना, आपल्या एवढ्याशा मुलाला वडील कटाक्षाने 'गेनादि' म्हणून संबोधायचे.

वडील अन् मुलगा एकदमच बाहेर पडायचे, कोपऱ्यापर्यंत जायचे, हे फार छान असायचं. वडिलांच्या शेजारून चालणं ग्येन्काला छान वाटायचं.

आई घरीच थांबायची. पुरुष, कामाची माणसं घाईघाईनं चालायला लागायची. ग्येन्काला माहीत असायचं, की त्याचे सर्व मित्र अंगणातून त्याच्याकडे हेव्यानं पाहत असायचे. कारण सर्वांना त्याच्या वडिलांबद्दल आदर वाटायचा. अशासाठी असेल की त्यांनी मुलांना बर्फाचा किल्ला बनवायला शिकवलं होतं, ते स्वत: बनवलेल्या यंत्राविषयी सांगत असत.

कोपऱ्यावर ते पुरुषमाणसांसारखा हात हलवून थोडक्यात निरोप घ्यायचे.

वडील म्हणायचे, ''हं! चल.''

ग्येन्का संध्याकाळी उत्सुकतेने वडिलांची वाट पाहायचा, त्यांच्या पावलांचा आवाज तो लगेचच ओळखायचा. एक शांत, गंभीर घंटा वाजायची. दार उघडण्याची ग्येन्काला अनिवार इच्छा होई. पण त्याला जाणवायचं, की त्याच्यापेक्षाही आईला हे जास्त हवं असायचं आणि तो तिला वाट करून द्यायचा. वडील पुन्हा आईच्या डोक्यावर ओठ टेकवून तसेच आणि तेच शब्द उच्चारायचे,

''हॅलो, माझ्या लाडक्या पोरी.''

त्यांचे हे शब्द त्याच्या कानाला जास्त सुखावत. कारण वडील दिवसभर खूप कामे उरकून दमले-भागलेले वाटत. या हळुवारपणाने ग्येन्का अस्वस्थ झाल्यावाचून राहायचा नाही. आईला वडील ज्या शब्दांनी संबोधत त्यांनी ग्येन्काच्या मनात आनंद आणि एक प्रकारची शांतता दाटून यायची.

दुसऱ्याच क्षणी आईच्या चेहऱ्याकडे ते निरखून पाहायला लागायचे.

''तुझे डोळे किती सुजल्यासारखे झालेत? कशाला ही त्रिशोत्का हवीय?'' टाइपिंग मशीनला ते त्रिशोत्का म्हणायचे. जाता जाता ते जणू सहजच ग्येन्काला म्हणायचे,

''सायन्स कसं काय चाललंय?''

आपला मुलगा खरं बोलतोय की नाही हे पाहायला ते कधीच त्याच्या प्रगतिपत्रकात नजर टाकत नसत. आणि म्हणूनच की काय ग्येन्का खोटं बोलूच शकत नव्हता. जरी तो यथातथाच मार्क्स मिळवून आला तरी तो तसं सरळसरळ सांगायचा. वडीलही त्यावर गहजब करायचे नाहीत. ग्येन्काने त्यांच्या तोंडून अपशब्द ऐकले नाहीत.

आईचं वागणं मात्र एकदमच वेगळं असायचं. त्याचं प्रगतिपत्रक उघडून त्याच्या बेकार मार्कांवर ती अशी नजर टाकायची, की एखादी दुःखद घटना वाचावी. नंतर ती जिची मुलगी सहावीतच शिकत होती, त्या शेजारणीकडे जायची आणि गप्पा मारायची.

''आमच्या ग्येन्कानं तर आज पुन्हा तीन मार्क्स मिळवले आणि त्याचे वडील म्हणतात, दोन म्हणजे जास्तच वाईट!''

आई हळहळायची, वडिलांच्या बोलण्याची पुनरुक्ती करायला तिला आवडायचं. तिला ते आवश्यक अन् पटणारं वाटायचं, मग ती दीर्घ सुस्कारा टाकायची, पण वडिलांचं मौन मात्र ग्येन्काला कुठेतरी खुपायचं. आणि त्याच संध्याकाळी तो पुस्तकं पुढे घेऊन बसायचा.

ग्येन्काची एक खोड मात्र वडील सुधारू शकत नव्हते. ही खोड म्हणजे त्याची सिनेमाची ओढ. असं लक्षात यायचं, की काही कारणाने सोळा वर्षांखालील व्यक्तींना परवानगी नसलेले पिक्चर लागले, की ग्येन्का ते उड्या मारत पाहायचा. थोडेसे पैसे त्याला आई द्यायची आणि उरलेल्यांची भर तो आटोकाट काटकसरीने करायचा. शाळेतला नाश्ता तो एक दिवसाआड घ्यायचा. मेट्रो आणि ट्रॉली बसमधून विनातिकीट प्रवास करायचा.

जेव्हा ग्येन्का गोंधळलेल्या मनाने, लालबुंद चेहऱ्याने घरी यायचा, तेव्हा वडील आपल्या मुलाकडे रोखून पाहात, त्याच्याकडे दृष्टिक्षेप टाकत म्हणायचे,

''खोटं बोलण्याचा प्रयत्न करू नकोस, तू सिनेमाला गेला होतास?''

आणि संध्याकाळी जेवणाच्या वेळी कुणालाच उद्देशून नसल्यासारखं, विचार करत करत वडील उद्गारायचे,

''आज नवीन पिक्चर लागलंय! कशाविषयी बरं?''

आणि मग त्याच्या स्वत:च्याही नकळत त्या पिक्चरबद्दल सांगितल्याशिवाय ग्येन्काला राहवत नसे. आई कधी कधी वडिलांना म्हणायची,

''संध्याकाळी आपण सिनेमाला जाऊ या? ग्येन्का तिकीटं आणून देईल. या कामात तो तरबेज आहे.''

हतबल झाल्यासारखे हात पसरून वडील म्हणत, ''खरंय! मी आनंदाने आलो असतो. पण तुला माहीत आहेच. नेहमीप्रमाणे आजही संध्याकाळी मला अगदी निकडीची कामे आहेत.''

अशावेळी ते– ज्यांच्याबरोबर विचारविनिमय करायलाच हवा अशा काही इंजिनिअर्सपैकी हुशार इंजिनिअरचे नाव पुढे करीत आणि मग ग्येन्का रागाने आईकडे पाही. वडील त्यांच्या कामात किती व्यग्र आहेत, हे तिला समजत कसं नाही.

एकदा ग्येन्काला कळलं, की त्याच्या घरापासून तीनेक फर्लांगावर कुठला तरी जुना सिनेमा चाललाय, त्याच्याबद्दल त्याचे मित्र अगदी मोजक्या शब्दांत स्तुती करून म्हणत होते, ''फारच सुरेख.''

खरं तर ग्येन्कानं संध्याकाळच्या शोला जायचं मुळीच ठरवलं नव्हतं, पण त्याला माहीत होतं, की आज वडील उशीरा येणार होते. त्यांच्यासाठी तो महत्त्वाचा अन् सणासारखा दिवस होता. नव्या यंत्राची चाचणी होती. वडील म्हणायचे अशा कोणत्याही अनपेक्षित घटना घडू शकतात, की एखादा बिनडोक इंजिनिअर उलटंच काही करण्याची शक्यता असते म्हणून त्यांना काळजी वाटते.

वडील असे काळजी करत, तेव्हा त्यांच्या परतण्याची वाट पाहत आईदेखील चिंतेत पडायची. मग तिला एके जागी स्वस्थ राहवत नसे.

ग्येन्काला पिक्चरला जाण्याचे अजूनही एक विशेष कारण होतं, असं की त्यांची वाट पाहण्यातले तास न् तास भुर्रकन उडून गेले असते. घरी परतताच वडिलांना पाहणं आणि आईच्या चेहऱ्यावरून सगळं काही ठीक असल्याचं, छान असल्याचं समजणं हेही कारण होतंच.

ग्येन्कानं आपल्याबरोबर सातवीतल्या उंचपुऱ्या झोराला घेतलं. कोणत्याही अडवणुकीशिवाय कुठल्याही खेळाची तिकीटं त्याला विकत मिळत असत. झोरा सर्व मुलांना आवारातच तिकिटं आणून द्यायचा.

संध्याकाळच्या गजबजलेल्या रस्त्यातून पोरं धावत सुटली. सिनेमा थिएटरवर येऊन पोहोचली, तर कळलं, की उशीर झालाय. तिकिटं संपलीत. आधीचा खेळ संपला होता. सिनेमागृहातून माणसं बाहेर पडत होती. बाहेर पडण्याच्या दारात स्टँडवरून कोट-टोप्या काढून घेता घेता आपल्या प्रतिक्रियांची देवाणघेवाण करत होती. ग्येन्का त्यांच्याकडे हेव्यानं पाहत होता.

आणि अचानक त्याला ओळखीचा आवाज ऐकू आला,

''तुला थंडी नाही वाजत, पोरी?''

ग्येन्कानं मागे वळून पाहिलं आणि त्याला त्याचे वडील दिसले.

कोणा पिंगट केसांच्या स्त्रीला शाल लपेटून घेण्यासाठी ते वाकून मदत करत होते. ग्येन्काला झटकन बाजूला व्हावं, लपावसं वाटलं. संध्याकाळच्या खेळाला जाण्याची त्याला सक्त मनाई होती. त्याचे डोळे त्याच्या स्वत:च्याही नकळत पाणावले. ते वडिलांच्या डोळ्यांना भिडले आणि चकित होऊन तो एक पाऊल मागे सरकला. मग त्याने पाहिले, की वडीलही त्याला घाबरले होते. नेहमी ते इतके धीराचे, ठाम हालचाली असलेले, ते अचानक गडबडले होते. आपला हात पिंगट केसांच्या बाईच्या हाताखालून काढून घेतानाही त्यांची त्रेधा झाली. ते भांबावले होते. ग्येन्काला असंही जाणवलं, की ते खांबाआड लपण्याचा प्रयत्न करीत होते. दुर्दैवाने तो खांब त्यांना लपवू शकला नाही कारण तो बारीक होता अन् वडील भलेमोठे, रुंद खांद्याचे होते.

मग ग्येन्कानंच त्यांची सुटका केली. त्यानं रस्त्यावर धाव घेतली आणि इतक्या वेगानं तो धावत सुटला, की उंचापुरा, लांबटांग्या झोरासुद्धा त्याची बरोबरी करू शकला नाही. पण कुठल्यातरी क्रॉसिंगच्या ठिकाणी तो क्षणभर थांबला. त्याच्या कानात ते शब्द घुमत होते, ''तुला थंडी नाही वाजत, पोरी?''

जिला वडील खाली वाकून शालीत लपेटत होते ती पिंगट केसांची स्त्री तशी उंच नव्हती हे खरंच होतं, पण ते शब्द तिच्यासाठी वापरले जावेत हे त्याला विचित्रच वाटत होतं. ते शब्द आईच्या हक्काचे होते. त्या शब्दांवर आईचा अधिकार होता, फक्त आईचाच.

पण मग यंत्राची चाचणी ती कसली? याचा अर्थ– ते खोटं होतं? शक्य आहे, यंत्रबिंत्र हे नसेलच. वडिलांनी खोटं सांगितलं. ग्येन्का हे समजूच शकत नव्हता. त्याच्या आकलनशक्तीला हे पेलत नव्हतं. तर मग हे सगळं खोटंच! ते संवाद, चर्चा, वडिलांचे सल्ले, रात्री जेवतानाचे वादविवाद, सगळं सगळं खोटं!

'पहा, फाडू नकोस' या टोपण नावाची ती ग्रंथपाल ओरडून सांगत होती,

'ग्येन्का, इकडे ये. तू सांगितलेलं पुस्तक मी काढून ठेवलंय.' पण ग्येन्कानं 'वडिलांनी सांगितलेलं पुस्तक नकोय' अशा अर्थानं हात झटकला. त्या पुस्तकावर आता का कोण जाणे त्याचा विश्वासच राहिला नव्हता.

घरी परतल्या परतल्या ग्येन्का बिछान्यात आडवा झाला.


''तुला काय झालंय? किती तापला आहेस रे! ताप आलाय?'' आईनं चिंतेनं विचारलं, ग्येन्का किंवा त्याचे वडील आजारी पडले, की ती जास्त काळजीत पडायची. अगदी साधं दुखणं सुद्धा तिला असाध्यच वाटायचं.

''तू काळजी नको करूस, ममा, मी फक्त खूप दमलोय.'' कधीही नसेल इतक्या लाडिकपणे ग्येन्काने उत्तर दिले. कसंही करून आई जेव्हा वडिलांना दार उघडेल, तेव्हा ते काय सांगतील ते त्याला ऐकायचं नव्हतं; ते तो ऐकूही शकला नसता.

***

# पोरे

मूळ पोलीश लेखक : स्लावोमीर म्रोझेक
भाषांतर : मंदार पुरंदरे



**परिचय: स्लावोमीर म्रोजेक**

**(१९३०)**

**स्लावोमीर म्रोजेक हे पोलंडमधील एक लेखक. पोलंडच्या दक्षिण भागात बोंजेचिन येथे त्यांचा जन्म १९३०मध्ये झाला. एका साप्ताहिकात ते चित्रकार म्हणून काम करत. १९६३ पासून त्यांनी फ्रान्स व नंतर मेक्सिको येथे वास्तव्य केले. ते नाटककार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या एका नाटकावर आंद्रे वायदा या नामांकित दिग्दर्शकाने सिनेमा केला आहे. १९५५ साली त्यांचा 'स्लोन' म्हणजेच 'हत्ती' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. प्रस्तुत कथा त्यातूनच घेतली आहे. १९९६ मध्ये म्रोजेक पोलंडमध्ये म्हणजेच मायदेशी परत आले. पण २००८ पासून ते पुन्हा फ्रान्समध्ये गेले आहेत.**

***

**या** वर्षीच्या हिवाळ्यात हवं तितकं बर्फ पडलं होतं. बाजारामध्ये पोरांनी एक बर्फाचा माणूस तयार केला होता.

बाजाराची जागा गजबजलेली होती. भोवताली असणाऱ्या कित्येक कार्यालयांच्या खिडक्यांतून नेहमीच बाजाराकडे पाहता यायचे. बाजारावर त्याचा फारसा परिणाम होत नसे. तो आपला वाढतच चालला होता. तर अशा या बाजारात नेमक्या मध्यभागी पोरांनी बर्फाचा माणूस उभा केला होता. बर्फाचा माणूस बनवणं हा तर पोरांचा अगदी आवडता खेळ.

सुरूवात बर्फाच्या मोठ्या गोळ्याने झाली. हा मोठा गोळा म्हणजे भलेमोठे पोट. त्यावर एक छोटा गोळा, म्हणजे पाठ आणि मान, मग त्यावर अजून एक छोटासा गोळा, म्हणजे झालं डोकं. कोळशाचे काही तुकडे घेऊन त्या बर्फाच्या माणसाच्या पोटावर काळी बटणे लावण्यात आली, म्हणजे आता शर्ट तयार.

नाकाच्या जागी गाजराचा एक तुकडा आला. थोडक्यात, आपल्या देशात दरवर्षी हिवाळ्यात संपूर्ण देशभर हजारो लाखो बर्फाची माणसे बनतात, तशातला हा अगदी नेहमीचाच एक बर्फाचा माणूस होता.

पोरे जाम खूश होती.

येणाऱ्या जाणाऱ्या कित्येकांनी तो माणूस पाहिला आणि ते पुढे निघून गेले. जणू काहीच न घडल्याप्रमाणे कार्यालये चालूच राहिली. पोरे मोकळ्या आणि थंड हवेत खेळत आहेत हे पाहून बाबांना बरे वाटले. ताज्या हवेत खेळल्याने गाल गुलाबी होतातच, आणि भूकही वाढते.

संध्याकाळच्या वेळेला सर्वजण घरी बसलेले असताना कोणीतरी दार ठोठावले. पेपर विकणारा एक माणूस होता. या माणसाचे त्या बाजारात पेपरचे दुकान होते. इतक्या उशिरा आल्याबद्दल त्याने आधी माफी मागितली. परंतु वडिलांच्या कानावर तातडीने काही गोष्टी घालणे जरूरीचे आहे म्हणून आलो, असे त्याचे म्हणणे पडले. ''तर, तुमची पोरे लहान आहेत... तेव्हा ती काही पण करणार... हे माहीतच आहे... पण तुम्ही वडील म्हणून लक्ष दिले पाहिजे; नाहीतर पोरांचे पुढे कसे होईल! तर साहेब, त्या बाहुल्याला जे नाक लावले होते ना, लाल गाजराचे, तर त्याबद्दल... म्हणजे...'' आता या पेपरविक्याचे स्वत:चे नाक लालेलाल झाले होते. थंडीच्या कडाक्याने किंवा कडाक्याच्या थंडीने, वोडका पिऊन नव्हे. पण म्हणून त्याच्या गोठलेल्या नाकाची अशी जाहीर खिल्ली उडवण्याचे काही कारण नाही. तर पुढल्या वेळी असे होणार नाही, याची खबरदारी घ्या म्हणजे झाले; पोरांना चांगल्या गोष्टी लहानपणापासूनच शिकवल्या पाहिजेत.

बाबांनी ही तक्रार चांगलीच मनावर घेतली. पोरांनी अशी खिल्ली उडवणे बरोबर नाही. लहान पोरांना समज कमी. पोरांना बोलावून त्यांनी पेपरविक्यासमोर विचारले, ''काय रे पोरांनो, त्या तुमच्या बर्फाच्या माणसाचे गाजराचे नाक ह्यांच्या नाकावरूनच घेतले ना?''

पोरांना काहीच उमगेना. अखेरीस बाबांनी समजावून सांगितल्यावर पोरांनी सांगितले, की गाजराचे नाक लावताना या पेपरविक्याचा विचार त्यांच्या मनात

बिलकूल नव्हता. परंतु बाबांनी मात्र शिक्षा म्हणून पोरांना संध्याकाळचे जेवण दिले नाही.

पेपरविक्रेत्याने आभार मानले आणि तो निघून गेला. पेपरविक्रेत्याची 'एक्झिट' झाली आणि स्थानिक सहकारी सोसायटीच्या अध्यक्षांची 'एन्ट्री' झाली. अध्यक्ष आणि घरातील कर्ते पुरुष, म्हणजे बाबा यांचे नमस्कार चमत्कार झाले. आता या इतक्या जान्या-मान्या अध्यक्षाला 'याचि देही याचि डोळा' आणि तेही आपल्या घरात पाहण्याची ही पहिलीच वेळ!

पोरे दिसताक्षणीच अध्यक्ष महाशयांनी मजेदार चेहरा केला, 'बर्र' असा काहीसा आवाज काढला आणि बोलायला सुरूवात केली.

''हं! ही लब्बाड कंपनी इथे राहते तर! तुम्ही वडील म्हणून थोडे लक्ष द्यायला हवे या लब्बाड कंपनीकडे! छोटी आहेत, पण लब्बाड आहेत अगदी! आज आमच्या गोडाऊनच्या खिडकीतून पाहत होतो मी. ही पोरे आपली बर्फात खेळत आहेत. भर बाजारात.''

''अच्छा! तुमचे म्हणणे आहे ते नाक, लाल गाजर म्हणजे ते नाक!''

''नाक? गाजर? छे छे! ऐकून घ्या माझे म्हणणे! ही पोरे काय करत होती माहीत आहे? हे बघा! तर त्यांनी आधी बर्फाचा एक मोठा गोळा घेतला, मग त्यावर दुसरा छोटा ठेवला, आणि मग त्यावर अजून एक छोटा. आता हे किती अपमानास्पद आहे!''

हे बाबांना नवीनच होते. त्यांना काहीच समजेना आणि अध्यक्षमहाशय अजूनच वैतागले, ''अहो, हे इतके साधे आणि सरळ आहे. त्यांचे म्हणणे असे आहे, की आपल्या विभागात, आपल्या सोसायटीत एक चोर दुसऱ्या चोराच्या खांद्यावर बसतो. आता असे बघा, समजा उद्या प्रेसवाल्यांना असे काही म्हणायचे असेल तर, पुरावे लागतात त्यासाठी, आणि ही पोरे भर बाजारात उघड्यावर असल्या गोष्टींवर टिप्पणी करत आहेत.''

थोडक्यात काय तर पोरांबद्दल असणाऱ्या काळजीमुळे अध्यक्षमहाशय हे सर्व आवर्जून सांगायला लागले. ''पुढे असे होणार नाही याची जबाबदारी घ्या; पोरांचे पुढे चांगले झाले पाहिजे.''

बर्फाच्या एका गोळ्यावर दुसरा गोळा ठेवताना त्यांच्या मनात आपला विभाग, एक चोर, त्यावर दुसरा चोर, अशा काही गोष्टी होत्या का हे बाबांनी पोरांना लगेचच विचारले. हे ऐकल्यावर पोरे आधी रडू लागली, आणि माना हलवून 'नाही, नाही' म्हणू लागली. तरीदेखील काहीतरी शिक्षा म्हणून बाबांनी पोरांना कोपऱ्यात उभे राहण्याचे फर्मान सोडले.

दिवस अजून संपला नव्हता. घराबाहेर बर्फाच्या घसरगाडीच्या घंटेचा आवाज झाला आणि बंद झाला. यावेळी दोन माणसे दरवाजा ठोठावत होती. जाडसर कोटावरचा चेहरा अनोळखी होता, तर दुसरा मात्र अगदीच ओळखीचा; राष्ट्रीय पातळीवरच्या कौन्सिलचे प्रेसिडेन्ट!! दरवाजाच्या चौकटीमधूनच दोघे एकसुरात म्हणाले, ''जरा आपल्या मुलांबद्दल बोलायचे होते!''

अशा प्रकारच्या भेटींची बाबांना एव्हाना सवय झाली होती! त्यांनी सरळ दोन खुर्च्या ओढून आलेल्या पाहुण्यांना बसायला जागा करून दिली. प्रेसिडेंट साहेबांनी दुसऱ्या माणसाकडे किंचित प्रश्नार्थक नजरेने पाहिले; आता सुरुवात कोण करणार असा प्रश्न त्या नजरेत होता. पण अशी नजर फेकून लगेच त्यांनीच बोलायला सुरूवात केली.

''वाईट वाटते! आपल्या घरात अशी पोरे असावीत, याचे वाईट वाटते! आपल्याला राजकारणाची काही कल्पना दिसत नाही. काय? पॉलिटिकली करेक्ट, इनकरेक्ट म्हणजे काय माहीत आहे?''

बाबा पुन्हा मोठ्या गोंधळात पडले.

''तुमच्या पोरांच्या कृत्यावरून समजतेच आहे! नाहीतर कमिटी ऑफ पीपल्स पॉवर-वर अशी राजकीय टिप्पणी कोण करू शकेल? तुमची पोरे! अहो, माझ्या ऑफिसच्या बरोबर समोर ही पोरे बर्फाचे खेळ मांडतात!''

''आले लक्षात! हे बघा ते एक चोर दुसऱ्या चोरावर...'' बाबांचे वाक्य पूर्ण होण्याच्या आतच ते म्हणाले, ''चोर! मूर्खपणा! अहो, माझ्या, म्हणजे नॅशनल कमिटीच्या प्रेसिडेंटच्या ऑफिससमोर ही पोरे बर्फाच्या बाहुल्या बनवतात, याचा

अर्थ तुम्हाला कळतो का! लोक पाठीमागे मला काय बोलतात, चांगले माहीत आहे मला. आता मला सांगा, त्या विरोधी पार्टीच्या ऑफिससमोर ही पोरे का खेळत नाहीत! अं... सांगा ना! विचार करताय! खाजवा डोके... आणि हे तुमचे डोके खाजवणे सगळे सांगून जाते! हे पहा, मला अखेरीस कारवाई करावी लागेल. परिणामांना तयार रहा.''

''कारवाई'' या शब्दानंतर तो दुसरा अनोळखी चेहरा उठला, अलगद चोरपावलाने खोलीतून बाहेर गेला. खिडकीबाहेर पुन्हा एकदा बर्फगाडीच्या घंटीचा आवाज झाला आणि हळूहळू दूर जात ऐकू येईनासा झाला.

''हं! तर परिणामांचा जरा विचार करा! अजून एक, मी घरातून निघताना शर्टाची बटणे उघडी टाकतो ही सर्वस्वी माझी खासगी बाब आहे. या गोष्टीवरून सार्वजनिक विनोद करण्याचे या पोरांचे काम नाही. पोरांनी ती कोळशाची बटने डकवली आहेत ना, त्याला दोन अर्थ आहेत! विचार करा! तुम्हाला सांगून ठेवतो, हे माझे आयुष्य आहे, मला जर वाटले तर मी पॅण्ट न घालता फिरेन, पण त्यावर तुमच्या पोरांना चेष्टा करण्याचा अधिकार नाही. लक्षात ठेवा!!!''

आरोपीच्या पिंजऱ्यातील बाबांनी मुलांना बोलावले आणि बर्फाचा माणूस, कोळशाची बटने याबद्दल खडसावून विचारले. पोरे पुन्हा एकदा रडू लागली. रडत रडत सांगू लागली, की कोळशाची बटने लावताना या साहेबांचा किंवा त्यांच्या उघड्या शर्टचा विचार त्यांच्या मनात बिलकुल नव्हता. बर्फात खेळणे हा साधा हेतू होता.

पोरांना संध्याकाळचे जेवण मिळणार नव्हतेच; कोपऱ्यात उभे राहण्याची शिक्षाही मिळालीच होती, त्यातच आता गुडघ्याला डोके टेकवून उभे राहण्याच्या शिक्षेची भर पडली.

त्यानंतरही घराचा दरवाजा बरेचदा वाजला, पण बाबांनी दरवाजा उघडला नाही.

दुसऱ्या दिवशी बागेजवळून चाललो होतो. तिथे या पोरांना पाहिले. बाजारात खेळण्याची पोरांना आता परवानगी नव्हती. आता नक्की काय खेळावे याचा ती विचार करीत होती.

''बर्फाचा माणूस बनवूया-''

''हॅं! नको... त्यात काही मजा नाही.''

''तो पेपरविक्या होता ना, त्याचेच मॉडेल बनवू! मस्तपैकी लालेलाल नाक बनवू- वोडका पिऊन लाल झालेले.''

''मला तो अध्यक्ष बनवायचा आहे.''


''आणि तो प्रेसिडेंट; उघडा शर्ट असलेला.''

नक्की कुठले मॉडेल बनवायचे यावर पोरांचे एक छोटेसे भांडण झाले. अखेरीस अशी तीनही बर्फाची माणसे एकामागून एक बनवायचे ठरले आणि पोरे आनंदाने कामाला लागली.

***

# आमचं लोकशाहीवादी कुटुंब

**मूळ जर्मन लेखक : माक्स फोन डेअर ग्र्यून**
**भाषांतर : शर्मिष्ठा खेर**



**परिचय : माक्स फोन डेअर ग्र्यून**

**(१९२६–२००५)**

**हे दुसऱ्या महायुद्धात सैनिक म्हणून भरती झाले. युद्ध संपताना ते अमेरिकन युद्धकैदी म्हणून दोन वर्षे स्कॉटलंडच्या छावणीत राहिले. तेथील वास्तव्यात त्यांना साहित्याची गोडी लागली. १९४६ साली त्यांची सुटका होऊन ते जर्मनीत परतले. प. जर्मनीत रूर येथे कारखान्यात कामगार म्हणून भरती झाले ते १९६३पर्यंत. त्या काळातच त्यांनी लिखाण सुरू केले. १९६३ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कादंबरीने ते लेखक म्हणून प्रकाशझोतात आले. तेव्हापासून शेवटपर्यंत ते लेखक म्हणून कार्यरत होते. प. जर्मनीत १९६०–७०च्या दशकामध्ये डाव्या विचारसरणीचा पुरोगामी, प्रागतिक विचारांचा प्रभाव मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुण पिढीवर होता. जुन्या धार्मिक चालीरीती, धर्मश्रद्धा न मानता नव्या प्रागतिक विचारांनुसार जगावे असे त्यांना वाटत होते. या पिढीचे प्रतिनिधित्व करणारा माक्स फोन डेअर ग्र्यून हा लेखक! त्यांनी सोबतच्या कथेत नवीन विचार आचरणात आणताना जुन्या चालीरीतींचे काय करायचे हे न समजलेल्या, गोंधळून गेलेल्या पालकांचे चित्र रेखाटले आहे. प्रस्तुत कथेत ''नक्की काही ठरवता न येणाऱ्यांची'' आपल्या हलक्याफुलक्या शैलीत ते खिल्ली उडवताना दिसतात.**

***

**ती**न वर्षांपूर्वी आमच्या कुटुंबाने नाताळ साजरा करायचा नाही असं ठरवलं. मी, बायको आणि आमची मुलगी संपूर्णपणे या निर्णयाच्या बाजूने होतो. पण आमच्या तीन वर्षाच्या मुलाने, फ्रँकने आपलं मत नीट सांगितलं नाही. त्याला मुद्दाम विचारल्यावर त्याने फक़्त उद्‌गार काढले– नन्नन्ना!

मग आम्ही एक तडजोड स्वीकारली. कारण काहीही केलं तरी नाताळच्या काळात घरात ते सजवलेलं झाड नसणं आम्हालाही झेपेना. खरं तर बूर्झ्वा संस्कृतीची सर्व चिन्हं फेकून देण्याचा आम्ही निश्चय केला होता. पण हे एक चिन्ह तेवढं चालवून घेतलं.

ख्रिसमस इव्हला बरोबर दुपारी दोन वाजल्यापासून आम्ही दूरच्या सापुअरलँडमधून आणलेलं झाड रंगीत अंड्यांच्या कवचांनी सजवायला लागलो. या अंड्यांना विशिष्ट प्रकाराने बारीक भोक पाडून कवच अखंड राहील अशाप्रकारे आतला सर्व ऐवज फुंकून बाहेर काढून टाकावा लागतो. मग ती रंगवायची. झाडं अशी नीट सजवायला अशी बरोब्बर साठ अंडी लागतात. आम्ही सगळ्यांनी मिळून खूप आवडीने हे काम सुरू केले. करताना खूप मजा आली. मग नाताळपर्यंत नुसते फुंकून काढलेल्या अंड्यांच्या बलकाचे पदार्थ होत राहिले.

त्यावेळी आमच्याकडे एक बुद्धिवादी विवेकवादी विचारसरणीचा पाहुणा अचानक आला. झाडासमोर उभा राहून कौतुकाने न्याहाळत उद्गारला,''अँटी–ट्री.'' या पाहुण्याच्या घरात खूप पूर्वीपासून धर्मोपदेशकांची परंपरा होती. तो स्वत: कायदेतज्ञ. त्याला आमच्या प्रागतिक विचारसरणीच्या कुटुंबात पाहुणा म्हणून राहायला मिळाल्याचं अप्रूप दिसलं. मग त्याने प्रथेप्रमाणे रंगवलेल्या अंड्यांचं कौतुक केलं; त्यामागे दडलेल्या कित्येक दिवसांच्या कामाची दखल घेतली. हलकेच हात लावून अंडी चाचपली. काही साध्या वॉटर कलरने तर काही ऑईलपेंटने रंगवली होती. त्यांच्यावरच्या वास्तवदर्शी आणि अमूर्त अशा दोन्ही शैलींतल्या चित्रकलेचंही रसग्रहण केलं.

आमच्याकडे नाताळच्या गाण्यांच्या १८–२०लाँग प्लेईंग रेकॉर्डस् होत्या. त्या तबकड्या वाजवण्याचा मोह होऊ नये म्हणून त्या कपड्यांच्या कपाटात मुद्दाम सगळ्यात मागे टाकून दिलेल्या होत्या. गेली पंचवीस–तीस वर्ष अजिबात न वापरलेलं फिडलही जुनाट पेटीत पडून होतं. आम्ही नव्या वसंतऋतुगानाच्या तबकड्या विकत घेतल्या होत्या. 'मे महिना आला रे आला' किंवा 'जमले सगळे वसंतपक्षी' नाहीतर 'वेशीवरच्या विहिरीत..'

आमच्या मॅट्रीकच्या वर्गात शिकणाऱ्या मुलीच्या मते हे सगळं प्रतिक्रांतिवादी होतं. पण तरीही नाताळाचं झाड बघायला झाडून साऱ्या मैत्रिणींना तिने बोलावलं. नव्या तबकड्याही वाजवल्या. मैत्रिणींना ते सगळं भयंकर गोड आणि 'शिक' आणि 'कूल' वाटलं. घरी जाऊन त्यांनी आपापल्या आई-वडिलांना अँटी-ट्री बद्दल सांगितलं. मी आहे लेखक. त्यांच्या आई-वडिलांनी 'लेखकांचा वरचा मजला जरा संशयास्पदच असतो आणि समाजाने स्वीकारलेल्या लेखकांना तो तसा असणं परवडतं' वगैरे टीका केली. पण पोरींनी अँटी-ट्रीचं असं काही कौतुक केलं की सगळे आईबाप शांत-पवित्र रात्री बरेच अस्वस्थ होते.

त्याच्या पुढच्या वर्षी बऱ्याच मुलींनी वर्गात जाहीर केलं की त्यांच्या घरीही यंदा नाताळात अँटी-ट्री असणार आहे. मागच्या वर्षी जिथे अँटी-ट्री नव्हतं असं तर एकही घर नव्हतं, निदान बुद्धिवादी, मध्यमवर्गीय आणि बिझीनेसवाले अशांपैकी तरी एकही घर असं नव्हतं.

पण वस्तीतल्या ग्रे एरियात म्हणजे कडव्या डाव्या आणि कामगार वर्गाच्या घरांमध्ये अजून छोटे बल्ब आणि अस्सल मधमाशांच्या मेणाच्या मेणबत्याच लटकलेल्या असत. त्यांच्याकडे जुनी पारंपारिक नाताळगीतंच म्हटली जात.

हळूहळू ग्रे एरियाही पाघळेल. आमचे प्रयत्न चालू आहेत. मागच्या वर्षी नाताळच्या पहिल्या दिवशी आम्ही खिडक्या सताड उघडून स्पीकरवरून आमची गाणी, तीच ती 'मे आला रे आला', 'सर्व वसंतपक्षी जमले', 'वेशीवरच्या विहीरीत' -दूरवर फैलतील असा प्रयत्न केला. पहिल्यांदा त्यांनीही 'ओ पाईन ट्री' आणि 'हलकेच भुरभुरतोय बर्फ' वगैरे लावून प्रत्युत्तर दिलं. पण त्यांच्याकडे स्पीकर नव्हते. त्यामुळे ते फार वेळ चाललं नाही.

माझी मुलगी आणि तिच्या मैत्रिणी यांना खात्री आहे की पुढच्या नाताळपर्यंत त्या वस्तीत सुद्धा सगळीकडे अँटी-ट्री उभी राहतील. मेणबत्यांनी नव्हे तर अंड्यांनी सजवलेली आणि वसंत ऋतूची गाणी वाजतील. या लोकांशी तसं जपून वागावं लागतं. ही डाव्या विचारसरणीच्या लोकांची मोहीम आहे असं त्यांना बिलकूल जाणवता कामा नये. आमची मुलगी ते सगळं छानपैकी चालू फॅशनच्या आवरणाखाली खपवते. कामगारांचा चालू फॅशनला विरोध नसतो. इतकंच नव्हे त्यांना चालू फॅशन

खूप आवडते. विशेषत: त्यासाठी चार पैसे खर्च करावे लागले तर मग फारच आवडते!

आता हे यश तीन वर्षांपासून केलेल्या प्रयत्नांचं आहे. छान आहे. ग्रे एरियात आणि त्या पलिकडच्या एक्झॉटिक एरियातही घुसू शकलो. पण खुद्द आमच्या घरात? सगळ्यांना अँटी-ट्री आवडावं या प्रयत्नांच्या नादात आमचा फ्रँक मोठा होतोय याकडे लक्ष राहिलं नाही.

बायको स्वयंपाकघरात टर्की कोंबडी भाजत होती. मुलगी भेटवस्तूंचं टोपलं घेऊन शेजारी-पाजारी वस्तू वाटत हिंडत होती. मी 'इंट्रोडक्शन टू डायलेक्टिक्स अँड हिस्टॉरिअलिझम' वाचत बसलो होतो. अचानक 'स्टील नाईट होली नाईट'चे स्वर घरात घुमायला लागले. फ्रँकने कपड्यांच्या कपाटाची उचकापाचक करून त्या एल.पी. तबकड्या शोधून काढल्या होत्या. त्या आपल्या भोवती पसरून आणि भयंकर पद्धतीने गाणे म्हणत बसला होता. एकेक वाजवून बघताना त्या बरोबर डोलत स्वत:ही गात होता. घामाघूम होऊन बायको स्वयंपाकघरातून धावत बाहेर आली आणि किंचाळली,''या कार्ट्याला हे कसं सापडलं''

''मी नाही दिल्या हं!''

''मग काय मी दिल्या?''

आम्ही भांडलो पण आमच्या भांडणाचे शब्द त्या गाण्यांपुढे फुटतच नव्हते. फ्रँक 'ओ पाईन ट्री' पर्यंत आला होता. मग आम्ही त्याला समजावून सांगायला लागलो.

''फ्रँक, हे बघ, हे बाप्पाला आवडतं नाही हं. अशाने मग तो कुठल्याही गिफ्टस् पाठवत नाही. आपले शेजारचे काका, मावश्या काय म्हणतील? फ्रँक आणि त्याचे आई-बाबा यांचा वरचा मजला रिकामा आहे की काय?''

बुद्धिवादी, प्रागतिक आणि लोकशाहीवादी असल्याने आम्ही समंजसपणा अंगी बाणवला आहे. हातोडा नाहीतर काठीने फटकेबाजी न करता आम्ही त्याला अंड्यांनी सजवलेलं अँटी-ट्री आणि मेणबत्या, फुगे, कलाबूत यांनी सजवलेलं ख्रिसमस-ट्री यातला फरक शांतपणे समजावून सांगितला.


फ्रँक आमचाच मुलगा म्हटल्यावर त्याने सगळं नीट लक्षपूर्वक ऐकलं. मग बायको परत तिच्या टर्कीकडे गेली. मी माझ्या वाचनाकडे वळलो. सगळ्या भेटवस्तू संपवून मुलगी घरी परतली. पुन्हा आपली ती जुनी नाताळची गाणी वाजवायला लागली. 'हलकेच भुरभुरतय बर्फ' म्हणे! मी संतापून स्वयंपाकघराकडे धावलो. आणि किंचाळलो, ''आत्ताच्या आत्ता तुझ्या मुलाला ती गाणी बंद करायला लाव.''

ती चुलीसमोर अश्रू ढाळत उभी होती. ''टर्कीचा करपून कोळसा झाला आहे. काय तरी नशीब! सणाचा सत्यानाश झाला. टर्कीशिवाय नाताळ म्हणजे... माझ्या आईला हे कळलं तर काय म्हणेल? देवा रे देवा!''

***

# आठवणीतील फोटो

**मूळ फ्रेंच लेखक : जाँ ज्हाक सॉम्पे, रने गोसिनी**
**भाषांतर : नुपूर पोतनीस, सुदीप शिरोडकर**



**परिचय : जाँ ज्हाक सॉम्पे**

**ज्हाक सॉम्पे हे प्रसिद्ध फ्रेंच व्यंगचित्रकार. कठीण विषयसुद्धा साध्या आणि सोप्या शब्दांत मांडण्याची त्यांची खुबी वाखाणण्याजोगी होती. 'ल पती निकोला' ही त्यांची व्यंगचित्रमालिका १९५०च्या दशकात प्रसिद्ध झाली. त्यांची काही व्यंगचित्रे 'द न्यू यॉर्कर' या मासिकाच्या मुखपृष्ठावर छापून आली आहेत.**

**रने गोसिनी**

**रने गोसिनी हे प्रसिद्ध फ्रेंच विनोदी लेखक व संपादक. 'ल पती निकोला, 'आस्तेरीक्स', 'लकी ल्यूक' ही त्यांच्या गाजलेल्या पुस्तकांपैकी काही पुस्तके.**

***

**त्या** दिवशी आम्ही सगळे खुशीतच शाळेत आलो कारण आम्हाला आमच्या वर्गाचा एक फोटो काढून घ्यायचा होता. आमच्या बाई म्हणाल्या, की शाळेतली आठवण म्हणून हा फोटो आम्हाला आयुष्यभर जवळ ठेवता येईल. त्यांनी आम्हाला छान, नीटनेटकं आणि व्यवस्थित केस विंचरून यायला सांगितलं होतं.

मी तर डोक्यावर चांगलंच तेल थापून मैदानात प्रवेश केला. वर्गातले सगळे तिथे हजर होतेच आणि बाई मंगळवासियाच्या वेशात आलेल्या जिओफ्रॉयला ओरडत होत्या. जिओफ्रॉयचे बाबा खूप खूप श्रीमंत आहेत आणि ते त्याला पाहिजे तो खेळ विकत घेऊन देतात. जिओफ्राय बाईंना सांगत होता, 'मला ह्याच कपड्यांमध्ये फोटो पाहिजे, नाहीतर मी चाललो घरी.'

फोटोवाले काकासुद्धा तिथे त्यांच्या कॅमेऱ्यासहित होते आणि बाईंनी त्यांना लवकर फोटो काढायला सांगितलं. नाहीतर आमचा गणिताचा तास बुडाला असता. आरनॉ वर्गात नेहमी पहिला येतो आणि तो बाईंचा खूप लाडका आहे. तो म्हणाला, की गणिताचा तास चुकवणं वेडेपणाचं ठरेल, कारण एकतर त्याला गणित खूप

आवडतं आणि दुसरं म्हणजे त्याने सर्व गणितं सोडवलेली होती. आमच्या जाडजूड आणि गलेलठ्ठ मित्राला म्हणजेच युदेसला आरनॉच्या नाकावर एक जोरदार ठोसा मारावासा वाटला, पण आरनॉला चष्मा आहे ना! त्यामुळे आम्हाला पाहिजे तेवढं त्याला मारता येत नाही. बाई म्हणाल्या, की त्यांना आमचं वागणं काही आवडलेलं नाही आणि हे जर असंच चालू राहिलं तर फोटोचा कार्यक्रम रद्द करून आम्हाला सर्वांना वर्गात जावं लागेल. तेव्हा फोटाग्राफर काका म्हणाले, 'चला चला, शांत व्हा. मला लहान मुलांशी कसं वागायचं माहिती आहे आणि सर्व काही व्यवस्थित होईल.'

फोटोसाठी काहीजण खाली जमिनीवर बसतील, काही बाईंच्या आजूबाजूला उभे राहतील आणि बाकीचे सर्व मागे बाकड्यांवर उभे राहतील, असं काकांनीच ठरवलं. काकांचं डोकं पण काय चालतं...

बाकडी घ्यायला आम्ही शाळेच्या तळघरात गेलो. तिथे आम्ही खूप गोंधळ घातला कारण त्या खोलीत खूप अंधार होता आणि ऱ्युफुस, एक जुनी पिशवी डोक्यावर घालून ओरडत होता. 'हू! मी भूत आहे.' आणि तेवढ्यात आम्ही बाईंना येताना बघितलं. त्या खुश दिसत नव्हत्या म्हणून लगेचच आम्ही बाकडी घेऊन तिथून पळ काढला. ऱ्युफुस तिथे एकटाच राहिला होता. डोक्यावर पिशवी असल्यामुळे त्याला आजूबाजूचं काही दिसत नव्हतं आणि तो अजूनही ओरडतच होता. 'हं! मी भूत आहे.' शेवटी बाईंनीच त्याच्या डोक्यावरची पिशवी काढली. ऱ्युफुस उडालाच! त्यावेळी त्याचा चेहरा बघायला हवा होता.

मैदानात परत आल्यानंतर बाईंनी ऱ्युफुसचा कान सोडला आणि कपाळावर हात मारला. 'बापरे, तुमच्या सगळ्यांची तोंडं काळी झाली आहेत.' खरंच होतं म्हणा ते, तळघरात किती घाण होती. त्यामुळे आम्ही थोडेसे मळलो होतो. बाई भडकलेल्याच होत्या. पण काकांनी त्यांना सांगितलं, की ते बाकडी लावेपर्यंत आम्ही तोंड धुवून येऊ शकतो. आरनॉ सोडला तर फक्त जिओफ्राय स्वच्छ होता, कारण त्याच्या डोक्यावर त्या मंगळवासियाचं टोपडं होतं. 'बघितलंत,' जिओफ्राय बाईंना म्हणाला, 'जर हे सगळे माझ्यासारखे कपडे घालून आले असते तर असं

काही घडलंच नसतं.' माझ्या लक्षात आलं, की बाईंना जिओफ्रायचे कान पिरगळायचे होते, पण त्या मंगळवासियाच्या टोपड्याला पकडायला काही नव्हतं.

आम्ही तोंड धुतलं आणि मस्तपैकी केसांचा भांग पाडून परत आलो. आम्ही जरासे भिजलो होतो, पण काका म्हणाले, की ते फोटोत दिसणार पण नाही.

'चला, तुम्हाला तुमच्या बाईंना खूश करायचं आहे, हो ना?' काकांनी आम्हाला विचारलं. आम्ही सगळे हो म्हणालो कारण आम्हाला आमच्या बाई खूप आवडतात आणि जेव्हा त्या आमच्यावर रागावलेल्या नसतात तेव्हा त्या चक्क चांगल्या वागतात. ''मग तुम्ही शहाण्यासारखे फोटोसाठी उभे राहा बघू. सर्वांत उंच मुलं मागे बाकड्यावर, मध्यम उभे आणि छोटे खाली बसून घ्या.'' फोटोकाका म्हणाले. ते बाईंना सांगत होते, की आपण जरा धीर धरला, की आपल्याला पाहिजे तसं मुलांकडून करून घेता येतं. पण आम्ही शांत बसलो तरच बाईंना त्यांचं बोलणं ऐकू जाईल ना! आम्हाला सगळ्यांनाच बाकड्यावर उभं राह्यचं होतं आणि आम्ही भांडत होतो. त्यामुळे आमची भांडणं सोडवायला बाईंना यावंच लागलं.

''इथं फक्त एकच उंच मुलगा आहे आणि तो म्हणजे मी!'' असं ओरडत जो कोणी वरती चढेल त्याला युदेस खाली ढकलून देऊ लागला. जेव्हा जिओफ्रॉयने वरती चढायचा हट्ट केला तेव्हा युदेसने त्याच्या मडक्यासारख्या टोपड्यावर एक सणसणीत ठोसा मारला. पण तो त्यालाच खूप जोरात लागला. ते चेपलेलं टोपडं जिओफॉयच्या डोक्यातून काढण्यासाठी बऱ्याच जणांना एकत्र यावं लागलं.

बाईंनी आम्हाला शेवटची ताकीद दिली. नंतर गणिताचा तास होता, म्हणून मग आपण सगळ्यांनी व्यवस्थित वागलं पाहिजे असं म्हणत आम्ही फोटोसाठी उभं राहायला सुरुवात केली. जिओफ्रायने फोटोवाल्या काकांजवळ जाऊन विचारले, ''हे तुमचं यंत्र कसलं आहे?'' काका जरासे हसले आणि म्हणाले, ''बाळ, हा एक खोका आहे. त्याच्यातून एक छोटासा पक्षी बाहेर उडेल.'' ''खूप जुनं दिसतंय तुमचं यंत्र,'' जिओफ्राय म्हणाला, ''माझ्या बाबांनी एक नवा कॅमेरा आणलाय माझ्यासाठी. त्याला सूर्यप्रकाशासाठी आच्छादन आहे आणि जवळचे व लांबचे फोटो काढता येतात, तुम्हाला माहित्येय? आणि किनई...'' काकांनी भुवया उंचावल्या. थोड्या रागातच त्यांनी जिओफ्रॉयला त्याच्या जागेवर जायला सांगितलं. ''तुमच्या त्या

यंत्रात कमीत कमी रोल तरी आहे ना?'' असं जिओफ्रायने विचारताच गप्प झालेले काका एकदम त्याच्यावर डाफरले, ''शेवटचं सांगतो तुला, आपल्या जागेवर जा.''

आम्ही सर्वजण फोटोसाठी तयार झालो. मी आल्सेस्तच्या शेजारी जमिनीवर बसलो. आल्सेस्त हा माझा खूप जाड मित्र आहे आणि तो सदान् कदा काही ना काही तरी खातच असतो. तर तो जॅम लावलेल्या पावाचा तुकडा खात होता. काकांनी त्याला खाणं थांबवायला सांगितलं, पण आल्सेस्तने त्यांना सांगितलं, की तब्येत सुधारण्यासाठी त्याला ते खाणं गरजेचं आहे.

''फेकून दे ते!'' बाई ओरडल्या. त्या आल्सेस्तच्या मागेच बसल्या होत्या. आल्सेस्त दचकलाच आणि त्याच्या हातातला पाव खाली पडला आणि सगळा जॅम त्याच्या शर्टाला लागला. ''हुश्श, जमिनीवर नाही पडलं'', असं म्हणत आल्सेस्त पावाने शर्टावर पडलेला जॅम गोळा करू लागला. तो शर्टावरचा डाग फोटोत दिसू नये म्हणून बाईंनी आल्सेस्तला शेवटच्या रांगेत उभं राहायला सांगितलं.

बाई म्हणाल्या, ''युदेस, तुझी जागा तुझ्या मित्राला दे.''

तेव्हा युदेस ओरडला, ''तो काही माझा मित्र नाही, त्यामुळे मी त्याला माझी जागा देणार नाही, त्याला फक्त पाठ करून उभं राहायला सांगा, म्हणजे तो डागही दिसणार नाही आणि त्याचं ते घाणेरडं तोंडही दिसणार नाही.'' बाई रागावल्या आणि त्यांनी शिक्षा म्हणून युदेसला ''शर्टावर जॅम सांडलेल्या माझ्या मित्राला मी माझी जागा दिली पाहिजे'' हे वाक्य शंभर वेळा लिहायला सांगितलं. युदेस काही न बोलता बाकावरून खाली उतरला व पहिल्या रांगेच्या दिशेने चालू लागला आणि आल्सेस्त मागे जाऊ लागला. इथे जरासा गोंधळ उडाला. खास करून जेव्हा युदेस आल्सेस्तला आडवा गेला तेव्हा. युदेसने तर आल्सेस्तच्या नाकावर एक ठोसाच मारला. युदेसला एक सणसणीत लाथ मारण्याची आल्सेस्तची इच्छा होती आणि त्याने ती मारलीसुद्धा! पण युदेस चपळ असल्यामुळे त्याने ती सहज चुकवली आणि ती लाथ नेमकी आरनॉच्या पार्श्वभागावर बसली. नशिबाने, आपण तिथे चष्मा लावत नाही! तरीही ऑरनॉने, ''मला काही दिसत नाही... कुणालाही मी आवडत नाही. आता मला मरायचंय.'' असं भोकाड पसरवायचं चुकवलं नाही. त्यानंतर बाईंनी त्याला जवळ घेतलं, गोंजारलं, त्याची समजूत काढली आणि आल्सेस्तला,

''माझ्याशी न भांडणाऱ्या आणि चष्मा असणाऱ्या माझ्या मित्राला मी मारणार नाही'' हे वाक्य शंभर वेळा लिहिण्याची शिक्षा केली.

''बरं झालं, असंच पाहिजे,''आरनॉ म्हणाला. बाईंनी त्याला पण शिक्षा केली. आरनॉ एवढा गोंधळून गेला होता, की तो रडायचाही विसरला. बाईंनी सर्वांना शिक्षा करायला सुरुवात केली आणि आम्हाला ढिगभर ओळी लिहायला सांगितल्या. शेवटी त्या म्हणाल्या, ''आता सर्वांनी शांत बसायचं ठरवलंय का? जर तुम्ही शहाण्या मुलांसारखे वागलात तर मी सर्वांच्या शिक्षा माफ करीन. तर, तुम्ही सर्वांनी शांतपणे गोड हसत उभे राहा आणि काका आपला छानसा फोटो काढतील.'' आम्हाला बाईंना त्रास द्यायचा नसल्यामुळे आम्ही त्यांचं ऐकलं. आम्ही सर्वजण छानपैकी हसत फोटोसाठी उभे राहिलो.

पण आम्ही जो आमच्या आठवणीसाठी फोटो काढणार होतो, तो काढता आलाच नाही, कारण... फोटोवाले काका आम्हाला कंटाळून न सांगताच निघून गेले होते.

***

# रुदोल्फिओ

**मूळ रशियन लेखक : व्हलेंतिन रासपूतिन**
**भाषांतर : उज्ज्वला बर्वे**



**परिचय : व्हलेंतिन रासपूतिन**

**व्हलेन्तिन ग्रिगोरेविच रासपूतिन हा १९७०च्या दशकात नावारूपाला आलेला लेखक. 'ग्रामीण गद्य' लेखनाच्या चळवळीतील तो अग्रणी लेखक होता. रासपुतिन यांचा जन्म १५ मार्च १९३७ रोजी सायबेरियातील अंगारा नदीच्या काठावरील एका गावात झाला. मारीयासाठी पैसे (ज्येन्गी दल्या मारी,) 'अंतिम मुदत (पस्ल्येद्नी स्रोक), जग आणि आठव (झिवी इ पोम्नी) आणि मत्सेराला निरोप (प्रश्श्येनिये स् मात्सिरोय) या चार लघुकादंबऱ्यांमुळे ते प्रसिद्ध झाले. स्त्री-पुरुष संबंधांचा शोध घेणाऱ्या, त्यातील अनाकलनीयता, वेदना, कडवटपणा इत्यादींचा वेध घेणाऱ्या काही कथा त्यांनी १९६०च्या दशकात लिहिल्या... त्यातील ही एक कथा- रुदोल्फिओ.**

***

**त्यां**ची पहिली भेट ट्राममध्ये झाली. तिनं त्याच्या खांद्याला धरून त्याला हलवलं आणि त्यानं डोळे उघडल्यावर ती म्हणाली, ''हं, उतरायचंय् ना तुम्हाला इथे?'' ट्राम तोवर थांबली होती. तो घाईघाईनं उठला, आसपासच्या गर्दीतनं वाट काढत तिच्या मागून उडी मारून खाली उतरला.

ती लहान मुलगी वाटत होती. जेमतेम पंधरा-सोळा वर्षांची. तिच्या गोल, चमकदार चेहऱ्यावरूनच तिचं वय लक्षात येत होतं. आत्ता ती त्याच्याकडे पाहात होती, तो तिचे आभार मानेल या अपेक्षेनं. 'धन्यवाद. नाहीतर मी गेलो असतो पुढे.' आभाराचे एवढेसे शब्द तिला पुरेसे नाहीत हे त्याला जाणवलं, म्हणून तो पुढे म्हणाला, 'दिवसभर वेड्यासारखं काम झालं, दमायला झालं खूप. त्यात आठ वाजता घरी एक फोन यायचाय. तुझ्यामुळे बचावलो आज थोडक्यात.'

आता तिचं समाधान झाल्यासारखं दिसलं. दोघांनी एकदमच वेगानं येणाऱ्या गाडीला टाळत शिताफीनं रस्ता पार केला. बर्फ पडत होतं. असं हलकं, भुरभुरं– एखाद्या अनोख्या हिमपक्ष्याच्या पंखांच्या सळसळीसारखं– बर्फ पडू लागलं की घरी जावंसं वाटत नाही. त्यानं विचार केला, तो फोन येऊन गेला, की बाहेर पडावं. चालता चालता तो तिच्याकडे वळून पाहू लागला. असं न बोलता चालणं अवघडल्यासारखं झालं होतं. पण काय बोलावं हेही त्याला कळत नव्हतं. तिच्याशी काय बोललेलं चालेल आणि काय चालणार नाही याचा तो विचार करत असतानाच ती म्हणाली...'मी ओळखते तुम्हाला.'

'काय सांगतेस? कशी काय?'

'तुम्ही ११२ नंबरच्या घरात राहता, मी ११४ नंबरच्या. जवळपास आठवड्यातून दोनदा आपण ट्रामनं एकत्र येतो. अर्थात तुमचं माझ्याकडे लक्षच नसतं म्हणा.'

'गंमत आहे.'

'गंमत कसली आली त्यात? काही गंमत-बिंमत नाही. तुम्हा मोठ्या माणसांचं फक्त मोठ्यांकडेच लक्ष असतं. एक नंबरचे गर्विष्ठ असता सगळे. खरंय की नाही?'

तिनं मान वळवून त्याच्याकडे पाहिलं आणि मग खालीवर नीट निरखलं. त्यानं काहीच उत्तर दिलं नाही. कारण अजूनही त्याला कळत नव्हतं तिच्याशी काय बोललेलं चालेल आणि काय नाही, तिच्याशी कसं वागावं तेही उमगत नव्हतं.

थोडा वेळ दोघं न बोलता चालत राहिले, ती नाकासमोर बघत चालली होती. थोड्या वेळानं तसंच समोर बघत म्हणाली,

'तुमचं नाव नाही सांगितलंत तुम्ही अजून.'

'नाव कशाला हवंय तुला?'

'त्यात काय एवढं? असं का वाटतं लोकांना, की एखाद्याचं नाव विचारलं म्हणजे त्याच्याबाबतीत काही वेगळेच विचार मनात असतात?'

तो म्हणाला, 'ठीक आहे, माझं नाव तुला माहीत करून घ्यायचंच असलं तर... माझं नाव रुदोल्फ.'

'काय?'

'रुदोल्फ'

'रुदोल्फ', ती हसली.

ती आणखीनच जोरजोरात हसायला लागली. तो एका जागी थांबून तिच्याकडे बघत बसला.

'रु-दो-ल्फ', मुद्दाम तोंडाचा चंबू करून ती म्हणाली, आणि पुन्हा हसत सुटली. 'रुदोल्फ, मला वाटलं असं नाव फक्त हत्तीचं ठेवतात.'

'काय?'

त्याचा हात धरत ती म्हणाली, 'रागवू नको. पण खूप विनोदी नाव आहे. खरंच अगदी विनोदी. मी काय करू त्याला?'

'लहान मुलगीयेस अजून.'

'आहेच लहान आणि तू मोठ्ठा माणूस.'

'काय वय आहे तुझं?'

'सोळा.'

'माझं अठ्ठावीस.'

'तेच तर म्हणतीये- एवढा मोठा माणूस आणि त्याचं नाव रूदोल्फ.' ती पुन्हा हसायला लागली.

'आणि तुझं नाव काय?'

'माझं? तुला ओळखताच येणार नाही?'

'ओळखू कशाला? सांग ना.'

'माझं नाव इओ.'

'काय?'

'इओ.'

'काहीच कळलं नाही मला.'

'इ-ओ. इतकं ओझं- इओ.'

एवढ्या लवकर बदला घेण्याची संधी! तो खदखदून हसत सुटला. हसणं थांबवून तिच्याकडे पाहिलं , की त्याला पुन्हा अनावर हसू फुटत होतं.

'इ-ओ'- त्याला नीट बोलणंही शक्य होत नव्हतं. ती इकडे तिकडे बघत त्याचं हसणं संपण्याची वाट पाहात होती. तो जरा शांत झालेला दिसल्यावर ती म्हणाली, ''यात एवढं काही हसण्यासारखं नाहीये. हे साधं लेटिश नाव आहे. आम्ही लेटिश आहोत, कळलं?'

'खरंच मला मजा वाटली, या नावाची. पण आपली फिट्टंफाट झाली की नाही?'

आधी तिचं घर आलं. घराशी पोहोचल्यावर ती म्हणाली, 'तुझा फोन नंबर काय आहे?'

'फोन नंबर कशाला हवा?'

'घाबरतोयस?'

'तसं काही नाही.'

'मोठी माणसं प्रत्येक गोष्टीला घाबरतात.'

'ते मात्र खरंय्.'

तिनं हातमोज्यातनं हात बाहेर काढून त्याच्या हातात दिला. तिचा हात गार पडला होता. त्याला तिची दया आली. तो म्हणाला, 'चल, पळ घरी जा इओ.'

बोलता बोलता त्याला पुन्हा हसू आलं.

घराच्या दारात उभी राहून, ती म्हणाली, 'आता ट्राममध्ये भेटल्यावर मला ओळखशील ना?'

'नक्कीच ओळखीन.'

हात उंचावून तिनं त्याचा निरोप घेतला, 'मग ट्राममध्ये भेटेपर्यंत- अच्छा!'

तो ओरडून म्हणाला, 'ट्राममधून एकत्र प्रवास करेपर्यंत.'

त्यानंतर दोनच दिवसांनी तो कामानिमित्त परगावी गेला उत्तरेकडे आणि दोन आठवड्यांनी परतला. परतल्यावर त्याला सर्वांत आधी जाणवला येऊ घातलेल्या वसंत ऋतूचा आसमंतात दरवळणारा गंध. उत्तरेतल्या हिमवादळानंतर इथलं सगळंच कसं छान वाटत होतं- अगदी ट्रामसुद्धा.

घरी पोहोचताच बायकोनं सांगितलं, ''कुठली तरी मुलगी दररोज फोन करत होती तुला.'

त्यानं कंटाळलेल्या, थकलेल्या आवाजात विचारलं, 'कुठली मुलगी?'

'नाही माहीत मला. वैताग आणलाय तिनं.'

ओढून ताणून हसत तो म्हणाला, 'गंमतच आहे.'

तो आंघोळ करत असताना फोन वाजला. त्याच्या कानावर बायकोचं बोलणं येत होतं– हो आलेत, आंघोळीला गेलेत, नको, नाही– नंतर. तो झोपायला जाणार तोच पुन्हा फोन वाजला.

त्यानं फोन उचलला आणि हॅलो म्हणाला.

पलीकडून खूप आनंदी आवाज आला, 'रुजिक*, आलास तू?'

तो बिचकत म्हणाला, 'हॅलो, कोण बोलतंय?'

'काय हे, मला नाही ओळखलंस? मी इओ.'

'इओ', त्याला क्षणार्धात सगळं आठवलं आणि त्याच्याही नकळत हसू आलं. 'कशी आहेस इओ? माझ्यासाठी बरोबर मला शोभणारं नाव शोधून काढलंस तू!'

'आवडलं तुला?'

'मी तुझ्याएवढा होतो तेव्हा याच नावानं हाक मारायचे मला सगळेजण.'

'उगाच भाव खाऊ नकोस हं.'

'तसं नाही...'

दोघंही थोडावेळ गप्प बसले, मग न राहवून तो म्हणाला,

'पण तू आत्ता फोन का केलास?'

'ती कोण आहे? – तुझी बायको?'

'हो.'

'तू मला बोलला नाहीस तुझं लग्न झालंय म्हणून!'

तो गमतीनं म्हणाला, 'चुकलं हं माझं, मला काय माहीत ती एवढी महत्त्वाची गोष्ट आहे ते.'

---

*रुजिक – रुदोल्फ नावाचे लघुरूप

‘अर्थात, महत्त्वाचं आहे ते. तू-- तुझं प्रेम आहे तिच्यावर?’

तो म्हणाला, ‘हो, ऐक माझं- पुन्हा फोन करू नकोस मला.’

‘घा-ब-र-ट’ ती एकेका अक्षरावर जोर देत म्हणाली, ‘तू अजिबात काळजी करू नकोस. तू राहा तिच्याबरोबर हवं तर- माझं काऽही म्हणणं नाही. पण फोन करायचा नाही- ते नाही जमणार. काही कामासाठी फोन करावा लागला तर?’

‘कसलं काम?’

‘कसलंही. म्हणजे... बघ... मला ना ती एका हौदातलं पाणी काढून दुसऱ्या हौदात घालण्याची गणितं जमत नाहीत. तेव्हा तरी करू की नको फोन?’

‘नाही माहीत.’

‘तेव्हा केला तर नक्की चालेल. तिला घाबरू नकोस- आपण दोघं आहोत- ती एकटी आहे.’

त्याला न कळल्यानं त्यानं विचारलं, ‘कोण एकटी आहे?’

‘तुझी बायको.’

‘बरंय्, इओ, अच्छा!’

‘दमला आहेस ना?’

‘हो.’

‘ठीक आहे. झोप आता आणि तिच्याशी बोलायचं नाही याच्यापुढे.’

तो हसून म्हणाला, ‘चालेल. नाही बोलणार.’

फोन ठेवल्यावर तो हसत हसत बायकोकडे वळून म्हणाला, ‘इओ होती ती- त्या मुलीचं नाव आहे इओ. मजेशीर आहे ना?’

ती थोड्या वेळानं म्हणाली, ‘हं.’

‘तिला दोन हौदांची गणितं येत नव्हती. सातवीत का आठवीत आहे ती.’

‘आणि तुला जमलं ते गणित?’

‘छे, मी तर पार विसरून गेलोय आणि ती हौदांची गणितं- खरंच अतिशय अवघड असतात.’

सकाळी उजाडताना काय- त्याच्याही आधीच. अख्खं शहर साखरझोपेत असताना. फोन थांबण्याची चिन्हं दिसेनात तेव्हा रुदोल्फ फोन घ्यायला उठला. उठताना त्यानं घड्याळात पाहिलं- साडेपाच वाजले होते.

तो थोडासा चिडून म्हणाला, 'हॅलो.'

'रुजिक, रुजिक...'

तो एकदम भडकला, 'इओ, काय प्रकार आहे हा?'

तिनं त्याला मधेच तोडलं, 'रागावू नकोस-ऐक ना- तुला माहीत नाही काय झालं ते.'

त्यानं जरा शांत होत विचारलं, 'काय झालं?'

'रुजिक आता तुझं नाव रुदोल्फिओ झालं आहे. रुदो-ल्फिओ. छान आहे ना? आत्ताच मला सुचलं हे नाव. रूदोल्फ आणि इओ - दोन्ही नावं एकत्र केली, की रुदोल्फिओ. इटालियन नाव वाटतं ना? म्हणून बघ ना एकदा.'

'रुदोल्फिओ-' त्याच्या आवाजात हताशपणा आणि अनावर राग यांचं मिश्रण झालं होतं.

'बरोबर. आता तुझं-माझं मिळून एक नाव. आपण आता अभेद्य झालो. रोमिओ आणि ज्युलिएटसारखे, तू रूदोल्फिओ- मी रुदोल्फिओ.'

'ऐक जरा', तो भानावर येऊन म्हणाला, 'ही काय वेळ आहे का माझं बारसं करण्याची?'

'तुला कळत कसं नाही रे? तुला सांगितल्याशिवाय मला राहवेना अगदी. शिवाय थोड्या वेळानं तू उठलाच असतास ना? हे बघ बरोबर साडेसातला ट्राम स्टेशनवर वाट पाहीन मी तुझी.'

'आज मी ट्रामनं जाणार नाही.'

'का?'

'आज रजा आहे माझी.'

'कसली रजा?'

'मी जास्त काम केलं ना मागच्या महिन्यात– त्याबद्दल. आज कामाला जाणार नाहीये मी.'

'मग मी काय करू आता?'

'शाळेत जा नेहमीसारखी.'

'तुझ्या बायकोची पण रजा आहे?'

'नाही.'

'मग हरकत नाही. पण लक्षात ठेव हं– तुझं नाव आता रुदोल्फिओ आहे.'

त्यानं फोन जागेवर ठेवला आणि मनातल्या मनात एक शिवी हासडत तो चहाचं आधण ठेवायला गेला. आता एकदा झोपेचं खोबरं झाल्यावर पुन्हा झोप लागणं शक्यच नव्हतं.

साधारण अकरा-बाराच्या सुमारास दारावर टकटक झाली. त्यावेळी तो फरशी पुसत होता. एका हातात ओलं फडकं धरून त्यानं दार उघडलं.

दारात ती उभी होती.

'कसं काय रूदोल्फिओ?'

तो आश्चर्याने म्हणाला, ''तू? इथं कशी?'

'मी पण आज रजा घेतली.' तिच्या चेहऱ्यावर पश्चात्तापाच लवलेशही नव्हता.

'मग काय, आज नुसतं भटकायचा विचार दिसतोय. ये आत ये. आता लगेच आटपेल माझं फरशी पुसणं.'

अंगावरचा गरम कोट न काढता ती आत येऊन खिडकीजवळच्या एका खुर्चीत बसली. तो वाकून कशी फरशी पुसतोय ते तिनं थोडा वेळ पाहिलं आणि मग म्हणाली, 'रुदोल्फिओ, तू संसारात सुखी नाहीस असं मला वाटतं.'

त्यानं सरळ होत विचारलं, 'असं का वाटतं तुला?'

'दिसतंच आहे सरळ. तुझ्यावर बघ कशी फरशी पुसायची वेळ आली आहे. सुखी माणसांना असं नाही करावं लागत.'

तो हसून म्हणाला, 'काहीतरी कल्पना करू नकोस.'

'मग तू आनंदी आहेस असं म्हणशील स्पष्ट?'

'मी काहीही म्हणणार नाही.'

'बघ. म्हणजेच...'

'कोट काढ अंगावरचा.'

'नको. मला तुझी भीती वाटते.' खिडकीच्या बाहेर बघत ती म्हणाली.

'का?'

'तू पुरुष आहेस, म्हणून.'

'अस्सं होय!' हसला, 'मग इथं यायचं धाडस कसं केलंस?'

'पण तू आणि मी रूदोल्फिओ आहोत.'

'मला विसरायलाच होतं ते. पण म्हणजे त्यामुळे माझ्यावर आता जबाबदारी आली बरीच.'

'अर्थात.'

ती गप्प बसली. तो बादलीतलं पाणी टाकायला आत गेला. तेव्हा ती तशीच बसून राहिली. तो बाहेर आला तोवर तिनं कोट काढला होता. तिचा चेहरा उदास आणि दु:खी दिसत होता.

अचानक ती म्हणाली, 'रुदोल्फिओ, आज मी रडले.'

'का गं इओ?'

'इओ नाही रुदोल्फिओ.'

' का गं, रुदोल्फिओ?'

'माझ्या मोठ्या बहिणीमुळे. मी आज दांडी मारायची ठरविली म्हणून केवढा गहजब केला तिनं.'

'बरोबर आहे तिचं.'

'काही बरोबर नाही. एखाद दिवस मारली दांडी तर काही बिघडत नाही. असं तुझ्याबरोबर गप्पा मारताना किती छान वाटतंय.'

ती पुन्हा गप्प बसली. तो तिच्याजवळ गेला. तिच्या खांद्यावर थोपटून म्हणाला, 'सगळं काही ठीक होईल?'

'तू कशाला इतक्या लवकर लग्न केलंस रे? आणखी एक-दोन वर्ष थांबला असतास तर मी तुझ्याशी लग्न केलं असतं.'

'तुला कशाला लग्नाची इतकी घाई? तुझं लग्नाचं वय झालं, की खूप चांगला नवरा मिळेल तुला.'

'पण मला तुझ्याशी लग्न करायला आवडलं असतं.'

'तुला माझ्यापेक्षा खूप चांगला नवरा भेटेल.'

'असतात तुझ्यापेक्षा चांगली मुलं?'

'माझ्यापेक्षा हजार पटीनं चांगली असतात.'

'पण तरीही तो तू नसशील ना?' एक सुस्कारा सोडून ती म्हणाली.

'चल, जाऊदे. चहा पिऊया.' तो चहा करायला आत गेला आणि ती कपाटातली पुस्तकं चाळू लागली.

'रुदोल्फिओ - आपलं दोघांचं हे असं जोडनाव किती छान आहे ना! लेखकाचंसुद्धा नसतं असं नाव.' आणखी काही पुस्तकं चाळल्यावर ती म्हणाली, 'हं- या लेखकाचं नाव बरं आहे. एक्झ्यूपेरी. छान आहे ना?'

'हं. तू वाचलं नाहीस त्याचं पुस्तक?'

'नाही.'

'घेऊन जा वाचायला. पण शाळेला दांडी मारून नाही वाचायचं, कळलं?'

तिनं पुस्तक घेतलं आणि ती जायला निघाली.

'चहा?' त्यानं आठवण केली.

'नको. जाते. पण तुझ्या बायकोला सांगू नकोस हं, मी इथे आले होते हे.'

त्यानं आश्वासन दिलं, 'नाही सांगणार.'

अचानक, अजिबात चाहूल न देता वसंत ऋतू आला. काही दिवस सगळे आनंदी, उत्साही झाले. अशाच एका दिवशी तो कामावरून घरी परतत असताना एका मध्यमवयीन स्त्रीनं त्याला वाटेत थांबवलं. 'मी इओची आई.' ती म्हणाली,

''तुम्ही रूदोल्फ ना? मला माझ्या लेकीकडून तुमच्याबद्दल कळलं. गेले काही दिवस ती सारखी तुमच्याबद्दल बोलत असते. पण मी...'' आणि ती बोलता बोलता एकदम थांबली.

रूदोल्फच्या लक्षात आलं, एका आईच्या मनात निर्माण झालेले प्रश्न स्पष्टपणे विचारताना तिला अवघडल्यासारखं होत असणार. तो म्हणाला, 'काही काळजी करू नका. माझी आणि इओची अगदी निखळ मैत्री आहे. त्याच्यातून काहीही वाईट घडणार नाही याची खात्री बाळगा.'

'हो, हो, त्यात काही शंका नाही', तिची आई घाईघाईनं म्हणाली, ''पण इओ म्हणजे विक्षिप्त मुलगी आहे. आमचं ती अजिबात ऐकत नाही. पण तुमचं जर ती ऐकत असेल ना... खरं सांगू का, मला थोडी भीती वाटतेय- हे वय असं आहे ना, की भीती वाटणारच... ती काहीतरी वेडेपणा करून बसेल. त्यातून तिला तिच्या वर्गातल्या, तिच्या बरोबरीच्या मैत्रिणीसुद्धा नाहीयेत.'

'मग अवघडच आहे जरा.'

'हो ना. तुम्हाला मानते ती, त्यामुळे तुम्ही जर...'

'मो बोलतो तिच्याशी. पण इओ चांगली आहे हो खूप. तुम्ही उगाच काळजी करू नका.'

'काय माहीत?'

'बरंय, मी निघतो. बोलतो तिच्याशी. सगळं काही ठीक होईल.'

बायको घरात नव्हती त्यामुळे त्यानं लगेचच तिला फोन करायचं ठरवलं.

'रुदोल्फिओ', तिच्या आवाजातून आनंद कळत होता. 'किती बरं वाटलं मला तू फोन केलास म्हणून. आज मी पुन्हा रडले रुदोल्फिओ.'

'सारखं रडू नाही असं.'

'आता त्या छोट्या राजपुत्रामुळे रडले. इतकं वाईट वाटलं मला त्याचं. तो खरंच आपल्या पृथ्वीवर होता का रे?'

'मला वाटतं, होता.'

'मलाही तसंच वाटतं. पण आपल्याला कळलंच नाही तेव्हा. किती वाईट. एक्झ्यूपेरी नसता ना, तर आपल्याला कधी कळलंही नसतं.'

'हो ना.'

'आणि मला काय वाटतं माहितीये का? बरं झालं तो छोटा राजपुत्रच राहिला. मोठा झाला असता ना, तर इतर चारचौघांसारखाच झाला होता. आणि तशी सर्वसामान्य माणसं जरा जास्तच आहेत आपल्या अवतीभवती.'

'काय माहीत?'

'मला माहीत आहे ना?'

''माणसांच्या ग्रहाकडे' वाचलंस?'

'वाचलं, रुदोल्फिओ, सगळं वाचलं. मला वाटतं एक्झ्यूपेरी अतिशय विद्वान लेखक आहे.'

'शाबास, तुला कळतंय सगळं छान!'

'रुदोल्फिओ' ती पुढे बोलेना.

'हं बोल, मी ऐकतोय..' तरीही ती बोलेना.

'रूदोल्फिओ' कसली तरी काळजी वाटून तो म्हणाला, 'माझ्या घरी ये आत्ता. मी एकटाच आहे घरात.'

इओ आत येऊन खुर्चीवर बसल्यावर रूदोल्फनं विचारलं, 'इतकी गप्प का तू?'

'ती खरंच घरात नाहीये.'

'बायको?'

'मग कोण?'

'मी मधे एकदा फोन केला तेव्हा ती होती. मला म्हणाली हौदाचं गणित अडलं असेल तर तुझ्या शिक्षिकांना विचार. मला वाटतं, तिला माझा मत्सर वाटतो.'

'मला नाही वाटत.'

'बघशील, कळेल तुला. मला वाटतं तू तिच्यापासून वेगळं व्हावंस.'

'वेड्यासारखं बोलू नकोस. मला वाटतं, मी तुला जास्त मोकळीक देतो.'

'प्रेमामुळे ना?'

'मैत्रीमुळे'

ती तोंड हुप्प करून गप्प बसून राहिली. पण फार वेळ नाही. मग म्हणाली, 'तिचं नाव काय?'

'क्लाव्हा'

'भुईला भार आहे नुसती.'

आता मात्र तो रागावला. 'बास कर आता.' ती जागेवरून उठली. क्षणभर तिनं डोळे मिटून घेतले आणि मग म्हणाली, 'रुदोल्फिओ, माफ कर. माझं डोकं ताळ्यावर नाहीये. मला तसं म्हणायचं... विसरून जाशील सगळं? आज मी इथं आले होते, असं काही बोलले– विसरशील ना?'

'ठीक आहे.'

'निघते मी.' असं म्हणून ती घराच्या बाहेर पडली.

पाचव्या मिनिटाला रुदोल्फचा फोन वाजला.

तिनं पुन्हा फोन केला नाही आणि पुन्हा तो कामानिमित्त परगावी गेल्यानं बरेच दिवस त्यांची गाठ पडली नाही. शेवटी त्यांची ट्राममध्ये गाठ पडली. लांबून ती दिसल्यावर त्याला खूप आनंद झाला. ती उभी होती तिथे जाऊन तिच्या खांद्याला हात लावत तो म्हणाला, 'कशी आहेस इओ?' तिने दचकून मागे पाहिलं आणि तो दिसताच आनंदली. मग म्हणाली, 'इओ नाही रुदोल्फिओ. आपण अजून मित्र आहोत ना?'

'अर्थातच आहोत रुदोल्फिओ.' ट्राममध्ये गर्दी खूप होती. त्यामुळे आजूबाजूच्या लोकांनी ढकलल्यावर ते एकमेकांच्या खूप जवळ आले. इतके जवळ, की एकमेकांची नजर चुकवत ते उभे राहिले.

'रुदोल्फिओ, तुला एक सांगू?'

'सांग ना.'

ती वर तोंड करून त्याच्याशी बोलू लागताच तिचा चेहरा त्याच्या इतक्या जवळ आला, की त्याला डोळे मिटून घ्यावेसे वाटले.

'मला तुझ्यावाचून अजिबात करमत नाही, रुदोल्फिओ.'

तो म्हणाला, 'वेडपट आहेस.'

'माहितीये.' मोठा श्वास सोडून ती म्हणाली, 'इतर तरुण मुलांच्याबाबत मला काहीसुद्धा वाटत नाही. ती असली काय न् नसली काय?'

त्यांचा स्टॉप आल्यावर ते उतरून चालू लागले.

'तुझ्या क्लाव्हाकडे निघालास का?'

'नाही, चल जरा फिरू या?'

ते नदीच्या दिशेने निघाले. नदीकाठच्या मोकळ्या माळरानावर गेल्यावर जागोजागी पडलेल्या कचऱ्यातून वाट काढत ते चालू लागले. ती गप्प होती. तिच्या स्वभावाला शोभणार नाही इतकी. त्याच्याप्रमाणेच तिच्याही मनावर काळजीचं, चिंतेचं प्रचंड ओझं आहे, हे त्याला जाणवलं. ते नदीकाठच्या एका उंचवट्याच्या जागी पोहोचले. मघाशी कचऱ्यातून वाट काढताना त्यानं तिचा हात धरला होता, तो अजून तसाच तिच्या हातात होता. ते दोघं बराच वेळ नदीकडे, नदीच्या पात्राच्या पलीकडे पाहात बसले. त्याच्या हातातून आपला हात न सोडवता ती म्हणाली, 'रुदोल्फ, आतापर्यंत कधीच कुणी माझं चुंबन घेतलं नाहीये.'

त्यानं वाकून हळूच तिच्या गालाचा मुका घेतला.

तिनं विनवणी केली, 'ओठांचं चुंबन.'

'ओठांचं चुंबन फक्त अगदी जवळच्या माणसांनी घ्यायचं असतं.'

'मग मी?' ती विस्मयानं, भीतीनं कापायला लागली आणि तो घाबरला. पुढच्या क्षणी त्याला कळलं– जाणवलं नाही तर कळलं– की तिनं त्याला एक थोबाडीत मारली, आणि ती पळत सुटली. त्या कचऱ्यातून, माळरानातून, चिंता आणि अपेक्षा यांच्या जंजाळातून.

तो एका जागी उभा राहून तिला पाहत होता. त्याला ना तिला हाका मारायचं सुचलं ना तिच्यामागे पळायचं. तो बराच वेळ तसा उभा राहिला- हताश, उद्ध्वस्त झाल्यासारखा- स्वत:चा धिक्कार करत.

हा प्रसंग शनिवारी घडला. रविवारी पहाटे तिच्या आईचा फोन आला.

'रूदोल्फिओ, माफ करा, तुम्हाला उठवलं...'

तिचा आवाज कापत होता, स्वर गदगदला होता.

'रुदोल्फिओ, इओ रात्री घरी आलीच नाही.'

त्याला काहीतरी बोलायचं होतं, पण काय बोलावं ते सुचत नव्हतं.

'आम्हाला काहीच कळत नाहीये. काय करावं, कुणाला सांगावं- असं पूर्वी कधी झालं नव्हतं.'

एकदाचा त्याला कंठ फुटला, 'तुम्ही आधी शांत व्हा, प्लीज. मैत्रिणीकडे राहिली असेल ती कदाचित.'

'काय माहीत.'

'मला तर तसंच वाटतंय. तासा-दोन तासात आली नाही तर तिला शोधायला जाऊ. शांत व्हा तुम्ही. दोन तासांनी मी फोन करतो.'

फोन ठेवून तो विचार करू लागला, स्वत:ला बजावू लागला, शांत हो. ती मैत्रिणीकडे राहिली असेल रात्री. पण त्याची बेचैनी वाढतच गेली. त्यानं चाळा म्हणून पुस्तकांचं कपाट उघडलं. त्यातली शाळेची गणिताची पुस्तकं काढून तो ती चाळू लागला. एका पुस्तकात ते गणित होतं. एका हौदातलं पाणी दुसऱ्या हौदात सोडण्याचं... फोन वाजला.

'आली ती घरी', तिची आई म्हणाली आणि ओक्साबोक्शी रडायला लागली.

'रुदोल्फिओ, आमच्या घरी येता का? तिला काहीतरी झालंय.'

तिच्या घरी गेल्यावर त्यांच्या परवानगीची वाट न पाहता त्यानं गरम कोट काढला. तिची आई त्याला तिच्या खोलीकडे घेऊन गेली.

इओ पलंगावर बसली होती, पायांभोवती मिठी मारून. एकटक खिडकीबाहेर बघत होती.

त्यानं हाक मारली,'रूदोल्फिओ.'

त्याची हेटाळणी करत, आवळून धरलेल्या ओठातून ती म्हणाली, 'तू कसला रूदोल्फिओ, तू साधा रूदोल्फ. साधा अतिसामान्य रूदोल्फ. कळलं?'

हा वार इतका जोराचा होता, की त्याची वेदना क्षणभरात सगळ्या शरीरभर पसरली. त्यानं कसबसं स्वत:ला सावरलं. तो खिडकीजवळ जाऊन उभा राहिला. ती पायांची जुडी करून एका जागी पुढे-मागे डोलत राहिली. तिच्या हालचालींमुळे पलंगातून बारीक आवाज येत होता.

तिचं म्हणणं मान्य करत तो म्हणाला, 'बरं, ठीक आहे, पण तू सांग कुठे होतीस रात्रभर?'


त्याच्याकडे न बघता, थकलेल्या आवाजात ती म्हणाली, 'मसणात जा तू.'

त्यानं मान डोलावली. बाहेर येऊन गरम कोट घेऊन, तिच्या आईच्या मनातल्या आणि चेहऱ्यावर दिसणाऱ्या प्रश्नांना उत्तरं न देता जिने उतरून तो बाहेर आला आणि चालू लागला- मसणाकडे? नदीकाठच्या माळरानातून तो नदीच्या काठावर आला आणि मग विचारात पडला- आता इथून पुढे कुठे जायचं?

***

# डॉक्टर मनोरंजन

मूळ जर्मन लेखक:  जीगफ्रिड लेन्झ
भाषांतर : शर्मिष्ठा खेर



**परिचय: जीगफ्रिड लेन्झ (१९२६–२०१४)**

**हे लेखक जर्मनीतील युध्दोत्तर काळातील एक प्रसिध्द लेखक होते. त्यांची 'जर्मनचा तास' या अर्थाचे शीर्षक असलेली कादंबरी खूपच गाजली. हे पुस्तक त्यांनी हिटलरच्या हुकुमशाहीवर म्हणजेच नाझी राजवटीवर लिहिले होते. त्या काळात राष्ट्राप्रती आपले कर्तव्य हे कसे चुकीच्या समजुतीवर आधारलेले होते हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यांची पहिली कादंबरी १९५१ मध्ये तर पहिला कथासंग्रह १९५५ साली प्रकाशित झाला. तो त्यांच्या कथनशैलीमुळे आणि बोलीभाषेच्या केलेल्या वापरामुळे चांगलाच गाजला.**

**त्यांचे वडील लवकर वारले, ते बरीच वर्षे आजीकडे वाढले. शालेय शिक्षण संपल्यावर युध्दकाळात ते सैन्यात भरती झाले. युध्द संपल्यावर त्यांनी काही काळ एका दैनिकातील संपादनात काम केले. नंतर मात्र त्यांनी पूर्ण वेळ लेखन केले. पंधरा कादंबऱ्या, अनेक कथा, नाटके, रेडिओसाठी लिखाण, निबंध, परीक्षणे असे विपुल लेखन त्यांनी केले. लेखक म्हणून ते चांगले नावारूपाला आले. त्यांना साहित्यक्षेत्रातील अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत.**

***

**क**रमणूक ही गोष्ट सध्या माझ्या आत्यंतिक चिंतेचा विषय झालेली आहे. गेली तीन वर्षे मी करमणुकीवर जगतोय. म्हणजे गेली तीन वर्षं मला करमणूक या गोष्टीची सोय करण्याबद्दल पगार मिळतोय. आमच्या कंपनीच्या दूरवरुन येणाऱ्या सर्व ग्राहकांचं मनोविनोदन मी सांभाळतो. दिवसभराच्या व्यापाराच्या वाटाघाटींनी दमणूक झालेले ग्राहक पाहुणे संध्याकाळी माझ्या ताब्यात दिले जातात. पुन्हा दुसऱ्या दिवशी वाटाघाटी करायला तकवा यावा म्हणून त्यांची मन:स्थिती पुन्हा

उत्फुल्ल करण्यासाठी मी सर्व कौशल्ये पणाला लावतो. ग्राहक जेवढा ताजातवाना तेवढी वाटाघाटीत कंपनीला फायदा होण्याची शक्यता जास्त- या शब्दात मला कंपनीच्या प्रमुखाने माझं काम समजावून दिलं होतं. त्याच्या शब्दानुसार गेली तीन वर्षे मी कामगिरी पार पाडत होतो.

आता या कामाला मी कशामुळे लायक ठरलो हे मला सांगता यायचं नाही. बहुधा माझी कायदा या विषयातली डॉक्टरेट. मी मूळचा एका बंदरगावातला. जागतिक दर्जाच्या जहाजांची ये-जा जिथे चालते अशा मोठ्या बंदरगावातली माणसं जात्याच विनोदाचं अंग असलेली असतात. हे मुख्य कारण नसावं. पण या कारणाचाही काही वाटा माझी योग्यता ठरण्यात असणार.

अशा तऱ्हेने महत्त्वाच्या ग्राहकांची आवभगत सांभाळणारा तज्ज्ञ म्हणून माझ्या नोकरीची सुरुवात झाली. आमची कंपनी मासेमारी आणि प्रक्रिया उद्योगाला लागणारी यंत्रे बनवते. माशांचे काटे काढून टाकण्याचे यंत्र, सुंदरसे काप करण्याचं यंत्र. हे काप अति सुबक गोल आकाराचे निघतात. यापूर्वी कधीच असं मशिन बाजारात आलेलं नव्हतं. हे मशिन म्हणजे जणू गिलोटीनच होतं. दोन मीटर लांबीच्या थुन ( ट्यूना) माशाची चार सेकंदात अशी सफाईने खांडोळी व्हायची की त्या यंत्राला आम्ही नाव दिलं होतं रॉबेस्पिअर. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीतला एक अतिशय क्रूर क्रांतिकारक रॉबेस्पिअर नाव ठेवण्यात आम्ही अजिबात ज्यादा धिटाई दाखवली नव्हती. याशिवाय माशांच्या वाहतुकीसाठी खास पट्टे, मासेमारीसाठी वापरण्याची विशेष जाळी वगैरे अनेक तऱ्हांची उत्पादनं होती. आमच्या उत्पादनांच्या उच्च कोटीच्या कार्यक्षमतेची प्रसिध्दी एवढी होती की जगभरातल्या दूरदूरच्या ठिकाणांहून ग्राहक आमच्याकडे येत असत. जपान, कॅनडा, मोरोक्को, काळ्या समुद्राकाठचे देश......काय वाट्टेल तिकडून स्वतः लक्ष घालून व्यवहार पूर्ण करण्यासाठी लोकं यायची. त्यामुळे मी कामाचा दिवस संपल्यानंतरच्या वेळात साऱ्या जगाला रिझवण्याच्या कामावर होतो असं म्हणायला हरकत नसावी.

आणि हे काम मला - हे आपलं तुमच्या माझ्यात - खूपच चांगलं जमायचं. चिनी, दक्षिण आफ्रिकन्स, कोरियन्स, नॉर्वेजियन्स किंवा अगदी थंडकठोर समजले गेलेले श्पिट्सबर्गर्स या सगळ्यांना मी विनोद चाखवला आहे. गावातले खास

मनोरंजनासाठीच असलेले आमचे रस्ते आनंदाचा असा काही शिडकावा करायचे की ह्दयाला (आणि पाकिटालाही) मसाज व्हावा. मी निरनिराळ्या देशांचे विशिष्ट स्वभाव ध्यानात ठेवून बरोबर ती नस पकडतो. माणसांना जिव्हाळ्याचा स्पर्श घडवून एका सदिच्छेची निर्मिती करणं हा माझा हातखंडा झालाय. विनोद हा त्यासाठी रामबाण. माझी कामाच्या जागी व्हायला हवी ती प्रगती झाली. पगारवाढ झाल्यावर मला माझं काम भलतंच आवडायला लागलं.

पण अलीकडचे काही दिवस माझ्या कामाच्या प्रेमाला माझ्या स्वत:बद्दलच्या शंकेने तडे जातायत की काय, असं वाटू लागलंय. माझी खास रंजनक्षमता कमी होतेय का? आणि माझ्या विशेष रंजनक्षमतेचा पुरेपूर मोबदला मिळत नाहीये अशी खंत वाटतेय, कारण केवढा आत्यंतिक धोक्याचा खेळ मला माझ्या कामात करावा लागतो हे मला अलीकडे अगदी चरचरून जाणवलं.

मला एवढी खंत वाटतीय त्याचं कारण आहे पाखुल्का स्बीर. ॲल्युशियन बेटांवरचा, मजबूत आडदांड शरीरयष्टीचा ग्राहक. किंचित पिवळा वर्ण, कठोर गंभीर चेहेरा, डोक्यावर अस्वलाच्या कातड्याची टोपी, जीर्ण बूट आणि त्याच्या देशाच्या किनाऱ्यावर सतत आदळणाऱ्या समुद्राच्या लाटांसारखा घनगंभीर खोल आवाज. कंपनीच्या मुख्यालयाने त्याला माझ्याकडे पाठवल्यावर तो प्रथम जेव्हा माझ्या ऑफिसमधे आला तेव्हा त्याला पाहून मी दचकलोच. पण नंतर लवकरच त्यालाही रिझवीन असा विश्वास वाटला. सर्वप्रथम थंडगार चेरीचा रस देऊन त्याची कळी थोडी खुलवायचा प्रयत्न केला. नंतर त्याला घेऊन गावच्या मनोरंजनाच्या पेठेकडे निघालो. या जागेविषयी मला पूर्ण खात्री होती. कितीही संकोची किंवा थंड असलेला माणूस तिथे मोकळा व्हायचाच. सुरुवातीला छोट्या छोट्या खेळांचे फुटकळ तंबू होते. इथेच माझे जपानी पाहुणे मौन सोडून चिवचिवायला लागायचे. पण पाखूल्काला मी तिथे नेलं नाही. इतक्या अलवार मनोरंजनाने त्याला जराही तडा जाणार नव्हता. त्याच्यासाठी जास्त ठाशीव, मूर्त स्वरुपाच्या मनोरंजनाची गरज होती. मी त्याला घेऊन फिटेसच्या बारमध्ये शिरलो. इथे तीन अव्वल दर्जाच्या सुंदरी कलात्मक रीतीने कपडे उतरवण्याचा खेळ करायच्या. तिघींशीही माझी चांगली घसट होती. स्कँडिनेव्हियन ग्राहक काही केल्या दिवसभरातल्या चर्चा डोक्यातून

काढून टाकत नसत. पण या बायकांच्यात आणलं की ते बघता बघता दिलखुलास मूडमध्ये यायचे. आत शिरतानाच मी तिघींना डोळ्यांनी सूचक इशारा केला. त्यांनीही काळजी करु नकोस असा उलट इशारा केला.

मग खेळातला तो क्षण आला. बरेचसे कपडे उतरवल्यावर क्लबच्या रिवाजानुसार एक ग्राहक ग्रीक पुराणातला पॅरिस म्हणून निवडला जायचा. त्याच्या हाती एक सफरचंद दिलं जायचं. ते त्याने त्या तिघींपैकी, त्याला सगळ्यात सुंदर वाटणाऱ्या स्त्रीला नजर करायचे असे. आमच्यातल्या गुप्त समझोत्यानुसार पाखुल्काच पॅरिस म्हणून निवडला गेला. आडदांड पाखुल्का दाण दाण चालत स्टेजकडे मागे गेला आणि त्या तिघींकडे भयंकर उग्र नजरेने पाहत राहिला. त्या साहाजिकच किंचित् घाबरुन मागे सरकल्या . सगळ्या बारमध्ये विचित्र शांतता भरून राहिली. आणि पाखुल्काने कचाकचा आवाज करत ते सफरचंद खाऊन टाकलं. इतर गिऱ्हाईकांना नाही म्हटलं तरी वेगळीच मजा आली. त्यांच्या कौतुकाच्या नजरांमधून चालत तो माघारी आला. आणि तुसड्या चेहऱ्याने टेबलाजवळ बसला. पण मी हार मानली नाही. त्याचं रंजन हे मी आता कंपनीचं नव्हे तर माझंच देणं लागत होतो. या आधी फिनलँड, आयर्लंड वगैरे देशांतल्या ग्राहकांच्या बाबतीत कामाला आलेले एकापेक्षा एकेक कडक जोक्स मी पाखुल्काला ऐकवू लागलो. पण त्याच्या चेहऱ्यावर ढिम्म हालचाल नव्हती.

जरा वैतागून मी फिटेस्च्या बारमधून निघालो, अन् मॅक्सच्या बारमध्ये आलो. इथे टेबल रिझर्व केलेलंच होतं. मी चेरी ज्यूस मागवला. यापूर्वी सगळ्यात कठीण असे अमेरिकन किंवा अलास्कन ग्राहक सुद्धा मॅक्सकडे येईपर्यंत ढेपाळायला लागलेले असायचे. त्यात मॅक्सचं वैशिष्ट्य म्हणजे त्याचा ऑर्केस्ट्रा. ग्राहकांपैकीच एकाला ऑर्केस्ट्रा कंडक्ट करण्याचा मान दिला जायचा. अमेरिकन्स आणि अलास्कन्सना खूप विस्तीर्ण क्षेत्रावर हुकमत गाजवायची हौस असते. सुरांच्या साम्राज्यावर राज्य करायची संधी मिळाली की ते ताबडतोब खुलतात आणि निखळ आनंदाने ओतप्रोत भरून जातात. ॲल्युशियन बेट अलास्काच्या जवळच तर आहे, तेव्हा म्हटलं याच पद्धतीने पाखुल्काला आनंदून सोडू. अर्थातच कंडक्टर म्हणून पाखुल्काचीच निवड झाली. तो जी केव्हाही बाजूला काढून ठेवत नसे, अशी ती त्याची अस्वलाच्या

कातड्याची टोपी आणि पायात जीर्ण बूट असा तो स्टेजवर पोहोचला. त्याने कंडक्टरची छडी हातात घेतली आणि सपकन आसूड ओढला. त्याबरोबर सर्व वादक दचकून खांदे पाडून बसले. यामुळे स्वत:वर खूष झालेला पाखुल्का छडी शर्टात खुपसून आपली प्रचंड विस्ताराची पाठ खाजवायला लागला. हे जे काही झालं ते माझ्या नीट ध्यानात येईपर्यंत त्याने छडी खसकन बाहेर काढली - ती त्याच्या खाजणाऱ्या जागेपर्यंत पोचत नव्हती - आणि तिचे दोन तुकडे करून - एव्हाना काही वादकांनी चाचरत वाजवावयास सुरूवात केली होती-त्यांच्या दिशेने भिरकावून दिले आणि कोपिष्ट चेहऱ्याने आपल्या जागेवर परतला.

आता मी अतिशय करवादलो होतो. पण अजून पराभव मानला नव्हता. उलट माझी महत्त्वाकांक्षा जागृत झाली होती,असं म्हणा. कोणाही व्यावसायिकाला एवढी व्यवसायनिष्ठा असतेच. याचा मूड सुरळीत केल्याशिवाय याला हॉटेलवर परत न्यायचंच नाही असा निश्चय केला. ऑफिसमध्ये मला कौतुकाने मनोरंजनाचा डॉक्टर असं म्हणायचे ते अनाठायी नव्हते, हे सिद्ध करणं आवश्यक होतं. मी सर्व कौशल्य पणास लावायचं ठरवलं. केवळ सैबेरियन ग्राहकांसाठी राखून ठेवलेले जोक्स त्याला ऐकवले,पण त्याच्या चेहेऱ्यावर तसूभरही फरक नव्हता. मग घोड्यावरून रपेट,चित्रविचित्र गंमतशीर प्रतिमा दाखवणाऱ्या आरशांच्या दालनाला भेट, ब्लू फिल्म्स, अधून मधून चेरीचा रस होताच. पण कशाकशानेही हा माणूस पाघळेना.

वांदा ! वांदा हाच काय तो शेवटचा हुकुमाचा एक्का मी राखून ठेवलेला होता. तिकडे निघालो. वांदा रोज रात्री प्रेक्षकांनी तुडुंब भरलेल्या हॉलमधे शँपेन भरलेल्या एका प्रचंड काचेच्या टबमधे आंघोळ करायची. तिची आणि आमची मुलं एकाच वर्गात होती. माझी बायको आणि वांदा अधून मधून खिडकीत ठेवण्याच्या शोभेच्या टोपल्यांची देवाण घेवाण करायच्या. इतक्या घरगुती ओळखीमुळे वांदाला माझी अडचण सांगणं कठीण गेलं नाही. तिने तात्काळ माझी विनंती मानली. तिच्या खेळात ती रोज एका प्रेक्षकाला तिला हात देऊन शँपेन भरल्या टबमधून बाहेर उतरायला मदत करण्याची संधी देत असे. ती त्या रात्री अर्थात पाखुल्काला मिळाली. यापूर्वी अशाच एका बैकल सरोवराजवळून आलेल्या माझ्या पाहुण्याला वांदाने तिच्या मनमोकळ्या आमंत्रणाने खुलवलं होतं. त्यामुळे मी जवळपास जिंकल्याच्या

खुषीत होतो. पाखुल्का त्या प्रचंड मद्यपात्राकडे जाताना दिसला. वांदा ही एक पूर्वेकडून आलेली निर्वासित होती.एखादी निर्वासित स्त्री एवढ्या मोकळेपणाने काही करेल अशी अपेक्षा करणं कठीणच आहे. पण वांदा त्या शँपेनच्या तलावात अत्यंत आवाहक हालचाली करत विहरत होती. पाखुल्काला उद्देशून गोड हसत तिने आपला हात पुढे केला. प्रेक्षकांमधून जोरदार उत्सुक टाळ्या पडल्या. पाखुल्का गुडघे टेकून खाली बसला आणि त्याने ती शँपेन गटागटा पिऊन टाकली. आता वांदा सहज आपली आपण बाहेर येऊ शकत होती. वांदाने माझ्याकडे एक वैफल्यपूर्ण नजर टाकली. मी तशाच नजरेने उत्तर दिले. आता मात्र मी पाखुल्कापुढे हात टेकण्याच्या बेताला आलो होतो. अन्....

तेवढ्यात अगदी अचानक माझी शेवटची संधी आली. पाखुल्काला पुन्हा एकदा सर्व यंत्र बघायची होती. आम्ही कारखान्यात आलो. सिक्युरिटीचा माणूस मी कोण ते ओळखत असल्याने मी पाखुल्काला घेऊन सहज आत शिरलो. पाखुल्का प्रत्येक यंत्राजवळ जाऊन बारकाईने बघायला लागला. यंत्रावर हात ठेवून खूप विचार करायचा, हलवून बघायचा, कान लावून आवाजाची तपासणी करायचा. प्रत्येक यंत्राची तांत्रिक माहिती मला त्याने पुन्हा एकदा सांगायला लावली, आपल्या डायरीत काळजीपूर्वक नोंदी केल्या प्रत्येक यंत्राजवळ भरपूर वेळ घालवत त्याने हे सगळं केलं तरी त्याला रॉबेस्पिअरमधे विशेष रस वाटत होता हे माझ्या लक्षात आलं. रॉबेस्पिअर म्हणजे आमचं चार सेकंदात सहा फुटी माशाची सुबक खांडोळी करणारं यंत्र. रॉबेस्पिअरजवळ आल्यावर त्याने डायरी खिशात ठेवून दिली आणि आमच्या कारखान्याच्या नितांत अभिमानाचा विषय असलेलं ते यंत्र तो पराकोटीच्या चिकीत्सकपणे पाहू लागला. आता तो हळूच शीळ घालायला लागला. कौतुकमिश्रित आश्चर्याचे उद्‌गार त्याच्या तोंडून बाहेर पडू लागले. हा पठ्ठ्या एकदांचा खूष झालाय हे मला जाणवलं. तरीही मनातले सगळे अटकाव हटवणारा अंतिम निर्णय घेणं त्याला जड जातंय असं दिसलं. आता या शेवटच्या निर्णयाकडे त्याला किंचित ढकलणं आवश्यक होतं. मी चटकन रॉबेस्पिअरवर चढून त्याच्या पात्यांखालच्या धातूच्या भांड्यात एखाद्या खांडोळी करण्यासाठी ठेवलेल्या सहा फुटी माशाप्रमाणे पडलो. वर अतिशय मजबूत धारदार पाती चमकत होती. त्यांचा प्रकाश माझ्या


गळ्यावर पडला होता. ती महाकाय पाती अतिशय बारीक तारेच्या आधाराने वर टांगून धरलेली होती. एक हलकीशी कळ फिरवली की आधाराच्या तारा बाजूला होऊन पाती रोंरावत खाली आली असती. मी माशासारखा वळवळू लागलो. रॉबेस्पिअरच्या पात्यांखाली भांड्यात पहुडणं हे एखाद्या माशासाठी जणू स्वर्गसुख, अशी मला त्याची खात्री पटवायची होती. माझ्या या उत्साहाने केलेल्या सादरीकरणावर पाखुल्काने काहीच प्रतिसाद दिला नाही, फक्त कळ कुठे ते विचारलं. मी सांगताक्षणीच त्याने कळ फिरवली आणि पाती आधारातून सुटली आणि माझ्याकडे रोंरावत येऊ लागली.पण माझ्या गळ्यापासून चार इंच अंतरावर कशी कोण जाणे ती पाती अडकली आणि कचकच आवाज करत परत वर खाचेत जाऊन बसली. प्राणांतिक भितीने मी रॉबेस्पिअरच्या भांड्यातून खाली उतरलो. आता मात्र पाखुल्काच्या चेहऱ्यावर समाधानाचं स्मित होतं. तो हसत होता आणि त्याक्षणी तरी त्याच्या चेहऱ्यावरचं हसू एवढंच मला माझं श्रेय वाटत होतं.

आता आम्ही रॉबेस्पिअरमधे आणखी सुधारणा केल्या आहेत. आता त्याची पाती अशी मधेच अडकणार नाहीत. मात्र पुन्हा पाखुल्का आला तर मी किती काळ प्रयत्न करत बसायचं असा प्रश्न मी स्वत:ला विचारत असतो. माझ्या कामातला धोका मला पाखुल्कामुळे कळला. मनोविनोदकाच्या माणसाला कितीही पगार दिला तरी कमीच आहे. मी आज जेव्हा मनोरंजनाचा विचार करायला बसतो, तेव्हा ताबडतोब माझ्या डोळ्यासमोर येतात रॉबेस्पिअरची पाती.

***

# अक्कल

मूळ फ्रेंच लेखिका - मारी फ्लोराँस एरे
भाषांतर - नीलिमा रड्डी



**परिचय:**

**मारी फ्लोराँस एरे**

**मारी–फ्लोराँस एरे यांचा जन्म पॅरिसमधे झाला. साहित्य आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाबरोबरच त्यांनी विशेषत: आफ्रिकेतील अनेक देशांत केलेला प्रवास पर्यटनापलीकडे तेथील माणसं जाणून घेण्याचा होता. त्यांचे लिखाण कविता, कथा, कादंबरी, रहस्यकथा असे विविधांगी आहे. त्यांनी बरेच लिखाण कुमारांसाठीही केले आहे.**

**आता त्या सहसा पॅरिसलाच असतात. पूर्णवेळ लिखाण करतात, ब्लॉग चालवतात, लिखाणाच्या कार्यशाळाही घेतात.**

***

तुम्हाला मायकेल जॅक्सन माहितीये?

सगळ्यांना माहितीये, तसाच मलाही माहितीये.

माझ्या आईच्या प्रश्नाला मी असं उत्तर दिल्यावर ती महणाली, ''माहितीये ना, मग ऐक. तो मेला.''

मी वळून तिच्याकडे पाहिलं. कलाक्षेत्रातल्या प्रसिद्ध स्टारबद्दल तिनं मला ताजी बातमी पुरवणं हे अघटितच होतं! आणि तेही त्याच्या मरणाबद्दल!

'आँ?'' माझ्या तोंडून आलं.

मायकेल जॅक्सन! मला भारी आवडायचा तो. बाकी कुणाला पसंत नसे तो. गेल्या हिवाळ्यातले आजीकडचे माझे गढुळलेले दिवस त्यानंच तर उजळून टाकले होते. नाताळच्या दिवसाची वाट पाहण्याचा तो काळ इतका कंटाळवाणा होता! माझी आजी स्वैपाकघरात खुडबुडताना सारखी पुटपुटत असायची, ''काय बाई तरी नशीब!'' ती कशाबद्दल उसासे टाकत असायची कोण जाणे!... तिच्या लेकीला

होत असलेला उशीर की तिच्या पेन्शनमध्ये झालेली कपात, घेतलेल्या भाजी-पाल्याचा खराब दर्जा की वादळाने उध्वस्त झालेली शेतीभाती...

एकीकडे टी.व्ही. लावलेला असायचा, तो कुणीही पाहत नसे, पण एकदम टी.व्ही.च्या पडद्यावर तो दिसला आणि मी टी.व्ही.समोर ठाण मांडून बसले. उंदरासमोर जिभल्या चाटत अधाशीपणानं बसलेल्या मांजरासारखी.

''हे आहे तरी काय?'' टी.व्ही.च्या पडद्यावर उमटलेल्या छोट्याशा आकृतीकडे बोट दाखवत आजूबाजूला पाहात मी विचारलं होतं. मला पडद्यावर जे काही दिसत होतं ते म्हणजे मन:पटलावरचा राजकुमार आणि लबाड लांडगोबा अशा विविध छटांचं मनोहारी मिश्रण होतं! रेड रायडिंगहूडच्या स्वप्नातला लांडगा जणू!

'दुष्ट' नावाच्या चांगलीच प्रसिद्धी मिळालेल्या कार्यक्रमाचे अंश दाखवीत होते टी.व्ही.वर.

छोट्या पडद्यासमोरून जाता जाता आजी म्हणाली होती, ''काय बाई तरी नशीब!''

काहीही संबंध नसताना (निदान तेव्हा तरी मला तसं वाटलं हं!) आजी मान वेळावत बोलली होती- ''क़धी अक्कल येणार तुझ्या बिचाऱ्या आईला... देव जाणे!''

नंतर तो कार्यक्रम संपला आणि एकदाची माझी बिचारी आई आली बाहेरून. आम्ही तिघींनी मिळून खूप खूप मजेत नाताळ साजरा केला होता मग.

त्यानंतर मात्र मी मायकेल जॅक्सनला फारसं पाहिलं नाही. एक सांगायला हवं की आमच्याकडे टी.व्ही. नाही आणि माझी आजी 'ल मोंद'* सोडून दुसरं कुठलंही वर्तमानपत्र वाचत नाही. 'ल मोंद'मध्ये फोटो-चित्र असलं काही नसतं. पण शाळेत मी मायकेल जॅक्सनबद्दल बरंच ऐकलं होतं, त्यानं म्हणे पन्नासदा आपलं नाक दुरूस्त करून घेतलंय, चेहराही शस्त्रक्रियेने नवा करून घेतलाय. त्वचासुद्धा उजळवून टाकलीय म्हणे... त्याला मरणाची फार भीती वाटते म्हणतात... माकडं, बाहुल्या आणि लहान मुलं त्याला भारी प्रिय!... तो अंधाराला आणि सूक्ष्मजंतूंना घाबरतो म्हणे... मृत्यूची तर इतकी भीती की, त्यानं एक खास शीतपेटी करवून घेतली आहे.

*'ल मोंद'- हे जगप्रसिद्ध फ्रेंच वृत्तपत्र. वैचारिक लेखनासाठी मान्यताप्राप्त.

मृतदेह जिवंत करण्याचा शोध लागेपर्यंत त्याचं प्रेत म्हणे तिथेच जतन करून ठेवणार आहेत! पण शेवटी घाबरण्याने कुठलाच धोका टळत नाही, हे उघडच आहे आणि आज तो मेला, चक्क इतर सर्वांप्रमाणेच! त्याचं प्रेत आता त्या शाही रहस्यमय पेटीतून नेलं जात असेल का? तेच तर मी आईला विचारायच्या बेतात होते, ज्यावेळी तिनं मला थंडपणे सरळ माझ्या नजरेला नजर भिडवत ती बातमी दिली होती. मी फक्त 'आँ?'' एवढंच म्हणू शकले होते... काहीशा त्रयस्थपणे, काहीशा अस्वस्थपणे. आणि मग बऱ्याचशा प्रश्नांच्या फैरीही मी झाडत सुटले. ''हे तू मला का सांगतीयेस? कशानं मेला? एड्सनी की नशापाणी करून? हार्ट अटॅक की अपघात-बिपघात? विमानाचा, मोटारीचा, घोडा की सायकल? कुणी खूनबिन तर नाही केला?''

''असं वाटतंय की, तो तुझा बाप होता!''

आणि मग मी विचारलेले काही प्रश्न तरी अनुत्तरित राहू नयेत म्हणून पुढे म्हणाली, ''मी ऐकलं की त्यानं आत्महत्या केलीय. मला मात्र हे त्याच्याबाबत धक्कादायक वाटतंय,'' मलाही हे धक्कादायकच होतं. पण तो धक्का तेवढा मोठा नव्हता... मी पुरती गडबडून गेले होते. ती म्हणत होती ते खरं असेल तर, ती त्या माणसाला माझ्याहून फारच जास्त चांगलं ओळखत होती... म्हणजे माझ्या कानावर पडल्यासारखे वाटणारे ते शब्द खरंच मी ऐकले होते का?

बातमीचं मला नीट आकलन व्हायच्या आतच तिनं आपल्या घड्याळावर नजर टाकली आणि माझ्या गालाचा ओझरता पापा घेता घेता ती म्हणाली, ''हं म्हणजे... असं वाटतंय्...! बरं, आता मला नादामासमध्ये जायला हवंय. वाटलं तर आपण याबद्दल नंतर बोलू या!''

वाटलं तर? माझ्या पित्याच्या 'असण्याचा' किंवा मुख्यत्वे 'नसण्याचा' माझ्यावर यत्किंचितही परिणाम होण्याचे कारण नाही असे माझ्या आईचे ठाम मत होते, हे मला चांगलं माहीत आहे; पण तरीही ही माहिती देताना तिने दोन-चार जास्तीचे क्षण खर्च करायला काही हरकत नव्हती असं मला वाटलं. तिला असं वाटत नव्हतं हे सरळच दिसतंय.

''नादामास? की काय भानगड आहे?''

''ती एक विद्युतदाहिनी उद्योगसंस्था आहे.''

आई म्हणाली, ''मी नंतर सांगीन तुला सगळं.'' आणि तिनं माझ्याकडे ॲस्परॅगसच्या टोकांसारखा तीक्ष्ण निणार्यक कटाक्ष फेकला... ही आमच्या आईची खासियत बरं का. मग मला जरासं जवळ घेतल्यासारखं करत ऐटबाजपणे 'अच्छा' म्हणत वाऱ्याच्या झुळुकीसारखी ती नाहीशी झाली. मला काही बोलायची सवड मिळायच्या आतच दरवाजा बंद केल्याचा आवाज आला.

''मायकेल जॅक्सनची मुलगी?'' हे उद्‌गारवाचक प्रश्नार्थक शब्द मनात पुन्हा पुन्हा उमटत होते तरीही ते उच्चारणे व्यर्थ होते; कारण मी घरात एकटीच होते. काहीही म्हणा, मला तर जोराने हसूच येऊ लागले. मग मी आरशासमोर स्वत:ला नीट निरखलं- अगदी पोलिसासारखं; समोरून, बाजूने, उजवीकडून, डावीकडून.

आता घ्या! जगातल्या सर्वोत्तम शल्यविशारदांकडून चेहरा बदलून घेतलेल्या या भल्या माणसांतले साम्य कसं शोधायचं, सांगा बरं!

माझा रंग आईसारखा उजळ नाहीये. तिची कांती मुळातच फिक्कुटलेली आहे. माझे सोनेरी केस दाट व पिंजारल्यासारखे! तेही नक्कीच तिच्याकडून आलेले नाहीत. पण तरीही एवढ्यावरून स्वत:ला मायकेल जॅक्सनची मुलगी मानायचं म्हणजे जरा जास्तच होतंय- शिवाय माझा तो बेसूर आवाज आणि दरवेळी चिडल्यावर हिरवट दिसणारे माझे डोळे! छे... शक्यच नाही.

मी स्वत:चं प्रतिबिंब नीट पाहत होते, लक्षपूर्वक समोरून, कडेने, तिरक्या कोनातून न्याहाळत होते स्वत:ला...

सोळा वर्ष मी स्वत:ला जामेलची लाडकी मुलगी समजत होते... पूर्वी काबिली*त गुराख्याचं काम करणारे माझे बाबा जामेल, फ्रान्ससाठी लढतानाच मृत्यूमुखी पडले... इतक्या अचानकपणे की, आपल्या प्रेयसीची, म्हणजे माझ्या आईची त्यांच्या वयस्क आईशी भेट घडवायलाही अवसर मिळाला नाही. आता एकदम मी एक निग्रो वंशाची, पित्याने नाकारलेली मुलगी आहे असं मानायचं?

* काबिली- हा अल्जिरियातील डोंगराळ प्रदेश. अल्जिरीया हा फ्रेंच अधिपत्याखाली असलेला देश नंतर स्वतंत्र झाला.

मला दुसऱ्यांदा अनाथ झाल्यागत वाटू लागलं. एकाच वेळी मी माझा आत्तापर्यंत मानत आलेला पिता आणि माझा खरा जन्मदाता पिता दोन्हीही गमावले होते! माझ्या कोवळ्या तारुण्यात रंग भरण्यासाठी आईनं ही एक कल्पित कथा रचली असेल असं तरी कसं म्हणावं?

मायकेल जॅक्सनची मुलगी! शी! आईला हे मला आधी सांगायला काय झालं होतं? त्यानं त्याची सही करून मला दिलेले नुसते फोटो जरी मी दोस्तांना विकले असते ना, तरी किती पैसे कमावले असते मी.

या हलक्या विचारांची शरम वाटून मी खांदे उडवले. मात्र एक कबूल केलं पाहिजे की आमच्या मातोश्रींनी सांगितलेलं खरं म्हणून मानणं मला काही केल्या जमत नव्हतं. तुम्हीच सांगा असा कुणाचा विश्वास बसेल का?..

एकाएकी कुणी सांगितलं की तू अमुक अमुक संगीतसम्राटाची मुलगी आहेस तर? हॅ काहीतरीच... उद्या कुणी म्हणेल तू राष्ट्राध्यक्षांची मुलगी नाहीतर पोपची मुलगी आहेस!

माझे विचार असे भरकटत असताना टेलिफोन वाजू लागला. पलीकडचा आवाज माझ्या ओळखीचा नव्हता. फोन आईसाठी होता. आग्रही स्वरात शब्द आले, ''मी ॲडव्होकेट मिसू बोलतेय. फार तातडीचं काम आहे. कुठे असतील त्या आता?''

मी चातुर्यानं नादामास विद्युतदाहिनी उद्योगसंस्थेचं नाव सांगून टाकलं.

''त्यांना जाऊन बराच वेळ झालाय का?'' तो माणूस भलताच गांगरून गेल्यासारखा वाटला.

''नक्की सांगता येणार नाही, पण जास्तीत जास्त अर्धा तास लागेल.''

पलीकडून एक नि:श्वास टाकल्याचा आवाज आला. मला कळेना आता आणखी काय बोलावं- दाणकन् फोन खाली ठेवण्याचाही धीर होईना.

''तुम्ही त्यांची मुलगी का?''

''हो, त्यांची आणि मायकेल जॅक्सनची.''

मला वाटलं पलीकडच्याला हसू येईल हे ऐकून पण नाही. गंभीर स्वरात तो उद्गारला– 'अरेच्चा! तुम्हाला ठाऊक आहे तर! तुम्हाला लगेच येता येईल का?''

''लगेच?''

''७ मजेंटा बुलव्हार, पहिला मजला. उशीर करू नका.''

मला काही बोलू द्यायच्या आतच त्याने फोन ठेवला.

माझी प्रतिक्रिया पाहिजे तितक्या झटकन् होत नाही हे खरंय– पण त्या दिवशी माझी आई आणि आता हा... हे दोघं कुठलंही स्पष्टीकरण न देताच आपलं म्हणणं उरकत होते असं मला स्पष्टपणे जाणवलं.

अर्ध्या तासाच्या आतच मी 'त्याच्या'कडे पोहोचले. पण 'तो' तिथे नव्हताच. त्याच्याऐवजी त्याचं प्रेत होतं... बंदुकीच्या गोळीनं पडलेली दोन छिद्र आणि एक तांबडाभडक डाग त्यावर होता.

एका पोलिसाने माझ्यासाठी दार उघडलं होतं. त्याला पाहून मी एक पाऊल मागे हटले. तो दोन पावले पुढे सरकला, अतिशय सौजन्याने माझं कोपर हलकेच पकडून त्यानं मला आतल्या बाजूला नेलं होतं. अगदी प्रेताच्या समोरच.

मी तोंड वासून पाहातच राहिले. पोलिसानं माझं कोपर पकडलेलंच होतं.

पोलीसचौकशी एका तासापेक्षा जास्त वेळ चालली. निदान या मंडळींना तरी कसली घाई नव्हती. त्यांनी आणि मी एकत्रितपणे घडलेल्या घटनांचा मागोवा घेतला. माझं तिथे असणं, वकीलांचा तो फोन, माझ्या आईचे बाहेर जाण्यापूर्वीचे अखेरचे शब्द, त्याआधीचे तिचे उद्गार इथपासून ते मायकेल जॅक्सनपर्यंत. त्यांची सर्वांची माझ्याभोवताली लगबग सुरू होती. मला दार उघडून आत घेणारा तो तरुण पोलीस, तसेच इतरही काही... फोटो काढणारे, ठसे घेणारे... आपण टी.व्ही.त बघतो तसेच, कप्पे उपसणारे... मला जाणवत होतं की, ते सारेच माझ्याकडे विचित्रपणे पाहात होते. मायकेल जॅक्सनची मुलगी? कुठं काही साम्य दिसतंय का, असं शोधत असणार तेही!

त्यानंतर आम्ही सगळेजण पोलीसचौकीत गेलो. मला वाटतं माझं नाव, आडनाव व इतर गोष्टी मी त्यांना कमीत कमी वीसेक वेळा तरी सांगितल्या असतील.

एका क्षणी तर मला असं वाटलं की, आता मला इथेच डांबून ठेवणार हे लोक. माझ्या घरी ते पुन्हा पुन्हा फोन लावत होते. पण कुणी उचलेना. शेवटी मग चावून चावून चोथा झालेलं च्युइंगम थुंकावं तसं त्यांनी मला म्हटलं, ''हां हां ठीक आहे. तुम्ही जाऊ शकता आता. पण पॅरिसबाहेर कुठे जाऊ नका. गरज पडली तर तुम्हाला बोलावून घेऊ.''

अखेरीस आमची स्वारी पोलीसचौकीच्या दरवाज्यासमोर रस्त्यावर उभी ठाकली.

रात्रीचे सुमारे दोन वाजले असावेत. मेट्रो पकडण्यासाठी धावण्यात अर्थ नव्हता आता आणि टॅक्सीने जाण्याएवढे माझ्याकडे पैसे नव्हते. भराभरा चालले असते, तर घरी पोचायला पाऊण एक तास लागला असता.

मात्र मला आता चालत जावंसं अजिबात वाटत नव्हतं. पोलीसचौकीत परत जाऊन थोडे पैसे उधार मागायचीही मुळीच इच्छा नव्हती.

मला माझी आई हवी होती... शक्यतो सुरक्षित आणि जिवंत असलेली आई! पण हे सगळं कसं जमवायचं तेच मला कळत नव्हतं. चौकीतल्या 'मामा' लोकांना तर कशाचीच यत्किंचितही फिकीर दिसत नव्हती.

समोरून माझ्या चेहऱ्यावर एक झगझगीत प्रकाशझोत चमकला आणि माझी विचारसाखळी तिथेच तुटली.

समोरच्या कॅमेऱ्याचा तो फ्लॅश सरळ माझ्या डोळ्यावरच फेकला होता. एक जोरदार हासडलेली शिवी, ''च्यायला!''

त्याचक्षणी माझ्या पाठीमागून कानावर आदळली. अंधारात मागून एक सावली वेगाने झेपावली व तिने छायाचित्रकाराला खाली पाडले. नकळत पशुवत् प्रतिक्रियेने मीही त्या सावलीमागून स्वत:ला झोकून दिलं. आम्ही दोघांनीही कॅमेऱ्याचा पट्टा पकडला. छायाचित्रकार एखाद्या रानमांजराप्रमाणे कर्कश्श ओरडत होता.. मी कधी रानमांजराचा आवाज ऐकला नाहीये... आजीला विचारलं पाहिजे. ती या विषयातली तज्ज्ञ आहे ना!...

पट्ट्याच्या मजबुतीचा अंदाज आल्यावर त्या 'सावलीने' तो इतक्या जोरात खेचला की पट्टा तुटला! माझ्या हातात कॅमेरा आला आणि छायाचित्रकाराने त्या

'सावलीचा' पाय पकडला. जणू खेळ सावल्यांचा चालला होता. पोलीसांना चौकीतून बाहेर यायला चांगली पाच मिनिटं लागली.

चौकीचं दार उघडल्यावर आलेल्या प्रकाशाच्या तिरीपीमध्ये ती सावली जणू वितळून गेली. एखादी जुनी बाहुली छातीशी घट्ट धरावी तसा कॅमेरा पकडून मी रस्त्यावरच बसलेली होते. छायाचित्रकाराचे हात मात्र मोकळे होते. त्याला जेरबंद करण्यासाठी पोलीसांनी त्याच्यावर झडप घातली.

''पुन्हा तुम्ही!'' मला उठवायला मदत करीत एक पोलीसमामा उद्गारला.

दोन गणवेषधाऱ्यांच्या मधे उभा असलेला तो विशीचा तरुण माझ्याकडे हसून पाहत होता. जणू जॅक्सनचं हुबेहूब चित्रच. हं, म्हणजे मला खूप आवडणारं मायकेल जॅक्सनचं एक चित्र आहे तसं– मानेवर रुळणारे केस, गालावर ताणून बसलेली तपकिरी रंगाची त्वचा, मुख्य म्हणजे... मुख्य म्हणजे आसमंत उजळून टाकणारं त्याचं चमकदार स्मित! एखाद्या प्रेमळ लांडगोबासारखं, टूथपेस्टच्या जाहिरातीत शोभेलसं, पांढऱ्या शुभ्र कुंदकळ्या उलगडून दाखवणारं.

''तुम्ही अगदी तो सोडला नाहीत हं हातातून!'', तो मला म्हणाला.

तो माझ्याकडे पाहत नव्हता तर मी हृदयाशी घट्ट पकडून ठेवेलेल्या कॅमेऱ्याकडे त्याची नजर होती. त्याच्या कॅमेऱ्याकडे. ह्याच कॅमेऱ्याने त्याने माझी परवानगीही न घेता खुश्शाल माझा फोटो काढला होता. तेही रात्री दोन वाजता आणि पोलीसचौकीच्या समोर.

''काय झालंय काय नक्की?'' पोलीसाने तीव्र आवाजात विचारलं. ''या माणसानं तुमच्यावर हल्ला केला का?''

आता मात्र तो मायकेलची हुबेहूब प्रतिकृती असलेला पोरगा माझ्याकडे पाहू लागला. खरं तर हा काही तसा तितकासा आपल्या सुप्रसिद्ध गायकांसारखा नव्हता बरं का दिसत... त्याची मी मुलगी आहे, हे माझ्या अजून तरी नक्कीच पचनी पडलं नव्हतं. हा एक संमिश्र वंशाचा देखणा तरुण होता. अशाच तरुणाची स्वप्न साऱ्या मुलींना पडत असतात... अर्थात मलासुद्धा.

आम्ही दोघं एकमेकांकडे पाहत होतो. तो हसऱ्या नजरेने आणि मी रागाने, चिडून! माझी कॅमेऱ्यावरची पकड घट्ट होती.

''तुम्हाला तक्रार नोंदवायची आहे का यांच्याविरुद्ध?'' मला पोलीस परत आग्रह करत होता.

''तक्रार? आणि यांच्याविरुद्ध? माझ्यावर हल्ला करणारा पळून गेलाय... आणि ह्या धाडसी तरुणाने मधे पडून मला सावध केलं नसतं तर माझं काय झालं असतं देव जाणे!''

मी अगदी सहजपणे थाप ठोकून दिली. अर्थात् तसं ते अगदीच खोटं नव्हतं. हल्लेखोर खरोखरच निसटून गेला होता. फक्त हल्ला त्याच्यावर झाला होता आणि मी मधे पडले होते... तेही खरं तर केवळ योगायोगानंच!

मी त्याच्या बाजूची असल्याची खात्री पटून त्याचे तपकिरी डोळे स्निग्ध झाले... आणि त्याला गुन्हेगाराप्रमाणे आवळणाऱ्या पोलिसांचे हात सैल झाले.

''मी इथे जवळच माझी गाडी लावलीये.'' मग तो म्हणाला.

त्या क्षणी माझ्या नजरेनं टिपलं की त्याचे ओठही जणू निसर्गाची किमयाच आहेत. आमची आई म्हणाली असती, सुरेख फळ जसं! मला लाजल्यासारखं झालं उगीचच. तो मात्र पोलिसांशीच बोलत होता. ''तुम्ही परवानगी दिलीत, तर मी या मुलीला तिच्या घरी पोहोचवतो. तेच योग्य होईल, नाही का?''

पोलीस बुचकळ्यात पडले. एकदा माझ्याकडे नि एकदा त्याच्याकडे पाहत तो पहिला पोलीस मला म्हणाला,

''नक्की ठीक आहे ना सगळं?''

ठीक? माझे वडील नुकतेच मृत्यू पावलेत, मी आयुष्यात प्रथमच एक प्रेत पाहिलंय, माझी आई नाहीशी झालीय... एवढं सोडलं तर बाकी सगळं एकदम ठीक आहे!

मी उत्तरादाखल फक्त मान डोलावली. त्या तरुणानं माझा हात धरला आणि आम्ही निघालो. पोलीसांची चौकस नजर माझ्या पाठीवरसुद्धा मला जाणवत होती. मला भीती वाटत होती... न जाणो त्यांनी आपला बेत बदलून मला जाऊ देण्याचं नाकारलं तर?

''माझं नाव मिशेल. तुझं?'' माझा साथीदार कुजबुजला.

''लाम्बेकाकार फार?''

''काय नाव म्हणालीस, लाम्बेका.. काय?''

''माझं नाव सारा. ती तुला विचारते आहे की लांब आहे का कार फार?''

मी पदपथावर धाडकन् पडणार आता, असं मला वाटत होतं. सगळा तो भावनांचा उद्रेक... सहन होईना मला– मला घरी जायचं होतं माझ्या. गाढ झोपून जायचं होतं... अगदी आईनं, फक्त माझ्या आईनंच मला उठवेपर्यंत. खरपूस भाजलेले पावाचे तुकडे तिने माझ्यासाठी आणेपर्यंत झोपायचं होतं.

मला इतका थकवा आला होता की, गाडीतच झोप लागली मला.

हा तर देल्फीनचा चेहरा– मध्यवर्ती बेकरीवाली विक्रेती देल्फीन. मी जागी झाले, तेव्हा ती वाकून माझ्याकडे पाहत होती. चॉकलेट बनस्चा रुचकर सुगंध दरवळत होता. मला डोळे उघडावेसे वाटले– अरे, पण ते तर उघडेच होते की... अरे देल्फीन... खरीखुरी हाडामासाची देल्फीन नेहमीसारखीच काळे कपडे परिधान केलेली देल्फीन तिथे होती.– हे स्वप्न नव्हतं.

''काळजी करू नकोस अगदी. तुझी आई ठीक आहे.''

मी परत डोळे मिटून घेतले. आई बरी असली तर आणखी थोडं झोपायला काय हरकत आहे? झोपलेही असते म्हणा, पण भाजलेल्या पावाचा झकास वास आणि मनातलं कुतुहल मला डोळे मिटू देईना.

''पण तुम्ही काय करताय इथं?''

देल्फीनच्या चेहऱ्यावर एक गूढ स्मित उमटलं. मधल्या सुट्टीत तिच्या बेकरीत येणाऱ्या आमच्यासारख्या गिऱ्हाईकांना ती जेव्हा विचारायची, 'सफरचंदाचा शोसाँ* हवा की क्रवासाँ* हवा–' तेव्हाही असंच स्मित तिच्या तोंडावर असे. या मधल्या सुट्टीच्या तासात काही पोरंटोरं तर एकाच दिवशी तीन-चार वेळासुद्धा बेकरीत चकरा टाकीत!

* शोसाँ – एक प्रकारची पेस्ट्री. चिरोट्यासारखे पापुद्रे सुटलेल्या या गोल पदार्थात शिजवलेल्या फळांच्या गराचे सारण असते.

* क्रवासाँ – चंद्रकोरीच्या आकाराचा पॅटिससारखा पापुद्रे असलेला पदार्थ. फ्रेंच बेकरीची खासियत म्हणून जगप्रसिद्ध.

तिनं माझ्या प्रश्नाला प्रश्नानेच उत्तर दिलं. सुसंवाद साधण्यातलं हे एक उच्च दर्जाचं कौशल्य मानलं जातं. ''तुला एखादा बन हवाय का?''

तो तर मला हवाच होता, पण तिच्याकडून काही उलगडाही करून हवा होता. ती जराशी गडबडली, ''मला सगळं माहीत नाहीये... ती खूप वर्षांपूर्वी घडून गेलेली गोष्ट आहे... तुझ्या आईची आणि माझी तुझ्या जन्माआधीपासूनची ओळख आहे. 'रेड इंडियन्स' नावाचा एक स्त्रियांचा गट स्थापन झाला होता आणि आम्ही दोघी त्याच्या आघाडीच्या कार्यकर्त्या होतो. त्या कामाच्या संदर्भातच आमची मायकेलशी भेट झाली होती. हे सगळंच जरा गुंतागुंतीचं आहे. थोडक्यात सांगायचं तर, तुझ्या आईने मायकेलला गटाच्या मदतीप्रित्यर्थ गाण्यासाठी तयार केलं. त्यानंतरच्या काळात आमचे मार्ग बदलले. ती अल्जेरियाला गेली आणि मी दक्षिण अमेरिकेत. त्या दिवसांत आमच्या भेटीगाठी झाल्याच नाहीत. मी जेव्हा फ्रान्सला परतले, तेव्हा कोंडीत अडकल्यासारखी होते... ज्यावेळी मला स्वत:चं नाव गाव लपवून राहणं भाग होतं. त्यावेळी तिनं मला ही बेकरीतली नोकरी मिळवून दिली आणि मग नंतर मायकेल मरण पावला... तेव्हा...''

तेव्हा काय? माझ्या लक्षात आलं की माझा खरा पिता कोण याला तिच्या लेखी फारसं महत्त्वच नव्हतं.

याच क्षणी कुणीतरी दार ठोठावलं आणि माझ्या ध्यानात आलं की, मी माझ्या अंथरुणावर नाहीये... ही माझी खोली नव्हे. हे माझं घर नाही.

मिशेल हातातलं वर्तमानपत्र फडकावत, माझ्याकडे ढुंकूनही न पाहता आत आला आणि देल्फिनला म्हणाला, ''आई, काम झालं बरं का!''

नंतर माझ्याकडे नजर टाकून सहजपणे म्हणाला, ''कशी काय झाली झोप?''

जणू काही मी रोज त्याच्या अंथरुणात झोपत असते. त्याच्या की त्याच्या आईच्या अंथरुणात कोण जाणे. मला खरोखरी कळेना हा काय प्रकार आहे. मी अगदी अवघडून गेले व खोल गेलेल्या आवाजात विचारलं, ''मी कुठं आहे?''

देल्फीनचा चेहरा कसनुसा झाला. 'लिम्बेरास्यों' या वृत्तपत्राचा ताजा अंक तिनं माझ्यापुढे धरला. पहिल्या पानावर माझा फोटो! आणि माझ्या मागच्या बाजूला माझ्यावर पिस्तूल रोखून उभा असलेला माणूस स्पष्ट दिसत होता.

'वारसाची पारध' असं शीर्षक दैनिकाच्या वरच्या बाजूला झळकत होतं.

माझं डोकं गरगरायला लागलं. पान पाच वरची 'विस्तृत बातमी' वाचण्यापूर्वी मला काहीतरी खाल्लंच पाहिजे.

*''केवळ एका नाविन्यपूर्ण जाहिरात मोहिमेपायी पॅरिसच्या बारकोर्टाचे ॲडव्होकेट मिसू यांना स्वत:चे प्राण गमवावे लागले. नादामास विद्युतदाहिनी संस्थेकडून त्यांना मोठी रक्कम देण्यात आली व त्याबदल्यात त्यांनी मादाम मारी नोएल (कु. सारा नोएल- वय १६ यांच्या आई) यांच्याशी ओळख करून घेऊन आपण मायकेल जॅक्सन यांच्या मृत्युपत्राचे कार्यकारी विश्वस्त आहोत असे भासवले. सारा ही आपलीच कन्या आहे असे वाटल्यामुळे या विख्यात गायकाने आपल्यावर तिचा शोध घेण्याची कामगिरी सोपवल्याची बतावणी त्यांनी केली.*

*दुसऱ्या बाजूला ॲडव्होकेट साहेबांनी मायकेल जॅक्सन यांच्या कायदेशीर वारसांशीही संपर्क साधला. मायकेल जॅक्सन आपल्या मुलीचा पिता असल्याबद्दल पुरावे व कागदपत्रे एक मारी नोएल नावाच्या बाई न्यायालयात सादर करू शकतील असा सावधगिरीचा इशारा त्यांना मिसूंनी दिला.*

*हे सर्व धादांत खोटे होते. ही एक वृत्तपत्रातली सनसनाटी बातमी होऊ शकली असती. शिवाय वारसांनी पित्याच्या मृतदेहाचे दहन केल्यास शवविच्छेदनातून प्रकट होणारी क्लेशकारक आश्चर्ये टाळता येतात, अशी परिणामकारक जाहिरात नादामास विद्युतदाहिनी उद्योगास करता आली असती.*

*जोरदार धक्का देऊन जाहिरात करण्याचे तंत्र रोजच वापरात येते त्यातलीच ही एक जाहिरात झाली असती, पण दुर्दैवाने याचे रूपांतर एका मोठ्या नाट्यमय प्रसंगात झाले. मायकेल जॅक्सनच्या प्रचंड मालमत्तेचा आठवा भाग हातून निसटू नये म्हणून त्याच्या कायदेशीर वारसांनी मिसू वकीलांचा व या दोन्ही स्त्रियांचा नायनाट करण्यासाठी एका मारेकऱ्याला सुपारी दिली.''*

पहिल्या पानावरचा माझा फोटो पाहण्यासाठी मी वृत्तपत्राची घडी घातली आणि दुसरा चॉकलेट बन तोंडात कोंबला.

अजूनही मला सर्वकाही स्पष्ट कळलं नव्हतं. पण ती सौष्ठवपूर्ण वृत्तपत्रीय भाषेतली कथनं आता मला सहन होईनाशी झाली. एका अंतिम यात्रा कंपनीवाल्यांच्या

जाहिरातबाजीपायी झालेल्या खुनी हल्ल्यातून माझी आई व मी थोडक्यात वाचलो हे मला वृत्तपत्रातून कळावं याची मला चीड येत होती.

वर्तमानपत्र खाली ठेवण्याआधी मी परत एकदा माझ्या फोटोकडे पाहिलं. माझी आई कधी आत आली मला कळलंच नाही. माझ्या पलंगाच्या दोन बाजूंना देल्फीन आणि आई दोघी उभ्या होत्या आणि दोघी वाकून माझ्याकडे पाहत होत्या. नवजात येशू बाळावर छाया धरणाऱ्या प्राण्यांप्रमाणे. मिशेल जरासा बाजूला उभा होता. येशूदर्शनाला आलेल्या राजासारखा*.

आई म्हणाली,''अशी नको पाहूस माझ्याकडे. तुला मी कसलं स्पष्टीकरण द्यावं असं तुझं म्हणणं आहे? देल्फीन, आपली बेकरीतली विक्रेती. एक सांगते तुला की, ती यांत गुंतलीये हे ऐकून काहींना मोठाच अचंबा वाटेल– पण तिला यातून बाहेर पडायचं होतं, हे खरंय. आपल्या दोघींना जिवे मारण्याइतक्या थराला ते वारसदार जातील याची तिला कल्पनाही नव्हती. मायकेल मला सगळीकडे शोधतोय असं तिनं मला सांगितलं, तेव्हा माझा तिच्यावर विश्वास बसला. आमची दोघींचीही त्याच्याशी एकाच वेळी ओळख झाली होती. आमच्या स्त्रीवादी कार्याला मदत म्हणून एक गाण्याचा कार्यक्रम द्यायलाही तो आला होता. त्यानंतर... जाऊ दे. सगळं काही विस्तारानं तुला सांगायची गरज नाहीये. मायकेल हा एक अपघात होता असं म्हणू या. तो काय किंवा आणखी कोण काय... काय फरक पडत होता? मी मात्र तू जामेलची मुलगी आहेस असंच मानण्यात आनंद मानत आले आहे.''

मी काहीच बोलत नाही हे पाहून ती म्हणाली, ''जर वारसाहक्काबद्दल बोलायचं तर...''

वारसाहक्क? या क्षणी मला त्याची मुळीच चिंता वाटत नव्हती. मिशेल माझ्याकडे टक लावून पाहत होता. मी पुन्हा वर्तमानपत्र हातात घेतलं.

*''मिशेल जाक या तरूण हौशी छायाचित्रकारावर मिसू वकीलांनी साराचे फोटो काढण्याचे काम सोपवले होते. ही छायाचित्रे नंतर मायकेल जॅक्सनच्या*

---

* येशुजन्माच्या वर्णनाप्रमाणे तबेल्यात जन्मलेल्या या दैवी बालकावर एक बैल व एक गाढव या जनावरांनी छाया धरली होती. तसेच या ईश्वराच्या नव्या प्रेषिताच्या दर्शनाला पूर्वेकडून तीन द्रष्टे राजेही आले होते.

*वारसदारांकडे पाठवली जाणार होती. या कामात मिशेल जाक इतके वाहवत गेले की, दिवसभर सारा नोएलचा पाठलाग करून त्यांनी अनेक बाजूंनी त्यांची अगणित छायाचित्रे घेतली. अविचाराच्या भरात त्यांनी पोलीसचौकीसमोर साराचे गोंधळलेल्या मन:स्थितीतले भाव टिपण्याचा बेत केला. याच छायाचित्राने अखेरीस साराचे प्राण वाचवले. तसेच मारेकऱ्यांचीही ओळख पटली. कारण छायाचित्र काढण्याच्या नेमक्या क्षणी मारेकरी सारावर पिस्तूल रोखून उभा होता, तो कॅमेऱ्याच्या प्रकाशझोतात छायाचित्रात बरोबर टिपला गेला.''*

आई माझ्याकडेच पाहत होती. एखादा मोठा मासा पकडल्यानंतर त्याच्या शेजारी उभे राहून मच्छीमाराच्या तोंडावर हसू झळकते ना, तसेच हसू आईच्या चेहऱ्यावर होते. माझे वडील कोण? जामेल की मायकेल? मला ते कधीच कळणार नाही... मी फक्त माझ्या आईची मुलगी आहे... तिची एकटीची.

मी मिशेलच्या चेहऱ्यावरचं प्रेमळ लांडगोबाचं हसू निरखीत होते. तोही माझ्याकडेच पाहत होता. यावेळी अगदी रोखलेल्या नजरेनं. त्याचे अन् माझे वडील एकच असतील तर त्याच्याबद्दल अशी भावना मनात असणे हे पाप आहे ना?

देल्फीन आम्ही तिघांकडे पाहून म्हणाली, ''तू कसलाही विचार करू नकोस. मिशेल काही मायकेल जॅक्सनचा मुलगा नाही हे मी तुला खात्रीपूर्वक सांगतेय. तसं असतं तर तुझ्या आईवर कारस्थान रचायची मला काही गरजच नव्हती.''

लाजेने लाल होत मी वर्तमानपत्रात तोंड लपवलं. पिस्तुलाची गोळी हुकली, त्याचं काय एवढं, इथं तर मी मदनशरांनी विद्ध झाले होते!

''आणि तुझ्या लक्षात आलंच असेल की, हा सगळा बनाव देल्फीनचा असूनही तिनं स्वत:चं नाव पुढे येऊ न देण्याची खबरदारी घेतलीय.'' आईने कौतुकभरल्या आवाजात मैत्रिणीला दाद दिली. जणू काही तिच्या या बनावामुळे एका माणसाचं मरण ओढवलं आणि आमचंही ओढवू घातलं होतं हे काहीच महत्त्वाचं नव्हतं.

*''मारी नोएलना आज सकाळी जारीब्वाझिएर रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं. डोक्याला बंदुकीची गोळी चाटून गेल्यामुळे त्यांना तिथे भरती करण्यात आले होते. पोलीस संरक्षणात त्यांना घरी पोहोचवण्यात आले.''*

''अगं, जरासं कुठे खरचटलंय'', शांतपणे आई म्हणाली, ''रक्त खूप गेलं पण जखम अगदी मामुली आहे. तुझ्या आजीची मात्र निराशा होणार. ती कधीपासून वाट पाहतीये की, मला कधीतरी अक्कल येईल म्हणून!''

माझ्याबद्दल म्हणाल तर मीही लवकरच माझी 'अक्कल' गमावून बसणार होते, हे स्पष्ट दिसत होतं.

***

# लाल कोश

**मूळ जपानी लेखक : कोबो आबे**
**भाषांतर : निसीम बेडेकर**



परिचय : कोबो आबे

(१९२४-१९९३)

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता पावलेल्या जपानी साहित्यिकांमधले एक महत्त्वाचे कादंबरीकार व नाटककार, त्यांचे खरे नाव आबे किमिफुसा. जन्म टोकियोचा; परंतु वडिलांनी वैद्यकीय व्यवसायामुळे वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत मांचुरियातील मुडकेन येथे वास्तव्य केले. इतर बऱ्याचशा जपानी लेखकांच्या साहित्यामध्ये महत्त्व असलेल्या 'मूळ गाव (फुरूसातो)' या संकल्पनेला आबे यांच्या साहित्यात मुळीच स्थान नाही. उलट शहरीकरणामुळे मुळे हरवलेली, वैराण वस्त्यांमध्ये एकाकी जगणारी माणसे त्यांच्या लेखनात दिसतात आणि त्यामुळे, त्यांच्या कथानकांची पार्श्वभूमी जरी जपान असली, तरी जगातल्या कोणत्याही औद्योगिक, शहरीकरण झालेल्या समाजातील माणूसपणाच्या ऱ्हासाचे चित्रण त्यांच्या साहित्यात दिसते.

१९४३ साली टोकियो विद्यापीठात वैद्यक शाखेत त्यांनी प्रवेश घेतला. पण वैद्यकीय पेशात रस न वाटल्याने ते लवकरच साहित्याकडे वळले. त्यांचे वैद्यकाचे ज्ञान त्यांच्या लेखनात विशेषत: १९५९ साली प्रसिद्ध झालेल्या Daiyon Kampyoki (Inter Ice Age 4) यासारख्या सायन्स फिक्शनमध्ये प्रतिबिंबित झालेले दिसते.

त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्वत:चे अस्तित्वभान हरवलेली चमत्कारिक पात्रे, असंबद्धता आणि अतिवास्तववादी वातावरण असते. फ्रान्त्स काफ्काच्या शैलीशी त्यांच्या

बऱ्याच साहित्याचे नाते सांगता येते. तानिन नो काओ (The Face of Another 1964) या कादंबरीत, प्रयोगशाळेतल्या स्फोटाने चेहरा विद्रूप झालेला एक शास्त्रज्ञ मुखवटा वापरून स्वत:ची एक नवी ओळख तयार करतो. पण इतरांपासून खरा तो दुरावलेलाच राहतो. शहरी जीवनातील माणसांचे दुरावलेपण व मी खरा कोण आहे याबाबत होणारा गोंधळ आबे यांना महत्त्वाचा वाटतो. शहर म्हणजे एक गुंतागुंतीचा चक्रव्यूह बनतो व माणसे निव्वळ वस्तू बनून त्याच्या गल्लीबोळांमध्ये हरवल्यासारखी वावरत असतात. हाको आतोको या कादंबरीचा नायक एका पेटीत राहायला जातो. तिथे कोणीही त्याला ओळखत नसते व दैनंदिन जीवनात न लाभणारी मुक्तता त्याला लाभते. दुसऱ्या एका 'ॲबसर्ड' पद्धतीच्या कादंबरीत जमिनीखाली बोगद्यांचे जाळे बनवून त्यात राहणाऱ्या वेडसर चमत्कारिक पात्रांचे चित्रण आहे.

आबे हे नाटककार म्हणूनही प्रसिद्ध होते. १९७३ साली त्यांनी स्वत:ची नाट्यसंस्था सुरू करून स्वत:ची नाटके रंगभूमीवर आणली. रेडिओ, टी.व्ही., सिनेमा या माध्यमांसाठीदेखील त्यांनी लेखन केले. त्यांच्या पत्नी माची या प्रथितयश चित्रकार व नेपथ्यकार होत्या. आबे यांच्या कादंबऱ्यांसाठी त्यांनी चित्रे काढली व रंगभूमीवर नेपथ्याची बाजू सांभाळली.

लाल कोश (Red Cocoon) या डिसेंबर १९५० मध्ये लिहिलेल्या सुरुवातीच्या कथेतही आबे यांच्या साहित्यदृष्टीची वरील वैशिष्ट्ये दिसून येतात.

***

दिवस मावळायला आला. खरंतर यावेळी लोक घरी जाण्याची घाई करतात. पण मला परतण्यासाठी घरच नाही. मी दोन घरांमधल्या बोळातून सावकाश चालत होतो. सबंध रस्ताभर ही एवढी घरं असताना मलाच तेवढं एकही घर का बरं नसावं? हजारो वेळा पडलेला हा प्रश्न पुन्हा पुन्हा डोक्यात भणभणत होता.

विजेच्या खांबावर रेलून लघवी करत असताना, खाली पडलेला एक दोराचा तुकडा पाहून मला गळफास लावून घेण्याची इच्छा झाली. जणू तो दोराचा तुकडा माझ्याकडे कटाक्ष टाकत म्हणत होता, ''बंधू, चल, विश्रांती घेऊया.'' विसावा घ्यावा असं तर मलाही वाटत होतं. पण असं विसावता येणार नाही. एकतर मी काही दोराचा भाऊबंद वगैरे नाही आणि दुसरं म्हणजे मला स्वत:चं घर का नसावं या प्रश्नाचं पटण्याजोगं उत्तर अजून मला सापडलेलं नाही.

रोजच्यासारखी रात्र झाली. रात्र झाली की विश्रांती ही घ्यावीच लागते. विश्रांती घेण्यासाठी तर घर असतं. जर असं असेल, तर मला घर नसायला काहीच कारण नाही. परत मनात विचार आला, कदाचित माझा फार मोठा गैरसमज होत असावा. मला घर नाही असं नाही, फक्त ती गोष्ट मी विसरून गेलो असेन एवढंच. हो हो, तसं अगदी शक्य आहे. कदाचित... केवळ योगायोगाने मी पोचलो त्या एका घरापाशी माझे पाय थबकले. कदाचित हेच माझं घर असू शकेल की! अर्थात इतर घरांच्या तुलनेत हे घर माझं असण्याची शक्यता दाखवणारी काही खास गोष्ट वगैरे तिथं मुळीच नाही. पण कुठल्याही घराबद्दल असं म्हणता आलं असतं. शिवाय ते घर माझं नाही असं दाखवून देणारा काही पुरावाही नाही. मी धीर एकवटला. चला, दार ठोठावूया.

नशिबानं अर्धवट उघड्या असलेल्या खिडकीतून प्रेमळ वाटणाऱ्या एका स्त्रीचा हसरा चेहरा बाहेर डोकावला. माझं हृदय हळूच फुललं आणि झेंड्यासारखं फडफडू लागलं. मीसुद्धा हसून एखाद्या सद्गृहस्थाप्रमाणे अभिवादन केलं.

''जरा चौकशी करायची आहे. मला वाटतं हे घर माझं आहे, नाही?'' त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर एकदम आठ्या पडल्या.

'अरेच्चा. आपण कोण?'' मी खुलासा करण्याचा प्रयत्न केला, पण काय बोलावं हे सुचेना. सगळं कशा प्रकारे समजावून सांगावं कळेनासं झालं आहे. मी कोण आहे वगैरे गोष्टीचा इथे काही संबंध नाही हे तिला कसं पटवून द्यावं?

मी थोडासा निराश होऊन म्हणालो,''कसंही असलं तरी जर हे घर माझं नाही असं तुमचं म्हणणं असेल, तर तसं सिद्ध करून दाखवा.''

पण... त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर भीती दिसू लागली. याचा मला काहीसा राग आला.

''जर तसा पुरावा नसेल, तर हे घर माझं आहे असं समजणं ठीक होईल ना?''

''पण हे तर माझं घर आहे.''

''असं तुम्ही कशावरून म्हणता? आणि हे तुमचं घर आहे याचा अर्थ ते माझं घर नाही असा मुळीच होत नाही. होय ना?''

उत्तर देण्याऐवजी स्त्रीचा चेहरा भिंत बनला आणि खिडकी बंद झाली. तर स्त्रीच्या हसऱ्या चेहऱ्याचं खरं स्वरूप हे असं असतं! एखादी वस्तू कोणाचीतरी आहे, म्हणजे ती वस्तू माझी नाही असला काहीतरी निरर्थक तर्क उघड करून दाखवणारा, हा नेहमीचा बदल चेहऱ्यातला!

पण... का म्हणून... का म्हणून सगळं काही कुणाचं तरी असावं आणि माझं नसावं? ठीक आहे, जरी माझी नसली तरी कोणाचीही नाही अशी एकतरी वस्तू असावी की नाही? बांधकामाच्या जागी किंवा तसलं सामान ठेवण्याच्या जागी असलेले काँक्रीटचे पाइप हे माझं घर आहे असा मला कधीकधी भ्रम व्हायचा. मग अगोदर त्या कुणाच्या तरी होण्यासाठी असणाऱ्या वस्तू असायच्या. माझी इच्छा किंवा आवड असो वा नसो, शेवटी त्या वस्तू कुणाच्या तरी वस्तू होण्यासाठी तिथून अदृश्य व्हायच्या. किंवा माझं घर असण्याचा कदापि संभव नसलेल्या वस्तूंमध्ये रुपांतरित व्हायच्या.

ठीक. मग बागेतला बाक कसा काय वाटतो? अर्थातच झकास... हे खरोखरच माझं घर असतं... जर त्यानं हातात दंडुका घेऊन येऊन मला तिथून हाकलून लावलं नसतं तर... ही तर नक्कीच सर्वांची वस्तू आहे. कुणा एकाची नाही. पण तो म्हणतो

कसा, ''ए! ऊठ! ही सार्वजनिक वस्तू आहे. कुणा एकाची नाही. आणि तुझी असण्याची शक्यता नाही. चल, ताबडतोब चालू लाग. नाहीतर कायद्यानुसार तुझी तळघरात रवानगी करतो. त्याशिवाय इतर कोणत्याही जागेवर पाऊल ठेवलंस, तर तू गुन्हा केलायस असा त्याचा अर्थ होईल!''

भटकणारा यहुदी हा शब्दप्रयोग मी ऐकलाय. वाटतं तो माझ्याबद्दलचा उल्लेखच नाही ना?

दिवस संपायला आला. मी चालतच होतो. घरं... अदृश्य न होणारी, रूपं न बदलणारी. तशीच्या तशी जमिनीवर राहून, न हलणारी घरं... त्या घरांच्या मधल्या कोणताही विशिष्ट चेहरा नसलेल्या, बदलत राहणाऱ्या फटी, गल्लीबोळ, रस्ते! पावसाच्या दिवशी घोंगडीच्या लोकरीचे धागे निघतात तसे. हिमवृष्टीच्या दिवशी केवळ गाड्यांच्या चाकोऱ्यांइतकेच रुंद होणारे. वारा वाहील त्या दिवशी पट्ट्यासारखे वाहणारे रस्ते. मी चालतच होतो. मला घर नसण्याचं कारणही समजत नसल्यामुळे गळफासही लावून घेता येत नव्हता.

अरे! कोण आहे ते? माझ्या पायांभोवती वेटोळी घालणारं? जर गळफासाचा दोर असशील तर अशी धांदल करू नकोस रे. इतकी घाई करू नकोस. नाही, नाही, आपली काहीतरी चूक होते आहे. हा तर रेशमाचा चिकट धागा आहे. मी तो पकडून खेचला, तर तो फाटलेल्या बुटाच्या आतून बाहेर येत होता आणि खेचावा तितका लांब लांब वाढतच जात होता. हे काहीतरी वेगळंच प्रकरण दिसतंय. कुतूहलानं मी तो धागा खेचतच राहिलो आणि त्याहून विचित्र प्रकार घडला. माझं शरीर एका बाजूला कललं आणि मला जमिनीशी सरळ काटकोनात उभंच राहता येईना. पृथ्वीचा अक्ष ढळून गुरुत्वाकर्षणाची दिशा बदलली तर नसावी?

माझ्या पायातून बूट टपकन जमिनीवर गळून पडला, तेव्हा कुठे मला खरी परिस्थिती कळून चुकली. जसजसा मी धागा खेचत होतो तसतसा माझा पाय भराभर आखूड होत गेला होता. जीर्ण, झिरझिरीत जाकिटाचं कोपर जसं उसवत जातं, तसा माझा पाय उसवत, मोकळा सुटत चालला होता. तो धागा म्हणजे स्पंजच्या तंतूसारखा अलग होत चाललेला माझा पाय होता.

अरे देवा! आता आणखी एक पाऊलही मला टाकता येत नव्हतं. दिग्मूढ होऊन मी जागच्या जागी उभा राहिलो. तर काय! माझ्याप्रमाणेच दिग्मूढ झालेल्या माझ्या हातात रेशमी धाग्याचं भेंडोळं बनलेला माझा पाय आपल्या आपणच वळवळत होता. तो वळवळत बाहेर आला आणि हाताची बिलकूल मदत न घेता मोकळा होत जाऊन माझ्या शरीराला विळखा घालू लागला. माझा डावा पाय पूर्णपणे सुटून अलग झाला, तसा धागा सहजगत्या उजव्या पायाकडे वळला. धाग्याच्या भेंडोळ्यानं अखेर माझ्या सर्वांगाभोवती पिशवीसारखा विळखा घातला. तरीही धागा सुटायचा थांबेना. धडाकडून छातीकडे, छातीकडून खांद्याकडे, तो भराभरा सुटत गेला. तो सुटत असताना पिशवीला आतल्या बाजूनं बळकटी येत गेली होती आणि अखेर मी अदृश्य झालो!

आता उरला होता एक मोठा रिकामा कोश.

अहाहा! आता एकदाची विश्रांती घेता येईल. मावळतीचा सूर्यप्रकाश कोशाला लाल रंग देत होता. केवळ हेच एक माझं घर आहे. कुणीही अडथळा आणणार नाही असं. पण माझं घर तयार झालं, तर तिथं परत जाण्यासाठी मीच उरलो नव्हतो!

कोशाच्या आत काळ जणू थांबला होता. अंधार पडला तरी कोशाच्या अंतर्भागात सदैव सायंकाळच होती. अंतर्भागातून पडणाऱ्या संध्याप्रकाशामुळे कोशाला लाल झळाळी आली होती. इतकी नवलाईची वस्तू कोणाच्या नजरेतून सुटणं शक्यच नव्हतं. रेल्वे क्रॉसिंग आणि रुळांच्या मध्ये कोश होऊन पडलेल्या मला त्यानं पाहिलं. आधी त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. पण लवकरच आपल्याला एक दुर्मिळ चीज सापडली असल्याचं त्याच्या लक्षात आलं आणि त्यानं उचलून मला खिशात टाकलं. काही काळ मी तिथंच मजेत आराम करत राहिलो आणि त्यानंतर त्याच्या मुलाच्या खेळण्यांच्या पेटीत माझी रवानगी झाली.

***

# द स्वीचमॅन

**मूळ स्पॅनिश लेखक : खुआन खोसे आरेओला**
**भाषांतर : विद्यासागर महाजन**



**परिचय : खुआन खोसे आरेओला**

**(१९१८)**

**मेक्सिकोमधील गुझमान या शहरात १९१८ साली आरेओला यांचा जन्म झाला. लहान वयातच त्यांनी घरगड्यापासून ते इतिहास आणि साहित्य या विषयांचा अभ्यास अशी अनेकविध कामे केली. 'पान' (म्हणजे ब्रेड) हे मासिक सुरू केले. वास्तवता आणि काल्पनिकता यांच्यातील सीमारेषा पुसून टाकणारे, प्रतिमांचा अचूक वापर करणारे त्यांचे लेखन होते.**

**नवी मते, नवे विचार, नव्या पद्धती आणणाऱ्यांची सौंदर्यदृष्टी त्यांनी अंगिकारली होती. गहिरे साहित्यिक संवाद, शब्दांचे खेळ, निवेदनातली जादूमयता... अशा गोष्टींनी त्यांनी आपल्या छोट्या छोट्या कथांत आश्चर्यकारक जोम आणला. आपल्या कथांतून ते वाचकांना एका काल्पनिक जगात अलगद नेऊन सोडतात.**

***प्रस्तुत 'द स्वीचमॅन' या कथेच्या भाषांतरातूनही आपल्याला त्यांच्या या लेखनवैशिष्ट्यांचा प्रत्यय येईल अशी आशा आहे.***

***

**त्या** निर्मनुष्य रेल्वे स्टेशनवर तो परदेशीचा प्रवासी हाशहुश करत आला. त्याच्याजवळची भलीथोरली अवजड सुटकेस कोणीच वाहून न्यायला तयार नव्हतं. ती ओढून ओढून त्याचा चांगलाच दम निघत होता. त्यानं आपल्या चेहऱ्यावरचा घाम रुमालानं पुसला आणि कपाळावर हात आडवा धरून तो क्षितीजरेषांमध्ये हरवलेल्या रुळांच्या रेषा पाहात राहिला. श्रांत, विचारात गढलेल्या अवस्थेत त्यानं घड्याळात किती वाजलेत ते पाहिलं. अगदी गाडी सुटायची वेळ झालीच होती. कुणास ठाऊक कुठून पण एकजण तिथं टपकला. त्यानं मागं वळून पाह्यलं तर समोर एक म्हातारबुवा उभे होते. चेहऱ्यावर रेल्वेखात्यातले संदिग्ध भाव. एका हातात लालटेन धरलेला. लालटेन आकारानं खेळण्यातला वाटावा इतका छोटा.

म्हातारबुवा प्रवाशाकडे स्मित लावून उभे होते. प्रवाशानं त्याला इतका वेळ मनात ठेवलेला प्रश्न मनातली आशा एकवटून विचारला :

: म्हातारबुवा, तुम्हाला काही माहिती आहे का? – म्हणजे गाडी निघून गेली नाहीये ना?

: या मुलुखात तुम्ही नवखे आहात का?

: अहो, मला लगेचच्या लगेच इथून निघालं पाहिजे. उद्याच्या उद्या मला फ ला पोचावंच लागणार आहे, म्हणून विचारतोय.

: म्हणजे काय घडलंय त्याची तुम्हाला काहीच कल्पना दिसत नाही. तुम्ही ताबडतोब आधी आपली राहायची सोय लावा. त्या प्रवासी-निवासात.

असं म्हणून त्यानं राखाडी रंगाच्या एका अजब दिसणाऱ्या इमारतीकडे बोट दाखवलं. प्रवासी-निवास कसला तो तुरूंगच वाटत होता.

: पण मला इथं मुक्काम करायचा नाहीये– मला लगेच पुढच्या गाडीनं निघालं पाहिजे.

: माझं ऐका तुम्ही, आत्ताच्या आत्ता लगेच एक खोली भाड्यानं घेऊन टाका – म्हणजे मिळाली तर! मिळणार असेल तर मात्र एकदम एका महिन्याचं भाडं देऊन टाका. ते स्वस्त पडेल, शिवाय तुम्हाला चांगल्या सोयी देऊ करतील.

: तुमचं डोकं ठिकाणावर आहे ना? अहो, मला उद्याच्या उद्या फ ला पोचावंच लागणार आहे.

: खरं सांगायचं म्हणजे तुम्हाला आता नशिबावरच हवाला ठेवायला लागेल. पण तरीही मी तुम्हाला इथल्या काही महत्त्वाच्या गोष्टींची माहिती देऊन ठेवतो.

: द्या ना!

: तुम्हाला कल्पना आहेच की हा देश इथल्या आगगाड्यांसाठी प्रसिद्ध आहे. पण रेल्वेची अगदी हवी तशी सगळी व्यवस्था अजून लागली नाहीये. तरी पण रेल्वेमार्गाची आणि तिकीटांची छपाई करण्याचे मोठे काम त्यांनी केव्हाच हातावेगळं केलं आहे. आगगाडीच्या मार्गाच्या तक्त्यात तुम्हाला दिसेल की देशातल्या सगळ्या गावांपर्यंत आणि वस्त्यांपर्यंत रेल्वेमार्ग पोचलेत. अगदी छोट्यातल्या छोट्या, आत

आत असलेल्या खेड्यांत जाण्यासाठीही तिकीटं काढता येतात. फक्त तक्त्यातल्या सर्वच्या सर्व मार्गावरून अजून आगगाड्या धावायला सुरुवात झालेली नाही. तेवढं अजून बाकी राह्यलंय. नागरिकांना ते सगळं हवंय, पण कामकाजात जे काय पुढं मागं होतं ते ते खपवून घेतात. काही गोष्टी त्यांना पटल्या नाहीत तरी देशप्रेमामुळे ते आपला असंतोष वाट्टेल तसा प्रकटू देत नाहीत.

: पण या गावावरून जाणारी एखादी गाडी आहे ना?

: आता मी याला हो म्हटलं तर तुमची किंचितशी का होईना दिशाभूल केल्यासारखं होईल. या गावासाठी रेल्वेचे रूळ टाकलेले तुमच्या ध्यानात आले असतीलच की. आता काही लायनी अजून चालू व्हायच्या आहेत हे खरं! काही काही गावांत तर रूळ नसले तरी तिथं रूळांच्या रेषा खडूंनी रंगवून आखल्या आहेत. सध्याची परिस्थिती ध्यानात घेता कुठल्याही गाडीवर इथं थांबण्याचं बंधन ठेवण्यात आलेलं नाही, पण म्हणजे गाड्यांना इथं थांबायला मनाई आहे असं नाही. माझ्या कारकीर्दीत या स्टेशनावर थांबलेल्या तशा बऱ्याच गाड्या मी पाहिल्या आहेत आणि रेटारेटी करून चढलेले काही प्रवासीही माझ्या माहितीचे आहेत. तुम्हाला चालत असेल तर मी स्वत:सुद्धा तुम्हाला मदत करायला तयार आहे, देईन मी बसवून तुम्हाला एखाद्या आरामशीर डब्यात.

: ती गाडी मला फ ला घेऊन जाईल ना?

: त्या गाडीनं तुम्हाला तंतोतंत फ लाच न्यावं हे तुम्ही एवढं का लावून धरताय? तुम्हाला त्या गाडीत बसायला मिळालं तरी खूप झालं. एकदा गाडीत बसलं की ती तुम्हाला कुठं ना कुठं पोचवेलच. तेच तुमचं इप्सित स्थळ! ते गाव अगदी फ नसल्यानं असं काय बिघडणार आहे?

: अहो, म्हणजे फ ला जाण्यासाठीचं चालू तिकीट आहे माझ्याकडे. म्हणजे मी फ च्या गाडीत बसायचं आणि फ ला जायचं असं नाही का?

: तुमचं अगदी बरोबर आहे असं कोणाला म्हणता येईल सांगा बरं! त्या प्रवासी-निवासात जाऊन कोणाशीही बोला म्हणजे तुम्हाला कळेल! त्यांनी खबरदारी घेऊन एकेका प्रवासाची कितीतरी निरनिराळी तिकीटं काढली आहेत. असा अलिखित

नियमच झालाय म्हणा ना की प्रवाशांनीच दूरदर्शीपणा दाखवायचा आणि देशात जिथं म्हणून आगगाडी जाते त्या सगळ्या ठिकाणांची तिकीटं घेऊन ठेवायची, आणि मगच प्रवासाला निघायचं. काही काही जण तर असे आहेत की त्यांनी आपली सारी मालमत्ता तिकिटांसाठी खर्च करून टाकली आहे.

: असं? मला वाटलं की मला एकट्याला फ ला जायला एक तिकीट पुरेल, हे बघा माझं तिकीट!

: एक जण आहे त्यानं आपल्या इप्सित स्थळाला पोचण्यासाठी पुढच्या टप्प्यातला रेल्वेच्या मार्गाचा सारा खर्च एकट्यानं उचलला आहे. त्यासाठी त्यानं आपली अवघी संपत्ती रिती केली आहे. झालंय काय, की या मार्गावर बोगदेच बोगदे आणि पूलच पूल आहेत, पण रेल्वेखात्याच्या तंत्रज्ञांनी या मार्गाच्या बांधकामाला अद्याप मंजुरी दिलेली नाही.

: पण फ ला जायला एखादी तरी गाडी आहे ना? म्हणजे चालू आहे ना?

: तेवढीच एक नाही, या देशात अनेक गाड्या धावतायत. बऱ्याचदा लोक या गाड्यांनी तसा प्रवास करू शकतात. पण गाड्या अगदी नियमित आणि निश्चित धावतील याची शाश्वती नाही हे ध्यानात घेऊनच तुम्ही प्रवासाला निघणं चांगलं. थोडक्यात काय की गाडीत चढताना आपण आपल्या इप्सित स्थळी पोचू अशी कोणालाच अपेक्षा ठेवून चालत नाही.

: असं कसं?

: नागरिकांची सोय व्हावी ही रेल्वे कंपनीची इच्छा आहे. पण काही वेळा कंपनीचा निरूपाय होऊन काही अजब गोष्टी कराव्या लागतात. काही काही गावांहून पुढं जायला गाडीला मार्गच नसतो. मग अशा गावांसाठी कंपनीनं चक्राकार रेल्वेची सोय केली आहे. या गाड्या तर त्या मार्गावरून वर्षानुवर्षे गोल गोल फिरत राहतात आणि मग या काळात प्रवाशांच्या जीवनात अनेक महत्त्वाची स्थित्यंतरं होतात, प्रवाशांना त्या सगळ्यातून जावं लागतं. या दरम्यान काही प्रवाशांचा मृत्यू होणं असंही कधी कधी घडतं. पण रेल्वे कंपनीनं अशा सगळ्या गोष्टींचा दूरदृष्टीनं विचार केला आहे. या चक्राकार रेल्वेमार्गावर कंपनीनं मृतदेह इतमामानं ठेवण्यासाठी खास

डब्यांची सोय केली आहे. एखाद्या प्रवाशाचे शव सडू नये यासाठी प्रेतावर फासायच्या रसायनाचा भरपूर साठा करून ठेवलाय. प्रवाशाचं ज्या स्टेशनाचं तिकीट असेल त्या स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर त्याचं शव उतरवणं ही रेल्वे कंपनीसाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

कधी कधी गाडी अशा मार्गावरून धावते की तिथं फक्त एकाच बाजूला रूळ असतात. त्यामुळं काय होतं की रूळ नसलेल्या बाजूला बसलेल्या प्रवाशांना आगगाडीची चाकं मधल्या लाकडी पट्ट्यांवर जोरात घासून भयानक हादरे बसतात. प्रथम वर्गाच्या प्रवाशांना अगोदरपासूनच रूळ असलेल्या बाजूला जागा दिल्या जातात. रेल्वे कंपनी कसा पुढचा विचार करून ठेवते हेच यावरून दिसत नाही का? दुसऱ्या वर्गाच्या प्रवाशांना निमूटपणे हे हादरे सहन करत प्रवास करावा लागतो. या प्रवासाचे काही टप्पे तर असे आहेत की तिथं दोन्ही बाजूंना रूळ नसतात. अशा ठिकाणी दोन्ही बाजूंच्या प्रवाशांना सारखेच हादरे बसतात. सगळी गाडीच्या गाडी खिळखिळी होऊन खलास झाली की मगच हा त्रास संपतो.

: अरे माझ्या कर्मा!

: बरं का साहेब, अशा योगायोगांमधून, अपघातानं स हे गाव तयार झालं आहे. अशीच एक गाडी नीट वाट नसलेल्या मार्गावरून चालली होती. गाडी वाळूत घुसली. गाडीची चाकं वाळूला घासून घासून चाकांवरचं आवरण निखळलं आणि आतली लोखंडी चक्रं दिसू लागली. गाडी पुढं सरकेना झाली. या प्रवासात बराच काळ लोक एकत्र होते. एकमेकांशी नुसत्या गप्पा मारत होते. मग या रंगलेल्या गप्पांमधून लोकांची एकमेकांशी चांगली सलगी झाली. काही जण तर इतके जवळ आले की त्यांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमसंबंधात झाले. त्याचाच परिपाक म्हणजे स हे गाव. स वेगानं वाढतं आहे. सगळीभर मुलं खोडकरपणा करत हिंडत असतात, तिथल्या वाळूत रुतलेल्या त्या आगगाडीच्या तुटक्या भागांशी खेळत बसतात.

: अरे बापरे! असली भलती सलती साहसं मला कशी जमायची?

: जरा दमानं घ्या. अजिबात उत्तेजित होऊ नका. कुणी सांगावं, उद्या तुम्हीसुद्धा हिरो बनाल. अंगची हिंमत दाखवावी, स्वत:चं बलिदान करण्याची क्षमता सिद्ध

करावी असे भरपूर प्रसंग या प्रवासात तुमच्यावर ओढवतील. अलीकडेच दोनशे प्रवाशांनी रेल्वेप्रवास-इतिहासाच्या पुस्तकातलं सुवर्णपान ठरावं असं दिमाखदार बलिदान केले आहे. झालं असं की एका चाचणी प्रवासात रेल्वेमार्गावरच्या बांधकामात एक फार मोठी गफलत झालेली लक्षात आली. मार्गावरची दरी ओलांडणारा पूल बांधायचा राहून गेला होता. दरीशी आल्यावर ड्रायव्हरनं रेल्वे इंजिन मागे न फिरवायचा निर्णय घेतला. त्यानं प्रवाशांना एकत्र आणून उत्साहित केलं आणि पुढं जाण्यासाठी त्यांना उद्युक्त केलं. त्याच्या बोलण्यामुळे पुलाशिवाय दरी ओलांडण्यासाठीचं बळ त्यांच्या अंगात संचारलं. त्याच्या उत्साही मार्गदर्शनाखाली प्रवाशांनी गाडीचे सगळे भाग सुटे सुटे केले आणि ते भाग खांद्यावर घेऊन ते दरी ओलांडायला निघाले. पण पुढे आणखी एक अनपेक्षित संकट वाढून ठेवलं होतं. ते दरीतून उतरून खाली आले. खाली एक नदी दुथडी भरून वाहत होती. आगगाडी खांद्यांवरून वाहून नेऊन दरी ओलांडण्याचा हा जो पराक्रम त्या प्रवाशांनी करून दाखवला त्यामुळे रेल्वे कंपनी भरून पावली. कंपनीला इतका आनंद झाला की कंपनीनं तो पूल बांधायची योजनाच कायमसाठी रद्द करून टाकली. कंपनीनं जाहीर केलं की अशी जास्तीची संकटं पार करण्याचं धाडस आणि तयारी ज्या प्रवाशांत आहे त्यांना तिकीटांत भरघोस सवलत देण्यात येईल.

: पण मला काहीही करून उद्याच्या उद्या फ ला पोचावंच लागेल.

: फारच छान! तुम्ही आपला हेका सोडत नाही ही गोष्ट मला फार आवडली बघा! तुमचा स्वभाव म्हणजे 'एकदा ठरवलं की ठरवलं' असा आहे, हे लगेच कळतं. असं करा, लगेच त्या प्रवासी निवासात जाऊन आजची रात्र काढा आणि उद्याच्या पहिल्या गाडीनं निघा. तुम्हाला एवढा दम तरी कमीत कमी काढावाच लागेल.

तुम्ही स्टेशनवर जाल तेव्हा गाडीत घुसण्यासाठी हजारो माणसांची चढाओढ लागली असेल. गाडी आली की बराच वेळ वाट पाहून पाहून चिरडीला आलेले प्रवासी गोंधळ गर्दी करून सगळे एकाच वेळेस आत घुसण्याचा प्रयत्न करतील. दुसऱ्याविषयी आदर नाही, कुणाचीही कदर करायची नाही, बेदरकारपणे घुसाघुशी

करायची, यामुळे काहीवेळा अपघातही घडून आलेले आहेत. नीट शिस्तीत गाडीत चढण्याऐवजी सगळेच धक्काबुक्की करतात, काहीच नाही जमलं तर निदान दांडगाईनं आत घुसणाऱ्याच्या मध्ये यायचं. गाडीत कोणाला चढू द्यायचं नाही. मग गाडी तशीच पुढे निघून गेली की प्लॅटफॉर्मवर निषेधाचा थयथयाट करत राहायचं. श्रमून आणि संतापानं वेडे होऊन प्रवाशांनी या दांडगेपणाला लाखोली वाहायची. एकमेकांचा उद्धार करून एकमेकांशी हाणामारी करायची.

: पोलीस मध्ये पडत नाहीत?

: प्रत्येक स्टेशनात पोलिसांची एक तुकडी तैनात करायचा प्रयत्न झाला, पण गाड्यांच्या येण्या-जाण्याच्या अनिश्चित वेळांमुळे ही व्यवस्था प्रभावहीन आणि महागडी ठरू लागली. शिवाय तैनात पोलिसांनी लवकरच लाचखोरी सुरू केली. श्रीमंत प्रवासी त्यांना आपल्याजवळचे सगळे पैसे देऊ करत आणि त्या बदल्यात पोलीस त्यांना दरवाजानं आत-बाहेर करू देत. अखेर कंपनीनं असं ठरवलं की सभ्य वागणुकीचं खास प्रशिक्षण देणाऱ्यांना आणायचं आणि भावी प्रवाशांना शिष्टाचार पाळायचं विशेष प्रशिक्षण द्यायचं. ज्यायोगे त्यांना आपलं उर्वरित आयुष्य आगगाडीच्या प्रवासात सामोपचारानं घालवता येईल. चालत्या गाडीत किंवा वेगानं धावणाऱ्या गाडीत कसं चढायचं त्याचंही शिक्षण त्यांना द्यायचं. इतर प्रवाशांनी त्यांच्या बरगड्या तोडू नयेत म्हणून प्रत्येकाला ज्याच्या-त्याच्या मापाचं चिलखतही देऊ केलं होतं.

: पण एकदा का गाडीत बसलं की मग कोणतीही नवी संकटं प्रवाशांवर येणार नाहीत याची दक्षता घेतली आहे ना?

: म्हटलं तर घेतलीये. जाणारी-येणारी स्टेशनं कोणती ते नीट पाहून ठेवा, एवढंच मी तुम्हाला सांगतो. असंही होईल की तुम्हाला वाटेल की आलं आपलं फ. प्रत्यक्षात तो केवळ एक आभास असेल. गाड्या प्रवाशांनी ठासून भरलेल्या असतात. अशा वेळी गाडीत व्यतीत होणारा वेळ नीट जावा म्हणून कंपनीनं काही निश्चित उपाययोजना केली आहे. काही काही स्टेशनं तर मयसभेतल्यासारखी भासमय उभारली आहेत. गाडी भर जंगलातून जात असताना मध्येच ही स्टेशनं लागतात, त्या स्टेशनांवरची नावं शहरांची वाटावी अशी चांगलीचुंगली असतात. थोडंसं

निरखून पाहिलं तर हा चकवा आहे हे ओळखता येतं. नाटकातल्या नेपथ्यासारखीच ही स्टेशनं उभारली आहेत. खरं वाटावं म्हणून या स्टेशनावर माणसंही उभी असलेली दिसतात, पण प्रत्यक्षात ते लाकडाचे भुसा भरून बनवलेले पुतळे असतात. खुल्या जागेत उभे असल्यानं हे पुतळे थोडे खराब झालेत हे खरं, पण तरी कधीकधी हे पुतळे वास्तवातले वाटतात : त्यांच्या चेहऱ्यावर अनादिअनंत शिणवठा दिसून येतो.

: फ गाव इथून फार लांबवर नाही हे माझं नशिब!

: पण सध्या फारशा थेट गाड्या उपलब्ध नाहीत. मात्र तरीही तुम्ही तुमच्या इच्छेनुसार उद्याच्या उद्या पोचाल अशीसुद्धा एक शक्यता आहेच. ती धुडकवायचं काहीच कारण नाही. रेल्वे कंपनीच्या व्यवस्थापनात काही त्रुटी असल्या तरी कुठेही न थांबता आगगाडी आपला प्रवास चालू ठेवेल असंही घडू शकतं. बघाल तुम्ही! रेल्वेच्या बाबतीत इतक्या सगळ्या गोष्टी घडत असूनही त्या अजिबात ध्यानात न येणारे असेही लोक आहेत. ते फ ला जायचं तिकीट काढतात, गाडी आली की गाडीत चढतात, आणि दुसऱ्या दिवशी वाहक फ स्टेशन आलं की म्हणतो, फ च्या प्रवाशांनी खाली उतरून घ्या. कोणतीही शहानिशा न करता हे प्रवासी स्टेशनावर उतरतात आणि खरोखरी साक्षात फ ला येऊन पोचलेले असतात.

: असं व्हावं म्हणून मला काही प्रयत्न करता येतील का?

: अर्थातच करता येईल. तुम्हाला त्याचा काही उपयोग होईल का नाही ते मात्र सांगता येणार नाही. तुम्ही सगळ्या परींनी प्रयत्न करून पहा. गाडीत चढताना गाडी फ ला खात्रीनं पोचणार अशीच मनाची ठाम समजूत ठेवा. इतर कोणत्याही प्रवाशाशी काही संबंध येऊ देऊ नका. कारण नाहीतर ते एकेक किस्से सांगून तुम्ही रेल्वेवर टाकलेला विश्वास चुकीचा आहे हे तुम्हाला पटवतील, आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांचा धिक्कार करतील.

: काय सांगताय काय तुम्ही हे?

: या ज्या गोष्टी सध्या अवती भवती घडतायत ते ध्यानात घेऊन आता आगगाड्यांमधून गुप्तहेरांनी प्रचंड संख्येनं प्रवास सुरू केलाय. यातल्या बहुसंख्य हेरांनी कंपनीचं मनोधैर्य वाढावं यासाठी स्वत:हून वाहून घेतले आहे. प्रवाशांचं म्हणजे

बोलायचं म्हणून बोलायचं असं चाललेलं असतं. पण कुणाच्याही तोंडून एखादं अगदी साधं वाक्य बाहेर पडलं तरी त्याचे काय अर्थ होऊ शकतात हे त्या हेरांना बरोब्बर कळतं. एखादा अगदी निरुपद्रवी शेरा जरी तोंडून बाहेर पडला तरी तो म्हणजे तुमचं आक्षेपार्ह मत आहे असा अर्थ काढण्यास ते पटाईत असतात. प्रवासात तुमच्या हातून थोडी जरी आगळीक घडली तरी जराही मागेपुढे न पाहता तुम्हाला अटक झालीच म्हणून समजा. मग तुमचं उर्वरित आयुष्य तुम्हाला आगगाडीच्या डब्याचं रूपांतर केलेल्या तुरुंगात घालवावं लागेल. नाहीतर तुम्हाला घनदाट जंगलातल्या एखाद्या नकली स्थानकावर उतरायला भाग पाडतील. तुम्ही आपला कंपनीवर पूर्ण भरवसा ठेवून प्रवास केलेला बरा! शक्य तितकं कमी खायचं, अगदी आपलं फ स्टेशन आलं तरी खाली उतरायचं नाही– म्हणजे आपल्या ओळखीचं कोणीतरी दिसल्याशिवाय.

: पण फ मध्ये माझं कुणीही ओळखीचं नाहीये.

: असं असेल तर तम्हाला दुप्पट दक्षता घ्यावी लागेल. वाटेत अनेक प्रलोभनं तुमच्या सामोरी येतील. बाहेरची दृश्यं पाहावीत म्हणून तुम्ही खिडकीतून बाहेर पाहायला लागाल अन् मोहजालात फसाल. खिडक्यांमधून बसवलेली यंत्रणा अशी काही चावट आहे, ती असे काही देखावे दाखवते की त्यामुळे प्रवाशांच्या इच्छा चाळवल्या जातात. अगदी खंबीर मनाचा मनुष्यही या देखाव्यांना फसू शकतो. काही काही यंत्रणा इंजिन ड्रायव्हरच्या केबिनमधून चालवता येतात. काही यंत्रे गाडीचा आवाज आणि गाडीची हालचाल यांचा असा काही आभास साधतात की गाडी पुढं पुढं धावतीये असं वाटतं, पण प्रत्यक्षात गाडी जागच्या जागीच उभी असते. प्रवाशांना खिडक्यांच्या काचांमधून बाहेर पाहताना वाटतं की किती सुंदर प्रदेशातून गाडी चाललीये.

: पण यामुळं काय साधतं?

: प्रवाशांमध्ये अशांती माजू नये, प्रवाशांना शांत मनानं प्रवास करता यावा, धकाधकीमुळे त्यांनी उत्तेजित होऊ नये या सद्हेतूनं कंपनी सगळं काही करत असते. होता होता एका दिवशी प्रवाशांनी कंपनीच्या सर्वस्पर्शी बाहूत स्वत:ला पूर्णपणे सोपवून द्यावे अशी कंपनीला उमेद आहे. म्हणजे आपण कुठून आलो आणि कुठं चाललो याविषयी प्रवाशांनी पूर्ण निश्चिंत असावं.

: काय हो, तुम्ही या आगगाड्यांमधून बराच प्रवास केलाय ना?

: साहेब, मी एक साधा बावटेवाला आहे. खरं सांगायचं तर मी एक निवृत्त बावटेवाला आहे. गत आयुष्यातल्या रम्य आठवणी काढायला म्हणून मी अधून मधून इथं चक्कर मारतो. मी या आधी कधीही प्रवास केलेला नाही आणि यापुढे कधी करायचा माझा इरादाही नाही. मला प्रवाशांकडून काही हकीगती कळतात. गाड्यांमुळे प्रजानिर्मिती होऊन स गाव तयार झालं हे मला असंच कळालं. गाडीवर तैनात असलेल्या सेवकांना कधीकधी गूढ आदेश दिले जातात. मग ते प्रवाशांना गाडीतून एखाद्या ठिकाणी उतरायची शिफारस करतात, प्रेमळपणे प्रवाशांना सांगतात :

'गाडी एका सुंदर ठिकाणी येऊन पोचलीये. ते पाह्यला इथं उतरायचं' असं सांगून त्यांना तिथं उतरवतात. सांगतात, की इथं गुहा आहेत, धबधबा आहे, प्रसिद्ध ऐतिहासिक प्रासादाचे अवशेष आहेत. या गुहा म्हणा किंवा काय जे असेल ते पाहण्यासाठी इथं पंधरा मिनिटे गाडी थांबेल.

एकदा का सारे प्रवासी विवक्षित अंतरापर्यंत पोचले की गाडी भकभक धूर सोडत पसार होते.

: मग त्या प्रवाशांचं काय?

: ते काही काळ इकडे तिकडे भटकत राहतात. पण मग अखेर एकत्र येतात, आणि एखाद्या ठिकाणी वस्ती करतात. मग अशा अनपेक्षित थांब्यांचं एका छानशा गावात रुपांतर होतं. बाकी सगळ्या जगापासून दूर असलेलं पण निसर्गसंपन्न असं गाव. अशा सुंदर ठिकाणी गाडीतून फक्त निवडक रसरशीत तरुणवर्ग उतरवला जातो, आणि त्यातही बायकांना खास करून मोठ्या संख्येनं सोडलं जातं. कुणालाही ज्ञात नसलेल्या चित्रमय अशा सुंदर ठिकाणी एखाद्या पोरीबरोबर राहायला कोणाला आवडणार नाही?

असं म्हणून त्या म्हातारबुवांनी डोळा मारला आणि त्या परदेशीच्या प्रवाशाकडे तो खट्याळपणे पाहत राहिला. स्मितहास्य करत, सहृदयपणे.

त्याच क्षणी दूरवरून आगगाडीच्या शिट्टीचा आवाज झाला. त्यासरशी त्या बावटेवाल्यानं दचकून जागच्या जागी उडी मारली, आणि वेडेवाकडे विचित्र हातवारे करत आपला लालटेन हातात धरून तो चालता झाला.

परदेशी प्रवाशानं विचारलं, आली गाडी?

तोवर म्हातारबुवा त्या वाटेवरनं तोल गेल्यासारखा सुसाट धावत सुटला होता. विवक्षित अंतरावर पोचल्यावर मागे वळून ओरडला, तुमचं नशीब जोरात आहे, उद्या तुम्ही तुमच्या त्या सुप्रसिद्ध फ ला पोचाल. तुमचं नाव काय म्हणालात?

: प्रवासी उत्तरला, क्ष.

त्याच क्षणी तो म्हातारबुवा त्या सकाळच्या स्वच्छ हवेत विरून गेला. त्याच्या लालटेनच्या दिव्याचा लाल बिंदू तेवढा रुळांमधून उड्या मारत लांब गाडीपर्यंत वेगात दौडत जाताना दिसला.

दूर क्षितिजातून अगदी अपेक्षित असल्यासारखी गाडी जवळ जवळ येताना दिसत होती.

***

# दोन शब्द

मूळ द. अमेरिकन –स्पॅनिश लेखिका:
इसाबेल आयेंदे
भाषांतर: विद्यासागर महाजन



परिचयः इसाबेल आयेंदे

(१९४२)

मोठा वाचकवर्ग लाभलेली लॅटीन अमेरिकेतील लेखिका. जन्म लीमा येथे आणि नंतर चिलीमध्ये वास्तव्य. १९७३ मध्ये सैनिकी उठाव होऊन राजकीय उलथापालथ झाली. या काळात चर्चच्या मदतकार्यात त्यांचा सहभाग होता. गरजूंना अन्न, वस्त्र पुरवणे, आणि सैनिकांनी ताब्यात घेतलेल्यांची सुटका करण्याचा प्रयत्न करणे इत्यादी कामे त्यांनी केली. १९७५ मध्ये व्हेनेझुएला येथे स्थलांतर. पत्रकारितेचे कार्यक्षेत्र.

ला कासा दे लासि एसे्पिरटूस् (द हाऊस ऑफ द स्पिरीट्स्) ही त्यांची पहिलीच कादंबरी जगभर गाजली.स्त्रियांच्या हक्कांची खंदी पुरस्कर्ती म्हणून त्या माहित आहेत. स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून त्यांनी लढा दिला आहे.

मोहून टाकणाऱ्या कल्पनाशक्तीचा प्रत्यय आपल्या लिखाणातून देणारी, लॅटिन अमेरिकन मॅजिक रिअॅलझमची शैली असलेली यशस्वी लेखिका, अशीच यांची ओळख आहे.

*इसाबेल आयेंदे यांनी एव्हा लूना (१९८९) या कादंबरीत डाव्या गटाच्या यादवी युध्दाच्या एका अनाम देशातील वातावरणाचे चित्रण केले आहे. प्रस्तुत 'दोन शब्द' या कथेची नायिका बेलिसा क्रेपुस्कुलारिओ याच प्रदेशातली आहे. ती दारिद्र्यात जन्मलेली, लहानपणीच पोरकी झालेली*

*स्त्री आहे. आपल्या तैलबुद्धीच्या जोरावर आणि गोष्टी रंगवून सांगण्याच्या कलेवर ती आपला उदरनिर्वाह चालवते. कल्पनाविश्वात आणि लेखिकेनं शोधून काढलेल्या अफलातून जगात विरघळून जाणारे वास्तव तिच्या लेखनातून दिसते.*

----------

**ति**चं नावं बेलिसा क्रेपुस्कुलारिओ. पण हे नाव तिचा बाप्तीस्मा करुन कुणी ठेवलं नव्हतं की तिच्या आईनंही तिला दिलं नव्हतं. हे नाव सापडेपर्यंत तिचं तीच शोधत राहिली आणि सापडल्यावर तिनं ते धारण केलं.

*शब्दांची विक्री करणे* हा तिचा उद्योग होता. सगळा मुलुखभर ती फिरत असायची. अगदी उंच पर्वतराजीतील थंडगार ठिकाणांपासून ते समुद्रकिनाऱ्यावरील उष्ण हवामानातल्या गावापर्यंत ती पोचायची. उत्सवात, जत्रेत,बाजारात जाऊन धडकायची. उन्हा-पावसापासून बचाव करण्यासाठी आपला चार काठ्यांचा तागाच्या कापडाचे आच्छादन असलेला तंबू ठोकायची. त्यात बसून आपल्या ग्राहकांना सेवा पुरवायची. आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची तिला गरज नव्हती, कारण सदोदित इकडे तिकडे फिरून फिरून ती सर्वांना माहित झाली होती. वर्ष वर्ष तिची वाट पाहणारेही लोक होते. आपली साहित्य- सामुग्री काखोटीला मारून ती गावात आली रे आली की लोक तिच्या छोट्याशा दुकानासमोर रांगा लावायचे. आपल्या शब्दांची ती वाजवी किंमत घ्यायची. पाठ करायच्या पद्यपंक्तींसाठी पाच सेंट्स आकारायची, सात सेंट्स घेऊन ती स्वप्नातला गोडवा वाढवून द्यायची, प्रेमपत्रासाठी नऊ सेंट्स मोजावे लागायचे. आडमुठ्या विरोधकांचा प्रभावी पाणउतारा करणाऱ्या शब्दांसाठी बारा सेंट्सचा दर होता. याशिवाय तिच्याकडे कहाण्या, गोष्टीसुध्दा विकायला होत्या. पण या कहाण्या काल्पनिक नव्हत्या, तर खऱ्याखुऱ्या घडलेल्या आणि चांगल्या मोठाल्या गोष्टी होत्या. ती संपूर्ण गोष्टच्या गोष्ट काहीही न गाळता, कुठंही उड्या न मारता एका दमात, एका ओघात सांगायची. अशा तऱ्हेनं ती एका गावातल्या गोष्टी दुसऱ्या गावाला घेऊन जायची. त्यामुळे दरवेळी तिला नवनव्या गोष्टी सांगता यायच्या. विशिष्ट प्रसंगाला साजेशी एखाद- दुसरी ओळ तिनं सुचवावी म्हणून लोक तिला पैसे द्यायचे, मूल जन्मलं, फलाणा मेला, मुलांची लग्नं लागली,

पिकं जळाली अशा प्रसंगावर बोलण्यासाठी लोक तिच्याकडून चार दोन वाक्यं विकत घ्यायची. ती जाईल तिथं तिचं बोलणं ऐकायला लोक गर्दी करायचे. मग त्यांना इतर ठिकाणी लोक कसे जगतात ते कळायचं, त्यांच्या दूरच्या नातेवाईकांची हालहवाल कळायची आणि यादवी युध्दाबद्दल बारीक सारीक माहिती मिळायची. तिच्याकडून पन्नास सेंट्सूची खरेदी करणाऱ्याला ती एक गुप्त शब्द मोफत भेट द्यायची. सगळं औदासीन्य पळवून लावणारा असा तो शब्द असायचा. अर्थातच प्रत्येकाला ती वेगळा शब्द द्यायची. सगळ्यांना तिनं एकच शब्द दिला असता तर ती एक *सामुहिक फसवणूकच* झाली असती.प्रत्येकाला त्याचा त्याचा खास शब्द खात्रीनं मिळायचा. उभ्या विश्वात किंवा त्याही पलिकडे दुसरा कुणीही हा शब्द वापरणार नाही याची हमी दिलेली असायची.

बेलिसा क्रेपुस्कुलारिओचा जन्म एका अतिशय दरिद्री कुटुंबात झाला होता. दारिद्र्य इतकं की आपल्या मुलीला नाव द्यायचीही त्या कुटुंबाची ऐपत नव्हती. ती या जगात जन्माला आली आणि जगण्यासाठी सर्वार्थानं प्रतिकूल अशा एका गावात लहानाची मोठी झाली. ते ठिकाण असं होतं की तिथं पाऊस पडायचा आणि त्याचं रूपांतर बर्फात होऊन तो बर्फ आपल्याबरोबर सर्व काही वाहून न्यायचा, मग सलग काही वर्षं आकाशातून पावसाचा एकही थेंब पडायचा नाही, सर्वदूर सूर्याचं ऊन क्षितिजापर्यंत पसरायचं आणि त्या संपूर्ण प्रदेशाचं रूपांतर एका ओसाड प्रदेशात होऊन जायचं.

बारा वर्षांची होईपर्यंत बेलिसा काहीच करत नव्हती, तिला काही येतही नव्हतं.आपल्या भुकेवर आणि त्या प्रांतात शिरलेल्या शतकानुशतकांच्या मरगळीवर मात करून ती तग धरून होती इतकंच. दुष्काळ संपता संपत नव्हता. त्यातच तिला आपल्या चार भावांचा दफनविधी करावा लागला. लवकरच आता आपल्यावरही हीच पाळी येणार आहे हे तिला कळून चुकलं. मग तिनं आपलं गाव सोडून जायचा निर्णय घेतला.

सपाट भू-प्रदेश पालथे घालत ती समुद्राच्या दिशेनं निघाली. प्रवासाला जावं आणि मृत्यूला हूल देणं जमतयं का ते तरी पहावं असा तिनं विचार केला.वाटेवरचा सारा प्रदेश वैराण होता. खोलवर दुभंगलेली, खडकाळ अशी जमीन होती.झाडे

वाळून नष्ट होऊन त्यांचे अवशेष उरले होते, बाकी नुसती काटेरी झुडूपं होती, मेलेल्या प्राण्यांचे सांगाडे उष्णतेमुळे वाळून पांढरे फटफटीत पडले होते. वाटेत तिला काही कुटुंबं अशीच तिच्यासारखी दक्षिणेच्या रोखानं मृगजळामागे जाताना दिसली. त्यापैकी काहीजण निघताना आपल्या चीजवस्तू खांद्यावरून म्हणा, छोट्या हातगाड्यातून म्हणा वाहून नेत होते. खरं म्हणजे आपले स्वत:चे हातपायही हलवायचे त्यांच्या अंगात त्राण नव्हते. म्हणून मग थोडंसं अंतर चालून गेल्यावर त्यांना आपल्या चीजवस्तू वाटेतच सोडून देणं भाग पडत होतं.ते मुश्किलीनं आपले पाय ओढत चालत होते. त्यांच्या अंगाला पालीच्या कातड्याचा रंग आला होता. कडक ऊन डोळे भाजून काढत होते. बेलिसा त्यांच्याशी जुजबी बोलून, नमस्कार करून त्यांच्यासाठी न थांबता पुढं निघून जात होती. कारण त्यांना सहानुभूती दाखवण्यासाठी आपली उरलीसुरली शक्ती खर्ची पाडणं तिला शक्य नव्हतं. त्यांच्यापैकी अनेकजण वाटेतच कोसळून पडली.पण त्यांचा तो नरकवास कठोरपणे तसाच ओलांडून ती पुढे जात राहिली. अखेर ती वाटेवरच्या पहिल्या पहिल्या झऱ्यांपाशी येऊन पोचली. झरे कसले बारीक बारीक ओघळच होते, सहजी नजरेत न येणारे.तुरळक वाढलेल्या वनस्पतींना त्यांचे पाणी मिळत होते. त्यांच्या खूपसं पुढं गेल्यावर जरा आणखी मोठे झरे आणि वाढलेली झुडूपं तिला दिसली.

बेलिसानं आपला तर जीव वाचवला. शिवाय नंतर तिला अगदी योगायोगानं लिहिण्या-वाचण्याची कला गवसली. किनाऱ्याजवळच्या एका गावात ती पोचली तेव्हा वर्तमानपत्राचं एक पान वाऱ्यानं उडतउडत येऊन तिच्या पायाला लटकलं. तिनं ते पिवळट, काहीसं जीर्ण झालेलं पान उचललं आणि बराच वेळ ती त्याचं निरीक्षण करत राहिली. ते कसलं, काय, कशासाठी आहे हे तिला कळेना.तिची उत्कंठा इतकी ताणली गेली की तिची भीड चेपली. आणि तिथंच त्या चिखल झालेल्या डबक्यात आपला घोडा धुणाऱ्या एका इसमाकडं जाऊन तिनं त्याला विचारलं, *'हे काय आहे?'*

तिचं अज्ञान पाहून तो इसम चकीत झाला. पण त्यानं आपल्या चेहऱ्यावर आश्चर्य दाखवलं नाही. तो तिला म्हणाला, *'हे एका वर्तमानपत्रातलं क्रीडा-जगताची माहिती देणारं पान आहे.'*

हे उत्तर ऐकून ती पोर उडालीच. आपलं बोलणं त्या इसमाला आगाऊपणाचं वाटू नये म्हणून ती जरा बेताबेतानंच त्याच्याशी बोलत राहिली. त्या पानावर उठलेली माशीच्या पायांची नक्षी हा काय प्रकार आहे हे तिनं विचारून घेतलं.

– *'ते शब्द आहेत पोरी. फुलखेनसिओ बार्बा नावाच्या मुष्टियोध्द्यानं नेग्रो तिझानोचा तिसऱ्या फेरीत पराभव केला असं त्यात लिहीलंय.'*

त्या दिवशी बेलिसाला कळून आलं की शब्दांना कोणी मालक नसतो, ते सुटे असतात. कुणीही ते वापरायला मोकळा असतो. फक्त जरा हुशारी पाहिजे, मग कुणीही त्यांच्यावर हुकमत गाजवून त्यांचा वापर करून व्यवसाय करू शकतो. आपण कोणत्या परिस्थितीतून जातोय हे तिला कळत होतं. तिला वाटलं की वेश्याव्यवसायापेक्षा किंवा एखाद्या श्रीमंत माणसाच्या घरात स्वयंपाकीण म्हणून काम करण्यापेक्षा असा दुसरा काहीतरी उद्योग आपल्याला करता येईल. शब्द विकण्याचा व्यवसाय तिला खूपच सभ्यपणाचा वाटला.

त्या क्षणापासून तिनं याच एका उद्योगाला वाहून घेतले. दुसरं काहीही करण्यात तिला स्वारस्य वाटलं नाही. वर्तमानपत्राच्या बाहेरही शब्द लिहिले जाऊ शकतात याची खात्री झाल्यावर तिनं शब्दविक्रीच्या व्यवसायाला सुरूवात केली. शब्दांची मोजदाद करायला ती शिकली, तसं तिच्या लक्षात आलं की शब्दांची व्याप्ती अमर्याद आहे. मग तिनं आपल्या गावातून येताना वाचवलेल्या पैशातून एका धर्मोपदेशकाला वीस पेसो दिले. त्याच्याकडून त्या बदल्यात लिहिणं-वाचणं शिकून घेतलं. उरलेल्या तीन पेसोंचा तिनं एक शब्दकोश विकत घेतला. त्यातल्या ए पासून झेड पर्यंत सगळ्या शब्दांचं तिनं पठण केलं आणि नंतर लगेच तो शब्दकोश समुद्रात फेकून दिला. कारण जसेच्या तसे तयार शब्द देऊन तिला आपल्या ग्राहकांची फसवणूक करायची नव्हती.

त्यानंतर बऱ्याच वर्षांनी एक घटना घडली. ऑगस्ट महिन्याची सकाळ होती. एका गावच्या मध्यवस्तीतल्या चौकात बेलिसा क्रेपुसकुलारिओ आपलं दुकान टाकून बसली होती. निवृत्तीवेतन मिळावं म्हणून गेली सतरा वर्षे झगडणाऱ्या एका म्हाताऱ्याकडून न्यायालयात आपलं म्हणणं कसं मांडावं ते घटवून घेत होती. अर्थातच पैसे घेऊन. तो बाजाराचा दिवस होता. तिच्याभोवती बराच गोंगाट चालू होता.

अचानक तिच्या कानावर घोड्यांच्या टापांचा आवाज पडला, पाठेपाठ लोकांच्या किंकाळ्या ऐकू आल्या.तिनं आपल्या कागदपत्रांवरून नजर उचलली तर आधी एक धुळीचा ढग नजरेत आला आणि नंतर जिप्सी लोकांची एका टोळी तिथं जबरदस्तीनं घुसल्याचं तिला दिसलं.

ते यादवी युद्द करणाऱ्या कर्नलचे सैनिक होते.त्याचा खास माणूस असलेल्या मिश्रवंशीय मुलातोच्या नेतृत्वाखाली ती टोळी तिथं येऊन धडकली होती. आपला चाकू चलाखीनं आणि चपळाईनं चालवण्यासाठी मुलातो त्या पंचक्रोशीत प्रसिध्द होता. कर्नलशी तो एकनिष्ठ होता. कर्नल आणि मुलातो, दोघांनीही आपलं सारं आयुष्य यादवी युध्द करण्यात घालवलं होतं. गावोगावी जाऊन अचानक हल्ले करायचे, विध्वंस घडवून आणायचा हेच या दोघांचं कर्तृत्व, अशा अचानक कोसळणाऱ्या संकटांशी त्यांची नावं निर्विवादपणे जोडली जात होती.

हिंस्र जनावरांचा कळप चालून यावा तसे ते बंडखोर सैनिक वाटेवरचं सगळं काही तुडवत तुडवत त्या गावात आले. एकच गदारोळ उडाला. घामानं निथळणारे ते सैनिक भयभीत करून सोडणाऱ्या वादळासारखेच तिथं येऊन धडकले. घोड्यांच्या टापांच्या आवाजासरशी कोंबड्या उधळल्या, बंदुकीचे बार उडाले तशी कुत्र्यांनी धूम ठोकली, आपापल्या पोरांना घेऊन बायका सैरावैरा धावू लागल्या.

बेलिसा क्रेपुसकुलारिओखेरीज त्या बाजारात दुसरं एकही माणूस उरलं नाही. तिनं कधीही मुलातोला पाहिलं नव्हतं, आणि म्हणूनच त्याला आपल्या रोखानं येताना पाहून तिला आश्चर्य वाटलं. आपल्या पिळदार चाबकानं तिच्याकडे निर्देश करून मुलातो ओरडला,

'आम्ही तुलाच शोधतोय.'

त्याचं बोलणं पूर्ण व्हायच्या आत दोन सैनिक तिच्यापुढं आले, त्यांनी तिचा तंबू जमीनदोस्त केला, तिचं लिखाण सामान मोडून तोडून टाकलं, तिचे हातपाय दोरानं बांधले आणि नाविकाच्या लांबूळक्या पिशवीसारखं मुलातोच्या घोड्याच्या पुठ्ठ्यावर आडवं टाकून दिलं. मग घोडे टेकडीच्या दिशेनं वळवून भरधाव टापा टाकत ते पसार झाले.

तासन्तास ती तशीच लटकलेल्या अवस्थेत आडवी पडून होती. घोड्याच्या थडथड उडण्यामुळे तिचं हृदय वाळूसारखं विदीर्ण झालं होतं. ती जवळपास मरायलाच टेकली होती, तेवढ्यात तिला ते थांबले आहेत असं जाणवलं. चार मजबूत हातांनी तिला उचलून जमिनीवर ठेवलं. आपण उठून उभं राहावं आणि आब राखून डोकं वर उचलून सभोवताली पाहावं म्हणून तिनं प्रयत्न केला, पण तिच्या अंगात काही ताकदच उरली नव्हती. तिच्या तोंडून एक हुंकार बाहेर पडला,आणि ती पुन्हा जमिनीवर कोसळली, एका भ्रमिष्ट स्वप्नात खोलवर बुडून गेली.

त्या मोकळ्या जागेतल्या परिसरात होणाऱ्या रात्रीच्या किर्रर आवाजानं तिला बऱ्याच वेळानं जाग आली. ते आवाज कसले आहेत त्याची चाहूल घ्यायला तिला वेळच मिळाला नाही. कारण तिनं डोळे उघडले तर तिला मुलातोचा अस्वस्थ चेहरा समोर दिसला. तिच्या पुढ्यातच तो गुडघे टेकून बसला होता.

तिच्या तोंडाजवळ ब्रँडीची बाटली नेत तो म्हणाला,

*'बाई, अखेर जागी झालीस म्हणायचं.'*

तिला जरा तरतरी यावी म्हणून त्या ब्रँडीत बंदुकीच्या गोळीची किंचितशी पावडर मिसळली होती.

आपल्याला इतकी वाईट वागणूक का दिली जातीय हे तिला जाणून घ्यायचं होतं. तिच्याकडं कर्नलचं एक महत्त्वाचं काम आहे असं मुलातोनं तिला सांगितलं. तिला तोंडावरून पाण्याचा हात फिरवायची परवानगी दिली, आणि लगोलग तो तिला त्या मोकळ्या जागेच्या अगदी कोपऱ्यात घेऊन गेला.

त्या देशात दहशत निर्माण करणारा कर्नल तिथं झाडांना टांगलेल्या एका झुल्यावर पहुडला होता. तिला त्याचा चेहरा दिसू शकत नव्हता. त्याच्या चेहऱ्यावर झाडांच्या पानांची सावली पडल्यासारखी वाटत होती, पण वास्तविक ती खरी सावली नव्हती.अनेक वर्षे लुटारूसारखी व्यतीत केल्यामुळं चेहऱ्याला आलेली ती काळी झांक होती. ती कधीही पुसून निघणार नव्हती. तिला असंही वाटून गेलं की धाकदपटशा आणि दहशतीचं ते प्रतिबिंब आहे. म्हणूनच त्याचा हा महाकाय साथीदार त्याच्याशी इतकं अदबीनं बोलत असणार. कर्नलचा आवाज इतका मृदू कसा याचं तिला आश्चर्य वाटलं. एखाद्या प्रभावी व्याख्यात्यासारखे त्याच्या आवाजात छान चढ-उतार होत होते.

त्या कर्नलनं तिला विचारलं, *'तूच का ती शब्द विकणारी?'*

त्या अर्धवट प्रकाशात त्याचा चेहरा नीट दिसावा म्हणून मान वर करून पाहत ती अडखळत म्हणाली, *'तुझ्या सेवेसाठी हजर आहे.'*

कर्नल झुल्यावरून उठून उभा राहिला. मुलातोनं धरलेल्या पलित्याचा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडला.त्याचा रापलेला, गडद वर्ण आणि त्याचे सिंहासारखे हिंस्र डोळे तिला दिसले.या जगातला सर्वात एकाकी माणूस आपल्यासमोर उभा आहे हे तिला कळून चुकलं.

तो म्हणाला, *'मला या देशाचा राष्ट्राध्यक्ष होण्याची इच्छा आहे.'*

या वैतागवाण्या मुलुखात हमखास हरणाऱ्या निष्फळ लढाया लढत, गरागरा फिरून तो थकून गेला होता. कोणत्याही युक्त्याप्रयुक्त्या करून त्या जिंकता येत नव्हत्या. अनेकवर्षे तो उघड्यावर झोपत होता. डासांचं चावणं, घोरपडीचं मांस खाणं आणि सापाचं सूप पिणं असं जिणं तो जगत होता. आपलं आयुष्य बदलून टाकावंसं त्याला वाटत होतं त्याचं कारण या छोट्या छोट्या अडचणी नव्हत्या, तर इतर माणसांच्या डोळ्यांत त्याच्याविषयी उमटणारी भीतीची भावना पाहणं त्याला नकोसं झालं होतं. त्याला गावागावांतून विजयोत्सवाच्या मिरवणुकीतून मिरवायचं होतं, रंगीबेरंगी फडकत्या झेंड्यांच्या वाटेवरून जावं आणि फुलांच्या माळांनी आपलं स्वागत व्हावं असं त्याला वाटत होतं. लोकांनी त्याचा जयजयकार करावा, त्याला गरमागरम आमलेटचा आणि घरी भाजलेल्या ताज्या पावाचा पाहुणचार करावा याची आंस त्याला लागली होती. तो गावात आला रे आला की गावातली पुरूषमाणसं कशी लपून बसतात, बायका कशा घाबरून जातात आणि सारे प्राणिमात्र कसे थरथरू लागतात हे पाहून त्याला स्वत:चाच तिटकारा वाटत होता, आणि म्हणूनच त्यानं राष्ट्राध्यक्ष व्हायचं मनावर घेतलं होतं.

*सरळ दौडत दौडत राजधानीत जाऊन आपण सरकारचा ताबा घेऊ* असं त्याला मुलातोनं सुचवलं होतं. नाहीतरी ते आजवर अशाच पध्दतीनं कुणालाही न विचारता, कुणाच्या परवानगीची वाट न पाहता अनेक गोष्टींचा कब्जा घेत होते. पण कर्नलला आता दुसरा जुलमी राज्यकर्ता बनायची इच्छा नव्हती. आजपर्यंत त्या देशात असेच अनेक जुलमी राज्यकर्ते होऊन गेले होते.शिवाय अशी जबरदस्तीनं

सत्ता मिळवून त्याला जनतेच्या प्रेमाचा लाभ झाला नसता.आपण डिसेंबरच्या निवडणुकीत सर्वाधिक बहुमतानं निवडून यावं अशी त्याची इच्छा होती.

त्यानं बेलिसा क्रेपुस्कुलारिओला विचारलं, *'मला तू निवडणुकीला उभ्या राहिलेल्या उमेदवाराचं भाषण तयार करून देशील का?'*

आजवर तिनं शब्दांच्या अनेक मागण्या पुऱ्या केल्या होत्या, पण तिच्याकडे अशी मागणी कधी कुणी केली नव्हती. पण ती कर्नलला नकार देऊ शकणार नव्हती. मुलातो तिच्या डोळ्यांच्यामधून गोळी घालेल अशी भीती तर होतीच, पण त्याहीपेक्षा कर्नलला कोणत्याही क्षणी रडू फुटेल याची तिला जास्त भीती वाटत होती. दुसरं म्हणजे त्याला मदत करायची उत्कट इच्छा तिच्या मनात उत्पन्न झाली होती. कारण त्याच्या धपापणाऱ्या छातीतून बाहेर पडणाऱ्या उष्णतेची धग तिच्या अंगात शिरू लागली होती. त्याला-त्या पुरूषाला-स्पर्श करण्याची अनावर इच्छा तिला झाली. आपल्या हातांनी त्याला कुरवाळावं आणि कवेत घ्यावं अशा भावनेनं तिला वेढून टाकलं.

राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवाराचं भाषण तयार करण्यासाठी आपल्या पोतडीतून चपखल शब्द शोधण्यात बेलिसा क्रेपुस्कुलारिओनं ती संपूर्ण रात्र आणि आणि पुढचा जवळजवळ सबंध दिवस घालवला.

तिच्यावर पहारा देत मुलातो तिच्या बाजूलाच उभा होता. एरवी सतत भ्रमंती करणाऱ्या त्या स्त्रीचे पाय एकाच जागी जणु रूतून बसले होते. त्या पायांवरून आणि तिच्या कुमार स्तनभारांवरून एकही क्षण नजर न हलवता तो उभा होता.

कर्नलसाठीचे भाषण तयार करताना आपल्या शब्दसंग्रहातले कठोर आणि कोरडे शब्द तिनं वगळले. पिंजारलेले, प्रतिस्पर्ध्यावर हल्ला करू न शकणारे, अशक्य कोटीतली आश्वासनं देणारे, सत्यांश नसलेले अन् विचारांचा गोंधळ असणारे सारे शब्द तिनं बाजूला ठेवले. पुरूषवर्गाच्या विचारशक्तीला स्पर्श करून त्याला आपल्याकडे खात्रीनं वळवणारे, स्त्री वर्गाचा भावनिक कल ओळखणारे असेच शब्द तिनं भाषणात वापरले. त्या धर्मोपदेशकाला वीस पेसो देऊन मिळवलेले ज्ञान तिनं उपयोगात आणून तयार केलेले भाषण एका कागदावर लिहून काढले. मग तिनं त्या

मुलातोला खुणावून जवळ बोलावलं. झाडाला दोरीनं बांधून ठेवलेले आपले पाय मोकळे करायला तिनं त्याला सांगितलं. तो कर्नल विसावला होता तिथं तिला पुन्हा नेण्यात आलं. त्याला पाहून तिच्या हृदयात पुन्हा धडधड सुरू झाली. पुन्हा तशीच अनावर ओढ तिच्या मनात निर्माण झाली. त्याच्या हाती भाषणाचा तो कागद देऊन त्याच्या प्रतिक्रियेसाठी ती तिथंच थांबली. तो कागद हाताच्या बोटांत धरून कर्नल त्याकडे निरखून पाहू लागला. अखेर त्यानं तिला विचारलं, *'ही काय भानगड आहे?'*

*'तुला वाचता येत नाही?'*

*'मला फक्त लढाया करता येतात.'*

मग तिनं त्या कागदावर लिहून काढलेलं भाषण त्याला मोठ्यानं वाचून दाखवलं. आपल्या ग्राहकाच्या जिभेवर ते लीलया खेळावं म्हणून तिनं ते तीनवेळा वाचलं. बाकीचे सैनिकही भाषण ऐकायला तिथं जमले होते. वाचून संपल्यावर तिनं त्या सैनिकांच्या चेहऱ्यावरचे भाव अजमावले. तिला कर्नलच्या डोळ्यांत उत्साह संचारल्याची चमक दिसली. हे भाषण करून राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक आपण निश्चित जिंकू असा आत्मविश्वास त्याच्या मनात निर्माण झाला होता.

मुलातो म्हणाला, *'हे भाषण चांगला प्रभाव पाडणार यात शंका नाही. कारण पहा जरा, हे भाषण तीन वेळा ऐकल्यानंतरही या सैनिकांचा आ वासलेलाच राह्यलाय.'*

कर्नलनं तिला विचारलं, *'याचे किती द्यायचे तुला?'*

'कर्नलसाहेब, *एक पेसो झालाय.'*

*'म्हणजे फार महाग नाही. '*

असं म्हणून त्यानं कमरेला नुकत्याच केलेल्या लुटालुटीतून मिळालेली कमरेला लटकावलेली पिशवी खोलली.

बेलिसा क्रेपुस्कुलारिओनं त्याला सांगितलं, शिवाय या भाषणाबरोबर तुला आणखी दोन शब्द असेच वर मिळतील, भेट म्हणून. गुपित धारण केलेले दोन शब्द.

'म्हणजे कसं?'

तिनं त्याला समजावून सांगितलं, ग्राहकाकडून तिला मिळणाऱ्या प्रत्येक ५० सेंटस्च्या फी मागे ती त्याला तिनं खास वेचलेला, फक्त तो ग्राहकच वापरू शकेल असा एक गुप्त शब्द मोफत देऊ करते.

त्यानं खांदे उडवले. तिनं देऊ केलेल्या या खास शब्दात त्या कर्नलला काडीचंही स्वारस्य नव्हतं. पण तरी त्यानं ते दोन गुप्त शब्द घेतले, कारण तिनं त्याच्यासाठी एवढं छान भाषण तयार केलं होतं आणि चांगुलपणानं वर ती ते शब्दही देऊ करत होती.

तो एका चामड्याच्या मोढ्यावर बसला होता.ती सावकाश त्याच्या जवळ गेली, आणि आपली गुप्त शब्दांची भेट देण्यासाठी त्याच्यापुढं झुकली. तेव्हा डोंगरदऱ्यात फिरणाऱ्या वाघिणीच्या अंगातून बाहेर पडतो तसा तिच्या शरीराला गंध होता, तो त्याच्या नाकात शिरला. तिच्या नितंबांचा धगधगीत स्पर्श त्याला झाला. तिचे केस त्याच्या अंगाला घासून गेले त्या मुलायम स्पर्शानं तो घायाळ झाला.

ती त्याच्या कानात त्याला मिळालेले गुपीत कुजबुजली तेव्हा त्याला आपल्याला मदभरा झुळूकस्पर्श होतोय असं वाटलं.

निघता निघता ती म्हणाली, *'हे गुपित आता तुझे आहे. तुझ्या मनाला येईल तेव्हा ते तू वापरू शकतोस.'*

मग मुलातो बेलिसा क्रेपुस्कूलारिओला परतीच्या वाटेवर घेऊन गेला. तिच्याकडे तो गोंधळलेल्या कुत्र्यासारखा दीनवाण्या नजरेनं पाहत होता. पण तिला स्पर्श करायला त्यानं हात पसरले तेव्हा तिनं एक अमोघ शब्दप्रवाह वापरून त्याचे हात तिथल्या तिथं थांबवून ठेवले. त्या शब्दप्रवाहात दुसऱ्याच्या कामेच्छा थोपवण्याची ताकद होती. कारण त्याचा हेतू चांगला नाही असं तिचं मत झालं होतं.

सप्टेंबर,ऑक्टोबर आणि डिसेंबरमध्ये कर्नलनं इतक्या वेळा ते भाषण ठोकलं की बस्स! अतिशय टिकाऊ आणि तेजोमय अशा शब्दांनी ते भाषण बांधलेलं होतं म्हणून बरं, नाहीतर पुन्हा पुन्हा सारखं सारखं तेच ते वापरून वापरून त्याचा केव्हाच कोळसा झाला असता. त्यानं उभा देश पालथा घातला. फडकत्या विजयपताकांच्या मार्गावरून त्यानं शहराशहरांतून प्रवेश केला. कुणाच्या खिजगणतीतही नसलेल्या लहानशा खेड्यांतूनही तो जाऊन आला. मानवनिर्मित कचरा एवढीच मनुष्यवस्तीची साक्ष देणारीही काही ठिकाणं होती. आपला मतदार जिथं म्हणून असेल तिथं तिथं जाऊन त्यानं त्यांना पटवलं. तो जेव्हा गावातल्या मध्यवस्तीतल्या चौथऱ्यावर

जाऊन भाषण द्यायचा तेव्हा मुलातो आणि त्याचे सहकारी लोकांना चॉकलेट-गोळ्या वाटायचे आणि भिंतीभिंतीवर कर्नलचं नाव सुवर्णाक्षरात लिहून ठेवायचे.पण लोकांनी या जाहिरातबाजीला फारसं महत्त्व दिलं नाही. ते कर्नलच्या सरळसोट प्रस्तावांनी,त्याच्या काव्यात्म, चमकदार वक्तव्यांनी थक्क होऊन गेलेले असायचे. त्याच्या विचाराची-भूतकाळातल्या चुका दुरूस्त करण्याच्या त्यानं व्यक्त केलेल्या इच्छांची- लागण झालेली असायची.आयुष्यात प्रथमच त्यांना एवढा मोठा आनंद मिळालेला असायचा.

आपल्या उमेदवाराची-कर्नलची- प्रचारसभा संपल्यावर त्याचे सैनिक हवेत बंदुकीचे बार उडवायचे आणि फटाक्यांची आतषबाजी करायचे.एखादा प्रचंड धूमकेतू आकाशात बरेच दिवस रेंगाळावा तशी आशा वातावरणात आणि लोकांच्या मनात जागवून ते गाव सोडायचे. लवकरच कर्नल एक अतिशय लोकप्रिय राजकीय नेता बनला. अंगभर लढाऊ जखमांचे व्रण असलेल्या,एखाद्या कॅथलिकाप्रमाणे धडाधडा बोलणाऱ्या, यादवी युध्दे लढत वर आलेल्या अशा या माणसानं न भूतो न भविष्यति असा करिष्मा केला. त्याची ख्याती आणि प्रतिष्ठा देशभर पसरली. *हलचल माजवून* तो जनतेच्या गळ्यातला ताईत बनला. प्रसिध्दीमाध्यमे त्याच्यावर भरभरून लिहू लागली.दूरदूर मुलुखातून येऊन पत्रकार त्याच्या मुलाखती घेऊ लागले, त्याची वाक्यं पुन्हा पुन्हा उद्‌धृत करू लागले.त्यामुळं त्याच्या पाठीराख्यांची आणि शत्रुंचीही संख्या वाढली. यशोमंडित असे बारा आठवडे सरल्यावर मुलातो कर्नलला म्हणाला, 'आपला विजय नक्की आहे.'

पण आता तो राष्ट्राध्यक्षपदाचा उमेदवार त्याचं बोलणं ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. आता तो त्याला भेट मिळालेले ते दोन गुप्त शब्द मनाशी रोज घोकू लागला होता. केवळ त्याचे असलेले ते गुपित तो दिवसच्या दिवस मनाशी घोळवत होता.

आठवणींनी विव्हल होऊन तो त्या शब्दांची हळुवारपणे उजळणी करत होता, झोपताना तीच पुटपुट करत होता, घोड्यांवर स्वार होतानाही तेच त्याच्या साथीला होते. आपलं गाजलेलं भाषण सुरू करण्याआधी तो त्यांचा उच्चार करत होता,विसावा घेताना त्यांना मनसोक्त कुरवाळत होता. ते शब्द मनात उमटले की बेलिसा क्रेपुस्कुलारिओची मूर्ति तो आपल्या मन:चक्षूंसमोर उभी करायचा.तिच्या अंगांगातून

उमलणारी डोंगरदऱ्यातली ती गंधस्मृति त्याला बेभान करून टाकायची. तिच्या निकट सान्निध्यानं जाणवलेली धग, त्याच्या शरीरावरून फिरणाऱ्या तिच्या केसांचा घायाळ करून टाकणारा संभार, तिचा तो धुंद करणारा झुळुकस्पर्श... या सगळ्याची जाणीव झाली की झोपेत चालणाऱ्या माणसासारखी त्याची अवस्था होऊन जायची.त्याच्या पदरच्या सैनिकांना कळून चुकलं की राष्ट्राध्यक्षाच्या खुर्चीवर विराजमान होण्याआधीच याचा खेळ आटपणार आहे.

मुलातोनं त्याला अनेक वेळा विचारलं होतं, *'कर्नल काय झालंय, असं का होतंय?'*

अखेर कर्नलला आपल्या अशा अवस्थेचं कारण मुलातोला सांगणं भाग पडलं.

*आपल्या उरात खोलवर रूतून बसलेले ते दोन गुप्त शब्द हेच आपल्या या अवस्थेचं कारण आहे,* हे त्याला कबूल करावं लागलं.

त्याचा निष्ठावंत सहकारी असलेला मुलातो म्हणाला, *'चल, मला सांगून टाक ते शब्द. बघू, त्यामुळं त्यांची जादू नाहीशी होतेय का?'*

कर्नल त्यावर उत्तरला, *'नाही ना रे बाबा, मला ते असे दुसऱ्याला सांगता यायचे नाहीत. ते फक्त माझ्यासाठी माझ्यापुरतेच आहेत.'*

आपल्या नेत्याची अशी फाशी जाणाऱ्या कैद्यासारखी झालेली अवस्था मुलातोला पाहवेना. त्यानं आपली बंदूक खांद्यावर टाकली आणि तो बेलिसा क्रेपुस्कुलारिओच्या शोधात निघाला.

तिचा माग काढण्यासाठी त्यानं विस्तीर्ण प्रदेश पालथे घातले. अखेर ती त्याला दक्षिणेच्या एका खेड्यात सापडली. आपलं दुकान मांडून जमलेल्या लोकांना गावोगावच्या गोष्टी सांगत ती बसली होती. आपले दोन्ही पाय फाकवून बंदूक रोखून मुलातो तिच्यासमोर उभा ठाकला.

ती जणु त्याची वाटच पाहत होती. तिनं आपलं लिखाणसामान आवरलं, तागाचा तंबु गुंडाळला, खांद्याभोवती शाल पांघरली आणि काहीही न बोलता ती घोड्याच्या पाठीवर खोगीरावर चढून बसली. संपूर्ण वाटेत ते एकमेकांशी एक चकार शब्दही बोलले नाहीत, की त्यांनी एकमेकांकडे नजरेचा एक कटाक्षही टाकला नाही.

कारण तिच्याविषयी मुलातोच्या मनात आधी जी लालसा उत्पन्न झाली होती, तिची जागा आता डोक्यात चढलेल्या संतापानं घेतली होती.आपल्या मंतरलेल्या शब्दांची करणी करून ती आपल्याला घोड्यावर चाबुकही उगारून देणार नाही अशी भीती त्याला वाटली. कर्नल वास्तवाचं भान सुटून पूर्ण हरवून गेलाय, त्याच्या कानात कुजुबजलेल्या त्या दोन शब्दांमुळे लढाई करायची त्याची इच्छाही पार लोपली आहे, हे तिला सांगण्याची त्याला बिलकूल इच्छा नव्हती. तीन दिवसांनी ते मुक्कामावर पोचले. त्या कैद करून आणलेल्या स्त्रीला मुलातोनं आपल्या सर्व सैनिकांसमोरून तत्काळ कर्नलकडे आणलं.

*'या बाईला मी पुन्हा तुझ्याकडं घेऊन आलोय. देऊन टाक तिला तिचे शब्द परत! म्हणजे ती तुला तुझं शौर्य परत करेल.''*

असं म्हणून त्यानं आपल्या बंदुकीची नळी त्या बाईच्या गळ्याला लावली.


कर्नल आणि बेलिसा एकमेकांपासून काही अंतरावर उभे होते, ते जागच्या जागी उभं राहून बराच वेळ एकमेकांचा अंदाज घेत एकमेकांकडे टक लावून बघत राह्यले. कर्नलला त्याच्यावर त्या दोन शब्दांच्या झालेल्या जादूपासून स्वत:ची सुटका करून घेता येणार नाही हे त्याच्या सैनिकांच्या लक्षात आलं. कारण जेव्हा ती पुढं झाली आणि तिनं त्याचा हात आपल्या हातात घेतला तेव्हा त्याची सिंहाची, इतरांना फाडून खाणारी नजर आता पाळीव बनली आहे हे सर्वांना स्पष्ट दिसून आलं.


***

एच/१००-(११-२०१७)

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१.







गेल्या चाळीस -पन्नास वर्षांत जर्मन, फ्रेंच, रशियन अशा भाषांच्या साहित्यात नेमके काय व्यक्त झाले, तेथील लेखकांच्या अभिव्यक्तीतून, कथा-कादंबऱ्यांच्या आशयातून, त्या आशयाच्या मांडणीतून, कोणत्या प्रकारचे वाङ्मयीन उद्‌गार, हुंकार मांडले आहेत, त्यांच्या समाजातील स्थित्यंतरांचे पडसाद वाङ्मयात उमटले आहेत का, का व्यक्तिकेंद्री, व्यक्तिसापेक्ष साहित्य तिथे लोकप्रिय ठरले, त्यांचे कथावाङ्मय आपल्या कथावाङ्मयाशी मिळतेजुळते आहे का, तेथील लेखकांना कोणत्या प्रश्नांनी, समस्यांनी अस्वस्थ करून सोडले आहे हे आणि असे अनेक प्रश्न आजच्या सजग आणि रसिक वाचकांना पडले आहेत. या प्रश्नांना थोड्याफार प्रमाणात समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न आम्ही सदर कथासंग्रहाद्वारे करत आहोत. जागतिक भाषांमधील निवडक समकालीन कथा वाचकांसमोर या संग्रहाद्वारे ठेवताना मराठी वाचकांना त्या त्या भाषेतील समकालीन साहित्याच्या भल्यामोठ्या दालनाचे दार जरासे किलकिले करून दिले आहे.



मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे



